(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

पृ.शी. : मराठवाड्याच्या विविध क्षेत्रात असलेल्या अनुशेषामुळे विकासावर झालेला विपरीत परिणाम

मु.शी. : मराठवाड्याच्या विविध क्षेत्रात असलेल्या अनुशेषामुळे विकासावर झालेला विपरीत परिणाम या विषयावर सर्वश्री. विक्रम काळे, अमरसिंह पंडित, अमरनाथ राजूरकर, सतीश चव्हाण, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री. अब्दुल्ला खान दुर्राणी, धनंजय मुंडे, हेमंत टकले, सुभाष चव्हाण, विनायक मेटे, दिलीपराव देशमुख, सुभाष झांबड, राणा जगजितसिंह पाटील, रमेश शेंडगे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाच्या चर्चेसाठी 1 तास 55 मिनिटांचा वेळ दिला आहे. काही वेळा अशा प्रस्तावांवर 4-5 तास चर्चा झाली आहे. मी तेवढा वेळ मागत नाही. परंतु, या प्रस्तावावरील चर्चेसाठी अधिकचा एक तास मिळावा, अशी मी विनंती करतो.

श्री. अमरनाथ राजुरकर : सभापती महोदय, आमचाही या विनंतीला पाठिंबा आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, प्रस्तावरील चर्चा सुरू करावी. विधानसभेत देखील विदर्भ व मराठवाडा या जिल्ह्यांतील सिंचनाच्या विषयावरील चर्चा आजच्या कामकाजपत्रिकेवर ठेवण्यात आली आहे. मी अर्ध्या तासापेक्षा कमी उत्तर देऊ शकणार नाही.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मग उद्या सकाळी 1 तास वेळ देण्यात यावा.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, तसे करता येणार नाही. त्यानंतर प्रश्नोत्तरे आहेत.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझी या प्रस्तावालाच हरकत आहे.

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, प्रस्तावावरील चर्चा मान्य केली आहे. आपण प्रस्तावावरील चर्चा सुरू करावी. विधानसभेत देखील जलसंपदा विभागाचे दोन प्रस्ताव चर्चेसाठी घेण्यात आलेले आहेत. माझी विनंती आहे की, चर्चा सुरू करावी, चर्चा मर्यादित ठेवावी आणि सरकारकडून उत्तर घ्यावे.

(नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, हा प्रस्ताव चर्चेला येण्यापूर्वी मला याबाबत हरकत घ्यावयाची आहे. हा प्रश्न न्यायप्रविष्ट आहे. मराठवाड्याला किती पाणी द्यावयाचे, त्या भागाला आजपर्यंत किती पाणी देण्यात आलेले आहे, या ठिकाणाहून पाणी द्यावयाचे आहे त्या ठिकाणी पाण्याची किती गरज आहे, तेथे पाण्याचा साठा किती आहे, मराठवाड्यात पाणी साठा किती उपलब्ध आहे या सर्व गोष्टी न्यायप्रविष्ट आहेत. मराठवाड्याला आजपर्यंत किती पाणी दिलेले आहे ते मंत्री महोदयांनी वेळोवेळी सांगितलेले आहे. तसेच माननीय उप मुख्यमंत्र्यांनी निवेदनही केलेले आहे. जानेवारी, 2014 पर्यंत माननीय उच्च न्यायालयाने मुदतवाढ दिलेली आहे. ही वस्तुस्थिती असताना सन्माननीय सदस्यांकडून सभागृहाची दिशाभूल केली जात आहे. विनाकारण हा प्रस्ताव मांडून सन्माननीय सदस्यांना चर्चेत सहभागी होण्यास भाग पाडत आहेत. चर्चेच्या निमित्ताने विविध गोष्टी रेकॉर्डवर आणल्या जात आहेत. ज्या सन्माननीय सदस्यांनी हा प्रस्ताव उपस्थित केलेला आहे त्यांना पाण्याचा इतका कळवळा असेल तर त्यांनी प्रथम त्यांच्या भागातील बियरच्या फॅक्टरीज बंद कराव्यात. त्यामुळे हा प्रस्ताव चर्चेला घ्यावयाचा की नाही याबाबत आपण निर्देश द्यावेत.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : आजच्या कामकाजपत्रिकेवर अनेक प्रस्ताव आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करावी.

(सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, एखादा विषय कोर्टात आहे की नाही हे पाहण्याचे काम सरकारचे आहे. विधिमंडळ हे सर्वोच्च आहे. या सभागृहात सर्व कामकाज प्रचलित पध्दतीनुसार व कायद्यानुसार चालते. या प्रस्तावाबाबत आम्ही अभ्यास केलेला आहे. पण मागील 3 दिवसापासून कामकाज पत्रिकेवर हा प्रस्ताव येऊनही त्यावर चर्चा होऊ शकली नाही. त्यामुळे या प्रस्तावाबाबत आक्षेप घेणे चुकीचे आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी आता जे वक्तव्य केलेले आहे ते कामकाजातून काढून टाकण्यात यावे, ही माझी मागणी आहे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, ही बाब न्याय प्रविष्ट असताना आपण या प्रस्तावावर चर्चा सुरु करण्यास परवानगी देत आहात का ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांना सभागृहातून बाहेर नेण्यासाठी आपण मार्शलला बोलवावे.

श्री.जयवंतराव जाधव : हा माझा अधिकार आहे. सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चा सुरु करण्याबाबत आपण निदेश दिले आहेत का ?

तालिका सभापती : होय.

श्री.जयवंतराव जाधव : आपण चर्चा सुरु करण्यास अनुमती दिली असल्यामुळे मी या प्रस्तावाचा निषेध करुन सभात्याग करीत आहे.

(सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव हे बहिर्गमन करतात.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"महाराष्ट्रात विलीन झाल्यापासून अद्यापही मराठवाड्याचा सिंचन, औद्योगिक, रस्ते, वीज, रेल्वे या क्षेत्रामध्ये असलेला मोठा अनुशेष, या अनुशेषामुळे या विभागाच्या सर्वांगीण विकासावर झालेला विपरीत परिणाम, परिणामी तेथील जनतेमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, विशेषत: जायकवाडी हे एकमेव मोठे धरण मराठवाड्यासाठी उपलब्ध असताना या धरणात पाणी साठा होऊ नये अशा प्रकारे इतर धरणांचे बांधकाम करण्यास शासनाने मान्यता देणे, मराठवाड्यात नवीन धरणाचे बांधकाम न करता हक्काच्या पाण्यापासून मराठवाड्याच्या जनतेला वंचित ठेवण्यात येणे, मराठवाड्यातील लोकप्रतिनिधीनी याकडे शासनाचे लक्ष वेधल्यानंतर पाणी देण्याची योजना आखण्याऐवजी शासनाने व प्राधिकरणाने कायदे व नियम बदलण्याची भूमिका घेणे, न्यायालयामधील विविध याचिकांचे कारण सांगून मराठवाड्यातील जनतेला पाणी न देणे, राज्य शासनाने तातडीने पाण्याच्या समान वाटपाची नितांत आवश्यकता लक्षात घेऊन त्यानुसार पाणीवाटपाचे धोरण ठरवण्याची गरज, पाणी वाटपाचे धोरण तातडीने राबविण्यासाठी करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, आपण परवानगी दिल्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो आणि या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करतो. सभापती महोदय, जायकवाडी प्रकल्पाचा विषय अर्थसंकल्पीय अधिवेशनातही मी उपस्थित केला होता. त्यावेळी अलीकडे व पलीकडे बसणारे सन्माननीय सदस्य तेच आहेत आणि मंत्री महोदय सुध्दा तेच आहेत. त्यावेळी उपस्थित करण्यात आलेला प्रस्ताव आम्ही पुन्हा आज मांडत आहेत. जायकवाडी धरण हा मराठवाड्यातील प्रमुख व जीवनदायी प्रकल्प आहे. त्या धरणामुळे 1 लाख 83 हजार हेक्टर जमीन ओलिताखाली येते. त्यामुळे हा साक्षात कामधेनू प्रकल्प आहे. परंतु या प्रकल्पाबाबत आता सामाजिक व राजकीय चर्चा होत चालली आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित....

या पाण्याच्या विषयामध्ये उत्तर महाराष्ट्रातील राज्यकर्ते दिवसेंदिवस अधिकाधिक राजकारण करु लागलेले आहेत. वास्तविक पहाता आमच्याकडे अतिरिक्त पाऊस झाला नव्हता, आमच्याकडे महापूर नव्हता. परंतु नाशिकला अतिरिक्त पाऊस पडल्यामुळे त्याठिकाणी महापूर आला. या महापूराचे पाणी आमच्याकडे सोडण्यात आले. वरची सगळी धरणे भरली. पावसाचे पाणी इतक्या मोठ्या प्रमाणावर येत होते की धरणातील पाणी गोदावरी नदीमध्ये सोडण्याशिवाय पर्याय नव्हता. 1 लाख 20 क्युकेक्स पाणी गोदावरी नदीत सोडण्यात आले आणि आमच्या भागामध्ये पुराची परिस्थिती नसताना देखील महापुराला आम्हाला सामोरे जावे लागले. एकट्या गेवराई तालुक्यातील 62 गावातील लोकांच्या संसाराची राखरांगोळी गोदावरी नदीमध्ये सोडलेल्या पाण्यामुळे झाली. वास्तविक हा महापूर आमच्या भागातील नव्हता. नाशिकमध्ये पडलेल्या पाण्याचे नीट नियोजन शासनकर्त्यांना करता आले नाही. यावेळी देखील आम्ही हे सहन केले. जायकवाडीला पाणी मिळाले नाही. कराराने बंधनकारक असताना सुध्दा आज केवळ शब्दच्छल करुन काल माननीय उच्च न्यायालयामध्ये राज्य सरकारच्या वतीने, उत्तर महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांच्या वतीने एक याचिका दाखल करण्यात आली होती. त्या याचिकेमध्ये राज्य सरकारने शपथपत्र देखील दिलेले आहे. दुदैवाने मला सांगावेसे वाटते की, या शपथपत्राच्या माध्यमातून या मराठवाड्याच्या विरोधात एक कटकारस्थान या राज्य सरकारच्या वतीने करण्यात येत आहे.

सभापती महोदय, मी 12 (6) (क) या विषयी सविस्तर बोलणार नाही. समन्यायी पाणीवाटपाच्या धोरणानुसार कोणत्याही परिस्थितीमध्ये 15 ऑक्टोबरला वरच्या धरणातील पाणी सोडूया असे मागील अधिवेशनामध्ये सरकारने या सभागृहामध्ये मराठवाड्यातील जनतेला एक वचन दिले होते. पण 15 ऑक्टोबर तारीख उलटून गेली. जेव्हा पाणी सोडण्याची वेळ आली त्यावेळी मुंबई उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्यात आली. त्या याचिकेमध्ये असे म्हटलेले आहे की, फक्त 33 टक्क्यापेक्षा कमी जिवंतसाठा असेल तरच उर्ध्व भागातील पाणी सोडण्यात येईल. याच भूमिकेमुळे समन्याची पाणी वाटप आणि सर्व धरणात समान प्रमाणात पाणी साठा उपलब्ध करणे या कायद्यातील मूळ तरतुदीचे पालन करण्याची इच्छा नाही हे स्पष्टपणे दिसून येते. फक्त पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी तुम्ही वरुन पाणी सोडणार आहात. मी अतिशय

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित...

जबाबदारीने सांगतो की, फक्त पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी समन्यायी वाटपाचे तत्व शासनाने स्वीकारलेले आहे. जायकवाडी धरणाच्या लाभक्षेत्रातील 40 हजार हेक्टर क्षेत्रातील लोकांना केवळ एक आवर्तन म्हणजे एक रोटेशन पाणी मिळणार आहे. उर्ध्व भागातील शेतकऱ्यांसाठी पूर्ण हिवाळयामध्ये 5 पाण्याची व्यवस्था करण्यात आली. किंबहुना अधिकची काळजी वरच्या भागातील लोकांची घेण्यात येते. मग आम्ही महाराष्ट्रातील नाही काय ? मराठवाडा हा महाराष्ट्रामध्ये नाही काय ? आम्ही महाराष्ट्रामध्ये सामील झालो ही आमची चूक झाली काय ? मी मागच्यावेळी बोललो होतो की, निजाम बरा. त्यावेळी माझ्यावर टीका करण्यात आली होती. परंतु त्या मागची भूमिका अशी होती की निजामाने काही निर्णय केले होते, कदाचित ते चुकीचे असू शकतील, परंतु त्याने निर्णय केले होते. परंतु या पाण्याच्या बाबतीत राज्य शासन निर्णय करायला तयार नाही. आम्ही मराठवाड्यातील लोक महाराष्ट्रातील नाही काय ? काल आम्ही वर्तमानपत्रातील बातम्या वाचल्या की, विदर्भातील लोक स्वतंत्र विदर्भाची मागणी करीत आहेत. आता अतिशय जबाबदारीने म्हणावेसे वाटते की, विदर्भाप्रमाणे उद्या मराठवाड्यातील जनता देखील स्वतंत्र मराठवाड्याची मागणी घेऊन पुढे आले तर त्यामध्ये आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. आज आम्हाला असे वाटू लागले आहे की जाणीवपूर्वक मराठवाड्याला बाजूला ठेवण्याचे काम हे सरकार करायला लागलेले आहे. आम्हाला एक आवर्तन द्यायचे झाले तर त्यासाठी 4.52 टीएमसी पाणी लागते. 5 रोटेशन्स द्यायचे झाले तर 25 टीएमसी पाणी लागेल. या धरणाची क्षमता 100 टीएमसी आहे. शासनाने न्यायालयामध्ये दाखल केलेल्या शपथ पत्रामध्ये शासनाने मान्य केलेले आहे की, त्या धरणामध्ये 6 टीएमसी सिल्ट आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

त्या ठिकाणी 7 टी.एम.सी.गाळ आहे. 27 टीएमसी पाण्यात 7 टीएमसी गाळ असल्यामुळे 24 टीएमसी पाणी शिल्लक आहे. जायकवाडी धरणावर 314 नळयोजना आहेत. औरंगाबाद, गेवराई, अंबड येथील नळ योजना या धरणाच्या पाण्यातून चालतात आणि दोन-चार दिवसापूर्वी जालनाची वॉटर स्कीम जायकवाडीमधून गेलेली आहे. साधारणत: 314 नळ योजनांचे अवलंबत्व जायकवाडी धरणावर आहे. त्या ठिकाणी उद्योग सुरु आहेत, ते उद्योग बंद करण्याचे धोरण या राज्य शासनाचे आहे काय अशी शंका आम्हाला येऊ लागलेली आहे. जायकवाडी धरणातील पाणी शेतीला उपलब्ध करुन द्यावयाचे नाही. केवळ जायकवाडीमधून पिण्याचे पाणी देण्याचे ठरविले तर वरच्या भागातील धरणे 90 टक्क्यांपेक्षा अधिक भरलेली आहेत. 100 टक्के जायकवाडीचे धरण भरुन घ्यावे असे आम्ही म्हणत नाही. आमची एक माफक मागणी आहे की, किमान 50 टक्के पाणी जायकवाडी धरणात सोडा आणि पाच रोटेशन प्रमाणे मराठवाडयातील शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करुन द्यावे. आम्हाला त्या ठिकाणी ऊस लावावयाचा आहे असे नाही. 5 रोटेशनमध्ये आमचे शेतकरी शेती करण्यास तयार आहेत. परंतु या बाबतीत राज्य सरकारचे धोरण पुरेसे नाही. एका रोटेशनमध्ये भूईमुगाचे पीक होते. दुसरे पीक घेता येत नाही. गव्हाचे पीक घेता येत नाही. मराठवाडयातील शेतकऱ्यांनी एक नवीन तंत्रज्ञान शोधून काढलेले आहे.

सभापती महोदय, आपण ऊसाचा खोडवा ऐकला असेल. परंतु मराठवाडयात आता कापसाचा खोडवा सुरु झालेला आहे. कापूस पीक चार महिन्यात येते. वास्तविक डिसेंबर, जानेवारीमध्ये कापसाची काढणी पूर्णपणे संपून जाते. आमचे शेतकरी आता कापसाच्या खोडव्याला पुन्हा पाणी देतो, त्या खोडव्याला जगवितो. मार्चमध्ये दुसऱ्या कापसाच्या बोंडाची वाट पाहतो. आता आम्ही खोडव्यापासून कापूस उत्पादित करु लागलो आहोत. आपल्या माहितीत पुढे असे म्हटले आहे की, 15ऑक्टोबर नंतर जिवंत साठा जो काही आहे, टंचाई अथवा तुटीची परिस्थिती झाली म्हणजे जानेवारी, फेब्रुवारीमध्ये नदीचे पात्र कोरडे झाले त्यानंतर तुम्ही पाणी सोडण्याचा शासन स्तरावर विचार करणार. नदीचे पात्र कोरडे झाले, त्यावेळेस तुम्ही घोषणा करणार की, आम्ही 10 टीएमसी पाणी सोडतो.10 टीएमसी पाणी सोडल्यानंतर उत्तर महाराष्ट्रातील शेतकरी कॅनॉल, चाऱ्या भरुन घेतात, त्यामुळे आमच्या वाटेला फक्त एक ते सव्वा टीएमसी पाणी येते.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित....

सभापती महोदय, 10टीएमसी पाणी सोडल्यानंतर उत्तर महाराष्ट्रातील लोक घरातील हंडे, पिंप, जुन्या काळातील रांझणे देखील भरुन घेतात की काय अशा प्रकारची शंका मला वाटू लागली आहे. खालच्या लोकांना पाणीच मिळू द्यावयाचे नाही असा संकुचित दृष्टीकोन का आहे ? खालच्या बाजूला जसे कॅनिबल्स व स्कॅवेंजर्स आहेत अशा पध्दतीने उत्तर महाराष्ट्रातील लोकांचा आमच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन आहे.

सभापती महोदय, जायकवाडी धरणाच्या संदर्भात यदाकदाचित शासनाला हा निर्णय निकाली काढावयाचा असेल, हा वाद निकाली काढावयाचा असेल, तर माझी शासनाला विनंती आहे की, हे जे प्रकरण उच्च न्यायालयात आहे. ते तेथून काढून घेऊन एकत्रितरित्या चर्चा करुन हा विषय मिटविला नाही तर भविष्यातील लढा हा दुसऱ्या, तिसऱ्या कारणसाठी न होता तो पाण्यासाठी उभा राहील.

महोदय, मी सातत्याने एका गोष्टीचा उल्लेख करीत आलो आहे आणि विषयासंबंधीचा उल्लेख मी पक्षाच्या बैठकीत केला. या विषयाच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांना तीन-चार वेळा पत्रे लिहिली आहेत. शासनाला या विषयाच्या बाबतीत अनेक पत्रे लिहिलेली आहेत. 18 टीएमसीचा निकाल गेल्या अधिवेशनामध्ये माननीय मंत्री महोदयांनी अतिशय सुस्पष्ट भाषेत सांगितला. 18 टीएमसीच्या संदर्भात राज्य शासन निर्णय घेत आहे. त्यांनी घोषणा असा शब्द प्रयोग त्यावेळी वापरलेला आहे. राज्य सरकारच्या वतीने अमुक अमुक तारखेच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय करुन आम्ही तो निर्णय माननीय राज्यपालांना कळवितो. विभागाने तसा निर्णय केला. दिनांक 1 ऑगस्ट, 2013 रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंबंधीचा निर्णय झाला. 18 टीएमसीची कामे सुरु करण्याचा निर्णय त्या बैठकीत घेतला गेला. आता 1 ऑगस्ट, 2014 हे वर्ष येण्याची वेळ झालेली आहे. माझ्याकडे कार्यालयीन माहितीचे एक डाक्यूमेंट आहे. मराठवाडयातील 76 प्रकल्प असे आहेत की, जे सुधारित प्रशासकीय मान्यते अभावी प्रलंबित आहेत.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित.....

उदाहरण द्यायचे झाले तर गेवराई तालुक्यातील पांग्री प्रकल्पाचे देता येईल. तीन वर्षापूर्वी हा प्रकल्प पूर्ण झाला. मातीकाम पूर्ण झाले असून त्या प्रकल्पात पाणी अडविण्याच्या हेतूने, गॉर्जचे काम पूर्ण करण्याच्या हेतूने आणि भूसंपादनाचे पैसे देण्याच्या हेतूने सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रकरण राज्य सरकारकडे पाठविण्यात आले. तीन वर्षापूर्वी प्रकल्प पूर्ण होऊन केवळ गॉर्जचे काम करुन पाणी अडविल्यानंतर शेतकऱ्यांना निश्चितपणे लाभ मिळणार आहे. अशा वेळेला मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, नांदेड, लातूर, हिंगोली या सातही जिल्हयातील 76 प्रकल्प पूर्ण झाले तर 37 टीएमसी पाणी नव्याने मराठवाड्यामध्ये थांबणार आहे. हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 1400 कोटी रुपये आवश्यक आहेत.

सभापती महोदय, आज गोदावरी खोरे विकास महामंडळाकडे 222 कोटी रुपये अखर्चित आहेत. सुप्रमा न मिळाल्यामुळे हे 222 कोटी रुपये अखर्चित राहिले आहेत. अशा प्रकारचे धोरण तुम्ही मराठवाड्याच्या संदर्भात स्वीकारलेले असेल, जाणीवपूर्वक राज्य सरकार मराठवाड्याला बाजूला काढायचा प्रयत्न करीत असेल तर आम्ही कोणाकडे पहायचे? या सभागृहाशिवाय आम्हाला दुसरा पर्याय राहिलेला नाही.

सभापती महोदय, साधारणपणे हे 76 प्रकल्प पूर्ण झाले तर 37 टीएमसी आमच्या हक्काचे पाणी उपलब्ध होणार आहे. आज 527 टीएमसी पाणी मराठवाड्याच्या वाट्याला आलेले असले तरी त्यापैकी केवळ 252 टीएमसी पाणी अडविले जात आहे. उर्वरित पाणी वाहून जात आहे. तुम्ही आंध्रप्रदेश राज्याशी करार करुन गोदावरी खोऱ्याचे पाणी दिले जाते. कृष्णा खोऱ्यामधील 12 टीएमसी पाणी अधिकचे तेथे थांबविले जाते. आमच्या संसाराची राखरांगोळी झाली तरी हरकत नाही. पण त्यांचे भले करायला निघाले आहात. हे सरकार उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्राचे आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील लोकांना आपले हक्काचे म्हणणे मांडण्यासाठी हे व्यासपीठ नाही?

सभापती महोदय, आज उपलब्ध 527 टीएमसी पाण्यापैकी 252 टीएमसी पाणी अडविले जात आहे. आम्ही सरकारला जाब विचारीत आहोत. गोदावरी खोऱ्यातील तूट तुम्ही भरुन काढणार आहात. उत्तर महाराष्ट्रातील लोकांना आम्हाला पाणी द्यायचे नाही म्हटले ते मान्य आहे. परंतु गोदावरी खोऱ्यातील तूट आज कशी भरुन काढणार आहात? ज्यावेळी आमचा विषय येतो,

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित.....

चर्चा होते तेव्हा सांगितले जाते की, वैतरणेचे पाणी नाशिकला आणणार, नारपाराचे पाणी नाशिकला आणून ते गोदावरीमध्ये आणणार आहोत. वैतरणेचे पाणी वर आणून ती सुध्दा व्यवस्था अगोदर केली तर त्या प्रकल्पाचेही चाऱ्या आणि कॅनॉल पूर्ण झालेले आहेत. केवळ डिस्प्यूट निर्माण करण्याच्या हेतूने उच्च न्यायालयात भंडारदरा धरण जायकवाडी धरणाच्या अगोदरचे आहे अशा प्रकारचे ॲफिडेव्हीट दाखल करण्यात आले. नव्याने उत्तर महाराष्ट्रातील लोकांनी काल असे ॲफिडेव्हीट दाखल केले आहे की, जायकवाडी धरणापूर्वीचे भंडारदरा धरण आहे. पाण्याचे ऑडिट करतो त्यावेळी भंडारदरा धरण त्यातून वगळण्यात यावे असे सांगण्यात आले. जायकवाडी धरण निर्माण करीत असताना भंडारदरा धरणातील पाणी गृहीत धरुन त्यावेळी पाण्याची उपलब्धता कॅल्क्युलेट करण्यात आली होती. त्यावेळी जायकवाडी धरण निर्माण करण्यात आले. तत्कालीन मुख्यमंत्री स्व.शंकरराव चव्हाण यांनी कोपरगाव, राहुरी येथे जायकवाडी धरण निर्माण करण्याच्या दृष्टीने बैठका घेतल्या होत्या. त्याची नोंद ज्येष्ठ मंडळींच्या भाषणात असल्याचे लायब्ररीमध्ये पहावयास मिळाले.

नंतर एफ.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित..

भंडारदरा धरणातील वॉटर अकौंटीबिलीटी चेक करून सगळे मान्य करण्यात आले. तरी देखील भंडारदरा यातून वगळण्यात यावे असे म्हणत असाल तर यामागे आपले षडयंत्र आहे. हे प्रकरण माननीय उच्च न्यायालयामध्ये वाद म्हणून बाजूला टाकून द्यायचे व कोणत्याही परिस्थितीमध्ये मराठवाड्यातील लोकांना पाणी मिळू द्यायचे नाही असा चंगच उत्तर महाराष्ट्रातील लोकांनी बांधला आहे अशी शंका वाटू लागली आहे.

मी अधिक खोलवर जाणार नाही. पाण्यासंबंधी माझे विचार अतिशय स्पष्टपणे मांडले आहेत. वर्तमानपत्रातून येणाऱ्या बातम्यासंबंधी माझा एक प्रश्न शासनाला आहे. माननीय मुख्यमंत्री आज येथे उपस्थित असते तर तो प्रश्न मी त्यांना धाडसाने विचारला असता. प्रकल्पाची किंमत वाढली अशा वर्तमानपत्रात बातम्या यायच्या. 5 कोटीची किंमत 12 कोटी झाली अशा प्रकारच्या बातम्या यायच्या. ही किंमत अचानक कशी काय वाढली ? 18 टीएमसीचे प्रस्ताव आहेत. दोन वर्षे झालीत तरी 76 प्रस्तावांना सुप्रमा मिळत नाही. हे सर्व प्रस्ताव दोन वर्षापासून मंत्रालयात पडून आहेत. दोन वर्षाचा डीएसआर आणि आजचा डीएसआर यात फरक हा येणारच. उद्या शासनाने या प्रस्तावांना मान्यता दिल्या नंतर सहा महिन्यांनी कामे सुरू झाली तर प्रकल्पाच्या किंमतीमध्ये निश्चितच वाढ होईल. अचानकपणे मराठवाड्यातील सर्व कामांची चर्चा घडवून आणली जाते. पाटबंधाऱ्यांच्या कामामध्ये एक टक्का, दोन टक्का वाढ झाली अशी चर्चा आपण वर्तमानपत्रातून घडवून आणता. जेव्हा घास घ्यायची वेळ येते तेव्हाच मराठवाड्याचा घात केला जातो. दोन वर्षांपासून हे प्रस्ताव आपल्याकडे प्रलंबित आहेत. याला आता नव्याने खर्च करण्याची गरज नाही यात फक्त गॉर्जचे काम राहिलेले आहे. एक ते दहा लाखाच्या वरची ही कामे नाहीत. ही कामे केली तर साधारणत: हजार एकर जमीन पाण्याखाली येईल. परंतु, याकडे कोणीही पहात नाही. एकीकडे प्रकल्प कॉस्ट वाढत चालली आहे. प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आहेत त्या जमिनीवरील माती उकरून मोठ मोठे खड्डे करण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांना शेती करता येत नाही. एवढेच नव्हे तर त्यांना मावेजा देखील देता येत नाही. कारण सुप्रमा राहिलेली आहे. यासंबंधीचा निर्णय कॅबिनेट कधी करणार आहे ? असा प्रश्न मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींना पडतो आहे. हे प्रकल्प निकाली काढणे अतिशय गरजेचे आहे. मराठवाड्यातील जनतेच्या वतीने

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित..

आपणाला कळकळीची विनंती करणार आहे. मराठवाड्यातील लोकांसाठी किती षडयंत्रे करण्यात येत आहेत. आम्हाला अजून किती षडयंत्रांना सामोरे जावे लागणार आहे ? मला काल परवा एक नोट वाचायला मिळाली. वैधानिक विकास मंडळाच्या कार्यालयांना आता फक्त कुलूप लावण्याचे राहिले आहे. शिपाई येतो आणि कार्यालय साफ करून जातो. काल परवा बजेटरी प्रोव्हीजन झाल्या नंतर मराठवाडा वैधानिक मंडळाची 100 टक्के रक्कम रि-ॲप्रोप्रिएशनच्या नावाने पुन्हा एकदा वर्ग करण्यात आली. असे मराठवाड्याबाबत का होत आहे ? आमचा अनुशेष संपला आहे काय ? आजही गेवराई तालुक्यातील 82 अंगणवाड्या अशा आहेत की, त्या अजूनही झाडा खाली भरतात. हा आमचा बॅकलॉग आहे. असे असताना देखील आमची वैधानिक मंडळा मधील स्थिती बदलत नाही. किंबहुना तेथील रक्कम ट्रान्सफर करण्याचे षडयंत्र हे राज्य शासन सातत्याने करत आलेले आहे.

सभापती महोदय, औरंगाबाद ते सोलापूर हा मार्ग चौपदरी करण्यात येणार आहे. हा दोन भागांमधील प्रकल्प आहे. औरंगाबाद ते एडशी आणि एडशी ते सोलापूर. पर्यावरणाच्या एनओसीसाठी हा प्रकल्प प्रलंबित राहिला आहे. एडशी ते सोलापूर या मार्गात माळढोक प्रकल्प येत असल्यामुळे पर्यावरण विभागाची त्यास मान्यता मिळत नाही. आता हा कॉरीडोर 3 कि.मी.चा करण्यात आला आहे असे सांगण्यात आले. या चौपदरीकरणाचा निर्णय लागत नसेल मराठवाड्यातील दळणवळणाचा विकास होणार नसेल तर त्यात आमचा दोष आहे काय?

यानंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित .....

देशाला स्वातंत्र मिळून 75 वर्षे झालेली असताना देखील आमच्या भागात साधी रेल्वे देखील आलेली नाही. आमच्या लेकरा बाळांना दुसऱ्या गावात नेऊन सांगावे लागते की, ती रेल्वे आहे व एक ना एक दिवस ती रेल्वे आपल्या भागात आल्याशिवाय राहणार नाही. आदिवासी भागाची परिस्थिती आमच्या भागापेक्षा सुधारत चालली आहे. इतकी भयानक परिस्थिती आमच्या मराठवाडयाची आहे. जाता जाता या सभागृहाला मी एक इशारा देऊ इच्छितो की, मराठवाडयाची जनता सोशीक आहे. परंतु मराठवाडयातील जनतेचा आक्रमकता तुम्ही पाहिलेला नाही. मराठवाडा वगळून तुम्ही केवळ एकाच स्वातंत्र्याचा लढा लढलेला आहात. उर्वरित महाराष्ट्राला 15 ऑगस्ट,1947 रोजी स्वातंत्र मिळाले. परंतु मराठवाडयातील जनतेला स्वातंत्र्यासाठी दोनदा लढा द्यावा लागला आहे. आम्हाला निजामाच्या तावडीतून सोडवणूक करण्यासाठी दुसरा लढा लढावा लागलेला आहे. आम्हाला तुमच्या पेक्षा एक वर्षानंतर स्वातंत्र मिळाले आहे. विदर्भातील लोक कौल कोणाच्या बाजूने आहे यासाठी मतदान घेतात परंतु आमच्या लोकांना मतदान,कौल असे काही समजत नाही, आम्हाला रस्त्यावरच यावे लागते. वेळ प्रसंगी मराठवाडयाला हातात रुम्हण घ्यावे लागते. मराठवाडा रुम्हण हातात घेऊन सरकारला जाब विचारल्याशिवाय राहणार नाही.

मी आपल्याला सांगू इच्छितो की, 2009 मध्ये 48 पैकी 39 जागा या बाजूसाठी दिलेल्या आहेत. मराठवाडयावर अशाच प्रकारे अन्याय होत राहिला, मराठवाडयाच्या प्रश्नासंबधी सुधारणा झाली नाही आणि मराठवाडयाच्या जनतेने तिकडे बसण्याचा निकाल दिला तर तिकडच्या बाजूने या प्रश्नावर बोलण्याची वेळ आमच्यावर येऊ नये म्हणजे झाले. मराठवाडयाच्या पाण्याच्या प्रश्नाच्या संदर्भात तसेच इतर प्रश्नाच्या संदर्भात हे शासन लक्ष का देत नाही ? आमच्या निजामाने भले चुकीचे निर्णय केले असतील परंतु त्यांनी निर्णय केले होते. त्यातील काही निर्णय चुकले असतीलही. परंतु या राज्य सरकारने मराठवाडयाच्या प्रश्नाच्या संदर्भात निर्णयच करावयाचे नाही असे ठरवले असेल तर आमच्या पदरात अधिकचे काहीच पडणार नाही. मराठवाडयाच्या पाण्याच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी 18 टीएमसी पाण्याची जी काही घोषणा केली होती त्यासंदर्भात कॅबिनेट मिटिंग मध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यावेळी सांगितले होते की, या प्रश्नाच्या संदर्भात काही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित .....

मंत्र्यांचे प्रतिनिधी घेऊन माननीय राज्यपाल महोदयांकडे जाऊ आणि यासंदर्भातील निर्णय तातडीने करुन आणू. त्यामुळे या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री निर्णय घेणार आहेत काय, निर्णय करुन मराठवाडयातील जनतेला आश्वासित करणार आहेत काय ? जायकवाडी प्रकल्पाच्या संदर्भात आपण जो काही निर्णय केलेला आहे त्यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाडयातील लोकप्रतिनिधींना घेऊन काही निर्णय केला तर अधिक गतीने निर्णय होईल नाही तर या प्रश्नाला न्यायालयात अधिक वेळ लागेल. मराठवाडयातील सुप्रमाच्या संदर्भात 76 प्रकरणे प्रलंबित आहेत. 76 प्रकरणे निकाली काढण्याच्या हेतूने माननीय मुख्यमंत्री या प्रश्नाच्या संदर्भात निर्णय घेतील काय ?

सभापती महोदय, आजच्या नियम 260 च्या प्रस्तावाच्या निमित्ताने या ठिकाणी जे तीन प्रश्न उपस्थित केले आहेत त्या तीनही प्रश्नांचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा अशी विनंती करतो व माझे दोन शब्द येथेच पूर्ण करतो.धन्यवाद.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, मराठवाडयाच्या जनतेच्या दृष्टीने तसेच शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रस्ताव या सार्वभौम सभागृहात चर्चिला जात असतांना या चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी विरोधी पक्षाचे कोणतेही सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. मराठवाडयाला काहीच मिळू नये अशी त्यांची अपेक्षा आहे काय ? त्यामुळे यासंदर्भात आपण गंभीर दखल घेण्याची आवश्यकता आहे. मराठवाडयातील जनतेचे हाल कशा प्रकारे चालले आहे याबाबत सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी आपल्या भावना अतिशय पोटतिडकीने मांडल्या आहेत. त्यामुळे यासंदर्भात विरोधी पक्षाचा जेवढा निषेध करावा तेवढा थोडा आहे.

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : आता सन्माननीय सदस्य श्री. अमरनाथ राजूरकर यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरनाथ राजूरकर (नांदेड स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मराठवाडयाच्या पाण्याच्या प्रश्नासंबंधी या ठिकाणी चर्चा सुरु आहे.

सभापती महोदय, मराठवाडा महाराष्ट्रात बिनशर्त सामील झालेला आहे. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री कै.यशवंतराव चव्हाण साहेबांनी मे,1960 च्या अधिवेशनात सांगितले होते की, आम्ही मराठवाडयाला झुकते माप देऊ.

यानंतर श्री.अजित.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरनाथ राजूरकर...

सभापती महोदय, मराठवाडा आणि विदर्भातील अनुशेष वाढत चालला आहे. रस्ते, वीज,पाणी, पायाभूत सुविधांचा अनुशेष शिल्लक आहे. विदर्भ महाराष्ट्रापासून वेगळा करण्याची मागणी वाढत आहे. उद्या मराठवाड्याने देखील अशी मागणी केल्यास ते चुकीचे होणार नाही. भविष्यात अशी मागणी होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो तेव्हा याचा शासनाने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, मराठवाडा आणि विदर्भातील मिळून एकूण 80 आमदार आहेत. या विभागातील आमदारांच्या सहकार्यामुळे मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, सहकार मंत्री, जलसंपदा मंत्री अशी पदे आपण भूषवित आहात, आपण सरकारमध्ये आहात. परंतु सरकारने या विभागांकडे दुर्लक्ष केल्यास आपणास विरोधी बाकावर बसण्याची पाळी येईल हे येथे मी नमूद करु इच्छितो.

सभापती महोदय, तिसरे महायुध्द हे पाण्यावरुन होणार आहे असे म्हटले जाते. हे काही अंशी खरे देखील आहे. आज आपल्या राज्यात आणि देशात पाणी प्रश्न पेटला आहे. राज्या-राज्यांमध्ये, जिल्ह्या-जिल्ह्यांमध्ये, विभागा-विभागांमध्ये पाण्यावरुन भांडणे होत आहेत. बाभळी धरणावरुन महाराष्ट्र राज्य आणि आंध्र प्रदेश राज्यामध्ये भांडण होत आहे. जायकवाडी धरणातील पाण्यावरुन उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यामध्ये भांडण होत आहे. उजनी धरणाच्या पाण्यावरुन पुणे आणि सोलापूर विभागामध्ये भांडण होत आहे. अशाप्रकारे पाण्यावरुन भांडणे होत आहेत. शासनाने समन्यायी पध्दतीने सर्वांना पाणी वाटप केले पाहिजे. त्यासाठी सरकारने महाराष्ट्र जलसंपत्ती विनियमन प्राधिकरण कायदा केलेला आहे. या कायद्यानुसार पाणी वाटपाचा प्रश्न सोडविण्यात यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, सरकारने कोणत्या प्रकारचे निर्णय घ्यावेत या संदर्भातील आदेश आज न्यायालय देत आहे. माननीय केंद्रीय कृषी मंत्री आदरणीय श्री.शरद पवार साहेब म्हणाले की, आता कोणता भाजीपाला लावावा हे न्यायालय सांगत आहे. माझी या निमित्ताने सरकारला विनंती आहे की, न्यायालयाने काही सूचना करण्यापेक्षा सरकारने स्वत:हून पुढाकार घेऊन निर्णय घेतले पाहिजेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरनाथ राजूरकर...

सभापती महोदय, सन 2005 मध्ये महाराष्ट्र जलसंपत्ती विनियमन कायदा मंजूर झाला. परंतु त्या संदर्भातील नियम करण्यासाठी सरकारला सात वर्षे लागली. यावरुन सरकारची मानसिकता दिसून येते.

सभापती महोदय, सन 2012-2013 मध्ये मराठवाड्यामध्ये दुष्काळ पडला. जायकवाडी धरणामध्ये फक्त 3.55 टीएमसी पाणी उपलब्ध होते. जायकवाडी धरण जालना शहरामध्ये आहे आणि त्या शहराला महिन्यातून दोन महिन्यातून एकदा पाणी पुरवठा होत होता इतकी भयानक परिस्थिती होती. औरंगाबाद, परभणी, बीड या भागांत मोठ्या प्रमाणावर दुष्काळ होता. तेथील लोक पाण्यासाठी वणवण फिरत होते. याच्या उलट नाशिक, अहमदनगर भागांतील धरणामध्ये 70 टक्के पाणी होते. या दुष्काळाच्या प्रश्नावर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मागील अधिवेशनात सर्वपक्षीय सदस्यांची बैठक घेऊन या प्रश्नासंदर्भात तातडीने तोडगा काढण्यात येईल असे सांगितले. परंतु दुर्दैवाने त्या बैठकीचे इतिवृत्त झाले नाही आणि घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही. याचा अर्थ आम्ही काय समजायचा ? या प्रश्नाचे उत्तर माननीय जलसंपदा मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, जलसंपदा विभागाने मराठवाड्यातील पाण्याच्या संदर्भात एक प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. हे प्रतिज्ञापत्र मराठवाड्यावर अन्याय करणारे आहे. सरकारने हे प्रतिज्ञापत्र मागे घ्यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, धरणांच्या संदर्भात केंद्रीय जल आयोग आणि केंद्रीय नियोजन आयोगाने पाण्याची उपलब्धी ठरवून दिली होती. जायकवाडी धरणाची उपलब्धता 260 टीएमसी होती. जायकवाडीच्या वरच्या भागातील धरणासाठी 116 टीएमसी पाणी ठरले हाते. जायकवाडी धरणासाठी 90 टीएमसी पाणी ठरले होते. जायकवाडी धरणाच्या वरच्या बाजूला 116 टीएमसी पाणी वापरण्याची परवानगी असताना तेथे 146 टीएमसीची धरणे बांधण्यात आली. सर्वात मोठा अन्याय येथे झालेला आहे. जवळपास 30 टीएमसी पाणी त्यांनी आधीच पळविले आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरानाथ राजूरकर....

कॅनॉल, सिमेंट बंधारे, वसंत बंधारे, शेत तळी बांधून 20-25 टक्के पाणी उत्तर महाराष्ट्रातील लोकांनी डायव्हर्ट केले आहे. शासनाची 116 टीएमसी पाणी घेण्याची परवानगी असताना प्रत्यक्षात 166 टीएमसी म्हणजेच 50 टीएमसी जादा पाणी वापरले आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे कायद्यातील 12 (6)(c) आणि 11 (8) च्या तरतुदींचा हेतुपुरस्सर चुकीचा अर्थ लावून जायकवाडीचे 33 टक्के पाणी उपलब्ध असताना ते पाणी केवळ पिण्यासाठी आहे असे भासविले जाते. जायकवाडी प्रकल्प सुरु झाला त्यावेळी त्यातील पाणी केवळ पिण्यासाठीच आहे अशी तरतूद नव्हती. त्यातून शेती, उद्योग आणि पिण्यासाठी पाणी घेता येईल अशी तरतूद होती. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, कायद्यापेक्षा नियम विसंगत असू शकत नाही. नियमांपेक्षा कायदा सर्वश्रेष्ठ आहे हे मंत्री महोदयांना माहीत आहे. तरी सुध्दा नियम बदलण्याचा प्रयत्न सुरु आहे.

महोदय, या निमित्ताने मी दोन बाबी मांडतो. जायकवाडी धरणातील पाण्यामुळे अहमदनगर, नाशिक आणि मराठवाड्यामध्ये निर्माण झालेला वाद मिटविण्यासाठी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि जलसंपदा मंत्र्यांनी पुढाकार घ्यावा आणि न्यायालयात कन्सेण्ट टर्म्स दाखल करावा. सर्वांना एकत्र बसवून बैठक घ्यावी आणि हा वाद मिटवावा. कारण उद्या हे पाणी पेटले तर फार अवघड होईल.

महोदय, या निमित्ताने मी विनंती करतो की, कायद्यातील कलम 12 (6)(c) ची त्वरित अंमलबजावणी सुरु करावी. तसेच नियम 2 (11)(c) रद्द करावे आणि मराठवाड्याच्या विरोधात एकतर्फी असलेले प्रतिज्ञापत्र त्वरित मागे घ्यावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. या प्रस्तावामध्ये केवळ सिंचनाचा विषय नसून, रस्ते, वीज, रेल्वे अशा अनेकविध महत्त्वाच्या विकासात्मक विषयांचा समावेश आहे. त्यामुळे या प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी केवळ माननीय जलसंपदा मंत्री उपस्थित राहून उपयोग नाही. इतरही मंत्री उपस्थित असणे आवश्यक आहे. माननीय जलसंपदा मंत्री उपस्थित असल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. परंतु इतर विभागांच्या मंत्री महोदयांचे काय ? इतर विभागांच्या संदर्भात जे विषय उपस्थित करण्यात येतील त्यांना कोण उत्तर देणार आहे ? मला वाटते आपण संबंधित विभागांच्या मंत्री महोदयांना सभागृहात बोलावून घ्यावे आणि ही चर्चा पुढे सुरु ठेवावी. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरनाथ राजूरकर : महोदय, खाजगीकरणाच्या माध्यमातून रस्ते आणि पुलांचे अनेक कामे बांधकाम विभागाकडून सुरु आहेत. बीओटी प्रकल्पामध्ये 60 टक्के ठेकेदाराचा, 20 टक्के महाराष्ट्र शासनाचा आणि उर्वरित 20 टक्के केंद्र सरकारचा हिस्सा असतो. राज्यात बीओटी तत्त्वावर अनेक प्रकल्प सुरु आहेत. आमच्या जिल्ह्यात नांदेड नरसी रस्त्याची चौपदरीकरणाने सुधारणा करणे, शिरुर ताजबंद देगलुर मुखेड नरसी रस्त्याची सुधारणा करणे, वाटूर-जिंतूर औंढा बसमत रस्त्याची चौपदरीकरणाने सुधारणा करणे, अकोला-वाशिम-हिंगोली रस्त्याच्या चौपदरीकरणाची सुधारणा करणे ही कामे आहेत. नांदेड जिल्ह्यातील 90 टक्के प्रकल्प झाले असून, 10 टक्के प्रकल्प राहिलेले आहेत. यातील अकोला-वाशिम-हिंगोली रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काहीच काम झाले नाही. या उलट बारामती-फलटण लोणंद शिरवळ रस्त्याचे चौपदरीकरण, हडपसर-सासवड रस्त्याचे चौपदरीकरण, शिक्रापूर-न्हावरा चौफुला रस्त्याचे चौपदरीकरण या कामांचे अजूनही टेंडर निघाले नाहीत, किंबहुना अंमलबजावणी झाली नाही. तरी सुध्दा या कामांना व्हीजीएफच्या माध्यमातून 25-25 कोटी रुपये म्हणजेच प्रकल्पाच्या किंमतीच्या जवळपास 50 टक्के रक्कम शासनाने अनुदान म्हणून दिली आहे. परंतु अजूनही ती कामे सुरु झालेली नाहीत. महोदय, ठेकेदाराने शासनाकडून पैसे घेतल्यानंतर काम सुरु करावयाचे आहे काय ? या बाबतचा खुलासा माननीय बांधकाम मंत्र्यांनी केला पाहिजे.

महोदय, गेल्या वर्षी विदर्भात अतिवृष्टी झाल्यामुळे एफडीआरची कामे करावी लागली. विदर्भाने त्या वेळी 600 कोटी रुपये मागितले. त्या तुलनेत विदर्भाला 500 कोटी रुपये देण्यात आले. मराठवाड्यामध्ये सुध्दा तशाच प्रकारची अतिवृष्टी झाले. मराठवाड्याने शासनाकडे 500 कोटी रुपयांची मागणी केली असता शासनाकडून प्रत्यक्षात केवळ 100 कोटी रुपये देण्यात आले. मराठवाडा व विदर्भ वगळता नाशिक, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र इत्यादी ठिकाणी शासनाच्या माध्यमातून 100-100 कोटी रुपये देण्यात आले.

नंतर श्री.कांबळे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठ नाही

श्री. अमरनाथ राजूरकर ....

तुमच्याकडे दुष्काळ पडला होता, त्यावेळी तुम्ही 2-3 हजार कोटी रूपये खर्च केले. त्यावेळी आपण मराठवाडा, विदर्भ यांना पैसे दिले होते का, आपण आमच्यावर का अन्याय करता ? माझी विनंती आहे की, आमच्यावरील अन्याय दूर करण्याकरिता शासनाने त्वरित निर्णय घ्यावा. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी परवानगी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, माझे पाण्याच्या प्रश्नावरील 3 मुद्दे आहेत. माननीय जलसंपदा मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मराठवाड्याचा 18 टीएमसी पाण्याचा मुद्दा आहे. 21 टीएमसी पाण्याचा मुद्दा उस्मानाबाद, बीड जिल्ह्यांशी संबंधित आहे. जायकवाडीचा मुद्दा मराठवाड्यातील 5 जिल्ह्यांशी संबंधित आहे. तीनही मुद्दे वेगवेगळे आहेत. सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी अतिशय उद्वेगाने त्यांचे विचार मांडले. विरोधी पक्षाची सर्व बाके रिकामी होती. मला नक्की खात्री होती की, मराठवाड्याचा प्रश्न आल्यावर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब येतील आणि जिव्हाळ्याने बोलतील. ते सभागृहात आल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. मी जलसंपदा विभागाच्या माननीय मंत्र्यांचे अभिनंदन करतो, कारण आम्ही 18 टीएमसी पाण्याबद्दल जे विचार मांडले, त्याबद्दल त्यांनी त्वरित मान्यता दिली. सभागृहात दिलेल्या घोषणांची अंमलबजावणी होणे फार दुर्मिळ असते. माननीय जलसंपदा मंत्र्यांनी 18 टीएमसी पाण्याबद्दल शब्द दिला होता. एकूण 300 प्रकल्प आहेत, तो आराखडा मंजूर केला आणि त्यास मंत्रिमंडळाने मान्यता देखील दिली. पण कुठे माशी शिंकली हेच समजत नाही. आपण स्थिर सरकार आहे असे म्हणतो, पण या 'स्थिर' शब्दाचा अर्थ आम्हाला आता समजला.

सभापती महोदय, आम्हाला वाटले की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या शब्दांना दिल्लीत वजन आहे. आम्ही ऐकत होतो की, नवी मुंबईचे विमानतळ होण्याच्या संदर्भात दिल्लीला चकरा मारून त्यांनी ते मंजूर केले. अजूनही काही महत्त्वाचे प्रकल्प त्यांनी मंजूर करून आणले, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. मला वाटते की, माननीय मुख्यमंत्र्यांचा बंगला, मंत्रालय व माननीय राज्यपालांचे निवासस्थान फार लांब नाही. आपणाला या प्रश्नाबाबत मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना घेऊन माननीय राज्यपालांच्या निवासस्थानी जाण्यास का वेळ मिळाला नाही ? 1 मिनिटाचे काम आहे माननीय मंत्र्यांनी स्वत: हे माननीय मुख्यमंत्र्यांना विचारावे. माननीय मुख्यमंत्र्यांनी फोन लावला तर आमचे काम होईल. हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी सांगितल्याप्रमाणे एकूण 76 प्रकल्पांना सुप्रमा देणे बाकी आहे. शासनाने त्या प्रकल्पांना 222 कोटी रूपये दिले आहेत. फक्त सुप्रमा नसल्यामुळे 222 कोटी रूपये खर्च होऊ शकत नाहीत. 76

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण ....

प्रकल्पांची एकूण साठवणूक क्षमता 37 टीएमसी आहे. आम्ही तुमच्याकडे 2-4 टीएमसी पाण्यासाठी भीक मागतो, वरच्या धरणातून पाणी सोडा, असे सांगतो. उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यावर आपणास पाणी सोडावे लागते. परवा सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे साहेब म्हणाले ते बरोबर आहे की, उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यावर आपल्याला पाणी सोडावे लागले. आपण निर्णयक्षमतेमध्ये कमी पडतोय का, हे पाहिले पाहिजे. 37 टीएमसी पाणी अडले तर मराठवाड्याचे किती कल्याण होईल, याचा विचार करा. 18 टीएमसी पाण्याबद्दल माननीय राज्यपालांची परवानगी घेतली आहे, अशी आपण घोषणा करावी, अशी माझी विनंती आहे.

दुसरा मुद्दा 21 टीएमसी पाण्याचा असून बीड, उस्मानाबाद व लातूर या जिल्ह्यांशी संबंधित आहे. परवा वर्तमानपत्रामध्ये बातमी आली की, लवादाचा निर्णय आला आहे, ते पाणी मिळणार नाही. सर्व ठिकणी संभ्रमावस्था आहे. वर्तमानपत्रातील बातमीने लोकप्रतिनिधी भांबावून गेले आहेत. 21 टीएमसी पाण्याबद्दलच्या घोषणा केल्या. तत्कालीन मुख्यमंत्री कै. विलासराव देशमुख, तत्कालीन माननीय मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांनी हे पाणी खेचून आणले.

(नंतर श्री. खंदारे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण...

परंतु आजपर्यंत केवळ घोषणा झालेल्या आहेत. दिनांक 15 डिसेंबर रोजी लवादाने पाणी न देण्याचा निर्णय दिलेला आहे. महाराष्ट्र शासनाचा माहिती व जनसंपर्क विभाग आहे. या लवादाच्या निर्णयाच्या बातम्या वर्तमानपत्रामध्ये आल्या आहेत. त्याचे कात्रण मंत्री महोदयांकडे असेल. सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी मराठवाड्याला पाणी मिळू देणार नाही असे म्हटल्याची मध्यंतरी बातमी आली होती.. त्यांच्या मतदार संघातून तो टनेल जाणार आहे असे आम्ही ऐकले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी माझ्या नावाचा उल्लेख केला असल्याने मी त्याबाबत खुलासा करु इच्छितो. मराठवाड्याच्या हिश्याचे पाणी त्या भागाला सरकारने कमिट केलेले आहे. त्या भागाला ते पाणी मिळाले पाहिजे ते देण्यासाठी कोणाचाही विरोध नाही. अशी आमची स्पष्ट भूमिका आहे. मराठवाड्याला पाणी मिळणार नाही असे आम्ही म्हटलेले नाही.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, 21 टीएमसी पाण्याबाबत सभागृहात खुलासा होणे आवश्यक आहे. मंत्री महोदयांनी लवादाच्या निर्णयाची माहिती सभागृहाला द्यावी. सध्या 5 हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन ठेवलेली आहे. या सर्व प्रकल्पांसाठी मागील 4-5 वर्षात 500 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या वर्षी 84 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. 5 हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांच्या कामासाठी दरवर्षी 100 कोटी रुपयांची तरतूद केली जाते. वास्तविक एस्कलेशनमध्ये दरवर्षी 10 टक्के वाढ होत असते. प्रकल्पाची किंमत 500 कोटी रुपयांनी दरवर्षी वाढत असताना तरतूद मात्र 100 कोटी रुपयांची होत असेल तर पुढील 200 वर्षे आमच्या पुढच्या पिढीला अशा प्रकारच्या चर्चा उपस्थित करुन भाषणे करावी लागतील.

सभापुती महोदय, बजेटच्या अधिवेशनामध्ये माननीय जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी सभागृहात आश्वासन दिले होते. ते दमदार निर्णय घेणारे मंत्री आहेत. त्यांनी जसा 18 टीएमसी बाबत निर्णय घेतला आहे. त्याप्रमाणे मराठवाड्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखावा, जेणे करुन आमच्या पिढीला तरी ते पाणी बघावयास मिळेल. यासाठी मंत्री महोदयांनी 500 ते 1000 कोटी रुपयांची तरतूद करावी, 3-4 वर्षांचा कालबध्द कार्यक्रम आखावा. कृष्णा खोऱ्यासाठी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.सतीश चव्हाण....

शासनाने कर्जरोखे उभे केले होते. त्याप्रमाणे या 21 टीएमसीसाठी शासनाने प्रसंगी कर्ज घ्यावे असे मी आवाहन करतो.

सभापती महोदय, जायकवाडी प्रकल्पाच्या पाण्याचे समन्यायी वाटप याबाबत सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी सविस्तर मुद्दे मांडले असल्यामुळे मी त्या मुद्यांची द्विरुक्ती करणार नाही. मराठवाड्यातील लोक अतिशय संभ्रमावस्थेत आहेत. मराठवाडा जनता विकास परिषद नावाची एक एनजीओ आहे. या प्रश्नासाठी आमचे राजकीय नेतृत्व कोठे तरी कमी पडले आहे काय, सरकार दरबारी आम्ही कमी पडलो म्हणून तेथील जनतेच मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये दाद मागितलेली आहे. परंतु नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील लोकांची मुजोरी किती आहे ते बघा. त्या लोकांनी मुंबई उच्च न्यायालयात 50 याचिका दाखल केल्या आहेत. परंतु उच्च न्यायालयाने या सर्व याचिका मुंबईला वर्ग कराव्यात असे आदेश दिलेले आहेत. उच्च न्यायालयात राज्यातील आमदार, मंत्री जातात. मी मंत्री महोदयांना असे सांगू इच्छितो की, आपण संपूर्ण महाराष्ट्राचे जलसंपदा मंत्री आहात. केवळ रायगड जिल्ह्याचे नाहीत. नगर व नाशिकच्या मंत्री महोदयांना त्या भागाचे मंत्री करावे.

सभापती महोदय, एका चित्रपटामध्ये नायकाला एक दिवसाचा मुख्यमंत्री बनविले जाते. एका दिवसात तो सर्व निर्णय घेतो. त्याप्रमाणे मला एक दिवसासाठी जलसंपदा मंत्री करावे. नाशिक, नगर जिल्ह्यातील लोकांनी मुजोरी दाखविलेली आहे. आमच्या भागातील पाणी कसे नेतात ते बघतो असे ते म्हणत आहेत.

नंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळाचे मंत्री महोदय उपस्थित नाहीत. ते या ठिकाणी उपस्थित असणे आवश्यक आहे.

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय सदस्यांनी ज्या योजनेचा उल्लेख केला ती योजना माझ्याकडे आहे.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, जायकवाडी धरणाच्या केसेस कोर्टात प्रलंबित आहेत. पावसाळयामध्ये या वर्षी माझ्या माहिती प्रमाणे 15 टीएमसी पाणी दुसरीकडे वळविण्यात आले. सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह राजूरकर यांनी सांगितल्या प्रमाणे हे 15 टीएमसी पाणी बेकायदेशीरपणे दुसरीकडे वळविण्यात आले. लोकांनी हंडेच्या हंडे भरुन घेतले, वॉटर बॅगा देखील भरुन घेतल्या. 15 टीएमसी पाण्याने त्या लोकांनी खरिपामध्ये सिंचन केले. आमच्याकडे पिण्यासाठी पाणी नाही आणि तुम्ही खरिपात सिंचन करता ? आमच्याकडे 25 टक्के पाणी असताना आणि वरची सगळी धरणे 100 टक्के भरलेली असताना या 100 टक्के भरलेल्या धरणातील पाणी स्वत:हून सोडण्याचे काम सरकारने करायला पाहिजे होते. परंतु त्यासाठी आम्हाला कोर्टामध्ये जावे लागले आणि मग त्या बाबतीत कोर्टाने निर्णय दिला.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी सांगितल्या प्रमाणे मान्सून काळामध्ये जे काही घडले त्याची चौकशी झाली पाहिजे. परवा 9 टीएमसी पाणी सोडले. त्यापैकी 1.67 टीएमसी पाणी जायकवाडीमध्ये आले. उर्वरित पाणी कुठे गेले ? ज्यांनी कुणी हे पाणी बेकायदेशीरपणे वळविलेले आहे त्यांच्यावर फौजदारी खटले भरले पाहिजेत. आम्ही असे करु देणार नाही, तसे करु देणार नाही अशा प्रकारची भूमिका लोकप्रतिनिधी जाहीरपणे घेतात आणि त्याबाबत सरकार एका शब्दाने देखील खुलासा करीत नाही. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये याबाबतीत जाब विचारला जात नाही. हे जे 15 टीएमसी पाणी बेकायदेशीरपणे वळविण्यात आलेले आहे त्याचा हिशेब आम्हाला पाहिजे. जलसंपदा खात्याने मराठवाड्यावर अन्याय केलेला आहे. राज्य शासनाने 30 एप्रिल 2013 रोजी अधिसूचनेद्वारे जे नियम प्रसिध्द केले त्यातील नियम क्रमांक 2(क) चे राज्य शासनाने समर्थन केलेले आहे. मी आणखी एक मागणी येथे करीत आहे की, सर्व प्रकारची नवीन सर्वेक्षणे आणि बांधकामे थांबविण्याची सुस्पष्ट घोषणा माननीय मंत्री महोदयांनी सभागृहामध्ये केली

==2==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण...

पाहिजे. मागच्या वेळी आम्ही नवीन सर्वेक्षणाची माहिती दिल्यानंतर माननीय मंत्री महोदयांनी ताबडतोबीने ते सर्वेक्षणाचे काम थांबविले त्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. परंतु या पुढे कोणत्याही प्रकारचे सर्वेक्षण होणार नाही अशी हमी माननीय मंत्री महोदयांनी आम्हाला द्यावी. जायकवाडीच्या संदर्भात जे शपथपत्र उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेले आहे त्याचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. जलसंपदा खात्याने मराठवाड्यावर सरळ सरळ अन्याय केलेला आहे असे दिसते. राज्य शासनाने 30 एप्रिल 2013 रोजी अधिसूचनेद्वारे जे नियम प्रसिध्द केले त्यामधील नियम क्रमांक 2(क)चे राज्य शासनाने समर्थन केलेले आहे. यामध्ये डिस्ट्रेस आणि स्केअरसिटी हे दोन शब्द समानार्थी मानण्यात आले आहेत. 33 टक्क्या पेक्षा कमी जिवंतसाठा असेल तेथे डिस्ट्रेस आणि स्केअरसिटीची परिस्थिती आहे असे मानण्याचे प्रयोजन आहे. या शब्दप्रयोगामुळे आणि 33 टक्क्याच्या तरतुदीमुळे मूळ कायद्यातील 12 (6)(ग)च्या अंमलबजावणीत अडसर निर्माण झाला असून हा नियम कायद्यातील तरतुदींशी विसंगत आहे. हा नियम त्वरित रद्द करावा अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.सतीश चव्हाण...

सभापती महोदय, माननीय श्री.रावते साहेब, हे या सभागृहाचे ज्येष्ठ नेते आहेत. जे नियम तयार केले जातात, ते सभागृहापुढे ठेवले जातात अशी आमची माहिती आहे. आपल्यापुढे असे नियम कधी आलेले नाहीत. आपण सभागृहात अनेक कागदपत्रे लेईंग करतो, परंतु हे नियम लेईंग केल्याचे मला आठवत नाही. या नियमातील व्याख्येवर नियम क्रमांक 11 अवलंबून असल्यामुळे कायद्यातील तरतुदीशी विसंगत नियम असल्यामुळे कायद्याच्या अंमलबजावणीचा उद्देशच विफल व्हावयास लागला आहे. आपण कशासाठी कायदे करतो. नियम कशासाठी करतो हे मला कळत नाही. एका कायद्याने तुम्ही आम्हाला पाणी द्यावयाचे आणि दुसऱ्या नियमाने काढून घ्यावयाचे हे आम्हाला कळत नाही. अशा अन्यायकारक नियमांचे समर्थन केलेले असल्यामुळे राज्य शासन मराठवाडा विरोधी भूमिका घेत आहे आणि नगर-नाशिक जिल्हयाची बाजू उचलून धरत आहे असा स्पष्ट संदेश यातून गेलेला आहे. मध्यंतरी मेंढकर समितीचा अहवाल येणार आहे म्हणून सांगितले. तो अहवाल आला असेल तर तो सभागृहापुढे ठेवा. आमच्या खणामध्ये किती तरी अहवाल असतात. बरेचसे अहवाल आम्ही वाचत सुध्दा नाही. जो महत्वाचा अहवाल आहे, तो आम्हाला बघावयास मिळत नाही. या गोष्टीचा देखील शासनाने खुलासा करावा. जिवंत साठा किती, ड्रिस्टेस्ट साठा किती, यासंबंधीची व्याख्या आम्हाला जलसंपदा मंत्र्यांनी सांगावी.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित म्हणाले ते बरोबर आहे. निजामांच्या काळात सर्व लोक एकत्र यावयाचे आणि त्या निजामाशी लढायचे. परंतु शासनच जिल्हया जिल्हयात भांडण लावत असेल तर इतर जिल्हयांनी कोठे जावयाचे. आम्ही म्हणणार आमच्या मंत्र्यांकडे जाऊ. आमच्या मंत्र्यांकडे शिक्षण खाते आहे. तेथे सुध्दा मराठवाडयावर अन्याय करण्यात आलेला आहे. पूर्ण महाराष्ट्राची शिक्षणाची जबाबदारी मराठवाडयाने घेतलेली आहे. शिक्षण मंत्री तसेच दुसरे शिक्षण राज्यमंत्री मराठवाडयातील आहेत. तिसरे राज्य मंत्री यांच्याकडे दुग्धविकास विभाग आहे. या बाबतीत काय करावे हे आम्हाला कळत नाही. आपण सर्वांनी एकत्र येऊन अशा प्रश्नांच्या बाबतीत तोडगा काढला पाहिजे. या बाबतीत वृत्तपत्रात बातम्या येतात, कोणी कोर्टात केसेस दाखल करतात. आम्ही सभागृहात चर्चा करतो. शासनाने स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे आणि त्याची व्याख्या स्पष्ट केली पाहिजे. जायकवाडी धरणाच्या बाबतीत ॲफिडेवीट बदलविण्यात आले. त्यामध्ये सुध्दा आपण विसंगत विधाने केलेली आहेत. माझ्याकडे नागपूरच्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण ....

ऐतिहासिक कराराची कागदपत्रे उपलब्ध आहेत. त्या करारावर नागपूरच्या त्यावेळच्या सर्व नेत्यांच्या सहया आहेत. त्यात चार नंबरचा क्लॉज हा स्पेसिफिक मराठवाडयासाठी लिहिलेला आहे. एकाच नियंत्रणेच्या गरजेनुसार विविध प्रदेशांवर खर्च करावयाचे वाटप तेथील लोकसंख्येच्या प्रमाणात केले जाईल. याच्या पुढचे वाक्य अतिशय महत्वाचे आहे. मराठवाडयाची अविकसित स्थिती लक्षात घेता त्या भागाच्या सर्वांगीण विकासाकडे खास लक्ष दिले जाईल व याबाबतचा अहवाल राज्य विधानसभेपुढे दरवर्षी ठेवण्यात येईल. अशा प्रकारचा अहवाल विधानसभेसमोर कधीच सादर केलेला दिसून आला आहे. कदाचित त्यावेळी विधान परिषद नसेल. आमच्या मराठवाड्यातील मंत्र्यांच्या आवाज क्षीण झाला आहे काय असे आम्हाला वाटू लागले आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासन या बाबतीत दोन-तीन घोषणा करील अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे मनोगत पूर्ण करणार आहे. 18 टीएमसी बद्दल माननीय राज्यपालांचा कन्सेंट अधिवेशन संपण्यापूर्वी घेणार काय ? महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचे केंद्र शासनामध्ये खूप वजन आहे असे आम्ही ऐकून आहोत. त्यांनी मुंबई विमानतळाची घोषणा केली, ट्रान्स हार्बर, मेट्रो प्रकल्पाची घोषणा केली, मुंबई शहराच्या विकासासाठी हजारो-कोटी रुपये खर्च करण्याची घोषणा केली. तेथे तो खर्च करणे गरजेचे असेल म्हणून त्यांनी त्यासंबंधी घोषणा केली असेल. त्याबद्दल आमचे दुमत असण्याचे कारण नाही. 18 टीएमसीमधील 300 लहान लहान प्रकल्प माननीय राज्यपालांच्या एका सहीसाठी थांबले आहेत. वर्षा बंगल्यापासून आणि मंत्रालयापासून राजभवन किती लांब आहे. या 18 टीएमसी बाबतचा निर्णय राज्य शासनाने आज जाहीर करावा. तसेच 21 टीएमसीसाठीचे धोरण शासनाने आजच स्पष्ट करावे.

महोदय, माननीय मंत्री महोदयांनी तीन प्रश्नांची उत्तरे द्यावीत असे आम्हाला अपेक्षित आहे.18 टीएमसीच्या बाबतीत आज सभागृहात घोषणा केली तर खूप चांगले होईल. उद्या आम्ही मराठवाडयात 18 टीएमसीच्या बाबतीतील माननीय राज्यपालांचे स्वाक्षरी झालेले कागदपत्र घेऊन जाणार आहोत.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर श्री. भोगले...

श्री.सतीश चव्हाण.....

21 टीएमसी पाण्याबाबत धोरण स्पष्ट करावे. लवादाची काय भानगड आहे, कोणाला किती पाणी मिळणार, कधी मिळणार हे स्पष्ट केले पाहिजे. 21 टीएमसी पाण्याचा मुद्दा आल्यानंतर स्थिरीकरणामध्ये समाविष्ट केले आहे. ज्याचा कोणताही संबंध नाही ते बोलले गेले. त्या संदर्भात घोषणा करावी आणि निधी कसा देणार हे जाहीर करावे. जायकवाडी धरणातील पाण्याबाबत कोर्टात केसेस दाखल झालेल्या आहेत, अशा स्थितीत शासनाने जे ॲफिडेव्हीट दाखल केले ते कोणी दाखल केले, चुकीचे आहे की काय याच्या खोलात आम्ही जाणार नाही. मराठवाड्यावर अन्याय करणारे ॲफिडेव्हीट ज्यांनी दाखल केले त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी आणि कलम 12(6)(ग) ची कडक अंमलबजावणी करावी एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, म.वि.प.नियम 260 अन्वये सर्वश्री विक्रम काळे, अमरसिंह पंडित यांनी उपस्थित केलेल्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य स्थापन झाले त्यावेळी या महाराष्ट्रात वेगवेगळे विभाग समाविष्ट झाले. संयुक्त महाराष्ट्रामध्ये मुंबई, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, खानदेश, मराठवाडा आणि विदर्भ हे प्रदेश समाविष्ट आहेत. मराठवाड्यातील विविध विकास कामांबाबत चर्चा होत आहे. ही चर्चा ऐकल्यानंतर माझ्या मनात एक प्रश्न निर्माण झाला आहे. ज्याप्रमाणे एखाद्या कुटुंबात चार-पाच अपत्ये असतात, त्या अपत्यांपैकी तीन-चार अपत्ये आई वडिलांची लाडकी असतात व उर्वरित नावडती असतात. तसाच प्रकार मराठवाड्याबाबत झाला आहे की काय असे आज मराठवाड्यातील जनतेला आणि आमच्यासारख्या लोकप्रतिनिधींना वाटायला लागले आहे. आम्ही सरकारचे नावडते लेकरु आहोत. माझ्यापूर्वी माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात वेगवेगळ्या प्रकारची आकडेवारी देऊन वस्तुस्थिती मांडण्याचा प्रयत्न केला आहे. सिंचन व विकास कामांची चर्चा केली आहे. प्रत्येक विभागाची आकडेवारी देऊन मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही.

सभापती महोदय, माझ्याकडे दिनांक 2 सप्टेंबर, 2013 रोजीचा अहवाल उपलब्ध आहे. काही वृत्तपत्रातून तो छापून आला आहे. मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष 5.30 लाख हेक्टरचा आहे. आजपर्यंत मराठवाड्याचे चांगले चालले आहे असे जर सरकारला वाटत असेल तर ते अतिशय दुर्दैवी आहे. मागील अधिवेशनात मराठवाड्याच्या पाणी प्रश्नाबाबत चर्चा झाल्यानंतर मंत्रिमंडळाने आपल्या 1 ऑगस्ट, 2013 रोजीच्या बैठकीमध्ये निर्णय घेऊन 18 टीएमसी पाणी मराठवाड्याला देण्याचा प्रस्ताव माननीय राज्यपालांकडे पाठविला. हे 18 टीएमसी पाणी मराठवाड्याला मिळाले असते तर मराठवाड्यातील 80 हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले असते. पण असे काय घडले की ज्यामुळे मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय माननीय राज्यपालांनी अमान्य केला. मराठवाड्यात 269 लघु सिंचन प्रकल्प उभारण्याच्या संदर्भातील शासनाचा निर्णय फेटाळून लावण्याची राज्यपालांकडे कोणी मागणी केली?

नंतर ओ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, मराठवाड्याच्या सिंचनाच्या विकासाबाबतचे जे जे मुद्दे समोर आले त्या त्यावेळी कोणी कोणी समोर येऊन मराठवाड्याच्या विकासामध्ये आडवा पाय आणला आहे ? वर्तमानपत्रामध्ये बातमी आली की, मराठवाड्याच्या सिंचन प्रकल्पामध्ये विरोधकांचा खोडा. मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्यानंतर विरोधक माननीय राज्यपाल महोदयांकडे का गेले ? त्यांनी राज्यपालांना भेटून सांगितले की, जुन्या प्रकल्पांना अगोदर निधी द्यावा व त्यानंतर 18 टीएमसी संबंधी निर्णय घ्यावा. असे का करण्यात आले ?

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते येथे उपस्थित आहेत. मराठवाड्यातील सर्व गावांमधून, तालुक्यांमधून त्यांनी प्रवास केला आहे. मराठवाड्याची स्थिती त्यांना माहीत आहे. माझा प्रश्न मराठवाड्यतील दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांना आहे की, हक्काचे 18 टीएमसी पाणी तोंडावर आलेले असताना तो घास कोणी पळविला आहे ? आपण कशासाठी विरोध करत आहात ? येथे भूसंपादनाचा पेच नाही. 259 लघु प्रकल्प आहेत. यात पर्यावरणाचा अडथळा नाही. दोन वर्षात प्रकल्प पूर्ण होणार आहेत. एकही नवीन मोठा प्रकल्प नाही. प्रत्येक प्रकल्पाची किंमत 10 ते 25 कोटी रूपये आहे. या प्रकल्पांसाठी 2690 कोटी रूपये अपेक्षित आहेत. 80 हजार हेक्टर क्षेत्र सिंचना खाली येणार आहे.

सभापती महोदय, मराठवाड्यामध्ये अशी परिस्थिती आहे की, आज पाण्यासाठी भांडावे लागत आहे. आज सरकारकडे मराठवाड्याचा विकास व्हावा अशी भीक मागण्यात येते. या मराठवाड्यातील आदर्श नेतृत्त्व करणाऱ्यांनी सांगितले की, विकास हा सरकारकडे भीक मागून होत नाही. विकास हा सरकारकडून खेचून आणावा लागेल. उद्या याबाबतीतील निर्णय सरकारने घेतले नाहीत तर आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून हा विकास सरकार कडून खेचून आणण्याची ताकद ठेवून आहोत.

सभापती महोदय, त्या दिवशीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये 18 टीएमसी पाणी आणण्याचा निर्णय झाला. या बैठकीमध्ये सुरूवाती पासून शेवट पर्यंत काय घडले हे श्री.तटकरे साहेब

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

कदाचित आपल्या भाषणामध्ये सांगणार नाहीत. सुरूवातीला हा प्रस्तावच आला नव्हता. मला या राज्याचे लोकप्रिय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांचे आभार मानायचे आहेत. जो पर्यंत मराठवाड्यातील 18 टीएमसीचा प्रस्ताव या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये येत नाही तो पर्यंत मंत्रिमंडळाची बैठक सुरू होणार नाही ही भूमिका घेतल्यामुळे हा 18 टीएमसी पाण्याचा प्रस्ताव आला. या 18 टीएमसी पाण्यासाठी माननीय राज्यपालांची संमती कोणी घ्यायची हा प्रश्न आज आमच्या समोर आहे. आम्ही जावे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी जावे की, माननीय जलसंपदा मंत्र्यांनी जावे की, माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी जावे ? हा प्रश्न मार्गी का लागत नाही ?

सभापती महोदय, सिंचनाचा एकच विषय आहे असे नाही. दुसरा विषय वैधानिक विकास महामंडळा संबंधातील आहे. आज वैधानिक विकास महामंडळावर बरखास्तीची तलवार आहे. वैधानिक विकास महामंडळ संपूर्णपणे बंद पडलेले आहे. 1994 मध्ये वैधानिक विकास महामंडळा संबंधी निर्णय झाला. 8 वर्षाचा बँकलॉग काढण्यात आला व विकासाची कामे झाली.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे....

वैधानिक विकास महामंडळ आज संपूर्णपणे बंद पडले आहे. 1994 साली वैधानिक विकास महामंडळाच्या बाबतीत निर्णय झाला आणि 1994 च्या अगोदरील 8 वर्षाचा बॅकलॉग वैधानिक विकास महामंडळाच्या माध्यमातून भरुन काढला गेला. वैधानिक विकास महामंडळाच्या माध्यमातून सन 2000 सालापर्यंतचा बॅकलॉग भरुन काढण्यात आला. परंतु 2000 पासून आतापर्यंतचा बॅकलॉग का भरुन काढण्यात आला नाही ? मराठवाडयाचा बॅकलॉग असतांना आपण वैधानिक विकास महामंडळाच्या बरखास्तीच्या बाबतीत निर्णय घेणार असाल तर या मराठवाडयाने कोणाकडे पहायचे ? आम्ही कोणत्या आशेने या सरकारकडे पहायचे ? आता जनतेला सर्व कळायला लागले आहे. मराठवाडयाकडे पाणी आणावयाचे म्हटले की, नगर आणि नाशिक जिल्हयाने विरोध करायचा हे असे कसे चालेल ? जर नाशिक आणि नगर जिल्हयांच्या माध्यमातून जायकवाडीमध्ये पाणी येणार असेल आणि त्या पाण्याने आमचा मराठवाडा सुजलाम सुफलाम होणार असेल तर मला सांगा, आज परळीमध्ये जी 12,500 मेगा वॅट वीज निर्माण होते ती वीज आम्ही महाराष्ट्राला देणे बंद केले तर ते चालेल काय ? एका एका विभागामध्ये एका एका विषयावर विरोध होत असेल तर हा महाराष्ट्र अखंड राहील की आणखी काही असा प्रश्न आमच्या मनामध्ये निर्माण झाला आहे. सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी सांगितले की, विदर्भातील जनता वेगळया विदर्भाची मागणी करीत आहे. काल परवा नागपूरमध्ये वेगळया विदर्भाच्या बाबतीत मतदान झाले, जवळ जवळ 5.5 लाख लोकांनी मतदान करुन वेगळया विदर्भाची मागणी केली आहे. आमचे प्रश्न मार्गी लागले नाही तर उद्या हीच भूमिका मराठवाडयालाही घ्यावी लागेल.

सभापती महोदय, औरंगाबाद येथे नॅशनल लॉ स्कूलसाठी जागा उपलब्ध आहे. यासाठी 6 कोटी रुपयांची तरतूद देखील करण्यात आलेली आहे. संपूर्ण देशातील नॅशनल लॉ स्कूलची युनिव्हर्सीटी औरंगाबाद येथे येणार आहे. असे असतांनाही नॅशनल लॉ स्कूलच्या बाबततीत अद्यापही निर्णय होत नाही. काही मंडळींना असे वाटते की, नॅशनल लॉ स्कूल औरंगाबाद ऐवजी मुंबई येथे झाले पाहिजे. अशी भूमिका घेण्यामागे नेमके कोणते कारण आहे ? जर औरंगाबाद येथे नॅशनल लॉ स्कूल स्थापण्याचा निर्णय झाला असेल तर तो चांगला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री श्री. राजेंद्र दर्डा साहेब तसेच मराठवाडयाचे ज्येष्ठ मंत्री मधुकरराव चव्हाण साहेब उपस्थित आहेत. मराठवाडयाच्या दृष्टीने नॅशनल लॉ स्कूल होणे हा अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न आहे. नॅशनल लॉ स्कूलसाठी दोन वर्षापासून जागा घेतली, तरतूद केली आहे परंतु भूमिपूजन कधी केले जाणार आहे,यासंदर्भात शासनाची नेमकी भूमिका काय आहे, याबाबतील माहिती माननीय मंत्री श्री. दर्डा साहेबांनी द्यावी अशी विनंती आहे.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, फक्त माहिती म्हणून मी सांगू इच्छितो की, नॅशनल लॉ स्कूलच्या संदर्भात औरंगाबादचा जो प्रस्ताव आहे तो हा प्रस्ताव मान्य झालेला आहे. ही मागणी गेल्या अनेक वर्षापासूनची आहे. गेले तीन वर्षे आपण सातत्याने यासंदर्भात पाठपुरावा करीत होतो. आता ही मागणी मान्य झाली असून नॅशनल लॉ स्कूलचे लवकरात लवकर भूमिपूजन केले जाणार आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. अमरनाथ राजूरकर : सभापती महोदय, नॅशनल लॉ स्कूल मुंबई, विदर्भात आणि मराठवाडयात देण्याचे प्रस्तावही मंजूर केले आहेत अशी आम्हाला माहिती मिळाली आहे.

श्री. राजेंद्र दर्डा :सभापती महोदय, मला असे वाटते की, आपण या विषयाच्या वादात न जाता औरंगाबाद येथे नॅशनल लॉ स्कूलचा प्रस्ताव मान्य झाल्यानंतर तो मुंबई येथेही झाला आहे. हायकोर्टमध्ये संपूर्ण कॉलेजने फक्त मुंबई येथेच व्हावे असे सुचविले होते. खरे म्हणजे कॅबिनेटच्या गोष्टी बोलता येत नाहीत. परंतु नॅशनल लॉ स्कूल औरंगाबाद येथे होण्याचाही प्रस्ताव झाला असून या प्रस्तावाला मान्यता मिळालेली आहे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, नॅशनल लॉ स्कूलच्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा केल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

माझी विनंती आहे की, हे सर्व झाले असेल तर औरंगाबाद मध्ये नॅशनल लॉ स्कूलचे भूमीपूजन केव्हा करणार आहात हे माननीय मंत्री महोदयांनी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विचारुन सांगावे. कारण आम्ही हे अधिवेशन संपल्यानंतर आमच्या मराठवाड्यामध्ये जाऊ त्यावेळी या अधिवेशनात आम्ही अशी अशी भूमिका मांडली आणि आम्हाला असे असे आश्वासन मिळाले हे आम्हाला सांगता येईल. तसेच मराठवाड्याकडे पाहण्याचा सरकारचा दृष्टीकोन बदलला आहे हे देखील सांगता येईल.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी मराठवाड्यातील सिंचना संबंधी जास्त मुद्दे मांडले, रस्त्या संदर्भात कमी मुद्दे मांडले. जिल्ह्याचे ठिकाण चौपदरी रस्त्याने जोडले गेले पाहिजे असा निर्णय सरकारने घेतला. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी नॅशनल हाय-वे ऑथॉरिटीच्या अखत्यारीत असलेल्या रस्त्यांचा विषय येथे मांडला. या रस्त्यांचे क्लिअरन्स आमच्या पिढीमध्ये मिळेल असे आम्हाला वाटत नाही. कारण या रस्त्यांच्या बाबतीत अनेक आक्षेप आहेत. या रस्त्यांच्या संदर्भातील बैठकीला आम्ही दोघेजण उपस्थित होतो. त्यावेळी नॅशनल हाय-वे ऑथॉरिटीच्या चीफ इंजिनियअरने सांगितले की, आपण रस्त्यांचा नाद सोडून द्यावा. मराठवाड्यातील रस्त्यांच्या बाबतीत अशाप्रकारे अडचणी निर्माण होत असतील, त्याबाबत परवानगी मिळत नसेल तर ती परवानगी मिळविण्याची कोणाची जबाबदारी आहे ?

सभापती महोदय, नवी मुंबई येथे विमानतळ उभारण्यात येत आहे. मुंबई, पुणे, पश्चिम महाराष्ट्रात काही गोष्टी खेचून आणल्या जातात. मराठवाड्यातील दळणवळणाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी शासन पुढाकार घेऊन केंद्र शासनाकडून परवानगी का घेत नाही ?

सभापती महोदय, नॅशनल हाय-वे रस्त्यांची दूरवस्था झालेली आहेच. पण राज्य रस्त्यांची अवस्था त्यापेक्षाही वाईट आहे. रस्त्यांवर खड्डे की खड्ड्यांमध्ये रस्ते आहेत हेच कळत नाही. मराठवाड्यातील जिल्ह्यांना जोडणारा एकही रस्ता चांगला नाही. ही जबाबदारी कोणाची आहे ?

सभापती महोदय, पाण्याच्या बाबतीत, शिक्षणाच्या बाबतीत आणि रस्त्यांच्या बाबतीत देखील हीच परिस्थिती आहे. मराठवाडा रेल्वेच्या बाबतीत इतका मागासलेला आहे की, आम्हाला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...

समजायला लागले तेव्हापासून आम्ही विचारत आहोत की, परळी-बीड-नगर रेल्वे कधी सुरु होणार आहे ? सोलापूर -जळगाव अशी रेल्वे सुरु करण्याबाबत देखील काही निर्णय झालेला नाही. मी या ठिकाणी कै.विलासराव देशमुख यांना धन्यवाद देतो कारण त्यांनी परळी-बीड-नगर रेल्वेसाठी सरकारचा अर्धा हिस्सा आणि केंद्र सरकारचा अर्धा हिस्सा असा निर्णय घेऊन ही रेल्वे सुरु करण्याचा निर्णय घेतला. परंतु हे काम इतक्या संथगतीने सुरु आहे की, आमच्या मुलांना किंवा नातवडांना त्या रेल्वेमध्ये बसायला मिळेल की नाही अशी परिस्थिती आहे. मराठवाड्यातील या महत्वाकांक्षी रेल्वे प्रकल्पाच्या बाबतीत शासन केव्हा पुढाकार घेणार आहे हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी जलसंपदा मंत्री उपस्थित आहेत. बीड जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांसाठी 10 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. बीड जिल्ह्यातील जे सिंचन प्रकल्प आहेत त्यामध्ये सात्रापोत्रा सिंचन प्रकल्प आहे. या प्रकल्पातून जवळपास 700 हेक्टर सिंचनक्षमता निर्माण होऊ शकते. सन 2003 मध्ये या प्रकल्पाला मंजुरी मिळाली. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास जवळपास पावणेसहा दक्षलक्ष घन मीटर इतका पाणीसाठा होऊ शकतो. सात्रापोत्रा गावासह मूर्शदपूर व कुंभारी या तीन गावांतील 700 हेक्टर जमीन ओलिताखाली येऊ शकते.

सभापती महोदय, टुकूर प्रकल्पाच्या बाबतीत देखील हीच परिस्थिती आहे. बीड जिल्ह्यांतील एकूण 69 प्रकल्पांना निधीची आवश्यकता आहे. हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आम्ही सरकारकडे निधीची मागणी करुनही आमच्या मागणीचा विचार झालेला नाही. आम्ही या ठिकाणी मराठवाड्याच्या संदर्भात जे मुद्दे मांडले त्याची उत्तरे माननीय मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात द्यावीत अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

अशुधीत प्रत / शोधनीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे....

या प्रस्तावाच्या माध्यामातून सरकारकडून आमच्या प्रमुख मागण्यांवर अपेक्षित उत्तर मिळाले नाही तर आम्ही सरकारची बाजू जनतेसमोर मांडू शकणार नाही अशी परिस्थिती आमच्यासमोर निर्माण होईल. आज मराठवाड्यातील जनता सरकारकडे आशेने पाहत आहे. मराठवाड्यातील जनतेची आशा राज्य सरकारने पूर्ण करावी आणि त्या जनतेला कोठे तरी दिलासा द्यावा, एवढेच या प्रस्तावावरील भाषणाच्या शेवटी सांगतो.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो व माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष झांबड (औरंगाबाद तथा जालना स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. महोदय, आपण मला या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला मनापासून आभारी आहे.

महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावाच्या अनुषंगाने मराठवाड्यातील विविध प्रश्न सभागृहाच्या माध्यमातून माननीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. महोदय, मराठवाडा हा निजामाच्या ताब्यात असताना दिनांक 17 मे, 1948 रोजी तो सर्वांगीण विकासासाठी कोणतीही अट न ठेवता महाराष्ट्रात सामील झाला. त्या काळात दिवंगत नेते सर्वश्री स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, शंकररावजी चव्हाण, भाई उध्दवराव पाटील, विनायकराव पाटील, बापूसाहेब काळदाते, दादा गणोरकर, भुजंगराव कुळकर्णी यांनी कायम मराठवाड्याच्या विकासासाठी शांत विचारांनी अनेक प्रश्न मांडले.

महोदय, मुळात मराठवाडा ही संतांची भूमी आहे. मराठवाड्यातील जनता शांत आणि सहनशील आहे. परंतु आजपर्यंत मराठवाड्यावर कायमस्वरुपी अन्यायच होत राहिला आहे. अनेक सन्माननीय सदस्य मराठवाड्यातील जायकवाडी धरणातील पाण्याचा प्रश्न मांडत आहेत. या निमित्ताने मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, मराठवाड्यात केवळ पाण्याचा प्रश्न प्रलंबित नसून, शेती, उद्योग, वीज, रस्ते, पूल, रेल्वे इत्यादी विविध प्रश्न प्रलंबित आहेत. मराठवाडा हा दुष्काळी भाग आहे. विदर्भात मोठ्या प्रमाणावर पाऊस पडल्यामुळे या भागातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. त्यामुळे या विभागातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबतची मागणी सभागृहामध्ये करण्यात आली. परंतु आमच्याकडे या उलट परिस्थिती आहे. मराठवाड्यामध्ये पाऊस झाला नाही. त्यामुळे आणेवारीनुसार ज्यांची पिके आली नाहीत, त्या शेतकऱ्यांना शासनाच्या माध्यमातून मदत मिळाली पाहिजे अशी आमची कायमस्वरुपी मागणी असते. म्हणूनच मराठवाडा हा विभाग दुष्काळी आहे हे सिध्द होते.

महोदय, मराठवाड्यात जायकवाडी बरोबरच नांदूर-मधमेश्वर, शिवणार टाकळी या सारखे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. जायकवाडी धरणातील पाण्याच्या संदर्भात मराठवाड्यावर आतापर्यंत कसा अन्याय झाला हे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. नांदूर-मधमेश्वर हा प्रकल्प स्व.विनायकराव

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष झांबड.....

पाटील यांनी मराठवाड्याच्या विकासासाठी केला. औरंगाबाद जिल्ह्यात वैजापूर आणि गंगापूर हे दोन तालुके अतिदुष्काळी आहेत. भारताचे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या माध्यमातून मराठवाड्यातील पाण्याचा प्रश्न सुटावा म्हणून उत्तर महाराष्ट्रात मुकणे, भावली, वाकी आणि भाम ही चार धरणे मंजूर करुन घेतली. त्यापैकी 3 धरणे पूर्ण झाली असून, भाम धरणाचे काम अपूर्ण आहे. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, या धरणांचे पाणी केवळ मराठवाड्यासाठी अडविण्यात आले होते. परंतु ते पाणी इतरांसाठी सोडले जाते. बरीच वर्षे हा विषय प्रलंबित पडला होता. महोदय, देशाचे कृषी मंत्री माननीय श्री.शरद पवार यांनी या प्रकल्पामध्ये विशेष लक्ष घालून 60 कोटी रुपयांचा निधी दिल्यामुळे तो मार्गी लागला आहे.

नंतर श्री.कांबळे...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष झांबड ....

परंतु, मार्गी लागूनही काम झालेले नाही. आम्हाला पाणी मिळाले आहे. आम्हाला ज्या पध्दतीने आवर्तन मिळते, त्यावरून असे दिसते की, पश्चिम महाराष्ट्राकडे ते आवर्तन सोडले जाते. मराठवाड्यातील वैजापूर, गंगापूर तालुक्यात येणारे पाणी पश्चिम महाराष्ट्राच्या आवर्तनाच्या मार्फत येते. त्यामुळे किती पाणी पश्चिम महाराष्ट्राकडे वळले जाते आणि किती आमच्याकडे येते, हे समजत नाही. मराठवाड्यातील पाण्याचा प्रश्न अत्यंत बिकट झाला आहे. हा प्रश्न सुटला नाही तर मराठवाड्यातील जनता रस्त्यावर आल्याशिवाय राहणार नाही. माननीय जलसंपदा मंत्र्यांनी साडे नऊ टीएमसी पाणी सोडण्याची भूमिका घेतली. त्यावेळी उत्तर महाराष्ट्रातील मंडळींनी रक्ताचे सडे पडले तरी चालतील पण पाणी सोडण्यात येणार नाही, ही भूमिका घेतली. आम्ही दुर्दैवी जनता आहोत, आमचे लोकप्रतिनीधी दुर्दैवी आहेत. कारण वरचे लोक सांगतात की, रक्ताचे सडे पडले तरी चालतील पण पाणी सोडण्यात येणार नाही. मराठवाड्यावर अन्याय होत आहे. मी माननीय मंत्र्यांना विनंती करतो की, जायकवाडी प्रश्नाच्या संदर्भात नियम 12(6)(सी) ची त्वरित अंमलीबजावणी करण्यात यावी. तसेच, नियम 2(11)(सी) रद्द करण्यात यावा आणि मराठवाड्यातील जनतेला न्याय द्यावा. मी सभागृहात पहिल्यांदाच बोलत आहे. आपण मला बोलण्यास संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. शासनाकडून मराठवाड्याच्या प्रश्नाला न्याय मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त करून मी माझे भाषण पूर्ण करतो.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या, जनतेच्या दृष्टीने अतिशय जिव्हाळ्याचे आणि महत्त्वाचे विषय कोणते असतील तर ते म्हणजे मराठवाड्यातील पाण्याचा विषय, रस्त्याच्या विषय, विजेचा विषय आणि रेल्वेचा विषय. शासनाने मराठवाड्यातील जनतेच्या तोंडाला पाने पुसण्याशिवाय काहीही केलेले नाही. शासनाने या संदर्भात ठोस कृती आराखडा तयार करून त्या संदर्भातील कार्यक्रम जाहीर करावा. मराठवाड्यातील शेतकऱ्याला, जनतेला न्याय द्यावा या उद्देशाने आम्ही येथे बसलो आहोत. गेले 3 दिवस सातत्याने सभागृहात सकाळपासून रात्री 10-11 वाजेपर्यंत कामकाज सुरू आहे. मराठवाड्याच्या प्रश्नांवर चर्चा कधी होते आणि माननीय मंत्री आमच्या कानावर कोणती सुंदर चांगली अक्षरे टाकतील, या कुतूहलतेने आम्ही भावनाविवश झालो आहोत. आज मराठवाड्यातील प्रश्नांवर चर्चा सुरू झाली आहे, याचा आनंद आमच्या मनात आहे.

सभापती महोदय, मराठवाड्याला वरदान असणाऱ्या जायकवाडी धरणाचे भूमिपूजन देशाचे तत्कालीन पंतप्रधान स्व. लालबहादूर शास्त्री यांच्या शुभहस्ते झाले. तत्कालीन पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांच्या हस्ते हे धरण राष्ट्राला समर्पित करण्याचे काम झाले. दिनांक 11.10.1965 आणि सन 1976 या जवळपास दीड वर्षांच्या कालावधीत हा प्रकल्प जलद गतीने पूर्ण करण्यात आला. स्व. शंकरराव चव्हाण यांनी या प्रकल्पासाठी भगीरथ प्रयत्न केले. आदरणीय श्री. शरदचंद्र पवार साहेबांचे योगदान यामध्ये राहिले. मराठवाड्यातील औरंगाबादपासून नांदेडच्या कोपऱ्यापर्यंत असलेल्या शेतकऱ्याला यामुळे पाणी मिळत आहे, याचा आनंद आपल्या सर्वांच्या मनात आहे. धरणाची साठवण क्षमता 102 टीएमसी आहे, धरणामुळे 1,83,322 हेक्टर इतके क्षेत्र ओलिताखाली येत आहे. यावरून हे धरण किती महत्त्वाचे आहे, हे आपल्या लक्षात येते. धरणामुळे 196 टीएमसी जलनिष्पत्ती होणे अपेक्षित आहे. पैठणच्या वरच्या भागात नाशिक, अहमदनगर जिल्ह्यासाठी पाणी मंजूर आहे.

(नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

त्यानुसार 115.50 टीएमसी पाणी वरच्या भागामधील धरणांमध्ये अडविणे व वापरणे आवश्यक होते. प्रत्यक्षात वरच्या भागामध्ये गंगापूर, गडबा, नांदूर मधमेश्वर, प्रवरा, मुळा अशा प्रकारचे अनेक लघु पाटबंधारे प्रकल्प बांधण्यात आले. या सर्व धरणांची एकूण पाणी साठविण्याची क्षमता 115 टीएमसी इतकी आहे. पण आजमितीस वरच्या धरणामधून 160 टीएमसी पाणी वापरणे सुरु आहे. म्हणजे 51 टीएमसी व 173.75 टीएमसी पाणी वरच्या धरणांमध्ये अडविले जाणार आहे. हा कोणता न्याय आहे ? ज्यावेळी खालच्या भागात धरण बांधले तेव्हा वरच्या भागात किती धरणे बांधावीत, पाण्याची क्षमता किती असावी हे ठरले होते. हे सर्व लिखित आहे. मराठवाड्यातील भूमी साधूसंतांची आहे. ठेविले अनंते तैसेच रहावे, चित्त असू द्यावे समाधानी, असे संतांनी म्हटले आहे. त्या प्रमाणे आम्ही समाधानी आहोत. आमच्यावर जो जो अन्याय होतो तो आम्ही सहन करतो. परंतु किती सहन करावयाचे हे देखील लक्षात घेतले पाहिजे. आम्ही सर्वांचे ऐकत आलो, सहन करत गेलो. त्याची फळे आज आम्हाला भोगावी लागत आहेत. तेथील धरणांची एकूण क्षमता 115 टीएमसी इतकी असताना प्रत्यक्षात 174 टीएमसी पाणी वरच्या भागातील लोक वापरत आहेत. हा किती तरी मोठा अन्याय मराठवाड्यातील लोकांवर होत आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी पाण्याचे समन्यायी वाटप होण्यासाठी 2005 साली राज्यात जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची स्थापना केली. त्याचे आम्ही स्वागत केले होते. सर्वांना सारखे पाणी मिळावे यासाठी तो कायदा केलेला आहे. या कायद्याच्या कलम 12 (6) (ग) मध्ये असे नमूद केले आहे की, " खोऱ्यातील पाण्याची तूट सम प्रमाणात विभागली जावी. यासाठी सर्व धरणातील पाणी साठे दरवर्षी ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस नियंत्रित केले जातील. वर्षासाठी उपलब्ध असलेली पाण्याची टक्केवारी सर्व धरणासाठी जवळजवळ सारखीच असेल. कायदा सर्वांसाठी असतो. त्या कायद्याचे पालन सर्वांनी केले पाहिजे. या प्राधिकरणाचे नियम तयार करण्यासाठी दीड वर्षाचा कालावधी लागला. हा विलंब का झाला ? केवळ मराठवाड्याला पाणी मिळू नये म्हणून विलंब करण्यात आला व हे नियम केवळ मराठवाड्याला पाणी मिळू नये यासाठी करण्यात आले असा माझा गंभीर आरोप आहे. मंत्री महोदय अभ्यासू

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.विक्रम काळे....

आहेत. यामध्ये काही तरी चुकीचे होत आहे असे त्यांचे आंतरिक मन म्हणत आहे. तरी देखील नाईलाजास्तव त्यांना त्यावर सही करावी लागली. या कलमाला अधिकाऱ्यांच्या माध्यमातून छेद देण्याचे काम होत आहे. मंत्री महोदय औरंगाबाद येथे आले होते. राज्यात इतरत्र अतिवृष्टी झाली असेल, मराठवाड्यातील उस्मानाबाद, बीड, लातूर, या जिल्ह्यात पाऊस पडला असेल पण माझ्या मतदार संघातील 8 जिल्ह्यांपैकी 5 जिल्ह्यात पाऊस पडलेला नाही.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे....

जायकवाडी धरणामध्ये 33 टक्के पाणीसाठा होता. त्यावेळी मंत्री महोदय 25 ऑक्टोबरला औरंगाबादला आले होते.

उप सभापती : दुपारी 12.00 वाजता ही चर्चा मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणासह संपवाची आहे.

श्री. दिवाकर रावते : मागील 4-5 अधिवेशनामध्ये मराठवाड्यासंबंधी चर्चा झालेली नाही. तेव्हा या चर्चेसाठी आपण वेळ वाढवून द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, या वर्षी कमी पाऊस झाला. वरच्या भागामध्ये जास्त पाऊस झाला. वरच्या भागातील सर्व धरणे शंभर टक्के भरली. परंतु जायकवाडी धरणामध्ये पाणी आले नाही. समन्यायी वाटपाप्रमाणे आम्हाला पाणी मिळाले पाहिजे म्हणून आम्ही सातत्याने आंदोलने केली, जनतेने आंदोलने केली, लोकप्रतिनिधींनी धरणे आंदोलन केले, औरंगाबाद जिल्हयातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी देखील आंदोलन केले, मोर्चे काढले आणि पाणी सोडले पाहिजे अशी मागणी केली. या सर्वांचा आक्रोश ऐकून उशिरा का होईना माननीय मंत्री महोदय दिनांक 25 ऑक्टोबरला औरंगाबादे येथे आले आणि त्यांनी तेथे बैठक घेऊन 10 टीएमसी पाणी सोडण्याचे जाहीर केले. हे 10 टीएमसी पाणी सोडण्याचा निर्णय झाला. 10 टीएमसी पाणी सोडण्यात आले. परंतु तोपर्यंत उच्च न्यायालयामधून स्थगिती आदेश घेण्यात आले. सगळया बाजूंनी विरोध झाला होता. सोडलेल्या 10 टीएमसी पाण्यापैकी जायकवाडी धरणामध्ये केवळ 1.67 टीएमसी इतके पाणी पोहोचले. उर्वरित पाणी कोठे गेले याचा शोध मंत्री महोदयांनी घ्यावा. आमच्यासाठी जे पाणी सोडले होते ते पाणी आमच्यापर्यंत पाहोचले नाही. हेच पाणी पावसाळयामध्ये, नदीला पाणी असताना सोडले असते तर 10 टीएमसी पाणी औरंगाबादला पोहाचले असते. उशिरा का होईना थोडेसे पाणी जायकवाडीमध्ये पोहोचले. आज कोर्टामध्ये याचिका दाखल केलेली आहे. त्या बरोबर ॲफेडेव्हिट देखील दाखल केलेले आहे. अशा पध्दतीने जे चुकीचे ॲफेडेव्हिट तयार करण्यात आले होते ते ॲफेडेव्हिट अधिकाऱ्यांनी मंत्री महोदयांना दाखविले नव्हते काय ? म्हणून जो कोणी अधिकारी दोषी असेल त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. मराठवाड्याला पाणी मिळू नये अशा प्रकारचा कुटिल डाव मराठवाड्याविरुध्द खेळला जात आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे...

सभापती महोदय, मराठवाड्यातील उस्मानाबाद आणि बीड जिल्हयाला कृष्णा-खो-यातून 25 टीएमसी पाणी मिळाले पाहिजे. यासाठी उस्मानाबाद आणि बीड जिल्हयातील लोकप्रतिनिधी सातत्याने प्रयत्न करीत आहेत. माझे वडील कै. वसंतरावजी काळे यांनी देखील अनेक पाणी परिषदा घेण्याचे काम केले होते. सन 2000 साली मंत्रालय स्तरावर प्रकल्पाला मान्यता देण्याचे काम केले होते. मान्यता मिळून देखील प्रकल्प सुरु होत नाही. आमच्या भागातील ज्येष्ठ नेते श्री. मधुकरराव चव्हाण यांनी देखील वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष असताना दिनांक 19 सप्टेंबर 2005 रोजी औरंगाबादला मंत्रिमंडळाची बैठक घेतली होती. प्रकल्प सुरु झाल्यानंतर तो पूर्ण होईपर्यंत किती वेळ लागतो हे सर्व सन्माननीय सदस्यांना माहीत आहे. औरंगाबादला बैठक घेण्यात आली. परंतु आम्हाला आमच्या हक्काचे पाणी मिळत नाही. प्रकल्प सुरु होण्यासाठी निधी मिळत नाही. जी माणसे खुर्चीवर बसलेली आहेत त्यांनी सर्वांना सारखा न्याय देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. माननीय मंत्री महोदय, लोकांच्या तुमच्याकडून अपेक्षा आहेत.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. नागो पुंडलिक गाणार)

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

आमच्याकडे 25 टीएमसीचा प्रकल्प मंजूर झालेला आहे, त्या प्रकल्पासाठी टप्प्याटप्याने निधी द्यावयाचा आहे. तो निधी आम्हाला तत्काळ उपलब्ध करुन दिला पाहिजे आणि सिंचनाचा अनुशेष दूर करण्याचे काम शासनाने केले पाहिजे.

सभापती महोदय, मराठवाडयात 2982 कोटी रुपयांचा सिंचनाचा अनुशेष आहे. तो अनुशेष तातडीने कसा दूर करता येईल याचा माननीय मंत्री महोदयांनी ठोस निर्णय घ्यावा, अशी आम्ही अपेक्षा व्यक्त करीत आहोत. आम्ही कायद्याप्रमाणे मागत आहोत, कायदा सोडून काहीही मागणी करीत नाही. आपण कलम 12(6) मध्ये जी तरतूद केलेली आहे त्यानुसार पाण्याचे समन्यायी वाटप केले पाहिजे. आमच्या वाटयास जेवढे पाणी येईल तेवढे पाणी आम्हाला उपलब्ध करुन दिले पाहिजे. समन्यायी पाणी वाटपाच्या भूमिकेवर आपणही ठाम राहण्याचे काम केले पाहिजे. 25 टीएमसी पाण्याचा प्रश्न आहे, त्याचे काम करण्यासाठी निधी लागणार आहे, तो उपलब्ध करुन घेण्यासाठी आमचे खासदार डॉ. पद्मसिंह पाटील, श्री.राणा पाटील, श्री.मधुकर चव्हाण व आम्ही इतर सदस्य शासन दरबारी पाठपुरावा करीत आहोत. प्रत्येक अधिवेशनात हा मुद्दा आम्ही मांडतो. गेल्या वर्षी सुध्दा आम्ही दिनांक 12 डिसेंबर 2012 रोजी माननीय राज्यपालांना नागपूरमध्ये भेटलो होतो. माननीय राज्यपालांनी सुध्दा राज्य शासनाला निदेश दिलेले होते पण त्यांनी दिलेल्या निदेशाप्रमाणे 25 टीएमसी पाण्याच्या बाबातीत निधी आजही उपलब्ध करुन दिला गेलेला नाही, ही मोठी खंत आहे. म्हणून तोही निधी उपलब्ध करुन देऊन त्या ठिकाणचे प्रकल्प पूर्ण झाले पाहिजेत अशी मी मागणी या निमित्ताने करतो. मराठवाडयातील प्रकल्पांना सुप्रमा दिल्या जात नाहीत. अजूनपर्यंत सुप्रमाका दिल्या गेल्या नाहीत, त्या प्रकल्पांना सुप्रमा कधी दिल्या जाणार आहेत, त्याबाबतचा देखील स्पष्ट खुलासा माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी केला पाहिजे. मला असे वाटले होते की, या विषयाच्या बाबतीत माननीय मंत्री महोदय पूर्णपणे अभ्यास करुन आले असतील. उद्या हिवाळी अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. मुंबईला गेल्यानंतर आठ दिवसात सर्व प्रकल्पांच्या कामांना सुप्रमा दिल्या जातील अशा प्रकारचे बाणेदार उत्तर माननीय मंत्री महोदय देतील अशी मी अपेक्षा करतो. मराठवाड्यातील अनेक प्रकल्पांच्या सुप्रमा राहिलेल्या आहेत, त्या प्रकल्पांना सुप्रमा देण्याचे काम माननीय मंत्री महोदयांमार्फत केले जाईल अशीही अपेक्षा मी या निमित्ताने करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

सभापती महोदय, मराठवाडयातील रस्त्यांच्या बाबतीत सुध्दा अतिवृष्टीमुळे अतिशय दयनीय परिस्थिती झालेली आहे. मराठवाडयातून अतिशय कमी राष्ट्रीय महामार्ग जातात. मराठवाडयातील आठही जिल्हयातील सर्व रस्त्यांची लांबी 56.71 टक्के इतकीच आहे. माननीय सभापती हे आपणास माझे मुद्दे लिहून घेण्यास सांगत आहेत. आमची सातत्याने मागणी अशी आहे की, मराठवाडयाचा विकास चांगल्या प्रकारे करावयाचा असेल तर रस्ते चांगले झाले पाहिजेत. जर रस्ते चांगले असतील तर बाहेरचे उद्योजक आपल्याकडे येतील. मी आमदार झाल्यापासून प्रत्येक अधिवेशनात मागणी करीत आहे की, जिल्हयाजिल्हयाला जोडणारे जे रस्ते आहेत त्यांचे चौपदरीकरण झाले पाहिजेत. या बाबतीत आम्ही अजूनही पाठपुरावा करीत आहोत.

सभापती महोदय, आज राजधानीला जोंडणारे रस्ते सुध्दा चारपदरी नाहीत याची आमच्या मनात खंत आहे. मराठवाडयाचा खरोखर विकास करावयाचा असेल तर रस्त्यांची अवस्था सुधारली पाहिजे. रत्त्यांच्या चौपदरीकरणाच्या कामासाठी तसेच दुरुस्तीच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला गेला पाहिजे.

सभापती महोदय, मराठवाडयात रेल्वे मार्गाचा देखील प्रश्न मोठा आहे. आमचे खासदार श्री.विजय दर्डा, डॉ.पद्मसिंह पाटील या संदर्भात दिल्लीमध्ये प्रयत्न करीत आहेत. मराठवाडयातील पाच जिल्हयांना जोडणारा "नांदेड-मनमाड" हा रेल्वे मार्ग दुहेरी झाला पाहिजे. तो मार्ग दुहेरी झाला तर जालना येथील स्टील कंपनी देशात,जगात स्टीलचा पुरवठा करते. त्या उद्योगास चालना मिळण्याचे काम होणार आहे. म्हणून "नांदेड-मनमाड" हा रेल्वे मार्ग दुहेरी झाला पाहिजे. त्या कामास रेल्वे मंत्रालयाकडून मान्यता मिळवून घेतली गेली पाहिजे, अशी सुध्दा मी या निमित्ताने मागणी करतो. आज आमचा "परळी-नगर*बीड "रेल्वे मार्ग व्हावा म्हणून या विभागातील सर्व लोकप्रतिनिधी प्रयत्न करीत आहोत. परंतु त्या मार्गावरील रेल्वेत आमचे नातू बसतील, त्यानंतरची पिढी बसेल असे आम्हाला वाटू लागले आहे. या रेल्वे मार्गाच्या बाबतीत सरकारची काय भूमिका आहे या बाबतची देखील माहिती या ठिकाणी सांगितली गेली पाहिजे.

<u>सभापतीस्थानी माननीय उप सभापती</u>

यानंतर श्री. भोगले....

अशुद्धीत पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.....

सभापती महोदय, वीज जीवनातील आवश्यक भाग आहे. एकेकाळी आम्ही पणतीच्या उजेडात, दिव्याखाली अभ्यास करीत होतो. आज वीज जीवनावश्यक बाब झालेली आहे. सायंकाळी जेवणाच्या वेळी घरात वीज खंडित झाली असेल तर अगोदर वीज पुरवठा सुरु होऊ दे मग जेवण करु अशी भूमिका घेतली जाते. इतकी विजेची बाब जीवनाशी निगडित झालेली आहे. वीज सर्व शेतकऱ्यांना अखंडितपणे पुरविली गेली पाहिजे, शेतीपंपांना पुरविली पाहिजे, जनतेला पुरविली पाहिजे. यासाठी शासनाने कृती कार्यक्रम तयार केला पाहिजे. आज वारंवार लोडशेडिंग केले जाते. शेतकरी शेतामध्ये मोटार सुरु करतो, वाफेमध्ये पाणी येईपर्यंत वीज पुरवठा खंडित झालेला असतो. त्यामुळे त्या शेतकऱ्याला मोटार सुरु करता येत नाही. अशी शेतकऱ्यांची दयनीय अवस्था झालेली आहे.

सभापती महोदय, वीज बिलाच्या थकबाकी संदर्भात शासनाने ठोस निर्णय घेतला पाहिजे. एकदाची सर्व थकबाकी माफ करावी आणि रेग्युलर बिल भरण्यात यावे अशा प्रकारचे धोरण अवलंबिले पाहिजे. सभापती महोदय, मराठवाड्यातील पाण्याचा प्रश्न असेल, विजेचा प्रश्न असेल, रस्त्यांचा प्रश्न असेल किंवा शिक्षणाबाबतचे प्रश्न असतील त्या संदर्भात शासनाने प्राधान्य दिले पाहिजे. माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण सातत्याने औरंगाबाद येथे लॉ स्कूल स्थापन करावे अशी मागणी करीत आहेत. मराठवाड्याच्या दृष्टीने शिक्षणाचा केंद्रबिंदू म्हणून औरंगाबादकडे पाहिले पाहिजे. त्या ठिकाणी लॉ स्कूल व्हावे म्हणून आम्ही आग्रह धरला आहे. मंत्रिमंडळाने ही बाब मान्य केली असल्याचे आम्हाला कळले आहे. मराठवाड्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या शिक्षण विषयाबाबत सुदैवाने विभागाचे चारही मंत्री मराठवाड्याचे आहेत. त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. शालेय शिक्षण आणि उच्च शिक्षण विभागाचे चारही मंत्री मराठवाड्यातील असल्यामुळे आमच्या त्यांच्याकडून फार मोठ्या अपेक्षा आहेत.

सभापती महोदय, शालेय शिक्षणमंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांनी त्यांच्या कार्य कर्तृत्वाने शिक्षण विभागातील फार मोठे प्रश्न निकाली काढले आहेत. सभापती महोदय, कनिष्ठ महाविद्यालयांबाबत कायम शब्द वगळावा म्हणून आम्हाला काल धरणे धरावे लागले, उपोषण करावे लागले. माननीय मंत्री हे वजनदार आहेत. ते आपला पेन का चालवित नाहीत? मुख्यमंत्र्यांकडे याबाबत आग्रह का

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.....

धरीत नाहीत याची चिंता वाटते. मराठवाड्याच्या जनतेच्या दृष्टीने त्यांना जी संधी मिळाली आहे तिचे त्यांनी सोने केले पाहिजे. मराठवाड्याची जनता त्यांच्या निर्णयाकडे डोळे लावून बसली आहे. तो निर्णय मंत्री महोदयांनी या ठिकाणी जाहीर करावा अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मराठवाड्याच्या प्रश्नाबाबत चर्चेत भाग घेण्यापूर्वी आनंद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. माननीय सदस्य सर्वश्री विक्रम काळे, धनंजय मुंडे यांनी सुंदर भाषण केले आहे. माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण बिनीचे सरदार शेलार मामांसारखे लढत आहेत हे पाहून आनंद झाला. मराठवाड्यातील रस्ते, पाणी, वीज, उच्च शिक्षण या विभागांतील प्रश्नांबाबत कडाडून हल्ले चढविण्यात आले. मराठवाड्याचा अनुशेष आणि त्या बाबतचे माननीय सदस्यांचे विचार ऐकून मत्री महोदय हसत होते. ही सर्व खाती राष्ट्रवादी पक्षाकडे आहेत. राष्ट्रवादीचे शिलेदार तुमच्यावर तुटून पडत आहेत. मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष याला कारणीभूत आहे हे सांगितल्याबद्दल धन्यवाद देतो.

सभापती महोदय, मी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचा अध्यक्ष झालो त्यावेळेला मराठवाड्यामध्ये राष्ट्रीय महामार्गाची लांबी फक्त 8 कि.मी.होती. सोलापूर ते उमरगा आणि पुढे तो महामार्ग कर्नाटकामध्ये जातो. या संदर्भात लक्ष घालायचे मी ठरविले. सातत्याने पाठपुरावा केला. सुदैवाने माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी या ठिकाणी आहेत. दिल्लीमध्ये जाऊन सर्व संबंधितांच्या भेटी घेतल्या. त्यांनी आम्हाला सांगितले की, राष्ट्रीय महामार्ग होण्याकरिता प्रथम राज्य शासनाने तो रस्ता तयार करावा, नंतर आम्ही तो ताब्यात घेऊ.

नंतर एक्स.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

संभाजी नगर ते नांदेड पर्यंतचा 540 कि.मी.चा राष्ट्रीय महामार्ग माझ्या काळात करण्यात आला. हा महामार्ग करत असताना त्यातून परभणी सुटत होते. त्यामुळे शेलू, परभणी, हिंगोली मार्गे नांदेड पर्यंत हा महामार्ग नेण्यात आला. अशा प्रकारे मराठवाड्यासाठी वैभवपूर्ण असा महामार्ग निर्माण झाला आहे. हे काम वैधानिक विकास मंडळामार्फत करण्यात आले होते. हे मी मुद्दाम सांगत आहे.

आमचा मराठवाडा मोसंबी पिकवणारा आहे. परंतु, संत्रा-मोसंबीची बाजारपेठ कायमची नागपूरला असायची. वैधानिक मंडळाचा अध्यक्ष या नात्याने बैठक घेतली होती. त्यावेळी तत्कालीन कृषी मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील हे माझ्या बाजूला बसले होते. त्यावेळी ते आमच्या युती शासनामध्ये होते. मोसंबी आष्टी, पाटोदा तालुक्यामध्ये पिकते. त्याला 60 रूपये भाव मिळतो. परंतु, 10 कि.मी.वर असलेल्या नगर जिल्ह्यातील मोसंबीला 120 रूपये भाव मिळतो. तेव्हा त्यांनी याची माहिती जाणून घेण्यासाठी लगेच अधिकाऱ्यांना बोलाविले. तेव्हा त्यांना आम्ही सांगितले की, मोसंबी पिकविणाऱ्या मराठवाड्याची बाजारपेठ मराठवाड्यामध्ये असली पाहिजे. नव्हे तसा हट्ट धरला. त्यानंतर नागपूरची बाजारपेठ जालन्यामध्ये आली. अशाने 350 कोटी रूपयांची उलाढाल असलेली आमची मोसंबीची बाजारपेठ परत मराठवाड्यामध्ये आली. वैधानिक विकास मंडळ सक्षम असल्यानंतर काय काय निर्णय घेऊ शकते हे समजण्यासाठी मी हा विषय मांडला आहे.

सभापती महोदय, कृष्णा खोरे संबंधातील विषयामध्ये मी मघाशी पटकन म्हणालो की, आपले बरोबर आहे. आपल्याला पाणी लोकसंख्ये नुसार मिळाले पाहिजे. तो विषय मी येथे मांडला होता. कृष्णा खोऱ्याचे 586 अब्ज घन मीटर पाणी उपलब्ध आहे. मराठवाड्यातील लोकसंख्या महाराष्ट्राच्या 10 टक्के असेल तर आम्हाला कृष्णा खोऱ्यातील एकूण उपलब्ध असलेल्या पाणी साठ्या पैकी 10 टक्के पाणी मिळाले पाहिजे हा आमचा आग्रह आहे. जेव्हा राष्ट्रीय नद्या जोडणी कार्यक्रम निघाला तेव्हा आदरणीय श्री.शरद पवार यांनी केंद्र शासनाला सांगितले की, महाराष्ट्र हे पठारावर असल्यामुळे आमच्याकडे कुठलेही पाणी येऊ शकत नाही. एकूण देशाच्या दहा टक्के लोकसंख्या महाराष्ट्रात असल्यामुळे या कार्यक्रमातील दहा टक्के निधी आमच्या येथील नद्या जोडणीसाठी देण्यात यावा. जो फॉर्म्युला श्री.शरद पवार यांनी देश पातळीवर मांडला तो आम्ही मराठवाड्यासाठी पाणी मिळविण्यासाठी का मांडायचा नाही व का उपयोगात आणायचा नाही,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

असा प्रश्न मी या सदनामध्ये केला होता. बीड, धाराशीव, लातूर याकरिता 10 टक्क्याप्रमाणे 86 टीएमसी पाणी मिळाले पाहिजे ही आमची आग्रही भूमिका आहे. आदरणीय श्री.शरद पवार यांनी जलनीती संबंधी चांगला फॉर्म्युला दिला होता तो आमच्या मराठवाड्यासाठी का वापरला जात नाही असा प्रश्न मी मंत्रिमहोदयांकडे उपस्थित करीत आहे. हे पाणी आम्हाला कधी मिळणार आहे ?

मला माननीय मंत्री श्री.मधुकरराव चव्हाण यांचे अभिनंदन करावयाचे आहे. माझे अर्धवट राहिलेले काम अभ्यासाअंती पुढे पुढे जात आहे. आपण या मंडळाचे अध्यक्ष झाल्यानंतर ते काम पुढे नेल्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो व ते शासन स्वीकारत नाही म्हणून मला चिंता वाटते.

सभापती महोदय, सन 2000 मध्ये वैधानिक मंडळाने 21 टीएमसी पाण्याचा ठराव केला होता. त्यावेळी भीमा नदीतून 8 टीएमसी पाणी, उजनी धरणातून 7 टीएमसी पाणी, सीना धरणातून 4 टीएमसी पाणी, कुकडीतून 3 टीएमसी असे 22 टीएमसी पाणी आमच्या मराठवाड्याला त्या भागातून मिळाले तर आमचा बाकीचा प्रश्न निर्माण होत नाही. या योजनेला शासनाने सन 2005 मध्ये मंजुरी दिली. समन्यायी पाणी वाटप असल्यामुळे शासनाने त्यास मंजुरी दिली. त्यावेळी स्थिरीकरण योजना नव्हती. ज्यावेळी मी हा प्रश्न मांडला होता तेव्हा आदरणीय श्री.शरद पवार साहेब हे त्या खात्याचे मंत्री होते. त्यांनी मला सांगितले की, कृष्णा-भीमा, स्थिरीकरण झाल्याशिवाय हे पाणी आपणाला उपलब्ध करून देता येणार नाही. तेव्हा हे पाणी आम्हाला कधी उपलब्ध होणार आहे ?

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

कृष्णा-भीमा स्थिरीकरणाचे काम पूर्ण होईपर्यंत न थांबता 21 टीएमसीच्या धरणाची कामे आता ओस पडली आहेत. या ठिकाणी फार थोडी कामे झालेली आहेत.

उप सभापती : या चर्चेसाठी सभागृहाची वेळ 12.30 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कृष्णा-भीमा स्थिरीकरणाचा विषय बाजूला सारुन वैधानिक विकास मंडळाने मंजूर केलेल्या ठरावाला शासनाने मान्यता दिली असून त्याची तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. या वर्षी बीड,घाराशीव येथे जो दुष्काळ पडला होता त्यामध्ये गावेच्या गावे ओस पडली होती. या दुष्काळात लाखो जनावरे मृत्यूमुखी पडली होती. अशा घटना भविष्यात टाळावयाच्या असतील तर दुष्काळाच्या संदर्भातील निर्णय शासनाने तातडीने घेण्याची आवश्यकता आहे. आम्हाला जे पाणी दिले जाणार आहे ते तातडीने दिले तर त्या भागातील जनता भविष्यातील दुष्काळाला काही अंशी तोंड तरी देऊ शकेल असे मला वाटते.

सभापती महोदय, गंगापूर येथून नांदूर मधमेश्वरसाठी पाणी आणण्यासाठी या भागातील जनतेने फार मोठा लढा दिला होता. 4 वर्षापूर्वी गंगापूर धरणातून 3 टीएमसी पाणी सोडण्यात आले. मराठवाडयाला पाणी मिळणार नाही याचा बंदोबस्त नगर व नाशिककरानी केलेला आहे. ज्या प्रमाणे या दोन जिल्हयांनी जायकवाडी धरण ओस पाडले तसेच गंगापूर धरणही ओस पाडण्याचा निर्णय घेतलेला आहे. आपण प्राधिकरण नियुक्त केल्यापासून पाण्याच्या प्रायोरिटीत बदल झालेला आहे. आता पिण्यासाठी प्रथम, शेतीसाठी दुसरी आणि उद्योगासाठी तिसरी अशा पध्दतीची प्रायोरिटी ठरविण्यात आलेली आहे. पिण्यासाठी जर प्रथम प्रायोरिटी असेल तर आमच्या नांदूर मधमेश्वर येथे पाणी येऊच नये यासाठी नाशिक महानगरपालिकेने माकडी धरणातून पिण्याच्या पाण्याची योजना मंजूर केली आहे. माकडी धरणाच्या माध्यमातून गंगापूर, वैजापूरच्या 43 हजार हेक्टरच्या सिंचनाचा प्रश्न आपण निर्माण करीत आहात. आपण यासंदर्भात जी भूमिका घेतली आहे ती अतिशय गैर आहे. माकडी धरणातील पाणी नाशिक महानगरपालिकेसाठी आरक्षित केले आहे ते ताबडतोब रद्द करण्याची आवश्यकता असून नाशिक शहराला दुसऱ्या धरणातून पाणी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. मराठवाडयाच्या हक्काचे जे पाणी आहे ते कृपया काढून घेऊ नका एवढे मी अत्यंत नम्रपणे निदर्शनास आणीत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, जायकवाडीला येणारे पाणी थांबल्यामुळे परभणी पासून ते कंधार पर्यंतचा 100 कि.मी.चा जो कालवा निघणार होता तो काढला गेला नाही. आता तो रद्द करण्यात आलेला आहे. यामुळे या भागातील 72 हजार हेक्टर सिंचन क्षमता कमी झाली आहे. त्यामुळे या कालव्याच्या संदर्भात आपण पुनर्विचार करणार आहात काय हे आम्ही मंत्री महोदयांकडून जाणून घेऊ इच्छितो.

सभापती महोदय, मराठवाडयात उद्योग नाहीत. जे काही उद्योग येतात ते संभाजीनगर मध्ये येतात. मी वैधानिक विकास महामंडळाचा अध्यक्ष असतांना हाजिरा, ऊरण, नांदेड व नागपूर मार्गे आंध्रप्रदेशात जाणाऱ्या गॅस पाईप लाईनच्या प्रकल्पाला मी चालना दिली होती. त्यावेळच्या मंत्री मंडळाने या प्रस्तावाला मान्यता देऊन या प्रकल्पाचा सर्व्हे करण्यासाठी 5 लाख रुपये निधी मंजूर केला होता. यासंदर्भात अध्यक्ष या नात्याने मी स्वत: दिल्ली येथे गेलो होतो. त्या ठिकाणी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली, त्या बैठकीमध्ये सर्व्हेला मंजुरी दिल्यानंतर सर्व्हेची फी सुध्दा भरण्यात आली होती. आता हा अहवाल शासन दरबारी आलेला आहे. 27 जानेवारी, 2001 रोजी केंद्र सरकारकडून महाराष्ट्र शासनाकडे प्रस्ताव सादर झाला होता. इंजिनिअरींग इंडिया लिमिटेड या भारत सरकारच्या उपक्रमातून तयार झालेला अहवाल शासनाकडे आलेला आहे. मराठवाडा, विदर्भाच्या औद्योगिक क्षेत्राला प्रचंड चालना मिळणारा हा प्रकल्प असतांना या प्रकल्पाला आपण मान्यता तर दिली नाहीच परंतु मला जी माहिती मिळाली त्या माहिती नुसार मराठवाडा व विदर्भाला बाजूला सारुन ही पाईप लाईन वेगळयाच भागातून नेण्याचा प्रयत्न केला जात आहे.

यानंतर श्री.अजित.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंद

श्री.दिवाकर रावते...

माझ्याकडे अधिकृत माहिती नसल्यामुळे मी ती पटलावर मांडत नाही.

सभापती महोदय, मराठवाड्यातील पाण्याचे, रस्त्याचे प्रश्न उपलब्ध निधीप्रमाणे सोडविता येतील. परंतु मराठवाड्यातील बेरोजगार तरुणांकरिता, औद्योगिक विकासाकरिता काही प्रयत्न केले पाहिजेत. एमआयडीसीच्या नावाखाली मराठवाड्यातील हजारो एकर जमीन अधिग्रहीत करुन ठेवलेली आहे. परंतु त्या जमिनीचा काहीही उपयोग केलेला नाही. ती जमीन बंजर म्हणून पडून आहे. त्या ठिकाणी कोणी हॉटेल काढत आहे, कोणी ढाबे काढत आहेत. त्या ठिकाणी उद्योग येत नाहीत. तेथे उद्योग क्षेत्र निर्माण करण्याकरिता या पाईपलाईनचा तातडीने विचार करावा अशी माझी मागणी आहे. तसेच मराठवाडा आणि विदर्भातील औद्योगिक अनुशेष भविष्यात कधी निर्माण होणार नाही असे सामर्थ्य असलेल्या गॅस पाईपलाईनला आपण चालना द्यावी. किमान 371 (2) कलमास अनुसरुन मराठवाडा विकास महामंडळाच्या माध्यमातून ती निर्माण झालेली एक वेगळी क्षमता आहे. तिचा शासनाने पाठपुरावा करुन मराठवाडा आणि विदर्भाकरिता उद्योगाचे एक नवीन दालन उपलब्ध करुन दिले तर आम्ही आपले उपकार कधीही विसरणार नाही. हाजीरा-उरण-नांदेड नागपूरमार्गे आंध्र प्रदेशमध्ये जाणाऱ्या गॅस पाईपलाईनला तातडीने चालना द्यावी एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी नियम 260 अन्वये मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासा संदर्भात जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, मराठवाडा म्हणजे दख्खनचे पठार आहे. मराठवाड्यातील पाण्याच्या प्रश्नाबाबत मागील तीन अधिवेशनात चर्चा झालेली आहे. शासनाने "मराठवाडा पाणी प्रश्न" या नावाचा चित्रपट काढला तर त्या चित्रपटाच्या दिग्दर्शकासाठी श्री.सुनील तटकरे यांना सन्मान द्यावा लागेल.

सभापती महोदय, मी येथे पुनरुक्ती करणार नाही. जायकवाडीच्या उर्ध्व भागामध्ये 111.5 टीएमसी पाणी मंजूर करण्यात आलेले आहे. परंतु उर्ध्वभागातील मोठ्या मंडळींनी एकूण 173.75 टीएमसी पाणी प्रत्यक्षात अडविले आहे. म्हणजे 57.75 टीएमसी अधिकचे पाणी नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यातील मान्यवरांनी उचलले आहे. त्यामुळे मराठवाड्यावर एकप्रकारे अन्याय इ ालेला आहे.

सभापती महोदय, माझी जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे यांना विनंती आहे की, त्यांनी तटावर बसून महाराष्ट्र आणि मराठवाड्याचे दृश्य आनंदाने पाहू नये. त्यांनी तटावर बसून हाती माठ घ्यावा आणि तो मराठवाड्याच्या ओंजळीत रिकामा करावा. आपण असे केल्यास मराठवाड्यातील जनता आपणास दुवा देतील.

सभापती महोदय, मराठवाडा हा निजामाच्या काळात संघर्ष करुन पुढे आलेला प्रदेश आहे. मराठवाड्यातील जनता अतिशय उदार मनाची आहे. आम्ही संघर्षाची भूमिका घेतली तर दोन हात करण्याची आमची तयारी असते. आम्ही प्रेम केले तर आमचे प्रेम ओसंडून वाहते. मराठवाडा आणि विदर्भ हा महाराष्ट्राला सम्यक प्रदेश आहे. आमच्या प्रेमामध्ये तटकरे साहेब आपण वाहून जाल इतके प्रेम करणारी आम्ही माणसे आहोत.

सभापती महोदय, मागील 26 वर्षापासून 150 शेतकऱ्यांचे भूसंपादनाचे पैसे अजून मिळालेले नाहीत. केंद्र सरकारने भूसंपादनाचा कायदा केलेला आहे. आपण शेतकऱ्यांना वेळेवर पैसे दिले नाही तर या पुढे भूसंपादन करणे अवघड होणार आहे. शेतकऱ्यांच्या निढळाच्या घामाचे पैसे शासनाने ताबडतोब वितरित करावेत अशी विनंती आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी आर्त टाहो फोडला आहे. मी तर म्हणेन की, ते आयाळाशिवाय असणारे सिंह आहेत. ते अतिशय आक्रमक आहेत. मराठवाड्यातील सर्वसामान्य जनतेला न्याय द्यावा हा त्यांचा आर्त टाहो आहे. त्यांच्या आर्त टाहोला राज्य सरकारने प्रतिसाद द्यावा अशी मी विनंती आहे. महोदय, या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, महाराष्ट्राच्या अन्य विभागातील लोक मराठवाडा आणि विदर्भातील लोकांना मेंढरं समजतात काय, आम्ही शेळ्या आहोत काय ?

महोदय, प्रसिध्द महाकवी विठ्ठल वाघ म्हणतात की,

"आम्ही मेंढरं-मेंढरं,
यावं त्यानं हात लावा,
पाचा वर्षाच्या बोलीनं,
होतो आमचा लिलाव,
बाप लेक गाजोतात,
माय लेको गाजोतात
आमच्याच कातड्याची
ढोल सारे वाजोतात."

महोदय, कातडे आमचे आहे, ढोल आमचा आहे, परंतु तो ढोल वाजवणारे माननीय श्री.तटकरे साहेब मात्र दुसऱ्या विभागातील आहेत. माझी विनंती आहे की, जे लोक आमच्यावर अशा प्रकारे अन्याय करतात त्यांना थोडे थांबवा.

महोदय, बीड जिल्ह्यातील अनेक पिढ्यांनी रेल्वेगाडीचा डबा कसा असतो हे पाहिले नाही. मी आणि सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे अन्य मार्गे रेल्वेने येतो. या विभागात रेल्वे सुरु करण्याची स्वातंत्र्यापासूनची मागणी आहे. स्वर्गीय विलासराव देशमुख यांना मी धन्यवाद देतो की, त्यांच्या कार्यकाळात रेल्वे प्रकल्पाच्या कामाचा 50 टक्के हिस्सा राज्य सरकारने उचलला. असे असताना आज त्या भागातील रेल्वेची कामे बंद आहेत. राज्य सरकारकडून वारंवार सांगितले जाते की, मराठवाड्यातील अनुशेष दूर करण्यासाठी मदत करण्यात येईल. परंतु त्या दृष्टीने

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

प्रयत्न केला जात नाही. या निमित्ताने माझी राज्य सरकारला विनंती आहे की, मराठवाड्याच्या जे जे हक्काचे आहे ते त्यांना द्यावे.

महोदय, या प्रस्तावामध्ये इतरही अनेक विभागाशी संबंधित असलेल्या विषयांचा समावेश आहे. परंतु त्या विभागांचे मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे त्या विषयांवर मी बोलणार नाही.

महोदय, माननीय जलसंपदा मंत्री हे दृढनिश्चयी आहेत, एखादा संकल्प केल्यानंतर तो सोडणारे आहेत. मी तर म्हणेन की, ते रायगडचे शेर आहेत आणि आम्हीही मराठवाड्यातील बछडे आहोत. आम्हा बछड्यांची आपल्याला आग्रहाची विनंती आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श समन्यायी वाटपाच्या निमित्ताने महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जनतेसमोर ठेवावा आणि त्या भागातील जनतेला न्याय द्यावा.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो व येथेच थांबतो.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये सर्वश्री विक्रम काळे, अमरसिंह पंडित, अमरनाथ राजूरकर, सतीश चव्हाण, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री अब्दुल्ला खान दुर्राणी, धनंजय मुंडे, हेमंत टकले, सुभाष चव्हाण, विनायक मेटे, दिलीपराव देशमुख, सुभाष झांबड, राणा जगजितसिंह पाटील, रमेश शेंडगे यांनी मराठवाड्यातील विविध विषयांवर चर्चा उपस्थित केली आहे.

या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य सर्वश्री अमरसिंह पंडित, अमरनाथ राजूरकर, सतीश चव्हाण, धनंजय मुंडे, सुभाष झांबड, विक्रम काळे, दिवाकर रावते, प्रा.सुरेश नवले यांनी आपले विचार मांडले. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित आणि इतर सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना मांडल्या त्या खऱ्या आहेत. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मराठवाड्याचा सर्व भूभाग महाराष्ट्रात आला. ज्या काळात हा ऐतिहासिक पध्दतीचा लढा लढला गेला त्या काळात मराठी भाषिकांचे एक राज्य निर्माण केले गेले. त्या अनुषंगाने राज्यातील प्रत्येक विभागाच्या विकासासाठी समन्यायी निधी मिळाला पाहिजे अशी महत्त्वाची भूमिका अनेक सन्माननीय सदस्यांनी मांडली. या चर्चेमध्ये ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्यांना मी धन्यवाद देतो.

महोदय, या चर्चेवर बोलताना सन्माननीय सदस्यांनी सांगितली ती वस्तुस्थिती आहे. या देशाने स्वातंत्र्यासाठी एकदाच लढा दिला. परंतु मराठवाड्यातील जनतेला मात्र स्वातंत्र्यासाठी दोन वेळा लढा द्यावा लागला. मराठवाडा ही संतांची भूमी आहे. या अनुषंगाने मराठवाड्यातील जे प्रश्न या ठिकाणी मांडले आहेत, त्या मागची भावना आणि मागोवा आपण सर्वांनी केवळ स्थितप्रज्ञ भूमिकेतून घेऊन चालणार नाही. त्या भावनांचा मागोवा घेत असताना अंतर्मुख होऊन या सर्व बाबींचा विचार करण्याची निश्चितपणे आवश्यकता आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

मूलभूत प्रश्न मांडला जातो, त्याच्या पाठीमागे काही विचार असतात. आपण दीर्घकाळ त्या प्रश्नांची सातत्याने मांडणी करीत असतो, पाठपुरावा करीत असतो. आपल्या परिसरात, भागात, जिल्ह्यात, तालुक्यात, मतदारसंघात, गावात या संदर्भात नेमके काय आले, असा प्रश्न डोळसपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मनात नेहमी येत असतो. मराठवाड्यातील, विदर्भातील अनुशेष दूर करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारने निश्चितपणे पावले उचलली आहेत. मी केवळ आकडेवारीमध्ये जाऊन तांत्रिक उत्तर देणार नाही. आज मांडलेला प्रस्ताव अत्यंत गंभीर आहे. महाराष्ट्रात कमी-जास्त प्रमाणात पडलेला पाऊस, निसर्गाची बदललेली स्थिती, ग्लोबल वॉर्मिंग यामुळे निर्माण झालेल्या सामाजिक प्रश्नातून लोकांच्या मनात संतापाची भावना निर्माण होऊ शकते आणि त्याला उत्तर देण्याची जबाबदारी सरकारवर येते, याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. गेल्या 10 वर्षांत विदर्भ, मराठवाडा येथील अनुशेष निर्मूलनाच्या बाबतीत काही कामे झाली का, सरकारने पावले उचलली का, योग्यरितीने वाटचाल केली का असे प्रश्न या ठिकाणी उपस्थित केले आहेत. मला नम्रपणे सांगितले पाहिजे की, गेल्या 10-11 वर्षात 11-12 हजार कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून देत काही कामे करण्याचा प्रयत्न झाला आहे. लवादाच्या पाणीवाटपाचा मुद्दा देखील उपस्थित केला. मी त्या संदर्भात सांगू इच्छितो की, पैठण धरणापर्यंत सर्व पाणी वापरण्याचा अधिकार महाराष्ट्राला आहे आणि लवादाच्या आकडेवारीनुसार पैठण धरणापर्यंत 75 टक्के विश्वासार्हता धरून एकूण 206.50 इतके टीएमसी पाणी उपलब्ध आहे. त्यामुळे जायकवाडीचे पाणी जायकवाडीच्या वरील भागामध्ये नाशिक, अहमदनगर येथील प्रकल्पांसाठी किती उपलब्ध होऊ शकते, खालच्या खोऱ्यात नेमके किती पाणी उपलब्ध आहे, ही सर्व आकडेवारी आपल्या सर्वांसमोर निश्चितपणे आहे. पण हा प्रश्न अधिक गंभीर का बनला, हेही आपल्याला पाहिले पाहिजे. गेल्या वर्षी पाऊस कमी झाला, प्रचंड दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली, त्यावेळी या प्रश्नांची तीव्रता मोठ्या प्रमाणात जाणवू लागली. त्यातून एकेक प्रश्न निर्माण झाले.

सभापती महोदय, आपण निर्माण झालेल्या प्रश्नांच्या भावना मांडतो, त्यावेळी त्याबद्दलचे उत्तर शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न देखील सर्वंकष पध्दतीने करावा लागतो. लवाद आणि लवादाच्या मार्फत मिळालेले पाणी आणि आज आपल्याकडे उपलब्ध असलेले पाणी, या पाण्याच्या संदर्भात

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे ....

नेमकी काय भूमिका घ्यायची, हा प्रश्न नक्कीच आहे.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी संगितले की, मराठवाड्यावर अन्याय झाला. मग तो पश्चिम महाराष्ट्राकडून झाला की उत्तर महाराष्ट्राकडून झाला, हे पाहिले पाहिजे. मी कोकणातील आहे, जेथे खूप पाऊस पडतो. त्यामुळे मी अन्याय केला असे म्हणण्याचे धाडस आपण करू शकला नाहीत आणि ते आमच्याही कोणाच्या मनात येण्याचे कारण नाही. प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे. गोदावरी खोरे तुटीचे आहे, म्हणून त्याचा सर्वंकष अभ्यास करून 18 टीएमसी पाणी जादा पध्दतीने अडवू शकू, अशी भूमिका आपण घेतली, सर्वेक्षण केले. गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आज उपस्थित केलेल्या सन्माननीय सदस्यांनीच हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी सुध्दा पोटतिडकीने भूमिका मांडली होती. मी त्यावेळी 18 टीएमसी पाण्याच्या बाबतीत कबूल केले होते. माननीय राज्यपालांनी लघुपाटबंधारे प्रकल्पांची कामे घेण्यास बंदी केली आहे. माननीय राज्यपालांनी अशी बंदी का केली आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आपल्याला मिळणारा नियतव्यय आणि सुरू असलेले प्रकल्प याची सांगड घालण्यासाठी प्रयत्न केले जावेत, शिस्त आणावी म्हणून माननीय राज्यपालांनी तसे निर्बंध घातले आहेत. मराठवाड्यात भीषण परिस्थिती निर्माण झाल्यानंतर, किमान 18 टीएमसी पाण्याच्या बाबतीत लघु पाटबंधारे प्रकल्प मंजूर करण्याच्या दृष्टीने काही प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन मी त्यावेळी सभागृहात दिले होते. सदर बाब मंत्रिमंडळापुढे आणेन असेही मी सांगितले होते. मला आपणास नम्रपणे सांगावयाचे आहे की, मी सर्व सन्माननीय सदस्यांची जाहीर माफी मागण्यास तयार आहे. कारण मला हा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आणण्यास 6 महिन्यांचा उशीर झाला आहे. मंत्रिमडळामध्ये हा प्रस्ताव एकमताने पारित झाला आणि मग तो माननीय राज्यपालांकडे पाठविला. माननीय राज्यपालांनी प्रस्ताव अमान्य केला नाही. सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी सांगितलेली चुकीची माहिती इतिवृत्तामध्ये राहू नये, म्हणून मी सांगत आहे की, माननीय राज्यपानांनी हा प्रस्ताव अमान्य केला नाही. शासनाकडून त्या संदर्भात पाठपुरावा करण्याची आवश्यकता आहे.

(नंतर श्री. खंदारे ....

अशुद्धीत मत / मुद्रितशोधन नाही

श्री.सुनील तटकरे....

सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी सांगितले ते खरे आहे. या विषयाबाबत सन्माननीय मुख्यमंत्र्यांकडे वारंवार चर्चा झालेली आहे. या विषयाबाबत माननीय उप मुख्यमंत्री, मंत्रिमंडळातील सहकारी, त्या भागातील सर्व लोकप्रतिनिधी या सर्वांना बरोबर घेऊन राज्यपालांकडे जाऊ असे माननीय मुख्यमंत्र्यांनी म्हटलेले आहे. परंतु राज्यपालांना भेटणे अजून शक्य झालेले नाही हेही मी सांगतो. त्यामुळे मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करीन की, हे अधिवेशन संपल्यानंतर त्यांनी राज्यपालांची भेट घ्यावी व यासंबंधी जी मागणी करावयाची असेल ती करावी. कारण हा प्रश्न केवळ मराठवाड्यातील जनतेच्या दृष्टीने महत्वाचा आहे. तेवढ्या पुरता हा प्रश्न सीमित राहत नाही. आज हा प्रस्ताव मांडत असताना ज्या भावना व्यक्त करण्यात आल्या, सुरुवातीला जो वैचारिक संघर्ष निर्माण झाला होता त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी त्यांची भूमिका मांडली होती. 18 टीएमसी पाण्याचा विषय केवळ मराठवाड्याचा आहे असे न मानता महाराष्ट्रातील जनतेच्या दृष्टीने व्यापक आहे, म्हणून तो महत्वाचा आहे असे मानून तो प्रश्न सोडविणे हे सर्वांचे काम आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांना सांगेन की, त्यांनी मुख्यमंत्र्यांना भेटून त्यांच्या नेतृत्वाखाली राज्यपालांना भेटण्यासाठी जाऊ. यासाठी किती नियतव्यय उपलबध होणार आहे हे सुध्दा महत्वाचे आहे. राज्याची सध्याची आर्थिक स्थिती व सुरु असलेले सिंचन प्रकल्प यासंबंधीची भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे. हा प्रस्ताव मंत्रिमंडळात मंजूर झाला त्यावेळी काही सन्माननीय सदस्यांनी राज्यपाल महोदयांची भेट घेतली होती. त्याच्या पाठीमागे राजकीय कारण आहे का हे मला माहीत नाही. पण सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना विश्वासात घेतले होते की नाही याची मला कल्पना नाही. मराठवाड्याच्या प्रश्नासंबंधी ते पोटतिडकीने बोलतात. सन्माननीय सदस्यांनी त्यांचा उल्लेख आदराने केलेला आहे. त्यावेळी त्यांच्या पक्षातील सदस्यांनी तेथे जाऊन विरोध करणे असे त्यांना म्हणावयाचे होते. माझे याबाबतीतील काही म्हणणे नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, शासनाच्या वतीने मंत्री महोदय सभागृहात उत्तर देत आहेत. राज्यपालांना कोण व कोणाला घेऊन भेटले, कोणाला घेऊन गेले नाहीत, असे आपसात वाद लावून देण्यापेक्षा तेथे जे वाद निर्माण झाले ते कसे मिटविता येतील व पाण्याचे वाटप कसे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

झाले पाहिजे या बाबतीत दोन्ही लोकांचे समाधान करण्याची जबाबदारी शासनाची आहे. शासन म्हणून काय केले जाणार आहे ते येथे सांगणे महत्वाचे आहे. त्याऐवजी राज्यपालांकडे कोण कोणाला घेऊन गेले नाही हे सांगत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे मराठवाड्यासाठी नेहमी बोलतात, मी सुध्दा मराठवाड्याबाबत बोलतो. सर्वजण येथे बोलतात. आम्ही येथे संपूर्ण महाराष्ट्राचे लोकप्रतिनिधी म्हणून बसलो आहोत, कोणी कोकणाचा, कोणी पश्चिम महाराष्ट्राचा, कोणी मराठवाड्याचा प्रतिनिधी म्हणून बसलेलो नाही. अशा पध्दतीने कोणाच्या भावना भडकावून देण्यापेक्षा, (अडथळा)

श्री.अमरसिंह पंडित : अनेक वर्तमानपत्रात ते छापून आलेले आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. वर्तमानपत्राच्या आधारावर सभागृहात बोलता येत नाही हे आपण त्यांना सांगावे. या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते किंवा अन्य महत्वाचे नाहीत. आपसात मतभेद निर्माण करण्यापेक्षा पाण्याचा जो प्रश्न निर्माण झाला आहे, तो प्रश्न सोडवावा. खानदेशातील व मराठवाड्यातील जनता तुमचे आभार मानेल. मंत्री महोदय, हे वारंवार मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगेन, माननीय उप मुख्यमंत्र्यांना सांगेन असे बोलत आहेत. त्यांना असे बोलता येत नाही. मंत्री महोदयांनी राज्यपालांना भेटू असे उत्तर दिले पाहिजे. या प्रस्तावाला खऱ्या अर्थाने न्याय द्यावा असे मला वाटते.

श्री.सुनील तटकरे : कदाचित मी बोललेले सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना राजकीय दृष्टया वर्मी लागले असावे त्यामुळे त्यांनी आक्षेप घेतला आहे असे मी मानतो. त्यांना वाईट असेल तर मी माझे शब्द मागे घेतो. वस्तुस्थिती कोणाला नाकारता येत नाही. या प्रस्तावाला विरोध झाला आहे. माझ्या बोलण्यामध्ये राजकीय अभिनिवेश नव्हता. माझ्या बोलण्याचा मतितार्थ एवढाच होता की, मराठवाड्याच्या दृष्टीने 18 टीएमसी पाण्यासाठी 320 प्रकल्प गरजेचे आहेत.

नंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे...

हा प्रश्न केवळ मराठवाड्यापुरता सीमित राहिलेला नाही तर या प्रश्नाची व्याप्ती सबंध महाराष्ट्रभर झालेली आहे. म्हणून हा सबंध महाराष्ट्राचा प्रश्न म्हणून या प्रश्नाकडे आपण सर्वजण पाहूया असे मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. मी माननीय मुख्यमंत्री महोदयांचा उल्लेख केला. याचे कारण असे की, त्यांच्या नेतृत्वाखाली राज्याचे एक शिष्टमंडळ माननीय राज्यपाल महोदयांकडे जाणे आवश्यक आहे. या प्रकल्पांच्या कामासाठी किती निघी लागणार आहे आणि किती निधी उपलब्ध केला जाणार आहे यासंबंधी माननीय राज्यपाल महोदयांच्या मनामध्ये काही शंका असू शकतील आणि म्हणून राज्याच्या संदर्भातील माहिती त्याना देणे आवश्यक आहे.

उप सभापती : माननीय मंत्री महोदयांना उत्तरासाठी अजून किती वेळ लागेल ?

श्री. सुनील तटकरे : मला आणखी 20-25 मिनिटे लागतील.

उप सभापती : सभागृहाची वेळ दुपारी 12.45 पर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. सुनील तटकरे : हा प्रश्न निर्माण झाल्यानंतर या प्रश्नाची व्याप्ती खूप वाढलेली आहे. 18 टीएमसी पाण्याच्या बाबतीत मी सर्वांना सांगू इच्छितो की, मी या ठिकाणी भूमिका मांडलेली आहे. ही वस्तुस्थिती आहे की, 76 प्रकल्प सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी रखडलेले आहेत. मराठवाड्यामध्ये जसे तुटीचे खोरे आहे त्याप्रमाणे हा 18 टीएमसी पाण्याचा प्रश्न आहे. सुधारित प्रशाकीय मान्यता नसल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे हे नाकारता येत नाही. मी या ठिकाणी विदर्भाच्या प्रश्नाच्या संदर्भात भूमिका मांडली. गेले दीड-दोन वर्षे सुधारित प्रशासकीय मान्यता न मिळाल्यामुळे 260 प्रकल्पांची कामे रखडलेली आहेत. या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध आहे. विदर्भ सिंचन विकास महामंडळाकडे 1800 कोटी रुपये आहेत. परंतु सुधारित प्रशासकीय मान्यता नसल्यामुळे प्रकल्प रखडलेले आहेत. तशाच प्रकारची परिस्थिती मराठवाड्यातील प्रकल्पाच्या बाबतीत आहे ही वस्तुस्थिती आहे. हे प्रकल्प 70 ते 90 टक्क्यापर्यंत पूर्ण झालेले आहेत. या प्रकल्पाच्या कामांना मर्यादित कालावधीमध्ये सुधारित प्रशासकीय मान्य देण्यात आली तर या प्रकल्पाची कामे वर्षभरामध्ये किंवा दोन वर्षामध्ये पूर्ण करता येतील. त्यामधून सुध्दा खूप मोठया प्रमाणावर पाण्याचा साठा होऊ शकतो. गेल्या 10-12 वर्षात निश्चितच उपलब्धी झालेली आहे. बीड जिल्हयातील सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, गेल्या 10 वर्षामध्ये जी काही कामे झाली त्यामध्ये बॅरेजेसची कामे देखील करण्यात आली. गोदावरीमध्ये बॅरेजेस बांधले गेले. कदाचित ते वादाच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भोवऱ्यात असू शकतील. त्यासंबंधी वेगवेगळी भूमिका घेण्यात आली. न्यायालयात देखील यासंबंधी याचिका प्रलंबित आहे. म्हणून मर्यादित बाबतीत मी सांगू इच्छितो की, गोदावरीमध्ये बॅरेजेस बांधण्याचा निर्णय ज्या कालावधीमध्ये घेण्यात आला त्यावेळी मी तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचा उल्लेख केला होता आणि आता देखील मी त्यांचा उल्लेख करीत आहे. त्याच्या कारकिर्दीमध्ये राज्याचे उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्याकडे जलसंपदा खाते असताना त्यांनी गोदावरीमध्ये बॅरेजेस बांधण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेतला. नदीवर बांधलेले कोल्हापूरी बंधारे हे बहुतांश नादुरुस्त झाले होते. त्यामुळे बरेचशे पाणी वाहून जात होते. बॅरेजेसचे दोन पध्दतीने फायदे होतात. नदीवर बॅरेजेस बांधले जात असल्यामुळे भूसंपाद करावे लागत नाही, लोकांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी येत नाही. त्यामुळे पाणी तातडीने उपलब्ध होऊ शकते. म्हणून यादृष्टीने एक चांगला कार्यक्रम हाती घेण्यात आला आणि त्याचा चांगला परिणाम मराठवाड्याच्या परिसरामध्ये होऊन तत्सम नगदी पिके मोठया प्रमाणावर घेण्यात येऊ लागली. बीडमध्ये काही सहकारी साखर कारखाने झाले. उस्मानाबादमध्ये साखर कारखाने निर्माण झाले.मराठवाड्यामध्ये अन्नधान्याचे दुर्भिक्ष होते. मराठवाड्यातील जनता दुष्काळामध्ये होरपळून जात होती त्यावर उपाययोजना करण्याचा चांगला प्रयत्न त्या कालावधीमध्ये निश्चितपणे झाला. जवळपास 10-11 हजार कोटी रुपयाचा निधी आपण उपलब्ध करुन दिला आणि त्याची फलनिष्पत्ती आपणास दिसून येत आहे.

सभापती महोदय, आता रखडलेल्या कामाचे काय होणार असा प्रश्न निर्माण झालेला आहे. याबाबतीत मी सांगू इच्छितो की, सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या बाबतीत ठोस स्वरुपाचा निर्णय लवकरात लवकर घेणे आवश्यक आहे. एका मर्यादित कालावधीमध्ये हा निर्णय आपण घेतला नाही तर राज्यामध्ये हा प्रश्न उग्र स्वरुप धारण करु शकेल. या प्रकल्पांच्या कामावर कित्येक हजार कोटी रुपये खर्च झालेले आहेत. प्रकल्पाची कामे 70 ते 90 टक्क्यापर्यंत पूर्ण झालेली आहेत. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले आणि सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी सांगितल्या प्रमाणे भूसंपादनाच्या रकमा देखील आम्हाला देता आल्या नाहीत. मधल्या काळामध्ये असा निर्णय घेतलेला आहे की, सुधारित प्रशाकीय मान्यता नसली तरी सुध्दा भूसंपादन आणि पुनर्वसनाच्या

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कामासाठी जो निधी लागेल तो निधी देण्याची भूमिका आपण घेतलेली आहे. यामुळे प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात सुरु होणार नाही याची जाणीव देखील मला आहे.

...नंतर श्री. गिते....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

सभापती महोदय, सन्माननीच सदस्य श्री.रामदास कदम यांनी जे मत व्यक्त केले ते खरे आहे. मी ज्यावेळेला शासन म्हणून उत्तर देतो त्यावेळेला मी माननीय मुख्यमंत्र्यांची नावे का घेतो त्या बाबतीत देखील मी खुलासा करणार आहे. पूर्वी प्रकल्पांच्या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता समितीची मान्यता घेऊन दिली जात होती. परंतु गेल्या वर्ष-दीड वर्षामध्ये सिंचनाचे किती क्षेत्र निर्माण झाले, प्रत्यक्षात किती निधी प्राप्त झाला होता, यातील प्रत्यक्षात किती निधी खर्च झाला आहे असे वेगवेगळे प्रश्न निर्माण झाले. 70 ते 72 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला, असे या ठिकाणी नेहमी नेहमी बोलले गेले. 1952 सालापासून महाराष्ट्रामध्ये जलसंपदा विभागाच्या मार्फत विविध प्रकल्पाच्या कामांवर जो खर्च झालेला आहे त्यामध्ये या वर्षी झालेला खर्च 2 हजार 80 कोटी रुपये आहे. विभागाच्या कार्यक्षमतेबद्दल,विश्वासार्हते बाबत बोलले गेले, विविध शंका उपस्थित केल्यामुळे सुधारित प्रशासकीय मान्यतेचे प्रश्न निश्चितपणे राहिले आहेत. या गोष्टींमुळे प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता मिळू शकलेल्या नाहीत. एवढया मोठया प्रमाणात खर्च करुन मोठया प्रमाणात विभागाने पाणी अडविले आहे. आज या सभागृहात दावा करु इच्छितो की, गेल्या 50 वर्षामध्ये जलसंपदा विभागाने 1350 टीएमसी पाणी अडविलेले आहे, गेल्या दहा वर्षात 250 टीएमसी पाणी अडविले आहे. पाणी अडविण्यावर इतका मोठा खर्च झाला, तेवढयाच पैशांचा भ्रष्टाचार झाला असे बोलून एकंदरीत या संबंध कामांवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले आहे. त्यामुळे प्रकल्पांच्या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला आहे. परंतु सरकारला आपली जबाबदारी झटकता येणार नाही. यासंदर्भात अंतिम निर्णय घ्यावाच लागेल.

सभापती महोदय, लोकप्रतिनिधी म्हणून लोकांनी आपल्याला निवडून दिलेले असते, त्या लोकांसमोर आपण काय कामे केली याचा अहवाल त्यांना द्यावा लागतो. आम्ही लोकांचे कोणते सार्वजनिक प्रश्न सोडविले, याचे उत्तर लोकशाहीमध्ये द्यावेच लागते. त्यामुळे या बाबतीत योग्य कालावधीत, विशिष्ट कालावधीत निर्णय घेतला जाईल. प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता मिळावी म्हणून मी माननीय मुख्यमंत्री,उप मुख्यमंत्री यांच्याकडे निश्चितपणे प्रयत्न करीन. सभागृहातील आजच्या चर्चेच्या निमित्ताने जो काही धोरणात्मक निर्णय घ्यावयाचा असेल तो

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

लवकरात लवकर घेतला जावा. कारण विभागाचा मंत्री म्हणूनच मला उत्तर द्यावे लागते. म्हणून या संदर्भात उचित तो निर्णय महिनाभरात धेतला जावा. हे आघाडीचे सरकार आहे. मला माझ्या पक्षाच्या नेत्यांनी मंत्री केलेले आहे. आदरणीय नेते श्री. शरद पवार साहेब यांनी मला मंत्रिमंडळात काम करण्याची संधी दिलेली आहे. आवश्यकता वाटली तर हा प्रश्न मी त्यांच्याकडे देखील उपस्थित करीन. हा प्रश्न केवळ विभागाचा, सुनील तटकरे यांच्यापुरता राहिलेला नाही. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंहजी, आपण या ठिकाणी आक्रोश केला. हा आक्रोश मराठवाड्यातील सर्व जनतेचा आहे. अशाच प्रकारचा प्रश्न विदर्भातील सर्व लोकप्रतिनिधींनी उपस्थित केला आहे. शेवटी पाण्याशिवाय पुढील कोणतेही प्रश्न सुटणार नाहीत.

वीज असेल, उद्योग असेल, व अन्य क्षेत्रे आहेत, त्यात महाराष्ट्राला पुढे न्यावयाचे असेल तर पाणी अडविल्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय असू शकत नाही हे वास्तव तुम्हाला आणि आम्हाला नाकारता येऊ शकणार नाही.

श्री.अमरसिंह पंडित : जायकवाडी धरणातील 33 टक्के पाण्यावर या ठिकाणी बराच गोंधळ झालेला आहे. आपण पाण्याच्या बाबतीत काही बोलतच नाहीत. जायकवाडी धरण कोरडे पडू लागलेले आहे. पाण्यासंदर्भात आपण उत्तर द्यावे.

श्री.सुनील तटकरे : श्री.अमरसिंहजी, तुमचा आदर करुन सांगतो की, माझे उत्तराचे भाषण अजून संपलेले नाही. तुम्हाला सर्व ठिकाणचा पाण्याचा प्रश्न सोडवून हवा आहे की, फक्त तुमचाच प्रश्न सोडवून घ्यावयाचा आहे. तुमच्या प्रश्नाच्या बाबतीत देखील मी बोलणार आहे. तुमच्यात जर राजकीय ताकद असेल तर तुम्ही तुमची भूमिका मांडा. तुम्हाला शक्य असेल तर तुम्हीही माननीय मुख्यमंत्र्यांकडे तुमची भूमिका मांडा. मी या ठिकाणी काही वेगळी भूमिका मांडत नाही. मी सार्वत्रिक भूमिका या ठिकाणी मांडतो आहे. ज्या गोष्टी घडतच नाहीत, त्या बाबतीत केवळ विभागाला केंद्रबिंदू करुन टीका केली जाते, विभागाला लक्ष्य केले जाते, त्यासंदर्भात मी भावना मांडतो आहे तुम्हाला 18 टीएमसी पाणी आवश्यक आहे. जायकवाडीच्या बाबतीत मी नाकारीत नाही. मी मघाशीच सांगितले की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत जाधव यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो मुद्दा हा त्यांच्या पुरता होता. तुमचा मुद्दा तुमच्याशी संबंधित होता. या बाबतीत वस्तुस्थिती अशी आहे की, या प्रश्नाचा निकाल कधी तरी लागणे आवश्यक आहे....

यानंतर श्री. भोगले....

अशुद्धीत मत / शोधनीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

जायकवाडी धरणाच्या संदर्भात सुध्दा माझ्याकडे पूर्ण माहिती आहे. मी एक असा मंत्री आहे, ज्याचा उल्लेख सर्व सन्माननीय सदस्यांनी केला. औरंगाबाद येथे जाऊन जायकवाडी धरणाच्या अंतर्गत किमान दोन रोटेशन देऊन 40 हजार हेक्टरचे पीक संरक्षित केले जाईल असे सांगणारा मी एकमेव मंत्री आहे, हे चर्चेच्या माध्यमातून मला आवर्जून सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, दुसऱ्या दिवशी मी पाणी सोडायला सांगितले. माझा पुतळा जाळला किंवा न जाळला तो प्रश्न व्यक्तीचा नाही. मराठवाड्यातील जनतेला हे पाणी मिळाले पाहिजे, त्यांच्या हक्काचे पीक संरक्षित केले पाहिजे या भूमिकेसाठीच तो निर्णय घेतला होता. मला पूर्णपणे जाणीव आहे, आज मराठवाड्यामध्ये जायकवाडी अंतर्गत किती पाणी पोहोचले? 1.60 ते 1.70 टीएमसी पाणी पोहोचले आहे. 4.5 ते 5 टीएमसी पाणी निळवंडे धरणातून सोडले होते. आज अधिकृत कागदावर नेमके कोणते पीक क्षेत्र आहे? 0.1 टक्का सिंचनाच्या संदर्भात प्रश्नचिन्ह निर्माण झाले त्या संदर्भात आज मी सांगू इच्छितो की, हजारो हेक्टर असे क्षेत्र आहे त्याची आज नोंद नाही. जरुर त्याची चौकशी करावी लागेल. त्या क्षेत्राची नोंद नाही. आरोपीच्या पिंजऱ्यात एखाद्या विभागाला उभे केले जाते त्यावेळी किती सिंचन क्षेत्र वाढले याबाबत वर्षभर आम्ही चर्चा करीत असू तर त्यामुळे या महाराष्ट्राचा विकास 25 वर्षे आम्ही मागे नेलेला आहे हे लोकांच्या समोर येते त्यावेळी या संदर्भातील माहिती समोर येणे अत्यंत आवश्यक आहे. जायकवाडीच्या संदर्भात किंवा जल संपत्ती नियमन प्राधिकरणाचा कायदा आणि त्या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत आपण म्हणालात. कायद्यात केलेल्या तरतुदी आणि नियम यामध्ये फरक आहे. आज मी तुम्हाला सांगू इच्छितो की, मी या नियमांना स्थगिती देतो. आपण सर्वजण चर्चा करु. त्या संदर्भात जो योग्य निर्णय असेल तो घेतला जाईल हे सभागृहाला सांगू इच्छितो. मुद्दा हाच आहे की, सर्वाशी व्यापक पध्दतीने चर्चा केल्याशिवाय प्रश्नाची सोडवणूक करता येणार नाही. प्रश्नाची सोडवणूक करीत असताना त्या त्या परिसरात असलेल्या प्रत्येक गोष्टीची जाणीव करुन घेणे आवश्यक ठरु शकते.

सभापती महोदय, आज या ठिकाणी मुद्दा उपस्थित करण्यात आला तो खरा आहे. लवादाच्या संदर्भात निर्णय मिळाल्यानंतर 21 टीएमसी पाणी मिळणार की नाही हा प्रश्न आहे. लवादाच्या निर्णयाबाबत ही वस्तुस्थिती खरी आहे. या ठिकाणी माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे....

माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात उपस्थित आहेत. कृष्णा खोरेच्या पाण्याच्या वापराबाबत माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उल्लेख केला. अमुक इतके पाणी मिळते, त्यातील अमुक टक्के पाणी या ठिकाणी मिळाले पाहिजे. वस्तुस्थिती खरी आहे. माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, तुम्ही आणि मी कोकणातील आहोत. आज कोकणात वस्तुस्थिती काय आहे? कोयना जलविद्युत प्रकल्पातील पाणी कृष्णेच्या लवादाच्या पाणी वाटपाचाच एक भाग आहे. कोयना येथील वीज निर्मिती करणारा देशातील पहिला प्रकल्प आहे, त्या प्रकल्पाचे उद्घाटन पंडित नेहरुंनी केले होते. जवळपास 67 टीएमसी पाणी आज वशिष्ठी नदीमार्फत माननीय सदस्य श्री.रामदास कदम ज्या नदीच्या तीरावर राहतात तेथून अरबी समुद्राला जाऊन मिळते ही वस्तुस्थिती आहे. एकदा त्या बाबत आपल्याला नियोजन करावे लागेल. शंका असण्याचे कारण नाही.

सभापती महोदय, लवाद वाटपामध्ये 25 टीएमसी पाणी अतिरिक्त आहे. मी माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांची संमती घेऊन सांगतो की, 25 टीएमसी पाणी कोकणात आले नाही तरी चालेल. परंतु 67 टीएमसी पाण्याचा वापर रत्नागिरी, रायगड जिल्हयासाठी केलाच पाहिजे ही आग्रही भूमिका ठेवू. हे 25 टीएमसी पाणी उप खोऱ्यात वळविता येत नाही. उजनी धरणातील पाण्याच्या संदर्भात माननीय मंत्री श्री.मधुकरराव चव्हाण सांगतात, त्या संदर्भात सुध्दा एक बैठक आम्ही नक्की घेऊ. किती नेमके पाणी राज्यासाठी उपलब्ध आहे. आज एवढे पाणी अरबी समुद्रात वाहून जाते. आमच्या कोकणामध्ये काही वेगळी परिस्थिती नाही. 5500 मि.मी.पाऊस पडून सुध्दा मार्च एप्रिल महिन्यामध्ये माझ्या कोकणामध्ये पाण्यासाठी टँकर लावावे लागतात ही वस्तुस्थिती मला नाकारता येणे शक्य नाही. पाणी वाटपाच्या संदर्भात निर्माण होणारे प्रश्न आणि इतक्या प्रचंड प्रमाणावर पाणी वाहून जाते त्या संदर्भात आपण जी भूमिका मांडता ती वस्तुस्थिती आहे. लवादाने दिलेल्या निर्णयाबाबत आंध्रप्रदेशने सर्वोच्च न्यायालयात एसएलपी दाखल केलेली आहे. त्यामध्ये आपण कायदेशीर भूमिका घेतली तर त्यामधून काय नुकसान होऊ शकते याचाही सारासार विचार नक्की करावा लागेल.

नंतर 2जी.1...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

तो सारासार विचार करत असताना ते पाणी कोकणामध्ये आले नाही तरी चालेल. कारण ते पाणी कोकणामध्ये थांबणारच नाही. ते पाणी प्रचंड वेगाने जाऊन अरबी समुद्राला मिळत आहे. त्या पाण्याचा वापर या दुष्काळी भागामध्ये करण्याची देखील माझी स्वच्छ भूमिका आहे. मी कोकणातील असलो तरी देखील जलसंपदा मंत्री या नात्याने आपल्याला अभिवचन देतो की, श्री.विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना 21 टीएमसी पाणी देण्यासंबंधी जे धोरण ठरले आहे त्यानुसार आम्ही नक्कीच फेर नियोजन करू. राज्याला दिलेला अधिकार, लवादाने दिलेले निर्णय या सर्वच गोष्टींचा आम्ही योग्यतऱ्हेने विचार करू. या चर्चेच्या निमित्ताने मराठवाड्याला पाणी देण्यात येईल हे मी सांगू इच्छितो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही नेहमी रेल्वेचा प्रश्न मांडतो. आपल्या किंवा माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्त्वाखाली माननीय रेल्वे मंत्र्यांकडे शिष्ट मंडळ घेऊन गेलात तर वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला रेल्वेचा प्रश्न मार्गी लागेल. माननीय राज्यपालांकडे शिष्टमंडळ घेऊन जाण्यासंबंधीचा विषय वेगळा आहे. माननीय रेल्वे मंत्र्यांकडे हा विषय नेऊन त्याला आयाम देणे गरजेचे आहे. त्यांना भेटलो तर अर्थसंकल्पामध्ये तरतूद होऊन हा प्रश्न मार्गी लागू शकेल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, नगर, बीड रेल्वे मार्गाच्या भूसंपादनाचे पैसे राज्य सरकार तर्फे देण्यात येतील असे मी अर्थसंकल्प मांडत असताना सांगितले होते. हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. रेल्वे आल्या खेरीज विकास होत नाही हे कोकणाने सुद्धा अनुभवले आहे. यासाठी निधीची उपलब्धता करणे आवश्यक आहे. मी तर आता माननीय मुख्यमंत्री महोदयांना सांगणार आहे की, श्री.विलासराव देशमुख, श्री.सुशीलकुमार शिंदे, श्री.अशोक चव्हाण हे मुख्यमंत्री असताना औरंगाबाद येथे मंत्रिमंडळाची बैठक घेण्यात येत होती. ती परंपरा थोडीशी खंडित झाली आहे. एकदा औरंगाबादला जाऊन बैठक घेतली पाहिजे. मराठवाड्यातील जनतेला न्याय देण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत अशी ठामपणाची भूमिका घेत आहोत ते त्यांना दाखवून दिले पाहिजे. तसेच घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी किती मर्यादित कालावधीमध्ये करणार आहोत या संदर्भातील भूमिका मांडणे देखील अत्यंत गरजेचे आहे. एखादा प्रदेश निर्माण होतो त्यावेळी कष्ट पडतात. घर बांधण्यासाठी देखील कष्ट घ्यावे लागते. उद्ध्वस्त करण्यासाठी फार कष्ट घ्यावे लागत नाहीत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे...

लोकांच्या मनात उद्रेक झाला की त्याचे उत्तरदायित्व शेवटी शासनावर येते. तेव्हा ते उत्तरदायित्व घेत आपण प्रामाणिकपणे लोकांसाठी काम करीत आहोत. नुसते काम करीत आहोत, घोषणा करीत आहोत असे नव्हे तर त्याची कालबद्ध अंमलबजावणी करण्यासाठी देखील प्रयत्न करण्यात येत आहे, असा विश्वास जनतेच्या मनामध्ये निर्माण करण्याचे काम पुढच्या कालावधी मध्ये आपल्याला करावे लागणार आहे. एवढेच आजच्या प्रसंगी मी सांगू इच्छितो. पाणी वाटपामध्ये कुठल्याही प्रकारचा अन्याय होणार नाही. ....(अडथळा) .... सभ्ांपती महोदय, माझे भाषण अजून संपलेले नाही.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, समन्यायी पाणी वाटपाचे धोरण ठरविलेले आहे. त्यामुळे वरच्या भागामध्ये नवीन कोणतेही धरण बांधता येणार नाही असे स्पष्ट धोरण ठरविलेले आहे. वरच्या भागामध्ये त्र्यंबकेश्वरला 4 टीएमसीचे धरण प्रस्तावित केले आहे. ते कायम स्वरूपी रद्द करण्यात येणार आहे काय ?

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, मराठवाड्याला न्याय देत असताना अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यावर अन्याय होऊ नये यासाठी .... (अडथळा) ...

(सत्ताधारी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती महोदय, आमच्यावर फार मोठा अन्याय होत आहे.

(सत्ताधारी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती महोदय, हे फार अन्यायकारक आहे. नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यासाठी समन्यायी पाणी वाटप झाले पाहिजे.

(सत्ताधारी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

उप सभापती : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, कृपा करून आपण सर्व एकाच वेळी बोलू नका. नाही तर ही चर्चा मी येथेच थांबवीन. माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. माननीय सदस्यांनी जागेवर जाऊन बसावे. कृपया सभागृहामध्ये शांतता पाळावी.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, एक गोष्ट नक्की आहे की, मघा पासूनच्या माझ्या वक्तव्यामध्ये नगर आणि नाशिक जिल्हयावर अन्याय होणार आहे असे मी बोललो नाही. या दोन्ही जिल्हयातील पीक संरक्षित करुन मराठवाडयाला न्याय कसा मिळू शकेल याचा सर्वंकष विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. औरंगाबाद येथे जाऊन मी जेव्हा पाणी सोडण्याची घोषणा केली त्यावेळेस नगर आणि नाशिक जिल्हयातील उभे असलेले पीक संरक्षित केले जाईल असे मी त्यावेळेस म्हणालो होतो परंतु पाण्याचा आपण कसाही अतिवापर करावा असा त्याचा अर्थ नाही.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

खालच्या भागातील पाण्याचा ....म्हणूनच माझी स्पष्टपणे भूमिका आहे की, या दोन्ही जिल्हयात असलेले पीक संरक्षित करुन मराठवाडयाला आवश्यक असलेले पाणी 100 टक्के उपलब्ध करुन दिले जाईल एवढे सांगून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

उप सभापती : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहाची विशेष बैठक स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन: सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.46 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

<u>पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन बाबत</u>

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, आज सकाळच्या सत्रात मराठवाड्यातील सर्वांगीण विकासाच्या प्रश्नावर चर्चा झाली. या चर्चेवरील माननीय जलसंपदा मंत्री महोदयांचे उत्तर अर्धवट राहिलेले आहे. त्यांच्या उत्तराने आमचे समाधान झालेले नाही. तसेच या प्रस्तावावरील राईट ऑफ रिप्लाय झालेला नाही. तेव्हा आपण राईट ऑफ रिप्लायसाठी वेळ वाढवून द्यावा अशी विनंती आहे. हा मराठवाड्यातील अतिशय गंभीर व संवेदनशील प्रश्न आहे. आपणास वेळेची अडचण निर्माण होत असेल तर या प्रश्नाच्या अनुषंगाने आपण आपल्या दालनात माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, मंत्री आणि संबंधित आमदारांची एक बैठक बोलवावी अशी विनंती आहे.

सभापती :मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मराठवाडयाच्या विविध प्रश्नांच्या संदर्भातील प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी सकाळच्या सत्रात सकाळी 10.00 ते 11.55 पर्यंत वेळ देण्यात आली होती. त्यानंतर ती वेळ दुपारी 12.45 पर्यंत वाढविण्यात आली ही वस्तुस्थिती आहे. मराठवाडा, नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यांच्या अनुषंगाने हा विषय असल्यामुळे आपल्या सर्वांच्या तशा भावना आहेत. आपण या विषयावर कितीही चर्चा केली तरी ती चर्चा अपूर्ण आहे असेच आपणास वाटणार आहे. हे अधिवेशन संपल्यानंतर या विषयाच्या संदर्भात माझ्या दालनात एखादी बैठक घेऊन तो प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करता येईल.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा राईट ऑफ रिप्लाय राहिलेला आहे.

सभापती : आज मी नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर बोलण्यास कोणासही परवानगी देणार नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे यांनी भाषणाच्या ओघात असा उल्लेख केला की, श्री.रामदास कदम यांची संमती आहे असे मानून कोकणामध्ये जे कोयनेचे 67 टीएमसीपाणी समुद्रात जाते त्या व्यतिरिक्त जे 25 टीएमसी पाणी आहे ते पाणी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

मराठवाड्याकडे वळविण्यासाठी माझी अडचण नाही. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, आता त्यासाठी माझी मान्यता नाही. कोकणातील सर्व आमदार, लोकप्रतिनिधींची मान्यता असेल तर मला त्याची अडचण नाही. आमचे 67 टीएमसी पाणी समुद्रात जाऊन मिळत आहे. हे पाणी आमच्या शेतीला आणि पिण्यासाठी द्यावे यासाठी मागील 20 वर्षापासून भांडत आहे. आमचे पाणी समुद्राला जाऊन मिळत आहे आणि आम्हाला न्याय न मिळता आम्हाला मिळणारे 25 टीएमसी पाणी द्यायला तयार आहोत ही भूमिका आज मला तरी पसंत नाही. त्यासाठी मी नापसंती व्यक्त करतो.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी या संदर्भात खुलासा करु इच्छितो की, आज कोयना धरणातील पाण्यावर वीज निर्मिती करुन 67 टीएमसी पाणी वशिष्टी नदीच्यामार्फत वाया जात आहे. आपण या 67 टीएमसी पाण्याचे रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग भागासाठी कशाप्रकारे नियोजन करता येईल याचा विचार करु असे मी म्हणालो...

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, आपण आताच सांगितले की, या प्रस्तावाच्या अनुषंगाने कोणालाही बोलता येणार नाही. परंतु त्यानंतरही सन्माननीस सदस्य श्री.रामदास कदम आणि माननीय मंत्री महोदय बोलत आहेत.

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी माननीय मंत्री महोदयांना वेळ दिली नव्हती. ते स्वत:हून स्पष्टीकरण देण्यासाठी उभे राहिले.

यानंतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी मी जे वाक्य बोललो नाही ते वाक्य माझ्या तोंडी घातले आहे आणि त्याच बाबतीत मला खुलासा करावयाचा आहे. नाही तर रेकॉर्डवर चुकीचे राहील. या प्रस्तावावरील माझे उत्तर संपलेले आहे. शिवाय आपण चर्चा सुध्दा थांबविलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना आपण मुद्दा मांडण्याची परवानगी दिली होती. मी जे वाक्य बोललो नाही ते वाक्य मी बोलल्याचे त्यांनी सांगितले आहे. ते रेकॉर्डवर कायम राहील म्हणून मी माझा खुलासा केला. आपण परवानगी नाकारली असली तरी माझी हरकत नाही. तसेच माझे उत्तर तपासले तरी माझी हरकत नाही.

श्री.अमरनाथ राजूरकर : महोदय, माननीय जलसंपदा मंत्र्यांनी उत्तरात सांगितले की, पाणी वाटपाचे जे नियम लागू केले आहेत त्यांना स्थगिती दिली आहे. माननीय मुख्यमंत्री आणि जलसंपदा मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. या निमित्ताने मी विनंती करतो की, माननीय मुख्यमंत्री व माननीय जलसंपदा मंत्री यांच्या उपस्थितीत मराठवाड्यातील सर्वपक्षीय आमदारांची बैठक आपल्या दालनात घेऊन पाण्याचे समन्यायी वाटप लागू करणार काय ?

सभापती : या बाबत बैठक घेण्याचे मी मान्य केलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

सभापती : आता दिनांक 12 डिसेंबर, 2013 रोजी राखून ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र.46602 घेण्यात येईल.

मराठा समाजास आरक्षण देण्याबाबत स्थापन केलेल्या समितीच्या अहवालाबाबत

*** 46602 श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक 44312 ला दिनांक 23 जुलै, 2013 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मराठा समाजातील लोकांना आरक्षण देण्याबाबत मा.उद्योग मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(2) असल्यास, अद्याप अहवाल शासनास सादर केला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(3) असल्यास, हा अहवाल शासनास केव्हा सादर करण्यात येणार आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शिवाजीराव मोघे : (1) नाही.

(2), (3) व (4) मराठा समाजास आरक्षण देण्याबाबत मा.मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित करण्यात आली आहे. या विभागाच्या दि. 10 जुलै, 2013 च्या शासन निर्णयान्वये समितीस 6 महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. समितीचा अहवाल अद्यापि अप्राप्त आहे. अहवाल प्राप्त झाल्यावर नियमानुसार यथोचित निर्णय घेण्यात येईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, या प्रश्नाला माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांच्याऐवजी माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे अशी अपेक्षा आहे.

महोदय, प्रचलित आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाचा ओबीसीमध्ये समावेश करुन त्यांना 25 टक्के आरक्षण मिळावे ही गरीब मराठा समाजाची अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. आपल्या अनुमतीने या विषयावर अनेक वेळा सभागृहात चर्चा झाली आहे. सभागृहाबाहेर या विषयी प्रचंड मोठ्या प्रमाणावर आंदोलने सुरु आहेत. राज्य मागासवर्ग आयोगाने या विषयी अभ्यास करुन शासनाला अहवाल सादर केला होता. परंतु तो अहवाल शासनाने आयोगाकडे फेरविचारासाठी परत पाठविला. त्या आयोगावर फेरविचार करु शकत नाही असे आयोगाने सरकारला पत्राद्वारे कळविले आहे. सभापती महोदय, आपल्या आदेशानुसार गेल्या वर्षी याच दिवशी, याच ठिकाणी म्हणजेच दिनांक 19 डिसेंबर, 2012 रोजी या विषयावर चर्चा झाली होती. शिवाय बाहेर धरणे आंदोलन झाले होते.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी नेमका प्रश्न विचारावा.

श्री.विनायक मेटे : महोदय, हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा असल्यामुळे त्याची पार्श्वभूमी सांगणे गरजेचे आहे. या विषयी सर्वपक्षीय सदस्यांनी आग्रह धरल्यामुळे सभागृहाचे कामकाज बंद पडले होते. त्यावेळी आपण सांगितले की, या विषयी उद्याच बैठक घेण्यात येईल. त्यानुसार दिनांक 20 डिसेंबर, 2012 रोजी आपल्या उपस्थितीत बैठक पार पडली. त्या बैठकीत दोन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यातील एक निर्णय म्हणजे मराठा समाजाचा ओबीसीमध्ये समावेश करण्याबाबतचा अभ्यास करण्यासाठी ज्येष्ठ मंत्री श्री.नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात यावी आणि दुसरा निर्णय म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय स्मारक अरबी समुद्रात उभारण्यासाठी माननीय मंत्री श्री.जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात यावी. महोदय, माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीने आपले काम तीन महिन्यात संपवावे अशा प्रकारचा निर्णय घेण्यात आला. परंतु अजूनपर्यंत.....

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना विचारु इच्छितो की, आपल्याला प्रश्न विचारावयाचा नाही काय ? आपल्याला खरोखरच प्रश्न विचारावयाचा असेल तर तो लगेच विचारावा. वास्तविक पाहता तारांकित प्रश्न पुकारल्यानंतर त्या बाबतीत उप प्रश्न विचारावयाचे असतील तर एक-दोन मिनिटात अल्पसे स्पष्टीकरण करुन उप प्रश्न विचारावयास पाहिजे.

श्री.विनायक मेटे : महोदय, या विषयाची पार्श्वभूमी सांगितल्याशिवाय या प्रश्नाला न्याय देऊ शकत नाही.

सभापती : परंतु इतका वेळ पार्श्वभूमी सांगणे योग्य नाही.

श्री.विनायक मेटे : महोदय, माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीला सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. ती मुदत दिनांक 10 जानेवारी, 2014 रोजी संपणार आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, विहित मुदतीमध्ये त्या समितीचा अहवाल प्राप्त होईल काय ? मराठा समाजाला खरोखरच आरक्षण द्यावयाचे असेल तर या समाजाचा सर्वांगीण सर्व्हे करुन डेटा एकत्र करणे गरजेचे आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, राणे समितीचा अहवाल येण्यापूर्वी मराठा समाजाचा सर्वांगीण सर्व्हे करण्यात येईल काय ?

नंतर श्री.कांबळे....

अशुद्धीसह प्रत / मुद्रितशोधनाची नाही

ता.प्र.क्र. 46602 ....

श्री. विनायक मेटे ....

राज्य मागासवर्ग आयोगावर असलेल्या सदस्यांची मुदत संपली आहे. परंतु, अजूनही ते तेथे आहेत. मुंबई येथे झालेल्या अधिवेशनात माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते की, या सदस्यांना लवकरच दूर करण्याचा प्रयत्न करू. परंतु, ते अजूनही तसेच आहेत. आपण त्यांना तेथून दूर करणार का, हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. शासनाच्या इतर मागासवर्गीयांच्या सूचीतील 83 क्रमांकावर कुणबी समाज असा उल्लेख आला आहे तर त्याच्या पोट जाती म्हणून लेवा-कुणबी, लेवा-पाटील, लेवा-पाटीदार, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा असा उल्लेख आहे. आपण कुणबी जातीच्या पोट जातीमध्ये फक्त मराठा-कुणबीच्या मध्ये फक्त 'कॉमा' टाकणार का आणि मराठा व व कुणबी हे वेगळे करणार का ? हे अत्यंत सोपे आहे. आपल्याला जास्त काहीही करण्याची गरज नाही. आपण असे करणार का ? माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नांची उत्तरे द्यावीत, अशी विनंती आहे. मागील वेळी या प्रश्नांना माननीय मुख्यमंत्र्यांनीच उत्तर द्यावे, याकरिता सभागृहाचे कामकाज बंद केले होते आणि हा प्रश्न अनुत्तरित ठेवला होता.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, समिती दिलेल्या वेळेमध्ये अहवाल, निर्णय देणार का आणि सर्व्हे करणार आहे का, असे प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारले आहेत. होय, होणार आहे, असे या दोन्ही प्रश्नांसाठीचे उत्तर आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय मंत्री चुकीचे उत्तर देत आहेत असे मी म्हणत नाही. परंतु, आमची विनंती आहे की, या संदर्भातील उत्तर माननीय मुख्यमंत्र्यांनी द्यावे.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, समितीचा अहवाल मुदतीपूर्वी देणार काय आणि सर्व्हे करणार काय असे सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे. दोन्ही प्रश्नांच्या संदर्भात समितीचे प्रयत्न सुरू आहेत. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य म्हणाले की, 3 सदस्य नेमले आहेत. ते चुकीचे नाही. त्यांना रि-अपॉईंटमेंट दिली आहे. त्यांची डिसेंबर, 2014 पर्यंत मुदत संपणार आहे. सन्माननीय सदस्यांनी 'कॉमा' काढण्याच्या संदर्भातीलही प्रश्न विचारला. मी सांगू इच्छिते की, कॉमा काढायचा असेल तरी ओबीसी कमिशनकडे जावे लागेल, त्यांनी रिपोर्ट दिल्यानंतर याचा विचार होऊ शकतो. कॉमा काढणे किंवा घालणे हे त्यांच्या हातात आहे. शिफारशी आल्यावर मंत्रिमंडळ निर्णय घेईल. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 46602 ....

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, हा प्रश्न यासाठीच राखून ठेवण्यात आला होता. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे म्हणत आहेत ते खरे आहे. माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले हे कबूल असले तरी सदस्यांची फेरनियुक्ती झाल्याचा उल्लेख करीत आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, अशा प्रकारे फेरनियुक्ती करण्याचे प्रावधान आहे का ? कारण अशाच प्रश्नाला उत्तर देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. आमचा कोणत्याही विशिष्ट सभासदांच्या विरोधात आक्षेप नाही. आमचे म्हणणे आहे की, त्यांचा कालावधी संपलेला आहे. त्यांच्या जागी दुसरी नियुक्ती करावी. पूर्वी असा मुद्दा आला होता आणि त्याला सकारात्मक म्हणजे होय असे उत्तर दिले होते. त्याचे काय झाले ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, रि-अपॉईंटमेंट करण्याबाबत कायद्यात प्रोव्हिजन आहे, त्याप्रमाणे 3 जणांची रि-अपॉईंटमेंट केली आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, हे चुकीचे आहे. मला आपण संरक्षण द्यावे. आपल्या समाजाला संरक्षण द्यावे. आपल्यामुळेच आम्ही येथपर्यंत आलो आहोत. माननीय मंत्र्यांनी काय उत्तर दिले हे मला अजूनही समजेले नाही. एका प्रश्नाचे सुध्दा सकारात्मक उत्तर दिलेले नाही.

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, समजून घेण्याची इच्छा असेल तर समजेल. मी कायद्याप्रमाणे, नियमाप्रमाणे उत्तर दिले आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, असे करता येत नाही. समजण्याची इच्छा नाही म्हणजे काय ? समजण्याची इच्छा आहे म्हणूनच प्रश्न राखून ठेवला होता. आपल्या हातामध्ये सत्ता आहे, सत्तेवर बसला आहात म्हणून बाकीच्यांना समजण्याची बुध्दी नाही, इच्छा नाही, असे म्हणता येणार नाही. आपण पूर्ण ऐकून घ्यावे. आपण फार तयारीनिशी आला आहात. आपण सर्व प्रश्नांची उत्तरे देणार आहात. आम्हाला सुध्दा अपेक्षा आहे. या बाबतीत अनेक वेळा चर्चा झाली, बाहेर आंदोलने झाली. आपण तत्परता दाखवित आहात, मग समिती अपॉईंटमेंटचे पत्र करण्यास 6 महिने का लागले, आता उर्वरित 15 दिवसांमध्ये या समितीचे कामकाज कसे होणार आहे ? सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला की, या समाजाचा डेटा तयार करावयाचा आहे, तो 15 दिवसांत कसा होणार ?

(नंतर श्री. खंदारे ....

अशुद्धीत प्रत / मुद्रणासाठी नाही

ता.प्र.क्र.46602....

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरतीचा मुद्दा आहे.

सभापती : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येत नाही. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे आणि सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांच्या प्रश्नाला मी उत्तर दिलेले आहे असे मंत्री महोदयांचे म्हणणे आहे. परंतु त्यांच्या उत्तराने त्यांचे समाधान झाले नसल्यामुळे मंत्री महोदयांना याबाबत अधिक स्पष्टीकरण करावयाचे असेल तर त्यांनी ते करावे असे मी त्यांना सांगेन.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या संदर्भात नेमलेल्या समितीला कमी वेळ दिलेला आहे, त्या अवधीत ती समिती निर्णय घेईल का असे सन्माननीय सदस्यांनी विचारलेले आहे. मी असे उत्तर दिलेले आहे की, त्यासाठी प्रयत्न होणार आहेत. आता सर्व्हे उपलब्ध झालेला आहे त्यावर आधारित निर्णय होऊ शकतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांचे एक विधेयक काल सभागृहात मंजूर झाले आहे. तेव्हा त्यांच्या शिरपेचामध्ये आणखी एक तुरा येऊ द्या. मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय शिवाजीराव मोघे यांनी केला असे आम्हाला कळू द्या. जसे आम्ही अभिमानाने सांगतो की, माननीय श्री.शिवाजीराव मोघे यांच्या प्रयत्नामुळे जादूटोणा विधेयक मंजूर झाले तसा निर्णय ते याबाबत घेणार आहेत का ? मला माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करावयाची आहे. या प्रश्नावर खूप चर्चा झाली आहे, खूप फाटे फुटत आहेत. मराठा समाजाला आरक्षण देण्याची सरकारची मानसिकता आहे का, असेल तर ते कधीपर्यंत दिले जाईल हे स्पष्टपणे ब्लॅक ॲण्ड व्हाईटवर सांगावे. शासनाच्या उत्तरानंतर त्या त्या संघटना आपले धोरण ठरवतील.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, आपल्या प्रयत्नामुळे हा प्रश्न निश्चित दिशेने पुढे निघाला आहे. गेल्या वर्षी याच दिवशी आपण नागपूर येथे महत्वाची बैठक घेतली होती. त्यामध्ये काही निर्णय झाले होते त्याचा उल्लेख सभागृहात झालेला आहे. या प्रश्नाची पार्श्वभूमी सर्व सन्माननीय सदस्यांना माहीत असल्यामुळे मी त्याबाबत पुन्हा बोलण्याची गरज नाही. काही घटनात्मक तरतुदी आहेत. आपल्याला जे उद्दिष्ट साध्य करावयाचे आहे ते दिसण्यासाठी सोपे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

ता.प्र.क्र. 46602.....

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी चौथ्या प्रश्नात असे सांगितले की, एक कॉमा काढावयाचा आहे. यामध्ये विषय तोच आहे. जर मराठा शब्द तेथे आला तर बाकी काही राहत नाही. कॉमा काढून तेथे मराठा हा शब्द यावा या चौथ्या प्रश्नाकरिताच आपण सर्व करीत आहोत. यातील कायदेशीर तरतुदी पूर्ण करण्याचा आपण निर्णय घेतला आहे. राज्यात 50 टक्क्यापेक्षा अधिक आरक्षण द्यावयाचे असेल तर त्यासाठी काही तरतुदी कराव्या लागतात. संख्यात्मक माहिती गोळा करावी लागते. घटनात्मक तरतूद अशी आहे की ती माहिती गोळा केल्याशिवाय ती मागणी पूर्ण करता येत नाही. काही राज्यांनी 50 टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण ठेवलेले आहे. परंतु त्याला न्यायिक आव्हान देण्यात आलेले आहे. त्यासाठी त्यांनी कोणते प्रयत्न केले होते ते सुध्दा आपल्यासमोर आहेत. त्याचा आपण अभ्यास केलेला आहे. घटनात्मक तरतुदीनुसार या राज्यात मागासवर्ग आयोग नेमलेला आहे. पहिल्यांदा या आयोगाच्या अध्यक्षपदी बापट यांची नेमणूक झाली होती. त्या आयोगाने अभ्यास करुन निर्णय दिला होता. त्यामध्ये ही मागणी स्वीकारण्यात आली नव्हती. त्यानंतर नवीन अध्यक्ष नेमले गेले, दुर्दैवाने त्यांचे निधन झाले. त्यानंतर नवीन अध्यक्ष नेमल्यावर त्यांच्याबद्दल काही आक्षेप घेण्यात आले. त्या आयोगामध्ये पूर्वग्रहदूषित सदस्य आहेत का असा आक्षेप घेण्यात आला होता. त्यामध्ये मी काही जात नाही. आपण निर्णय घेतल्या प्रमाणे मंत्रिमंडळातील माझे ज्येष्ठ सदस्य श्री.नारायणराव राणे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आलेली आहे. त्या समितीमध्ये 4 कॅबिनेट व 2 राज्यमंत्री तसेच सचिव आहेत. या समितीने अतिशय गंभीरपणे काम केलेले आहे. आपला उद्दिष्ट साध्य करण्याचा उद्देश पाहिजे. आपण केवळ प्रक्रिया पूर्ण करीत राहिलो तर त्याला काही अर्थ उरत नाही.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रासाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

उद्दिष्ट साध्य करण्याकरिता सर्व कायदेशीर टप्पे आपल्याला पूर्ण केले पाहिजेत. मला या ठिकाणी कमिटीला धन्यवाद दिले पाहिजे. कमिटीने खूप परिश्रम घेतलेले आहेत. त्यांनी आतापर्यंत 8 बैठका घेतलेल्या आहेत. 5 बाहेरगावी म्हणजे विभागीय बैठका घेतलेल्या आहेत. नागपूर, पुणे, कोकण, औरंगाबाद, नाशिक या विभागामध्ये 5 बैठका घेतलेल्या आहेत. एवढेच नाही तर लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना यांच्या समवेत देखील चर्चा केलेली आहे. या विषयाच्या संदर्भात लेखी निवेदने देण्याच्या बाबतीत सांगण्यात आले. जवळ जवळ 2787 निवेदने प्राप्त झालेली आहेत. महत्वाची गोष्ट अशी आहे की, मराठा समाजाचे काय प्रतिनिधीत्व आहे यासंबंधी आपल्याला पब्लिक सर्व्हिसेसमध्ये संख्यात्मक विश्लेषण करावयाचे आहे. त्यासाठी प्रत्येक विभागाकडून माहिती मागविली जात आहे. शासनाने या समितीला 6 महिन्याची मुदतवाढ दिलेली असून ही मुदतवाढ 9 जानेवारी 2014 पर्यंत आहे. मी यासंबंधी समितीच्या अध्यक्षांची चर्चा केली. त्यांनी आतापर्यंत काय काम केले याची माहिती दिली, अजून काय काय काम अपेक्षित आहे याची माहिती दिली. आयोगाचा अहवाल मंत्रिमंडळाच्या उप समितीने अस्वीकार केला, निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याची आयोगाला विनंती करण्यात आली असून आयोगाने ती विनंती स्वीकारलेली आहे. या निर्णयाचे पुनर्विलोकन करण्याची गरज का आहे हे मुद्देसुद पध्दतीने पटवून दिल्या शिवाय कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होणार नाही आणि तसा प्रयत्न सुरु आहे. तेव्हा आपण जी वेळ दिली आहे त्या वेळेपर्यंत राणे समिती अहवाल देईल.

आपणा सर्वांना अपेक्षा आहे की, याबाबतीत ठोस निर्णय झाला पाहिजे. निर्णय झाल्यानंतर तो निर्णय टिकला पाहिजे. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, तुम्ही निर्णय घ्या, तो हायकोर्टामध्ये किंवा सुप्रिम कोर्टामध्ये फेटाळला गेला तरी चालेल. मला वाटते असे करुन चालणार नाही. या विषयाच्या संदर्भात सर्वांशी विचारविनिमय करुन, सर्वांचे सल्ले घेऊन एकमताने जो काही निर्णय घेऊ तो निर्णय टिकला पाहिजे. यासाठी राणे समितीचे प्रयत्न सुरु आहेत. त्या समितीला आपण मुदतवाढ दिलेली आहे. आपण त्यांना वेळ देऊ या. त्यांच्या काही सूचना आहेत. त्याबाबतीत माझ्याशी चर्चा झालेली आहे. पुढे आणखी कोणकोणती प्रक्रिया करावी लागेल यासंबंधी त्यांची काही मते आहेत. मला वाटते 9 जानेवारी 2014 पर्यंत त्यांची मुदत आहे. तोपर्यंत अहवाल देण्याची त्यांना विनंती करु. समितीने खूप काम केलेले आहे. खूप चांगली माहिती

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण....

गोळा केलेली आहे. निवेदनांचे विश्लेषण चाललेले आहे. त्याची देखील मी माहिती घेतलेली आहे. यामधून आपल्याला ठोस निर्णय घेता येईल. त्यामध्ये आपल्याला कोणतीही अडचण येणार नाही. या सभागृहामध्ये यासबंधी भावना व्यक्त करण्यात आल्या. बाहेर देखील तीव्र भावना व्यक्त करण्यात आल्या. त्याचे प्रतिबिंब मंत्रिमंडळाच्या निर्णयामधून उमटेल याची मला खात्री आहे. मला एवढेच सांगावयाचे आहे की राणे समितीला आपण जी मुदतवाढ दिलेली आहे त्यावेळेपर्यंत अहवाल आल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री. विनायक मेटे : माननीय मुख्यमंत्र्यांचे मी मनापासून आभार मानतो. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या उत्तरातून आमच्या हाती काहीच लागले नाही.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : राणे समिती गठीत करण्याचा निर्णय माननीय सभापतींच्या आदेशानुसार झालेला आहे. समिती नेमलेली आहे. ती समिती काम करीत आहे. तेव्हा त्या कमिटीला काम करु न देणे किंवा त्या समितीवर टिपणी करणे हा माननीय सभापतींचा अवमान आहे. त्यांनी पुढाकार घेऊन समिती नेमण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्या समितीला काम करु द्यावे अशी माझी विनंती आहे.

श्री. भाई जगताप : मी माननीय मुख्यमंत्र्याचे आभार मानतो. आपल्याला तंत्रशुध्द पध्दतीने काम करावयाचे असेल तर डयू प्रोसेस ऑफ लॉ फॉलो करावे लागतील आणि त्याच्याशी आम्ही पूर्णपणे सहमत आहोत. माननीय मुख्यमंत्र्यांनी एक कळीचा मुद्दा सांगितला.

...नंतर श्री. गिते...

अशुध्दीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ABG/ D/ ST/ 13:25

ता.प्र.क्र.46602..

श्री.भाई जगताप...

आपल्याला 11 तारखे पर्यंत वाट बघण्यास काहीही हरकत नाही. आपण त्यांना अनेक वेळा मुदतवाढ दिलेली आहे. याच्यातील संख्यात्मक डेटा हा महत्वाचा विषय आहे. या बाबतीत सर्व्हे होणे आवश्यक आहे. पूर्वीच्या समितीने दिलेला अहवाल पूर्वग्रहदूषित होता, याची आपल्याला सगळयांना माहिती आहे, म्हणून तो अहवाल आपण स्वीकारला नाही. आपल्याला संख्यात्मक डेटा गोळा करावयाचा आहे, त्यासाठी वेळ लागणार आहे. संख्यात्मक डेटा हा 11 तारखेपर्यंत गोळा होईल काय या प्रश्नास "नाही" असे उत्तर माननीय मंत्री महोदयांकडून मिळेल. ही समिती अतिशय चांगल्या प्रकारे काम करीत आहे.त्या समितीने महाराष्ट्रात अतिशय चांगल्या प्रकारे काम केलेले आहे. त्यांनी यासंबंधी खूप चांगला डेटा गोळा केलेला आहे. या समाजाची आजच्या परिस्थतीची माहिती तसेच त्या समाजाचा संख्यात्मक डेटा गोळा करणे गरजेचे आहे. ही संपूर्ण माहिती सभागृहाच्या रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. जे माननीय मुख्यमंत्री महोदय म्हणाले, त्यांच्या मताशी आम्ही पूर्णपणे सहमत आहोत. हा सायंटिफिक डाटा आपल्याला गोळा करता येणार नाही. यासाठी केंद्र सरकारने समिती नेमलेली आहे. राज्य आणि केंद्र शासन यांच्यात समन्वय साधून तो डेटा गोळा करावा लागेल आणि तो डेटाच ग्राहय धरला जाणार आहे. सायंटिफिक डेटा गोळा करण्यासाठी अधिकचा वेळ लागला तर शासनाकडून अधिकचा वेळ दिला जाईल काय?

श्री.शिवाजीराव मोघे : राज्य शासनाने 10 जानेवारी, 2014 पर्यंत वेळ दिलेली आहे. या बाबतचा डिटेल अभ्यास चाललेला आहे यासबंधीची माहिती घेण्यात आलेली आहे. यात किती समाज आहे, किती जाती आहेत, वर्ग 3 च्या जागा किती आहेत, वर्ग 4 च्या किती जागा आहेत. त्यांच्याकडे जमीन किती आहे, भूमिहीन लोक किती आहेत यासंबंधीची आकडेवारी शासनाकडे उपलब्ध आहे. परंतु या बाबतीत अधिकची अद्ययावत माहिती मिळावी म्हणून हा सर्व्हे करण्यात येत असून तो दिलेल्या कालावधीत पूर्ण होईल की त्यासाठी आणखी मुदत वाढवून द्यावी लागेल या बाबतचा विचार विनिमय करुनच निर्णय घेता येऊ शकतो.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी अतिशय स्पष्ट शब्दामध्ये या बाबतीत काय कार्यवाही झाली आहे व होणार आहे तसेच ती कार्यवाही कशा पध्दतीने झाली

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46602..

श्री.राम पंडागळे...

पाहिजे यासंबंधी अतिशय समाधानकारक उत्तर दिलेले आहे. मला एका गोष्टीला आक्षेप घ्यावयाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप कदम हे भाई आहेत. ते अतिशय धडाडीचे कार्यकर्ते आहेत. बाहेरही ते धडाडीने काम करतात. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या उत्तरानंतर ते ज्या शांत पध्दतीने बोलले, त्यामुळे त्यांचा मी आदर करतो. माननीय सामाजिक न्याय मंत्री हे पददलित समाजाचे आहे. त्यांनी अतिशय शांतपणे आणि स्वच्छपणे उत्तर दिलेले असताना सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप हे अतिशय जोरात बोलून अंगावर धाऊन जात होते. हे चालणार नाही, असे होणार नाही, असे गृहीत धरु नका अशा प्रकारची वक्तव्ये ते जोरजोरात करीत होते. (अडथळा)

सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया सभागृहात शांतता ठेवावी. ही चर्चा अत्यंत गांभीर्याने चालू आहे. ही एकूण चर्चा गांभीर्याच्या वातावरणात व्हावयाची असेल तर आपण भावना विवश होऊन ती होणार नाही. या ठिकाणी या प्रश्नाच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी अतिशय सविस्तर व योग्य असे उत्तर दिलेले आहे. या विषयाच्या बाबतीत माननीय विरोधी पक्ष नेत्यांना त्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी एक मिनिटांचा वेळ देतो. त्यांचे मत ऐकून घेतल्यानंतर ही चर्चा मी थांबविणार आहे.

श्री.विनोद तावडे : महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तरानंतर सन्माननीय सदस्य श्री.मेटे उभे राहिले. त्यांनी काही शब्दांचा वापर केला. शब्दाचा वापर आपण थोडा वेळ बाजूला ठेवू. आपली प्राथमिक समिती झाली, परंतु त्या समितीचे परिपत्रक निघण्यास सहा महिन्यांचा कालावधी गेला. या गोष्टीचे आम्हाला दु:ख आहे. जयंत पाटील यांच्या शिव स्मारकाचे काम चालू झाले तर माननीय राणे साहेब, तुमचे का झाले नाही ? यासंबंधी शासनाने अजून परिपत्रक काढलेले नाही.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46602...

श्री.विनोद तावडे..

त्यामुळे ती खंत चळवळीतील कार्यकर्त्यांना आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. त्यांनी समितीकडून सगळी माहिती घेतली आहे. त्यामुळे मार्च अधिवेशनाच्या आधी या विषयासंबंधातील, आरक्षणाचा निर्णय घोषित होईल असे आपल्याला वाटते काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, समिती कोणता अहवाल देईल यासंबंधी पूर्वग्रह किंवा टिपणी करणे योग्य होणार नाही असे मला वाटते. आपल्या अध्यक्षतेखाली आपल्या दालनात सर्व संबंधितांसमवेत बैठक घेण्याचे आश्वासन सभागृहात दिलेले आहे. मी व माननीय मंत्रिमहोदयांनी वारंवार सांगितले आहे की, राणे समिती गठित करण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी लागला हे खरे आहे. या समितीमध्ये कोणाला घ्यायचे, या समितीची कार्यकक्षा काय ठरवायची हे निश्चित करण्यासाठी वेळ लागलेला आहे. तसेच तो कालावधी हा अधिवेशनाचा देखील होता. त्यामुळे समिती गठित करण्यास वेळ लागलेला आहे. यात आपल्याला कायदेशीर बाबी देखील तपासाव्या लागणार आहेत. घटनात्मक तरतुदींचा संपूर्ण अभ्यास करून हे आरक्षण न्यायालयामध्ये टिकेल अशा प्रकारचाच निर्णय घेणे आवश्यक आहे. तेवढाच विश्वास राज्यातील सर्व घटकांचा ढळू न देता निर्णय घेतला पाहिजे. कुठल्याही घटकाला असे वाटता कामा नये की, हा निर्णय आपल्यावर अन्यायकारक होईल. आपल्याला या दोन्ही गोष्टी साध्य करावयाच्या आहेत. म्हणूनच राणे समितीने ठिकठिकाणी जाऊन लोकांना विश्वासात घेऊन संघटनांमार्फत माहिती घेण्याचा प्रयत्न केला आहे. तो पर्यंत आपल्याला क्वान्टीटेटीव्ह डेटा गोळा करावाच लागणार आहे. आता शासनाच्या वतीने माननीय मंत्री महोदयांनी काही स्टेप्स घेतलेल्या आहेत. प्रश्नावलीची माहिती गोळा करण्याचे काम सामान्य प्रशासन विभागाकडून सुरू आहे. ही माहिती आपल्याला कायदेशीर, घटनात्मक तरतुदी करण्याकरिता फायदेशीर ठरणार आहे. त्यामुळे राणे समिती कोणता अहवाल देणार आहे, कोणता निर्णय घेणार आहे यासंबंधी आता चर्चा करणे आवश्यक नाही. प्रगती होत आहे. आपण पुढे सरकत आहोत. सभापती महोदय, आपण स्वत: बैठक घेणार आहोत असे आश्वासन दिले असल्यामुळे यासंबंधी पुढे चर्चा करणे संयुक्तिक होणार नाही असे मला वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायकराव मेटे : सभापती महोदय, आपण मला प्रश्न विचारण्यास संधी देत नसल्याबद्दल मी शासनाचा निषेध करतो आणि सभात्याग करतो.

(सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

.....

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठाणे जिल्ह्याचे विभाजन करुन पालघर जिल्हा घोषित करणेबाबत

(1) * 45148 श्री.संजय दत्त , श्री.चरणसिंग सप्रा , श्री. शरद रणपिसे , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.मनीष जैन : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शासनाने ठाणे जिल्ह्याचे विभाजन करुन पालघर हे जिल्ह्याचे ठिकाण घोषित करावे या मागणीसाठी जिल्हा विभाजन संघर्ष समितीच्या वतीने पालघर तालुका बंद चे आयोजन केल्याचे माहे ऑगस्ट, 2013 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाबाबत राज्य शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाबाबत होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात : (1) हे खरे आहे.

(2) जिल्हा विभाजनाच्या अनुषंगाने वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांचे निराकरण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्याचे विभाजन करण्यासंबंधीचा अत्यंत ज्वलंत प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित आहे. या विषयावर सभागृहात वेळोवेळी चर्चा देखील झालेली आहे. देशातील सर्वात मोठा लोकसंख्या असलेला हा जिल्हा आहे. लोकशाही आघाडी सरकार लोकाभिमूख सरकार आहे. माननीय मुख्यमंत्री जनभावनेचा आदर करणारे नेते आहेत. माननीय उप मुख्यमंत्री आणि माननीय महसूल मंत्री तडफदार आहेत. मी अत्यंत खेदाने नमूद करू इच्छितो की, या विषयावर शासनाच्या वतीने सार्वभौम सभागृहाची दिशाभूल केली जात आहे किंवा शासनाकडूनच वेळकाढूपणा होत आहे. कारण तत्त्वत: मान्यता देऊन सुद्धा निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसेल तर या पेक्षा दुसरे दुर्दैव नाही.

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपणाला जसा या प्रश्नावर न्याय मिळवून घ्यायचा आहे तसाच न्याय अन्य 2-3 सन्माननीय सदस्यांना उप प्रश्न विचारून घ्यायचा आहे. तेव्हा आपण नेमका प्रश्न विचारावा.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :45148.....

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, यासंबंधी मी स्पेसिफिक प्रश्न विचारु इच्छितो की, दि. 20.12.2012 तसेच दि. 16.7.2013 च्या प्रोसिडींगच्या कॉपीज मध्ये माननीय मंत्री महोदयांनी जी आश्वासने दिली होती त्याची माहिती मी आपल्या माध्यमातून सभागृहाच्या पटलावर ठेवू इच्छितो. माननीय मंत्री महोदयांनी त्या दिवशी जे आश्वासन दिले होते तेच उत्तर आज सुध्दा दिलेले आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, तेव्हा पासून आज पर्यंत या विषयाच्या संदर्भात काय प्रगती झाली आहे, विभाजनाचा निर्णय घेण्यासाठी शासन कालमर्यादा ठरविणार आहे काय, 26 जानेवारी पर्यंत यासंदर्भातील निर्णय घेतला जाणार आहे काय, 26 जानेवारी पर्यंत निर्णय घेतला जाणार नसेल तर ठाणे जिल्हयाच्या विभाजनाला कोणती अदृश्य शक्ती अडवत आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ठाणे जिल्हा हा महाराष्ट्रातीलच नाही तर संपूर्ण देशातील मोठा जिल्हा झालेला असून ही वस्तुस्थिती आपल्याला नाकारता येणार नाही. 20 वर्षामध्ये ठाणे जिल्हयाची लोकसंख्या दुप्पट झालेली आहे. या जिल्हयामध्ये 15 आदिवासी तालुके असून 8 तालुके बिगर आदिवासी आहेत. या जिल्हयामध्ये 7 महानगरपालिका असून 5 नगरपरिषदा आहेत. या जिल्हयामध्ये 5 प्राधिकरणे आहेत. या जिल्हयात 4 लोकसभा मतदार संघ असून 24 विधानसभा मतदार संघ आहेत. ठाणे जिल्हयाचे विभाजन झाले पाहिजे अशी शासनाची देखील इच्छा आहे. या विभाजनाच्या संदर्भात शासनाने एक समिती नेमली होती व त्या समितीने यासंदर्भातील अहवाल शासनाला दिलेला असून विभाजनाच्या दृष्टीने जी काही पूर्तता करावयाची असते त्यासंदर्भात वित्त विभागाने काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. यामध्ये जेवढे विभाग येणार आहेत त्यातील काही विभागाकडून अहवाल प्राप्त झालेले असून काही विभागाकडून अहवाल प्राप्त झालेले नाहीत. नवीन जिल्हा झाल्यानंतर त्या ठिकाणी एकंदर 61 विभागाचे काम सुरु होणार आहे. या सर्वांना किती स्टाफ लागणार आहे, किती अधिकारी लागणार आहे, किती खर्च येणार आहे या सर्वांचा गोषवारा एकत्र करण्याचे काम सुरु आहे. यामध्ये दोन प्रश्न महत्वाचे असून पहिला प्रश्न दोन सहकारी बँकेचे विभाजन तसेच दुसरा महत्वाचा प्रश्न जिल्हा परिषदेचा आहे. या ठिकाणच्या जिल्हा परिषदेची निवडणूक होऊन एक दीड वर्ष झालेले आहे. त्यामुळे लगेच निवडणुकीला सामोरे कसे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :45148.....

श्री. बाळासाहेब थोरात .....

जावे हा कळीचा मुद्दा बनलेला आहे. आम्ही ग्रामविकास विभागाकडून एक प्रस्ताव मागितला असून तो प्रस्ताव अद्यापी आम्हाला मिळालेला नाही. जिल्हा परिषद आहे त्या स्थितीत पुढे सुरु ठेवून तिचे 5 वर्षे पूर्ण करणे शक्य आहे काय याबाबत ग्रामविकास विभागाचा प्रस्ताव मागवला असून तो आम्हाला मिळाला नाही. हा प्रस्ताव आल्यानंतर तो विधी व न्याय विभागाला पाठविला जाईल. सर्व विभागाकडून एक महिन्यात प्रस्ताव येतील असे शेडयूल ठरविण्यात आले असून त्या प्रमाणे पूर्तता केली जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हा प्रश्न प्रत्येक अधिवेशनात वारंवार येत असतो. या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी माननीय मंत्री महोदय श्री. बाळासाहेब थोरात उभे राहिले की, ते मला भूगालाचे शिक्षक वाटतात. प्रामाणिकपणे सांगावयाचे झाले तर हा प्रश्न मागे जेव्हा उपस्थित झाला होता त्यावेळी माननीय उप सभापती आसनावर होते. विभाजनाच्या प्रश्नाच्या संदर्भात त्यांनी काही निर्देश दिले होते. हा प्रश्न प्रशासकीय कारणापेक्षा राजकीय कारणामुळे झालेला आहे. आघाडी शासन चालवित असतांना जनतेचा विकास कसा मारला जातो याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे ठाणे जिल्हयाचे विभाजन न होणे. या प्रश्नाच्या निमित्ताने एकाचे एक मत तर दुसऱ्याचे दुसरे मत आहे. हा न संपणारा प्रश्न असल्यामुळे या प्रश्नामध्ये राष्ट्रीय नेत्यांनी लक्ष घातले तरच हा प्रश्न सुटू शकतो.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45148....

श्री.विनोद तावडे...

आपणास आघाडीतील चटके सहन करावे लागणार आहेत. मग लकवा, चकवा असे आम्हाला ऐकू येते. मला राजकारणावर काही बोलायचे नाही. आपण पक्षातील भांडणामध्ये जिल्ह्याची वाट का लावत आहात ? आपण ज्येष्ठ नेत्यांशी बोलून हा विषय सोडविला पाहिजे. या ठिकाणी माजी प्रदेशाध्यक्ष श्री.मधुकरराव पिचड साहेब उपस्थित आहेत. खरे म्हणजे हा प्रश्न सोडविण्यासाठी आपल्यासारख्या ज्येष्ठ मंत्री महोदयांनी पुढाकार घेतला तर हा प्रश्न सुटू शकेल. माझा प्रश्न आहे की, वित्त विभागाने विचारलेली माहिती किती दिवसांत देणार आहात ? 26 जानेवारी रोजी या दोन नवीन जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये तिरंगा फडकाविला जाईल असा आपणास विश्वास आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, वित्त विभागाने उपस्थित केलेल्या बाबीं संदर्भातील पूर्तता एक महिन्यात करण्याचा प्रयत्न राहील. दोन जिल्हे लवकरात लवकर झाले पाहिजे असे आमचे देखील म्हणणे आहे.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी ठाणे जिल्ह्याच्या विभाजना संदर्भात काय अडचणी आहेत त्याची माहिती दिली. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, हा दोन पक्षाचा विषय आहे. परंतु यामध्ये जिल्ह्यातील लोक सफर होत आहेत. सर्वात जास्त क्राईम रेट, लॉ ॲन्ड ऑर्डर ठाणे जिल्ह्यात आहे. महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हापरिषद आणि बँकांचा कारभार सर्वात जास्त ठाणे जिल्ह्यात ढासळला आहे. आपण जिल्हापरिषदेचे, बँकेचे विभाजन करायचे किंवा कसे या प्रश्नावर विचार करीत राहिलो तर हा विषय कधीही मार्गी लागणार नाही. तेव्हा माझा प्रश्न आहे की, ठाणे जिल्ह्याचे विभाजन कोणत्या तारखेला करणार आहात ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, अशी तारीख सांगणे मला शक्य नाही. आम्ही महिनाभरात पूर्तता करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

श्री मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, मागील वीस वर्षापासून सर्व पक्षाचे सदस्य या विभाजनासाठी वेळोवेळी आंदोलन करीत आहेत. ठाणे जिल्ह्याला अशा प्रकारची वागणूक देणे अयोग्य आहे. त्या ठिकाणी जवळपास दीड कोटी जनता राहत आहे. त्या ठिकाणी सॅनिटेशनचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45148....

श्री.मुझफ्फर हुसेन....

प्रश्न आहे, शेतकऱ्यांचा, पाण्याचा आणि रेव्हेन्यूचा प्रश्न आहे. राज्यात सर्वात जास्त कुपोषण ठाणे जिल्ह्यात होत आहे आणि ठाणे जिल्हा मुंबईपासून फक्त 100 कि.मी. अंतरावर आहे. राजकीय दृष्टीकोनातून ठाणे जिल्ह्याचे विभाजन झालेले नाही. तेव्हा माझा प्रश्न आहे की, एक महिन्यात ठाणे जिल्ह्याचे विभाजन करण्यात येईल काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या संदर्भातील पूर्ण प्रयत्न शासनाच्या माध्यमातून करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या विषयावर अनेक वेळा सभागृहात चर्चा झालेली आहे. या संदर्भात मागील अधिवेशनात माननीय मंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते.परंतु त्याची पूर्तता न झाल्यामुळे हा प्रश्न उपस्थित करावा लागला आहे. या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, जिल्हापरिषदेचे सदस्य निवडून आले आहेत त्यांच्या बाबतीत काय निर्णय घेणार ? या लोकप्रतिनिधींचे स्थान पाच वर्षे टिकविण्यासाठी जिल्हा विभाजनाचा निर्णय पाच वर्षे पुढे ढकलणार काय ? माननीय मंत्री महोदयांनी मान्य केलेले आहे की, या जिल्ह्यातील लोकसंख्या वाढलेली आहे. आपणास या जिल्हयाचे विभाजन किंवा त्रिभाजन जे काही करायचे आहे ते करावे कारण हा विषय अतिशय महत्वाचा आहे. आपण सर्व विषय बाजूला सारुन या भागातील आदिवासी आणि सर्वसामान्य लोकांना न्याय देण्यासाठी विभाजनाचा किंवा त्रिभाजनाचा निर्णय तातडीने घेणार आहात काय ? म्हणजे आम्हाला हा विषय पुन्हा तातडीने मांडण्याची वेळ येणार नाही.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय,विभाजनामध्ये जे काही अनेक प्रश्न आहेत त्यामध्ये जिल्हापरिषदेचे सदस्य हा देखील एक भाग आहे एवढेच मी ते या निमित्ताने सांगितले. विभाजन शासनाला मान्य आहे. हा प्रश्न एक महिन्यात सोडविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, हा प्रश्न एक महिन्यात सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. वास्तविक पाहता महसूल विभागाकडून अनेक विभागांचा डेटा गोळा केला जात आहे. शिवाय वित्त विभागाचे सुध्दा विविध प्रश्न आहेत. एक महिन्यात डेटा गोळा करण्याचे काम झाले नाही तरी, जो काही डेटा उपलब्ध होईल त्या आधारावर एक महिन्याच्या आत ठाणे जिल्ह्याचे विभाजन करण्याचा निर्णय घेण्यात येईल काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : महोदय, ठाणे जिल्ह्याचे विभाजन करण्याच्या अनुषंगाने सर्व माहिती गोळा केली जात आहे. प्राप्त झालेली माहिती एकत्रित पध्दतीने वित्त विभागाकडे सादर करावयाची आहे. तद्नंतर या संदर्भात तातडीने योग्य तो निर्णय घेतला जाईल.

श्री.संजय दत्त : महोदय, माननीय ज्येष्ठ मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांच्याबद्दल आम्हाला आदर आहे. परंतु त्यांनी जे उत्तर दिले त्यावरुन असे दिसून येते की, त्यांनी या विषयावरील प्रश्नाला यापूर्वी जे उत्तर दिले होते तेच उत्तर आज सुध्दा दिले आहे. वास्तविक पाहता ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाबाबत पूर्वी पासून आतापर्यंत काय काय प्रगती झाली या बाबतचा उल्लेख त्यांनी करावयास हवा होता. परंतु तो करण्यात आला नाही. महोदय, ठाणे जिल्ह्यातील रहिवाशांच्या भावना किती तीव्र आहेत याचे मी एक उदाहरण सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो. आम्ही जनतेचे प्रतिनिधी आहोत. आमची लोकांप्रती बांधिलकी आहे. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील विविध संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांचे शिष्टमंडळ ठाणे जिल्ह्याच्या विभाजनासंदर्भात मला भेटावयास आले होते. त्यांनी मला सांगितले की, सरकारला ठाणे जिल्ह्याचे विभाजन करण्यामध्ये आर्थिक अडचण असेल तर आम्ही लोकवर्गणीतून पैसा जमा करुन शासनाला मदत करण्यास तयार आहोत. महोदय, या प्रश्नावर सर्व सभागृहाचे एकमत आहे. या निमित्ताने मी माननीय मंत्र्यांना स्पेसिफिक विचारतो की, या विषयाची भावना समजून घेऊन दिनांक 26 जानेवारी, 2014 या प्रजासत्ताक दिनी ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाची घोषणा करण्यात येईल काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : महोदय, ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाबाबत तेथील जनतेच्या आणि कार्यकर्त्यांच्या भावना एकच आहेत. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी या विषयी सातत्याने पाठपुरावा केला आहे या बद्दल शंका नाही. ठाणे जिल्ह्याचे विभाजन केल्यानंतर तेथे 61 कार्यालये उभी करावी लागतील. त्या बाबतीत अडचण आहे. या महिन्यात सर्व काही प्रयत्न व्यवस्थित

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45148....

श्री.बाळासाहेब थोरात.....

झाले तर सन्माननीय सदस्यांनी सांगितल्यानुसार कार्यवाही होऊ शकते.

ॲड.निरंजन डावखरे : महोदय, या विषयावर वारंवार सभागृहात चर्चा झालेली आहे. प्रत्येक वेळी ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाबाबत 'तारीख पे तारीख' दिली जात आहे. ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाबाबत 26 जानेवारी, 1 मे, 15 ऑगस्ट अशा विविध तारखा देण्यात आल्या. ठाणे जिल्हा विभाजनाच्या बाबतीत अजूनही काही औपचारिक बाबी पूर्ण करावयाच्या आहेत. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, ठाणे जिल्हा विभाजनाचा निर्णय जाहीर करण्यासाठी कोणती अंतिम तारीख राहणार आहे ? माझी अपेक्षा आहे की, येत्या प्रजासत्ताक दिनी म्हणजेच दिनांक 26 जानेवारी, 2014 रोजी ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाचा निर्णय जाहीर करावा आणि आपण ते करु शकता. परंतु त्यासाठी इच्छाशक्ती असावयास पाहिजे.

महोदय, आज आपण बघितले की, एका विषयाच्या बाबतीत माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांच्या माध्यमातून दोन्ही सभागृहाला ऐतिहासिक निर्णय पहावयास मिळाला. ठाणे जिल्हा विभाजनाबाबत सुध्दा अशाच प्रकारचा ऐतिहासिक निर्णय आम्हा ठाणेकरांना दिनांक 26 जानेवारी, 2014 रोजी पहावयास मिळेल काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : महोदय, या बाबत पूर्णपणे प्रयत्न करण्यात येईल.

श्री.विनायक राऊत : सभापती महोदय, मुळात ठाणे जिल्ह्यातील रहिवाशांची ठाणे जिल्ह्याचे त्रिभाजन करण्याची मागणी होती. परंतु शासन द्विभाजन करण्यास तयार झाले आणि ते ठाणेकरांनी मान्य केले. ऑगस्ट-2012 च्या पहिल्या आठवड्यात माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते की, दिनांक 15 ऑगस्ट रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर हे मुख्य कार्यालय निर्माण होईल. दोन दिवसानंतर माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाबाबत अजून काहीही अंतिम झालेले नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी सांगितल्यानुसार ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाचा प्रश्न दोन कैचित अडकला आहे. त्यामुळे संपूर्ण ठाणेकरांची जी दुरावस्था होते त्याला कारण म्हणजे शासनाच्या दोन पक्षातील भांडण होय. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, ठाणे जिल्ह्याचा खऱ्या अर्थाने विकास करावयाचा असेल किंबहुना

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45148....

श्री.विनायक राऊत....

ठाणेकरांच्या समस्यांची जाणीव शासनाला असेल तर वित्त विभागाच्या ज्या अडीअडचणी आहेत त्यांचे निराकरण एक महिन्यात करुन, 26 जानेवारी या प्रजासत्ताक दिनी ठाणे जिल्ह्याचे विभाजन करणार काय की, अशाच प्रकारे ठाणेकरांच्या भावनांशी आपण खेळणार आहात ?

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45148 ....

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, हे विभाजन कोणत्याही कैचीत किंवा भांडणात अडकलेले नाही. सर्व पूर्तता करून सन्माननीय सदस्यांच्या भावना विचारात घेऊन आमचा या पध्दतीचा पूर्ण प्रयत्न राहील.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, 2 वर्षांपूर्वी जानेवारी, 2011 मध्ये ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन जानेवारीला तेथे वेगळा झेंडा फडकणार होता, हे खरे आहे का ? सन 2011 मध्येच या जिल्ह्याचे विभाजन होणार होते, हे ठरलेही होते. परंतु, घोडे कुठे अडले, हे कळत नाही. सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी अतिशय महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. मुंबई शहराला लागून ठाणे जिल्हा आहे. ठाणे व मुंबई यामध्ये काहीही फरक राहिलेला नाही. ठाणे जिल्ह्यामध्ये हजारो आदिवासी कुंटुबे राहत आहत. ठाणे जिल्ह्यात असे आदिवासी राहतात की, आजही त्यांच्या अंगावर वस्त्रे नाहीत. हे नियोजित विभाजन होते. विभाजन झाल्यानंतर मुख्यालय पालघर ठरलेले आहे. राजकीय हस्तक्षेप होऊन हा जिल्हा होऊ देत नाही, असे विदारक चित्र आहे, हे खरे आहे का ? आपण या प्रश्नाचे ठोस उत्तर देऊन प्रश्नाला न्याय द्यावा. पुढील महिन्याच्या 26 जानेवारीला या जिल्ह्याचे विभाजन करून पालघर मुख्यालय करणार का ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, पालघर या विषयावर हे अडले आहे, अशी वस्तुस्थिती नाही. इतर प्रश्नांचे उत्तर मी यापूर्वीच दिले आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्याला प्रश्नरूपी विनंती करणार आहे. यापेक्षाही गंभीर प्रश्न आपल्या पुढाकाराने सुटले आहेत. मी आपल्याला विनंती करणार आहे की, यासंबंधी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय महसूल मंत्री व सभागृहाचे प्रमुख नेते यांची एक बैठक बोलावून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घ्यावा. आपण ते करणार का ?

सभापती : सभागृहाची भावना लक्षात घेऊन याबाबत सभापती या नात्याने मी स्वत: पुढाकार घेईन आणि जे करणे आवश्यक आहे ते करीन.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पालघर (जि.ठाणे) येथील आदिवासी खातेदारांना जमिनीचा ताबा देण्याबाबत

(2) * 46733 श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पालघर (जि.ठाणे) येथील आदिवासी खातेदारांच्या मालकीच्या शेतजमिनीवर मे.विराज प्रोफाईल कंपनीने घातलेले तारेचे कुंपन आणि कंपाऊंड काढून टाकण्याची व जमिनीचा प्रत्यक्ष ताबा आदिवासी खातेदारांकडे देण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना महसूल व वन विभागाने त्यांच्या दिनांक 11 सप्टेंबर, 2013 रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांना दिले आहेत, हे खरे आहेत काय,

(2) असल्यास, मे.विराज प्रोफाईल कंपनीला 9 आदिवासी खातेदारांच्या जमिनी विक्रीने हस्तांतरित करण्यासाठी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून अद्यापपर्यंत अंतिम मंजुरी अथवा परवानगी देण्यात आलेली नसल्यामुळे या शेतजमिनींची मालकी अद्यापपर्यंत आदिवासी खातेदारांचीच आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, 1966 च्या कलम 59 मधील प्रचलित तरतुदीनुसार हे काम बेकायदा ठरवून ते त्वरित हटवावे व जमिनीचा ताबा आदिवासी खातेदारांकडे सोपविण्याची कार्यवाही करावी असे आदेश महसूल व वन विभागाने जिल्हाधिकारी, ठाणे यांना देऊनही त्यांची अंमलबजावणी अद्यापपर्यंत झालेली नाही, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, या आदेशाची अंमलबजावणी त्वरित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(5) नसल्यास, दिरंगाई करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री. सुरेश धस, श्री. बाळासाहेब थोरात यांच्याकरिता : (1) होय. हे खरे आहे.

(2) हे खरे आहे.

(3) हे खरे नाही.

(4) दिनांक 11.9.2013 च्या शासन पत्रास अनुसरून कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आदिवासी खातेदारांच्या मालकीच्या जमिनीवर मे. विराज प्रोफाईल कंपनी आहे. त्या कंपनीने अतिक्रमण केले होते. बरीच वर्षे त्यांनी प्रयत्न केला. परंतु, प्रयत्न करूनही ते अतिक्रमण हटत नव्हते. आता त्याच्यावर थोडीफार कारवाई झाल्याचे आम्हाला समजले आहे. उत्तरातील क्रमांक 4 मध्ये दिनांक 11.09.2013 च्या शासन पत्रास अनुसरून कार्यवाही करण्यात आलेली आहे असे नमूद केले आहे. पत्रास अनुसरून नेमकी कोणती कारवाई करण्यात आली, आदिवासी खातेदारांच्या मालकीच्या शेतजमिनीवर मे. विराज प्रोफाईल

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 46733 ....

श्री. पांडुरंग फुंडकर ....

कंपनीने तारेचे कुंपन आणि कम्पाऊंड घातले होते ते काढून टाकण्यात आले होते का, असल्यास, ते कधी काढून टाकण्यात आले. आदिवासींच्या जमिनीवर अतिक्रमण करणाऱ्या मे. विराज प्रोफाईल कंपनीच्या अधिकाऱ्यांवर अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्यान्वये कोणती कारवाई करण्यात आली ?

श्री. सुरेश धस : सभापती महोदय, कोंड्या रामजी धोदडे व इतर 9 आदिवासी खातेदारांच्या संदर्भातील हा प्रश्न होता. त्यांच्या संदर्भामध्ये निर्णय दिल्यानंतर त्या 9 खातेदारांपैकी 8 खातेदारांची जमीन मोजून त्यांच्या ताब्यात दिलेली आहे.

(नंतर श्री. खंदारे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46733... श्री.सुरेश धस...

एकूण 8 खातेदारांच्या जमिनीचे क्षेत्रफट 7 हेक्टर 28 आर इतके आहे. मौजे माण या गावाचे 77 आर क्षेत्रफळ आहे. त्याची मोजणी करुन शेतकऱ्यांच्या ताब्यात ती जमीन द्यावयाची आहे. त्यासाठी दिनांक 9.1.2014 ही तारीख निश्चित केलेली आहे. या तारखेला त्या जागेची मोजणी करुन विराज कंपनीकडून काढून शेतकऱ्यांच्या ताब्यात देण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : त्या जमिनीवर कशा स्वरुपाचे अतिक्रमण होते व ते कोणत्या तारखेला काढण्यात आले आहे ?

श्री.सुरेश धस : त्या जागेवर अतिक्रमण नव्हते. परवानगी न घेता परस्पर त्या आदिवासींची जमीन खरेदी केली होती. याबाबत शासनाकडे तक्रार आल्यानंतर मंत्री महोदयांनी ती जमीन पुन्हा आदिवासींच्या ताब्यात देण्याचे आदेश दिले आणि त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. विराज कंपनीने त्या जागेवर कम्पाऊंड बांधले होते ते तोडण्यात आले आहे. विराज कंपनीने दि.11.9.2013 रोजी ती जमीन शेतकऱ्यांच्या ताब्यातही दिलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : मंत्री महोदय चुकीचे उत्तर देत आहेत. दिनांक 11 सप्टेंबर, 2013 रोजी जिल्हाधिकाऱ्यांना शासनाने पत्र लिहिले आहे. आता मंत्री महोदय दिनांक 11 सप्टेंबर रोजी ते कम्पाऊंड तोडले आहे.

श्री.सुरेश धस : दिनांक 18.11.2013 रोजी या जमिनीची मोजणी करुन शेतकऱ्यांच्या ताब्यात देण्यात आलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ D/ ST/ KTG/

विनाअनुदानित शाळांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या
शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती होण्याबाबत

(3) * 46261 श्री.रामनाथ मोते , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , श्री.नागो पुंडलिक गाणार : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) विनाअनुदानित शाळांमधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय विभागाकडून शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती होत नसल्याने अनेक संस्थांनी मा.मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मा. मुंबई उच्च न्यायालयाने अंतिम निकालाद्वारे शासनास कोणते व केव्हा आदेश दिले आहेत,

(3) याबाबत शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाने कोणते आदेश दिले आहेत व केव्हा,

(5) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(6) नसल्यास, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्क प्रतिपूर्तीबाबत टाळाटाळ करण्याची कारणे काय आहेत ?

श्री.शिवाजीराव मोघे : (1) होय.

(2) जनहित याचिका क्र.26/2011 प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक 03/04/2013 रोजी अंतिम आदेश दिलेले असून त्यामधील ठळक बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

अनुसूचित जाती, विजाभज व विमाप्र वर्गातील दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील विद्यार्थांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीची व्याप्ती वाढवून दारिद्रय रेषेवरील कुटंबातील विद्यार्थ्यांना देखील लागू करण्याचे तसेच त्यामध्ये अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गातील विद्यार्थ्यांचा समावेश करण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिले आहेत.

तसेच इ. 1ली ते 4थी साठी रुपये 10,463/- प्रति विद्यार्थी, इ. 5वी ते 8वी साठी रुपये 25,581/- प्रति विद्यार्थी व 9वी व 10वी साठी सचिव समितीच्या अहवालातील विकल्प-1, विकल्प-2 व विकल्प-3 प्रमाणे शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

(3) होय.

(4) व (5) सदर न्यायालयीन प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे एस.एल.पी. (सिव्हील) क्र. 22870-71/2013 दाखल करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणी दिनांक 16.08.2013 रोजी झ ालेल्या सुनावणीत मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाचे दिनांक 28.04.2011 चे अंतरिम आदेश चालू ठेवण्याचे निर्देश देऊन मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक 03.04.2013 च्या अंतिम आदेशास स्थगिती दिली आहे.

(6) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, हा विषय आपल्याला खूप चांगल्या पध्दतीने माहीत आहे. कारण आपणच पुढाकार घेऊन आपल्या दालनात याबाबत सन्माननीय मंत्री व सचिवांची एक बैठक घेतली होती. राज्यातील ज्या विनाअनुदानित शाळेतील मागासवर्गीय पाल्य आहेत, त्या मुलांना सन 2005-06 पर्यंत शासनाकडून शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती केली जात होती. त्यानंतर

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाने ती बंद केली. या संदर्भात शासनाने नकार दिल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल झाली होती. शासनाने गठित केलेल्या समितीच्या निर्णयानुसार व जनहित याचिकेच्या निर्णयानुसार शासनाकडे अहवाल आला आहे. दिनांक 28.4.2011 रोजी माननीय न्यायालयाने दिलेला निर्णय शासनाने अद्यापि लागू केलेला नाही. त्याची अंमलबजावणी केली नाही ती केली जाईल काय, एका बाजूला हे शासन फुले, शाहू महाराज व आंबेडकर यांचे नाव घेते. दुसऱ्या बाजूला मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी देत नाही. न्यायालयाच्या आदेशाचीही अंमलबजावणी होत नाही. न्यायालयाच्या आदेशाविरुध्द शासनाने सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील दाखल केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने सुध्दा याबाबत निर्णय दिलेला आहे. या आदेशामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे. त्याची शासन अंमलबजावणी करील का ? न्यायालयाच्या निर्णयात असे म्हटलेले आहे की, "Interim Order dated 28th April, 2011 passed by the High Court and affirmed by this Court vide Order dated 11th July, 2011 shall continue to remain operative. Pending final decision of the Appeal." न्यायालयाचा दिनांक 28.4.2011 चा निर्णय आजही कायम आहे. सर्वोच्च न्यायालयानेही हायकोर्टाच्या आदेशाची अंमलबजावणी करावी असे स्पष्टपणे म्हटलेले आहे. त्यामुळे या मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शासन फी देणार आहे का ?

श्री.शिवाजीराव मोघे : हायकोर्टाने दिनांक 28.4.2011 रोजी अंतरिम आदेश दिले होते. यासाठी सचिवांची समिती होती. त्यामध्ये अ-1, 2, 3 असे ग्रेडिंग होते.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत/ग्रंथसंग्रहासाठी नोंदी

शासनाने दिनांक 30 नोव्हेंबरला बीपीएल खालील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे त्यांना शिष्यवृत्ती देणे चालू आहे. परंतु उच्च न्यायालयाने असे निदेश दिले की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विशेष मागासप्रवर्ग त्याचप्रमाणे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना देखील शिष्यवृत्ती द्यावी. यामुळे शासनाच्या तिजोरीवर 2 हजार कोटी रुपयाचा बोजा येतो. त्यामुळे 16.8.2013 रोजी उच्च न्यायालयाच्या या निर्णयास स्टे ऑर्डर घेतलेली आहे.

श्री. कपिल पाटील : माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर हे मूळ उत्तराशी विसंगत आहे. लेखी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. उच्च न्यायालयाचे दिनांक 28.4.2011चे अंतरिम आदेश चालू ठेवण्याचे निर्देश देऊन मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक 3.4.2013 च्या अंतिम आदेशास स्थगिती दिली आहे. म्हणजे हा आदेश अंतिम नाही. जो रिलिफ दिला तो चालू ठेवायचा आहे. तेव्हा हे उत्तर मंत्री महोदयांनी मागे घेतले पाहिजे. दुसरी शरमेची बाब अशी आहे की, आपण शाहू, फुले आंबेडकरांचे पुरोगामी राज्य म्हणवत असताना मा. उच्च न्यायालयाने गरिबांसाठी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात शासन सर्वोच्च न्यायालयात जाते हे किती योग्य आहे ? न्यायालय असे म्हणते की, सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना, सर्व दारिद्रय रेषेखालील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती द्या. त्यांना शिष्यवृत्ती देण्यास शासन तयार नाही. सर्वांना मोफत शिक्षण देण्याचा जो मूलभूत अधिकार आहे तो तुम्ही नाकारात आहात. तुम्हाला आरटीआय लागू केलेला आहे तो तुम्ही नाकारीत आहात. ही तुमची वर्तणूक विसंगत आहे. शासन गरिबांच्या बाजूने नाही असे शासनाने सांगावे म्हणजे मग आम्ही सुप्रिम कोर्टात लढत राहू.तेव्हा जो अंतरिम आदेश दिलेला आहे त्याची अंमलबजावणी सुरु आहे की नाही हे मंत्री महोदयांनी सांगावे.

श्री. शिवाजीराव मोघे : मी सुप्रिम कोर्टाची फायनल ऑर्डर आहे असे म्हटलेले नाही. ती अंतरिम ऑर्डर आहे. हायकोर्टाने जी ऑर्डर दिली होती त्यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि मायनॉरिटी यामधील सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यास सांगितले. यामुळे शासनावर 2 हजार कोटी रुपयांचा बोजा पडतो. त्यामुळे या निर्णयाच्या विरुध्द महाराष्ट्र शासन सुप्रिम कोर्टामध्ये गेले. परंतु बीपीएल खालील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचे शासनाने मान्य केले होते आणि ती देणे चालू आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...(अडथळा)... बीपीएलखालील विद्यार्थ्यांना आपण शिष्यवृत्ती देत आहोत. उच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे त्यास सुप्रिम कोर्टामध्ये जाऊन स्टे ऑर्डर घेतलेली आहे.

डॉ. दीपक सावंत : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सांगितल्या प्रमाणे या विषयासंबंधी आपल्या दालनामध्ये अनेक बैठका झालेल्या आहेत. त्यावेळी मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फीची प्रतिपूर्ती राज्य शासन करील असे ठरले होते. मग आता राज्य शासनाचे नेमके धोरण काय आहे ? राज्य शासन कोणत्या विद्यार्थ्यांच्या फीची प्रतिपूर्ती करणार आहे आणि कोणत्या विद्यार्थ्यांची करणार नाही ?

श्री. शिवाजीराव मोघे : अनुसूचित जाती, विजाभज, विशेष मागासप्रवर्ग या विद्यार्थ्यांच्या बाबतीत निर्णय घेतलेला आहे. जे दारिद्र्य रेषेखालील आहेत त्यांच्या शैक्षणिक शुल्क आणि परीक्षा फीची प्रतिपूर्तीची योजना आजही सुरु आहे आणि आपण ती देत आहोत.

श्री. विनोद तावडे : शाहू, फुले, आंबेडकर यांचे नाव घेऊन आपण सत्तेवर येता, बजेटमध्ये घोषणा करता, मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम बाहेर मीडियाला बाईट देतात, सामाजिक न्यायाचे बजेट आम्ही कसे करतो हे सांगतात. आपण हा निर्णय घेतलेला आहे. कोणी मागणी केली नव्हती. निवडणुका आल्या की अशा प्रकारच्या घोषणा आपण करता... आता आपण प्रायव्हेट मेडिकल आणि इंजिनिअरिंग अभ्यासक्रमाच्या देखील फी देतो. आपण हे देण्याचे घोषित केल्यानंतर आपल्याकडून ते येत नव्हते म्हणून पालक कोर्टात गेले. कोर्टाने हे दिले पाहिजे असे निदेश दिले. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती द्या असे म्हटल्यानंतर त्याच्या विरोधात सुप्रिम कोर्टात सरकार जात असेल तर ती शरमेची बाब आहे. सुप्रिम कोर्टातील केस सरकार ताबडतोबीने मागे घेणार आहे काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : माझे मित्र माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी फुले, शाहू, आंबेडकरांचे नाव घेतले त्याबद्दल आम्हाला आनंद झाला. आपल्या युती शासनाच्या वेळी ही योजना होती का ? ही योजना बीपीएलच्या विद्यार्थ्यांना लागू केली. हायकोर्टाचे म्हणणे असे आहे की, ही योजना सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांप्रमाणेच अल्पसंख्याकांना देखील लागू करावी. यासाठी 2 हजार कोटी रुपयाचा बोजा शासनावर पडणार आहे. ही अंतरिम ऑडर आहे. मी आपल्या

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माहितीसाठी सांगू इच्छितो की, फुले, शाहू, आंबेडकरांच्या या शासनाने शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय घेतला. युतीच्या काळात हा निर्णय झाला नाही. महाराष्ट्रामध्ये व्हीजेएनटी आणि ओबीसीला आपण 100 टक्के अनुदान देत आहोत. पण युतीच्या शासनाने एक पैसाही दिला नाही.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत सभात्याग करतात)

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : तारांकित प्रश्नाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्री.सचिन अहिर (नागरी जमीन कमाल धारणा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "कमाल जमीन धारणा कायद्याबाबत विकासकांना देण्यात आलेली नोटीस" या विषयावरील श्री.विनोद तावडे, वि.प.स., श्री.चंद्रकांत पाटील, वि.प.स., श्री.रामनाथ मोते, वि.प.स., व श्री.संजय केळकर, माजी वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमाक 25802 ला दिनांक 4 एप्रिल, 2012 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबतची अधिक माहिती जोडावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.उदय सामंत (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे दिनांक 6 मे, 2009, 8 डिसेंबर, 2011, 26 डिसेंबर, 2011, 5 जुलै, 2012, 13 सप्टेंबर, 2012, 22 नोव्हेंबर, 2012, 22 नोव्हेंबर, 2012, 1 डिसेंबर, 2012, 1 डिसेंबर, 2012, 12 डिसेंबर, 2012, 12 डिसेंबर, 2012, 12 डिसेंबर, 2012, 17 डिसेंबर, 2012, 2 जानेवारी, 2013, 8 जानेवारी, 2013, 8 जानेवारी, 2013 व 22 मे, 2012 रोजीचे सतरा विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह" सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : विशेष अहवाल स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा दिनांक 31 मार्च, 2012 रोजी संपलेल्या वर्षाचा स्थानिक संस्था अहवाल क्रमांक-6" सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "विदर्भ वैधनिक विकास मंडळ, नागपूर, मराठवाडा विकास मंडळ आणि उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे सन 2012-2013 चे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अग्निशमन विभागातील अधिकारी/कर्मचारी (वर्गीकरण सेवा भरती व पदोन्नती) पदांच्या सेवा भरतीचे विनियम-2013 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक आयडीसी 2008/प्र.क्र.997/उद्योग-14, दिनांकित 5 डिसेंबर, 2013 " सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचे सन 2010-2011, 2011-2012 व 2012-2013 या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "कोंकण विकास महामंडळ मर्यादितचा सन 2006-2007 या वर्षाचा छत्तीसावा वार्षिक अहवाल व लेखे" सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल व लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.रणजित कांबळे (पर्यटन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2009-2010 या वर्षाचा पस्तीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

नंतर श्री.भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उदय सामंत (वने राज्यमंत्री) : सभापमी महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2011-2012 या वर्षाचा एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल आणि हिशेब सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल आणि हिशेब सभागृहा समोर ठेवण्यात आला आहे.

.....

श्री.संजय सावकारे (पशुसंवर्धन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन 2008-2009 चा तिसावा वार्षिक अहवाल सभागृहा समोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहा समोर ठेवण्यात आला आहे.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अंदाज समितीचा अहवाल सादर करणे

श्रीमती दीप्ती चवधरी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा 33 वा अहवाल सभागृहाला सादर करते.

सभापती : अंदाज समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

.....

पृ.शी./मु.शी.: सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.संजय दत्त (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक समितीचा 13 वा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

.....

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.भगवान साळुंखे (समिती सदस्य) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा नववा अहवाल सादर करतो. हा अहवाल सादर करीत असताना काही महत्त्वाच्या शिफारशी मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे.

1. अप्पर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, नागपूर कार्यालयांतर्गत येणाऱ्या विमुक्त जाती व भटक्क्या जमातीची वर्ग-3 मधील सरळसेवेची 50 पदे व पदोन्नतीने भरावयाची 25 पदे अशी एकूण 75 पदे लवकरात लवकर भरणे तसेच

2. विमुक्त जाती व भटक्या जमातीचा वर्ग 4 मध्ये एकूण 20 पदांचा अनुशेष तात्काळ पूर्ण करण्याबाबत

3. आदिवासी विकास निरीक्षकांची 2 पदे, केंद्र प्रमुख 3 पदे, माध्यमिक व प्राथमिक शिक्षकांची अनुक्रमे 9 व 7 पदे आणि विस्तार अधिकारी 1 पद इत्यादी महत्त्वाच्या पदांचा अनुशेष पूर्ण करणे.

4. खाजगी अनुदानित शाळांमधील विमुक्त जाती व भटक्या जमातीची शिक्षक, लिपिक व शिपाई या पदांबाबतची माहिती समितीला तात्काळ सादर करण्यात यावी आणि

5. विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्राबाबत 27 उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही त्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी आणि समिती समोर येताना प्रत्येक विभागाने अद्ययावत माहितीसह समिती समोर साक्षीस यावे असे माननीय मुख्य सचिवांनी सर्व विभागांना निर्देश द्यावेत अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उक्त अहवालात केलेल्या शिफारशींचा शासनाने गांभीर्याने विचार करून त्याप्रमाणे कार्यवाही करावी अशी समितीची अपेक्षा आहे.

सभापती : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

=====

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अशासकीय विधेयक आणि ठराव समितीचा
अहवाल सादर करणे व संमत करणे

श्री.चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 20 डिसेंबर, 2013 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 19 डिसेंबर, 2013 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनीटांचा वेळ उपलब्ध आहे. त्यानुसार खालील अशासकीय विधेयकांना वेळ देण्यात यावा अशी शिफारस समितीने □ली आहे.

पुर:स्थापनार्थ -

1.	सन 2013 चे वि.प.वि. क्रमांक 11- - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2013, श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांचे	5 मिनिटे
	(गतसत्रात घेतलेल्या बॅलेटमध्ये आलेली अशासकीय विधेयके)	
2.	सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 8 - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, 2011. श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचे	40 मिनिटे
3.	सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 13 - महाराष्ट्र सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) विधेयक, 2011 श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे	35 मिनिटे
4.	सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 9 - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक, 2011. श्री. विजय सावंत, वि.प.स. यांचे	35 मिनिटे
5.	सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 4 - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2011. श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे - चर्चा अपूर्णावस्थेत	35 मिनिटे

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री. भगवानराव साळुंखे (समिती सदस्य) : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : गडचिरोली जिल्हयातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे दुर्लक्ष करणे याबाबत डॉ.दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेंद्र गावित (आदिवासी विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, या विषयावर नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आदिवासी विभागातील विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे आदिवासी विभागाचे दुर्लक्ष झाले असून त्यासंबंधी 93 चे निवेदन देण्यात आलेले आहे. या विषयासंबंधी मी वारंवार पाठपुरावा केला आहे. गडचिरोली जिल्हयातील आदिवासी मुलांना आपण काहीच देत नाही. आपण उत्तरात असे म्हटले आहे की, आदिवासी विद्यार्थ्यांना देय असलेली सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. निर्वाह भत्त्याची देय रक्कम अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. परंतु यासंदर्भात मला असे विचारावयाचे आहे की, आदिवासी विद्यार्थ्यांची बँक खातीच उघडण्यात आलेली नाही. विदर्भातील जवळपास 35 हजार विद्यार्थ्यांची बँक खाती उघडली नसल्यामुळे या विद्यार्थ्यांना आपण प्रतीपूर्ती कशी करणार आहात ? विद्यार्थ्यांना संगणकाद्वारे व प्रोजेक्टरद्वारे गणित व विज्ञान विषय शिकविले जातात. खरे म्हणजे गडचिरोली जिल्हयातील शाळांमध्ये संगणकच नाही. त्यामुळे सर्व शाळांना संगणक उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत काय ? अनेक विद्यार्थ्यांना गणवेश आणि बूट मिळालेले नाहीत. या विषयाच्या संदर्भात मी औचित्याचा मुद्दा देखील मांडला होता. पूर्वी आपण गणवेश शिवून देत होतो परंतु आता रेडीमेड गणवेश दिले जातात. गेल्या दीड वर्षापासून विद्यार्थ्यांना गणवेश व बूट मिळालेले नाहीत. त्यामुळे गणवेश आणि बूट कधी उपलब्ध करुन दिले जाणार आहेत ?

श्री. राजेंद्र गावित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी 3 प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रश्नाच्या संदर्भात आदिवासी विद्यार्थी संघ, नागपूर यांनी 9/12/2013 रोजी गडचिरोली जिल्हयातील विद्यार्थ्यांना सुविधा मिळत नसल्यामुळे मोर्चा काढला होता. गडचिरोली जिल्हयात एकंदर 51 शासकीय आश्रमशाळा आहेत. या आंदोलनामध्ये 4 शासकीय आश्रमशाळा सामील झाल्या होत्या. आदिवासी विद्यार्थी संघाने दि. 9/12/2013 रोजी मोर्चा काढला होता त्यानंतर मी 10 तारखेला माझ्या दालनात बैठक घेतली होती. शिष्यवृत्ती तसेच विद्यार्थ्यांना देय असलेल्या सुविधांच्या संदर्भात तसेच निर्वाह भत्त्याच्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ सूचना देण्यात आल्या होत्या. या विद्यार्थ्यांना सप्टेंबर पासून निर्वाह भत्ता मिळाला नव्हता त्यामुळे यासंदर्भात अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर सर्व विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता मिळाला पाहिजे अशा सूचना दिलेल्या आहेत.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र डी. गावित.....

सभापती महोदय, पूर्वी खरेदी मध्ये अनियमितता होती. अनियमितता होऊ नये यासाठी विद्यार्थ्यांचे बँक खाते ओपन करुन त्यामध्ये मुख्याध्यापक, पालक आणि विद्यार्थी अशा तिघांची नावे ॲड करण्यात आली आहेत.

यानंतर श्री.अजित.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र गावित ....

त्यांना पैसे मिळाले पाहिजेत. यामध्ये सुसुत्रता असावी या दृष्टीने आपण असा निर्णय घेतलेला आहे. आपण पहिल्याच वर्षी असा निर्णय घेतल्यामुळे हा उशीर झालेला आहे. पुढील वर्षापासून अशा प्रकारची अनियमितता आढळून येणार नाही. यामध्ये सुसूत्रता निर्माण व्हावी म्हणून विद्यार्थ्यांचे बँकेत खाते उघडत आहोत जेणेकरुन ते पैसे विद्यार्थ्याच्या खात्यात जमा होतील म्हणून आपण असा निर्णय घेतलेला आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी यामध्ये सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न केला ही चांगली गोष्ट आहे. परंतु काही आश्रमशाळा दुर्गम भागात आहेत. त्यामुळे मुख्याध्यापकास विद्यार्थ्यांना एस.टी.ने प्रवास करुन बँकेत घेऊन जाणे जिकिरीचे आहे. त्यामुळे प्राध्यापक रिलक्टन्ट आहेत, तेव्हा आपण काय करणार आहात ? डेस्क स्कॉलर विद्यार्थी आणि अन्य विद्यार्थ्यांमध्ये फरक केला जातो. तो फरक दूर करणार काय ?

श्री.राजेंद्र गावित : सभापती महोदय, जो अतिदुर्गम भाग आहे जसे, गडचिरोली,धारणी या भागात 15-20 कि.मी.च्या अंतरामध्ये बँका नसल्यामुळे बँकेचे खाते उघडण्यास अडचणी आहेत. तेव्हा अतिदुर्गम भागातील आश्रमशाळांना या नियमातून वगळण्यात येईल. आपण पूर्वी प्रमाणे म्हणजे बचत गटांना गणवेश शिवण्यासाठी देत होतो, त्या पध्दतीचा अवलंब केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचनेची आश्वासित माहिती सभागृहासमोर ठेवणे

प्रा.वर्षा गायकवाड (महिला व बाल विकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "राज्यात एकात्मिक बाल विकास योजनेंतर्गत करण्यात आलेली बिस्किटांची खरेदी" या विषयासंबंधी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी दिनांक 1 एप्रिल, 2013 रोजी सभागृहात झालेल्या चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार आश्वासित माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवते.

सभापती : आश्वासित माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली माहिती छापावी.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>सभागृहाच्या कामकाजासंबंधी</u>

सभापती : आज कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना चर्चेसाठी घेण्यात येणार नाहीत. विशेष उल्लेखाच्या सूचना देखील घेऊ नयेत असे माझे मत आहे. आपणास अंतिम आठवडा प्रस्तावरील चर्चा लगेच सुरु करायची आहे. आज मी मध्यंतराची सुट्टी देखील देणार नाही. आपणास जेव्हा कॅन्टीनमध्ये जाणे गरजेचे वाटेल तेव्हा आपण जाऊ शकता. त्या दरम्यान सभागृहाचे कामकाज सुरु राहील.

...4.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचे मुद्दे

सभापती : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

आपण मला औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिली आणि माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री व माननीय गृह राज्यमंत्री यांना सभागृहात पाचारण केले त्याबद्दल मी आपले मन:पूर्वक आभार मानतो.

सभापती महोदय, मी एका तीन वर्षाच्या मुलाच्या संदर्भातील औचित्याचा मुद्दा मांडत आहे. आवश्यकता नसताना सर्जरी करुन या मुलाचे लिंग कापण्यात आले. कु.अमरसिंग भट्टेचोर, रा,अडेगाव,पो.कोंदामेढी,ता.मौदा.जि.नागपूर, येथे हा मुलगा आपल्या आईसमवेत राहत होता. या मुलास लघवीचा त्रास होता. आईने त्याला त्यांच्या फॅमिली फिजिशिअन्सकडे नेले. फॅमिली फिजिशिअन्सच्या सल्ल्यावरुन त्याला हायटेक हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले. फॅमिली फिजिशिअन्सने त्या मुलावर दोन दिवस ट्रीटमेंट केली. परंतु त्या मुलास लघवी होत नाही म्हणून त्याला ॲडमीट करण्यात आले.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

रामटेक येथील डॉ.प्रज्ञा आष्टणकर या खाजगी क्लिनिक चालवितात. त्या मुलाला दिनांक 12 जुलै, 2012 रोजी भूलतज्ज्ञ असलेल्या डॉ.संदीप जैन यांच्या हायटेक हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले. परंतु त्यांच्याकडे सर्जन आणि पेडियाट्रिशियन नव्हते. ते ऑनकॉल सर्जन आणि पेडियाट्रिशियन बोलवितात. डॉ.संदीप जैन यांनी त्या मुलाचे लिंग डायलेट करण्याचा प्रयत्न केला. वास्तविक पाहता टाईट फॉर्मोसीस असल्यामुळे त्या मुलाला लघवी होत नव्हती. म्हणून त्याची सुंता करणे आवश्यक होते. परंतु दुर्दैवाने त्या डॉक्टरांनी तसे केले नाही. त्यांनी डायलेटेशन करण्याचा प्रयत्न केला. डायलेटेशन करताना मुलाच्या लिंगापुढे त्यांनी कदाचित डॉनीकेट रबर बांधला असेल. त्यामुळे पुढचा रक्तप्रवाह बंद झाला. ही केस गुंतागुंतीची झाल्यानंतर त्या मुलाच्या लिंगातून पू आणि रक्त यायला लागले आणि त्या मुलाच्या लिंगाला गँगरीन झाले. त्यावेळी त्या मुलाला डॉ.संदीप जैन यांच्याच रुग्णालयात येणाऱ्या डॉ.राजेश सिंघानीया यांच्या माध्यमातून मेयो हॉस्पीटलमध्ये रेफर करण्यात आले. त्या रुग्णालयात त्या मुलावर उपचार करण्यात आले. त्या मुलाच्या शरीरभर गँगरीन पसरेल म्हणून त्याचे लिंग कापण्यात आले. सभापती महोदय, अवघ्या तीन वर्षाच्या मुलाचे लिंग कापण्यात आले. ही अतिशय भयानक व दुर्दैवी घटना आहे.

महोदय, हा सर्व प्रकार झाल्यानंतर सुध्दा पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली नाही. वास्तविक पाहता त्या मुलाला मेयो रुग्णालयात दाखल केल्यानंतर पोलीस तक्रार दाखल करणे आवश्यक होते. परंतु ती केली नाही. त्या मुलाची आई अतिशय शॉकमध्ये आहे. त्या मुलाला वडील नसल्यामुळे इतरांच्या सांगण्यावरुन दोन-अडीच महिन्यांनंतर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली. त्यानंतर ज्या डॉक्टरचे हॉस्पीटल होते त्याने पोलीस स्टेशनला मॅनेज केले. एवढा भयानक प्रकार त्या डॉक्टरकडून घडलेला असताना त्याच्यावर केवळ कलम 336 व 337 अन्वये गुन्हा दाखल झाला. त्यानंतर पोलिसांनी अतिशय भयानक प्रकार केले. पोलिसांनी डॉ.लांजेवार यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय समिती नेमली. परंतु त्या समितीची कार्यकक्षा ठरविली नाही. परिणामी त्या समितीचा अहवाल अपूर्ण आला. त्यामुळे साहजिकच डॉ.संदीप जैन या सर्व प्रकारातून सुटले. वैद्यकीय शिक्षण विभागाने डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन रद्द करण्यासाठी हे प्रकरण एमसीआयकडे रेफर केले आहे. त्या बाबतचे पत्र माझ्याकडे आहे. नागपूर येथील सर्व वर्तमानपत्रांनी झालेल्या प्रकाराबाबत आवाज उठविला. परंतु दुर्दैवाने त्या बाबतीत अजून काहीच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

झाले नाही. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, एमसीआयकडे प्रकरण गेल्यानंतर रजिस्ट्रेशन रद्द करण्यासाठी 7-8 वर्षे लागतात. रजिस्ट्रेशन रद्द होईपर्यंत त्यांची प्रॅक्टीस बिनभोभाट सुरुच असते. महोदय, डॉ.संदीप जैन हे सर्जन नसताना त्यांनी अशा प्रकारे त्या मुलाचे लिंग डायलेट केले. या मागील कारण असे सांगितले जाईल की, ते एमबीबीएस असल्यामुळे त्यांना अशा प्रकारे डायलेट करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे या कारणाखाली ते कारवाईविना सुटतील.

महोदय, या व्यवसायामध्ये जे ब्लॅकशिप आहेत, पैशाच्या लोभापोटी काम करणारे आहेत त्यांच्यावर कोठे तरी जरब बसली पाहिजे. त्या मुलाच्या पुढे उभे आयुष्य आहे. महोदय, त्या मुलाचा फोटो मी सोबत आणलेला आहे. तो मी तुम्हाला दाखवितो. त्या मुलाचे लिंग कापून त्याला फक्त लघवी करण्यापुरते एक छिद्र ठेवले आहे. पूर्वी पोटाला छिद्र करुन सुप्राप्युडीकने त्याची लघवी काढली जात होती. परंतु आता लिंगाजवळ केवळ छिद्र आहे. इतके भयानक आणि क्रूर कृत्य या डॉक्टरांनी केले आहे. या मुलाने आपले पुढील आयुष्य कसे जगावे ? लिंग हे पुरुषत्वाचे चिन्ह आहे. परंतु या मुलाला ते चिन्हच नाही. वयात आल्यानंतर लिंग नाही म्हणून या मुलाने आत्महत्या केली तर त्याला आपण सर्वजण जबाबदार राहू, किंबहुना या समाजातील ब्लॅकशिप जबाबदार राहतील.

नंतर श्री.खंदारे...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

डॉ.दीपक सावंत....

म्हणून माझी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती आहे की, याबाबत पुन्हा एक समिती नेमावी. लांजेवार समितची कार्यकक्षा मर्यादित स्वरुपात का ठेवली, त्या समितीच्या अहवालाला विलंब का झाला, त्या समितीचा अहवाल नीट आलेला नाही. कोर्टात ही केस जाईल त्यावेळी लांजेवार समितीचा अहवाल मागविला जाईल. परंतु त्या समितीने त्रोटक स्वरुपात अहवाल दिलेला आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची आय.जी.मार्फत चौकशी केली जाईल काय, पुन्हा ही केस स्ट्रॉंग तयार करुन त्यांना बिहाईण्ड बार करणार का ? एमसीआयकडे 37-37 वर्षे केसेस चालतात. आपल्याकडे फास्ट ट्रॅक कोर्ट नाही हे मला माहीत आहे. पण येणाऱ्या दोन महिन्यात त्या डॉक्टरची चौकशी करुन त्यांचे रजिस्ट्रेशन रद्द केले जाईल काय, तरच त्याला न्याय मिळेल. त्या मुलाचे आयुष्याचे नुकसान झालेले आहे. पुरुष म्हणून जगण्याचे त्याचे नुकसान झालेले आहे. ते कोणीही भरुन काढू शकणार नाही. कमीत कमी आपण एवढे करु, याबाबत आपण आदेश द्यावेत.

सभापती : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मांडलेला औचित्याचा मुद्दा अत्यंत गंभीर आहे. एका लहान मुलाच्या बाबतीत अत्यंत क्रूरपणे प्रयोग करण्यात आला आहे. असे प्रयोग थांबवावयाचे असतील तर या प्रकरणाची सखोल चौकशी करणे आवश्यक आहे. ज्यांनी हे कृत्य केलेले आहे त्यांना योग्य ते शासन होण्यासाठी शासनामार्फत प्रयत्न होणे जरुरीचे आहे. सन्माननीय वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री श्री.सावंत यांनी या प्रकरणी स्वत: लक्ष घालावे व त्या मुलाला ताबडतोब न्याय कसा मिळेल ते पहावे. तसेच ज्या डॉक्टरने त्या मुलाचे ऑपरेशन केलेले आहे त्यांच्याविरुध्द कारवाई करावी.

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी चिरंजीव अंश याची हृदयद्रावक कथा सांगितलेली आहे. त्यांनी व्यक्त केलेल्या भावनांशी हे सर्व सभागृह सहमत आहे. या प्रकरणातील डॉक्टरवर कठोर कारवाई झाली पाहिजे. डीनतर्फे लांजेवार समिती नेमण्यात आली. त्या समितीच्या अहवालात जरुर त्रुटी होत्या. त्या समितीने निष्कर्ष पिनपॉईण्ट केलेले नाहीत. चार कारणापैकी कशामुळेही तसे होऊ शकते असे त्यात नमूद केलेले आहे. म्हणून शासनाने हे प्रकरण एमएमसीकडे रेफर केलेले आहे. त्या डॉक्टरचे रजिस्ट्रेशन रद्द

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करणे ही सर्वात आवश्यक बाब आहे. या सभागृहाच्या भावना एमएमसीच्या अध्यक्षांच्या कानावर घालण्यात येतील. या केसचा पाठपुरावा करुन लवकरात लवकर निकाल लावण्यासाठी मी स्वत: लक्ष घालतो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचत्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, पुणे येथील नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ खेडच्या विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये उभारण्याच्या प्रस्तावास नुकतीच केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. या नियोजित विमानतळासाठी आवश्यक असलेला तांत्रिक अहवाल शासनास अद्याप प्राप्त झालेला नाही. सध्या पुणे व मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रचंड ताण आहे. पुण्याचे विमानतळ झाले तर मुंबई विमानतळावरील 20 टक्के ताण निश्चितपणे कमी होईल. नागरी हवाई वाहतूक मंत्रालय, हवाई दल, पर्यावरण विभाग व अन्य विभागांच्या परवानग्या लवकरात लवकर घेऊन पुणे येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ करावे. या विमानतळासाठी ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या जाणार आहेत त्यांना नवीन मुंबईच्या विमानतळाप्रमाणे पॅकेज देण्याचे जाहीर केलेले आहे त्याच धर्तीवर पुण्याच्या शेतकऱ्यांनाही पॅकेज लागू करावे, अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय माझो औचित्याचा मुद्दा आहे.

"गरीब रुग्णांना आरोग्याच्या सुविधा मोफत उपलब्ध करुन दिल्या जाव्यात यासाठी राज्य शासना तर्फे खाजगी धर्मदाय रुग्णालयांना विविध सवलती दिल्या जातात. त्यांच्यावर 10 टक्के गरीब रुग्णांना सवलतीमध्ये सेवा देणे बंधनकारक आहे. परंतु अशा ब-याचशा रुग्णालयातून अशा प्रकारे गरिबांना सेवा दिली जात नसल्याचे आढळून आलेले आहे. या बाबतीत तदर्थ समितीने नोटीस बजावलेली असून देखील शासना तर्फे अद्यापही काही कारवाई झाली नाही. ही कारवाई लवकरात लवकर व्हावी. जुलैमध्ये शासनाने सुवर्ण संकल्पना अंतर्गत सुसज्ज रुग्णवाहिका, आपत्कालीन प्रतिसाद सेवा सुरु करण्याचा निर्णय घेतल्याचे घोषित केले होते. त्याचा पहिला टप्पा सप्टेंबर 2013 पासून सुरु होणार होता. मात्र या योजनेची सुरुवात अद्याप झालेली नाही. तेव्हा या दोन्ही विषयांच्या बाबतीत काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

त्याचप्रमाणे ठाणे जिल्ह्यातील भिवंडीमधील यंत्रमाग पॉवर टॅरिफमुळे बंद पडलेले आहेत. आपल्या राज्यात सर्वात जास्त पॉवर टॅरिफ आहे, हा टॅरिफ कमी करावा अशी या औचित्याच्या माध्यमातून माझी शासनाला विनंती आहे."

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"मुंबई येथील शिवाजी पार्क, दादर टी.टी. खोदादाद सर्कल, फारशी कॉलनी, फाईव्ह गार्डन, हिंदू कॉलनी, माटुंगा व किंगसर्कल या परिसरात राहाणारे सर्व रहिवाशी मध्यम वर्गीय असून या भागातील इमारतींना सरसकट हेरिटेजच्या संकल्पनेत गृहीत धरल्यामुळे कनिष्ठ आणि मध्यमवर्गाचा मोठया प्रमाणावर नुकसान होण्याचा धोका निर्माण झालेला आहे. हेरिटेजमुळे मध्यमवर्गीय रहिवाशांना मोडकळीस आलेल्या इमारती व जुन्या मोडकळीस आलेल्या चाळी, जुन्या वाडया यांचे पुनर्वसन तर नाहीच पण त्याची दुरुस्ती देखील करता येणार नाही. तसेच या भागातील जागांचे भावही हेरिटेजमुळे कमी होत असल्याचे आढळून आलेले आहे. त्यामुळे गरीब व कनिष्ठ मध्यमवर्गावर अन्याय होऊ नये यासाठी अफझलपूरकर समिती, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र शासन यांनी या विषयावर सहानुभूतीपूर्वक विचार करावा व हेरिटेजसंबंधी विचार करुन हा कायदा रद्द करावा."

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

आपल्या राज्यामध्ये शेती हा अजूनही प्रमुख व्यवसाय आहे. उपजीविकेचे साधन म्हणून पशुपालनही मोठया प्रमाणावर केले जाते. गेल्या वर्षभराच्या कालावधीत राज्यातील पशुधन 10 टक्क्यांनी कमी झाल्याची वस्तुस्थिती समोर आलेली आहे. निसर्गाचा समतोल राखण्यासाठी पशुसंवर्धन व संरक्षण अतिशय महत्वाचे आहे. राज्य शासनाने पुढाकार घेऊन पशुवैद्यकीय विद्यापीठाची निर्मिती देखील केलेली आहे. परंतु या विद्यापीठामधून अजूनही संशोधन कार्य सुरु झालेले दिसत नाही. तसेच राज्याच्या अनेक जिल्ह्यात पशू इस्पितळांची अवस्था दिनवाणी झालेली आहे. आवश्यक असलेली औषधे, उपचार करण्यासाठी आवश्यक असलेल्या सामुग्रीचाही अभाव आहे. राज्याच्या वेगवेगळया भागामध्ये निसर्गाच्या अनियमितपणामुळे पशुधन नेहमीच संकटात सापडते. केवळ तात्पुरती मदत देऊन हे प्रश्न मार्गी लागणार नाहीत. त्यासाठी खात्यामध्ये अमूलाग्र बदल करुन तातडीने उपाययोजना हाती घेण्यात यावी अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे."

--

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक राऊत: सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

रत्नागिरी नगरपालिकेचे जवळ जवळ 28 पैकी 23 नगरसेवक कालपासून उपोषणाला बसलेले आहेत. याचे कारण तेथे श्रीमती रंजना गगे नावाच्या मुख्याधिकारी नियुक्त केलेल्या आहेत. त्यांच्या मनमानी कारभाराविरोधात सर्वपक्षीय नगरसेवक उपोषणाला बसलेले आहेत. या सर्व नगरसेवकांचे म्हणणे असे आहे की, या प्रभारी मुख्याधिकारी श्रीमती गगे यांची कारकीर्द वादग्रस्त ठरलेली आहे. त्या पूर्वी राजापूर नगरपालिकेमध्ये असताना तेथील सर्वपक्षीय नगरसेवक त्यांच्या विरोधात आंदोलन करीत होते. आता त्यांच्याकडे प्रभारी मुख्याधिकारी म्हणून रत्नागिरी नगरपालिकेचा कार्यभार सोपविलेला आहे. रत्नागिरी नगरपालिकेचे लोकप्रतिनिधी प्रामाणिकपणे रत्नागिरी शहराच्या विकासासाठी काम करीत आहेत. सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींच्या भावनांची कदर करुन या प्रभारी मुख्याधिकारी श्रीमती रंजना गगे यांची तातडीने बदली करावी आणि त्यांच्या जागी पूर्वीचे मुख्याधिकारी श्री. खोटके यांची पुनश्च नियुक्ती करावी अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून शासनास करीत आहे.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने एक महत्त्वाचा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

साईबाबा शिर्डी संस्थान शहरासाठी एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजना राबविण्यासाठी माननीय व्यवस्थापन समितीच्या दिनांक 12/12/2012 रोजीच्या सभेत निर्णय क्रमांक-1106 अन्वये मौजे निमगांव, कराळे येथील संस्थानच्या मालकीची गट नंबर-250 वरील 1 हेक्टर 85 आर इतकी जमीन शिर्डी नगरपंचायत शिर्डी, यांनी झोपडपट्टी विकास योजना राबविण्याकरिता बक्षीसपत्र देण्याबाबत मान्यता दिलेली आहे. शासनाकडून मान्यता मिळण्यासाठी तसा प्रस्ताव दिनांक 28/01/2013 रोजी शासनास पाठविण्यात आला आहे. हा प्रस्ताव पाठवून 11 महिन्यांचा कालावधी उलटून गेला असून देखील या कामासाठी शासनाकडून मान्यता मिळालेली नाही. यासाठी केंद्र सरकारकडून 50 कोटी रुपये मिळालेले आहेत. येत्या 8 दिवसांत माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भातील फाईलवर सही केली नाही तर केंद्र सरकारकडून प्राप्त झालेले 50 कोटी रुपये पुन्हा केंद्र सरकारकडे परत जाणार आहेत. माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी शिर्डी संस्थानच्या जागेबाबत तातडीने निर्णय घ्यावा.

सभापती : मी माननीय महिला व बालविकास मंत्री प्रा.वर्षाताई गायकवाड यांना सांगू इच्छितो की, हा अतिशय महत्त्वाचा औचित्याचा मुद्दा आहे. आपण ही बाब संबंधित मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून द्यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : पंचायती राज समितीचा अहवाल सादर करणे

श्री.विक्रम काळे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायती राज समितीचा पंधरावा व सोळावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती : अहवाल सभागृहाला सादर करण्यात आले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचे मुद्दे

(पुढे सुरु....)

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आपण मला औचित्याचा मुद्दा मांडण्यास संधी दिल्याबद्दल सर्वप्रथम मी आपले आभार मानतो.

राज्यातील सर्व शाळा व महाविद्यालयातून दरवर्षी मोठ्या संख्येने विद्यार्थी शैक्षणिक सहलीसाठी जात असतात. एस.टी. महामंडळाच्या बसेसचे जादा भाडे विद्यार्थ्यांना परवडत नसल्यामुळे सर्व विद्यार्थी शैक्षणिक सहलीसाठी खाजगी बसने जातात. आपणा सर्वांना माहीत आहे की, मोठ्या प्रमाणावर खाजगी बसेसना अपघात होत असतात. त्यामध्ये विद्यार्थ्यांना आपला जीव गमवावा लागतो. मागच्याच आठवड्यात शैक्षणिक सहलीसाठी कोल्हापूर जिल्ह्यातील एका माध्यमिक शाळेतील दोन बसेसना तुळजापूर जवळ अपघात झाला. त्यामध्ये सहा विद्यार्थी आणि एका शिक्षकाला आपला जीव गमवावा लागला. एस.टी.महामंडळाने बसच्या भाड्यामध्ये शैक्षणिक सहलीसाठी विशेष सवलत द्यावी, अशी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मी मागणी करतो. सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या बाबतची दखल घेण्याबाबत आपण त्यांना निदेश द्यावे.

सभापती : मी माननीय मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी मांडलेले औचित्य शालेय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांचे खाजगी बस वाहतुकीमुळे होणारे मृत्यू टाळण्याच्या दृष्टीने शालेय विद्यार्थ्यांना एस.टी. महामंडळाच्या बस प्रवासासाठी सवलत मिळाली किंवा अन्य कार्यवाही झाली तर ते विद्यार्थ्यांच्या दृष्टीने सोयीचे होईल. त्यामुळे या संदर्भात आपण स्वत: लक्ष घालावे.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अनिल परब : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, बृहन्मुंबई महानगरपालिका प्राथमिक शाळा व खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांमध्ये सन 1993 पासून विशेष शिक्षकांच्या म्हणजेच संगीत, चित्रकला, हस्तकला या विषयांतील शिक्षकांच्या सरळसेवा नोकर भरतीवर महाराष्ट्र शासनाने स्थगित दिली आहे. परिणामी आजपर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिका प्राथमिक शाळा व खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांमध्ये विशेष शिक्षकांच्या रिक्त जागा भरता आल्या नाहीत. या जागा रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे विविध कलात्मक विषयातील ज्ञानाचे नुकसान होत आहे. या बाबत शासनाकडे वारंवार लेखी स्वरुपात मागणी करुनही प्रशासन उक्त विषयांच्या रिक्त जागा सरळ सेवा भरतीने भरण्याबाबत अनुकूल धोरणात्मक निर्णय घेत नाही. तरी मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, या जागा सरळ सेवा भरतीने भराव्यात.

नंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्याचा कारभार सुयोग्य रितीने चालविण्यासाठी मंत्रालयात 64 विभाग करण्यात आलेले असणे, प्रत्येक विभागाची जबाबदारी सांभाळण्यासाठी स्वतंत्र सचिव, अधिकारी व कर्मचारी नियुक्त करणे, या सर्व विभागांना वित्त मंत्रालयामार्फत आर्थिक तरतूद देण्याची व्यवस्था करण्यात आलेली असणे, त्याकरिता सर्व विभागांकडून वित्त मंत्रालयाकडे करण्यात आलेल्या आर्थिक तरतुदींचे मागणी प्रस्ताव सादर करण्यात येणे, सादर केलेल्या प्रस्तावांपैकी 98 टक्के प्रस्ताव वारंवार त्रुटींच्या पूर्ततेसाठी जवळपास 7 ते 50 वेळा परत केले जाणे, त्यामुळे प्रस्ताव मंजूर करुन निकाली काढण्यासाठी प्रचंड कालावधी लागत असणे, परिणामत: या सर्व विभागांना वेळेवर निधी मिळत नसणे, निधी अभावी जनतेची सार्वजनिक कामे प्रलंबित पडून राहणे, प्रस्ताव सादर करणा-या सचिव व उच्चस्तरीय अधिकाऱ्यांना या त्रुटीबाबत कोणतीही खंत वाटत नसणे, त्यांच्या या बेजबाबदार वागणुकीमुळे व प्रस्ताव सादर करण्याच्या माहितीच्या अभावामुळे सदर जनतेला सुखसोयीपासून वंचित रहावे लागणे, परिणामत: जनतेसाठी शासनाच्या या वेळकाढू धोरणामुळे प्रचंड असंतोष पसरणे याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कृषी क्षेत्रातील विविध अडचणींमुळे शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या

मु.शी.: कृषी क्षेत्रातील विविध अडचणींमुळे शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, नागो पुंडलिक गाणार, भगवानराव साळुंखे, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प.नियम 259 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"कृषी क्षेत्रातील बी-बियाणे पुरविण्याऱ्या सीड कंपन्यांमधील भ्रष्टाचार, पत पुरवठ्यातील भ्रष्टाचार इत्यादी समस्यांमुळे विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी हवालदिल होणे, गत १५ वर्षापर्यंत पांढरे सोने म्हणून प्रसिध्द असणारा कापूस आज शासनाने केलेल्या दुर्लक्षामुळे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पीक म्हणून प्रसिध्द होणे, कापसाच्या नवीन वाणांचे संशोधन त्यासाठी आवश्यक असणाऱ्या सिंचनाचा अभाव, बाजार व्यवस्थेवरील व्यापाऱ्याची असलेली पकड, आणेवारी काढताना कापूस उत्पादक शेतकऱ्यांवर झालेला अन्याय इत्यादी सर्व कारणांमुळे कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत येणे, कापसाप्रमाणेच विदर्भ व मराठवाड्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी, सोयाबीनवर योग्य प्रक्रिया उद्योग न राबविल्यामुळे व राज्य शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्येत भर पडणे, सोयाबीनप्रमाणेच धान उत्पादक शेतकरी राईस मिल लॉबीच्या असलेल्या दबावामुळे योग्य हमीभाव न मिळाल्याने संकटात सापडणे, ज्वारी उत्पादक शेतकरी देखील अकाली पावसामुळे अडचणीत येणे, संपूर्ण जगभरात प्रसिध्दी पावण्याची क्षमता असलेला संत्रा राज्य शासनाच्या सावत्र वागणुकीमुळे अडचणीत येणे, सहकारी साखर कारखान्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराचे परिणाम उस उत्पादक शेतकऱ्यांना भोगावे लागून हमी भाव मिळण्यास्तव तो रस्त्यावर येणे, बेदाण्यांच्या व्यापारात शिरलेल्या दलालांमुळे द्राक्ष उत्पादक .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

शेतकऱ्यांना देखील केलेल्या श्रमाचा योग्य मोबदला न मिळणे, या सर्व शेतकऱ्यांच्या समस्यांवर तोडगा म्हणून स्वामीनाथन व रंगराजन समितीच्या शिफारशींची तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता असणे, या शिफारशींबरोबरच सावकारी विधेयक अद्यापपर्यंत मंजूर न झाल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण कमी न होणे, शेतकऱ्यांच्या या समस्यांमध्ये मार्ग काढण्यासाठी कापसाला सहा हजार, सोयाबीनला साडेचार हजार, धानाला तीन हजार व ऊसाला तीन हजार रुपये इतका हमीभाव देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्ताव या महत्वाच्या आयुधाच्या माध्यमातून विरोधी पक्षांच्या वतीने शेतकऱ्यांच्या शेतमालाविषयीचे विषय प्राधान्याने मांडण्याचा निर्णय घेण्यात आला. हे अधिवेशन दोन आठवड्याचे असून आतापर्यंत या अधिवेशनात विदर्भातील ओल्या दुष्काळासंबंधी चर्चा झाली. उद्या अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या माध्यमातून विदर्भातील शेतकऱ्यांच्या संदर्भात शेतीमालाचे अतिशय जिव्हाळ्याचे विषय असतील ते आवर्जून उपस्थित करायचे ठरविले आहे.

सभापती महोदय, नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये या भागातील समस्या चर्चेला याव्यात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या विषयावर प्रस्ताव उपस्थित केलेला आहे. या राज्यामध्ये आतापर्यंत 9884 शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे. सचिन तेंडुलकर क्रिकेट खेळत असताना त्याच्या 10 हजार धावा कधी पूर्ण होतात याकडे क्रिकेटप्रेमींचे लक्ष लागलेले होते. याच धर्तीवर या आत्महत्यांकडे पाहिले जात आहे. त्या 10 हजार धावांचा विक्रम मोडला जातो की काय अशी दुर्दैवी स्थिती या राज्यामध्ये निर्माण होण्याची शक्यता आहे. या आत्महत्या रोखण्यासाठी त्या त्यावेळी वेगवेगळ्या प्रकारची पॅकेजेस जाहीर केली गेली. आजपर्यंत 71 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी करण्यात आली. माननीय पंतप्रधानांनी 3750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. माननीय मुख्यमंत्र्यांनी 1000 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. अशा प्रकारे हजारो कोटी रुपयांचे अर्थसहाय्य देऊन आत्महत्यांचे सत्र थांबावे यासाठी शासन प्रयत्नशील होते. परंतु दुर्दैवाने या राज्यातील बळीराजांच्या आत्महत्या शासन थांबवू शकलेले नाही.

नंतर 3इ.1....

अशुद्धलिखित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

त्यामुळे हे जे पॅकेज किंवा कर्जमाफी आली ती शेतकऱ्यां पर्यंत पोहोचली की सत्ताधाऱ्यांच्या बँकात पोहोचली की ठेकेदारांकडे पोहोचली हा देखील एक संशोधनाचा विषय आहे. इतके हजार कोटी रूपये येऊन सुद्धा ते शेतकऱ्यांपर्यंत न पोहचता मधल्या लोकांकडे गेले. शेतकऱ्यांच्या नावाने हजार कोटी खर्च करून सुद्धा 9875 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

सभापती महोदय, आज शेतकरी काय मागत आहे ? शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, आम्हाला अनुदान नको, पॅकेज नको, आपली कोणतीही योजना नको. आम्हाला फक्त आमच्या श्रमाचा मोबदला द्यावा. आमच्या शेतमालाला योग्य तो भाव द्यावा. शेतकऱ्यांच्या श्रमाला योग्य भाव मिळाला तर शेतकऱ्याच्या समस्या खऱ्या अर्थाने सुटू शकतात. तेव्हा ही बाब लक्षात घेऊन माननीय मंत्री महोदयांकडे पहिली मागणी करणार आहे की, आपण राज्य कृषि मूल्य आयोगाच्या स्थापनेची घोषणा ताबडतोब आजच करावी. हजारो कोटी रूपये देऊन सुद्धा शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबत नाहीत. सामान्य शेतकऱ्यांच्या भेटी घेतल्यानंतर शेतकऱ्यांचे म्हणणे असते की, आमच्या शेतमालाला भाव द्यावा. त्यांचा आग्रह असतो की, आमच्या श्रमाला भाव द्यावा. आपण जर या आयोगाची स्थापना केली व त्या आयोगाने योग्य पद्धतीने शेत मालाला भाव ठरविला तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यात आपल्याला यश मिळवू शकेल. आज हमी भाव काढताना शेतकऱ्यांची फसवणूक होते. माननीय मंत्री देखील ग्रामीण भागामध्ये शेती करणारे आहेत. आपल्याला या वास्तवाची जाणीव आहे.

सभापती महोदय, बी-बियाणातील भ्रष्टाचार असेल, कृषि पंप वितरणातील भ्रष्टाचार असेल या सर्व प्रकरणात शासन दोषींवर कारवाई करीत नाही. त्यामुळेच विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी देशोधडीला लागला आहे हे वास्तव आहे. या शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी किमान शेतमालाला रास्त भाव मिळणे आवश्यक असताना शासन हमी भाव ठरवताना वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरत आहे. यातून कमीतकमी खर्च दाखविण्याचा प्रयत्न कसा करण्यात येत आहे याची माहिती आपणा सर्वांना आहेच.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

श्री.विनोद तावडे...

धानाचा प्रति हेक्टर सिंचन खर्च 24 रूपये 74 पैसे दाखविला आहे. श्री.टकले साहेब ही जादू आहे की,टोणा आहे हे मला माहीत नाही. एस.टी.स्टँडवरील सुलभ शौचालयामध्ये गेल्यानंतर एवढ्या भागाला पाच रूपयाचे पाणी द्यावे लागते. हेक्टरला 24 रूपये 74 पैसे हमीभाव ठरविताना काढतो. हे न्याय्य आहे काय ? एवढ्या पैशामध्ये एक हेक्टरचे सिंचन कसे काय होऊ शकते ? हा खरच प्रश्न आहे. तेव्हा या विषयातील सरकारची धारणा काय आहे हे शेतकऱ्याला कळत नाही. त्याच्यावर शासन किती अन्याय करीत आहे हे देखील कळत नाही.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

सभापती महोदय, एक हेक्टर कापूस उत्पादनासाठी लागणाऱ्या कीटक नाशकाचा खर्च 1634 रुपये दाखवला आहे. आता शासन बीटी कापसाच्या ऐवजी जुन्या हायब्रीड कापसाची लागवड करा असा प्रचार मोठया प्रमाणात करीत आहे. जुन्या व्हरायटीच्या कापसाच्या कीटक नाशकाचा खर्च प्रती हेक्टर 12000 रुपये इतका येतो. असे असतांना आपण हा खर्च प्रत्यक्षात 1634 रुपये धरला असून यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाला कसा काय भाव मिळेल ? राज्य कृषी मूल्य आयोगाची स्थापना करण्यात यावी असा माझा आग्रह आहे. कापूस,ऊस,सोयाबीन,धान,आंबा,द्राक्ष,ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या खऱ्या अर्थाने सोडवायच्या असतील तर प्रत्यक्ष येणारा खर्च गृहीत धरुन त्या आधारे हमी भाव काढला गेला पाहिजे. खरे म्हणजे राज्य कृषी मूल्य आयोगाची स्थापना केली तर प्रत्यक्ष खर्च ठरवितांना सोईचे होईल. शेतकऱ्यावर अन्याय होऊ नये यासाठी कृषी मूल्य आयोगावर शेतकरी अधिक संख्येने कसे राहतील हे सुध्दा पाहिले पाहिजे. कृषी विद्यापीठातील तज्ज्ञ हे शेती करीत नाही. त्यामुळे प्रत्यक्ष शेतकऱ्यांचा प्रतिनिधी असणे अत्यंत आवश्यक आहे. हमी भाव काढत असताना नरसिंह राव पंतप्रधान असतांना आताचे माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह हे त्यावेळी अर्थ मंत्री होते त्यावेळेस स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने जो अहवाल दिलेला आहे त्यामध्ये शेतकऱ्याच्या शेतमालाच्या उत्पादनाला येणाऱ्या खर्चामध्ये 50 टक्के नफा टाकून शेतमालाचा भाव ठरवला होता. त्यामुळे त्याच धर्तीवर राज्य कृषी मूल्य आयोगाने भाव काढणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, मला काही काही गोष्टींचे आश्चर्य वाटते. बाजारातून आपण जी वस्तू विकत घेतो त्या वस्तूच्या रॉ मटेरियलची किंमत किती, लेबरची किंमत किती, प्रॉफिट मार्जीन किती असे करुन फिनिश प्रॉडक्टची किंमत काढली जाते. परंतु शेतकऱ्याच्या ऊसाच्या बाबतीमध्ये अगोदर फिनिश प्रॉडक्टचा म्हणजे साखरेचा भाव अगोदर ठरवला जातो व त्या प्रमाणे रिव्हर्स येऊन ऊसाचा भाव ठरविला जातो. त्यामुळे कोणत्या अर्थशास्त्राप्रमाणे अशा प्रकारचे भाव ठरवले जातात ? दुसऱ्या बाजूला आपण कापसाला जो भाव देतो त्यामध्ये अर्ध्या किलो कापसाला 200 रुपये भाव देतो परंतु या कापसापासून तयार होणाऱ्या शर्टचा भाव 2000 रुपये असतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

त्यामुळे प्रोसेस आणि मार्जीन यामध्ये एवढा मोठा विरोधाभास कसा काय दिसतो ? हा विरोधाभास का आहे ? शेतमालाचा भाव ठरवित असताना आपल्याला शेतीचे एक वेगळे अर्थकारण मांडावे लागणार आहे. मला ग्रामीण भागातील अनेक शेतकरी भेटत असतात. ते सांगतात की, साहेब मी गेल्या 20 वर्षापासून शेती करतो आहे. 20 वर्षापूर्वी या शाळेत जो शिक्षक नोकरीला लागला त्याचा पगार गेल्या 20 वर्षात किती वाढला तो बघा आणि माझ्या शेतकऱ्याचे उत्पन्न किती वाढले ते बघा. शेवटी नोकरीवाल्यांना चौथा वेतन आयोग, पाचवा वेतन आयोग,सहावा वेतन आयोग दिला जातो आता तर निवडणुकीच्या आधीच नोकरीवाल्यांना आयोगाचा फायदा मिळेल.

सभापती महोदय, कापूस उत्पादक शेतकऱ्याच्या समस्या सांगावयाच्या झाल्या तर मला प्रश्न पडतो की, आपण कृषी विद्यापीठावर करोडो रुपये खर्च करीत असतो. या कृषी विद्यापीठाने कापसाचे नवीन वाण शोधण्यासाठी काही संशोधन केले आहे काय ? कृषी विद्यापीठाना कोठे तरी जबाबदार धरले पाहिजे की नाही ? कृषी विद्यापीठाने दुर्लक्ष केल्यामुळे मॉनसँटो सारख्या बहुराष्ट्रीय कंपन्या महाराष्ट्रात आल्या आणि त्यांनी कोटयवधी रुपये बाहेर नेले. कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यामागे केवळ ॲग्रीकल्चरचे पदवीधर तयार करणे असा उद्देश नव्हता.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

संशोधनाच्या माध्यमातून शेतीला उपयोग होईल या उद्देशाने कृषी विद्यापीठे काढण्यात आली होती. परंतु या विद्यापीठांचा शेतीला म्हणावा तसा उपयोग झालेला नाही. मी या ठिकाणी बीटी कॉटनचे संशोधन न केल्यामुळे झालेल्या नुकसानीचा उल्लेख केला. शेतीच्या दृष्टीने संशोधन होणे गरजेचे आहे आणि त्याकडे कृषी विद्यापीठे दुर्लक्ष करीत असतील तर आपण त्यांना जाब विचारला पाहिजे.

सभापती महोदय, आज सुध्दा शेतकऱ्यांना परदेशी कंपन्या ज्या दराने बियाणे देतील त्या प्रमाणे खरेदी करावी लागत आहे. आपण कृषी विद्यापीठांना सर्व सुविधा देतो. पण कोणत्याही प्रकारच्या सुविधा नसताना जवळपास 50 कंपन्यांनी बीटीयुक्त कपाशीचे संशोधन केलेले आहे. जर खाजगी कंपन्या असे करु शकतात तर आपण कृषी विद्यापीठांना सर्व प्रकारची मदत करीत असताना आणि दर महिन्याला लाखो रुपये पगार घेणारे प्राध्यापक आणि संशोधक, शास्त्रज्ञ असताना अशाप्रकारचे संशोधन का करु शकत नाही ? कृषी विभागासाठी किती बजेट आहे हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. त्यापैकी पगारावर किती खर्च केला जातो. पगाराच्या तुलनेत त्यांनी काय आऊटपूट दिले हे देखील आम्हाला समजले पाहिजे. जर चांगल्या प्रकारे संशोधन होणार नसेल तर तो एक प्रकारे भ्रष्टाचार आहे. या भ्रष्टाचाराला आळा घालण्याची हिंमत कृषी मंत्री महोदयांनी दाखविली पाहिजे.

सभापती महोदय, बीटी कॉटनवर संशोधन करण्यास आपणास अपयश आले आणि आता जुन्या पध्दतीने लागवड करण्यास कृषी विभागाने प्रोत्साहन देण्यास सुरु केले आहे. बीटी कॉटन शेतकऱ्यांना परवडेल यासाठी दोन बाबी करणे गरजेचे होते. स्वत: संशोधन करणे किंवा मॉन्टेसो कंपनीला स्वस्त दरात बियाणे पुरविण्यासाठी निगोशिएट करुन दबाव निर्माण करणे. आपणास हे शक्य होते असे माझे मत होते. आपण ते करायला पाहिजे होते.

सभापती महोदय, बीटी कॉटन हे हायब्रीड कॉटन आहे. हायब्रीड कॉटनला जास्त पाणी लागते त्यामुळे सिंचनाच्या सुविधा त्या प्रमाणात देणे गरजेचे आहे. या दोन्ही आघाड्यांवर आपले शासन अपयशी ठरले आहे म्हणून आपण नवीन कॅम्पेन सुरु केला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, मी या निमित्ताने सिंचनाचा उल्लेख करतो. शेतकऱ्यांच्या प्रश्ना संदर्भात सिंचनाचा रोल महत्वाचा आहे. विदर्भातील सिंचनाचा अनुशेष असल्यामुळे कापूस, सोयाबीन, धान, संत्रा उत्पादक शेतकरी अडचणीत आले आहेत आणि ही खरी समस्या आहे. माननीय पंतप्रधानांनी मिश्रा यांची समिती नेमली होती त्या समितीने विदर्भात सिंचन कमी असल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत असे सांगितले.

सभापती महोदय, महाराष्ट्र जलसंपत्ती प्राधिकरण विनियमनाप्रमाणे दरवर्षी सिंचनाचा अनुशेष जाहीर करावा लागतो. त्याप्रमाणे हा सिंचनाचा अनुशेष जाहीर झालेला आहे. मी त्याची आकडेवारी वाचतो. आपण अमरावती आणि नागपूर विभाग घेतला तर अमरावती विभागातील बुलढाणा जिल्ह्यामध्ये सिंचनाचा अनुशेष 235.38 हेक्टर, अकोला - 152.52 हेक्टर, वाशिम 136.39 हेक्टर, अमरावती 260.95 हेक्टर, यवतमाळ 193 हेक्टर, असा एकूण 978.15 हेक्टरचा अनुशेष आहे. नागपूर विभागाचा विचार केला तर वर्धा-62.65 हेक्टर, नागपूर 55 हेक्टर, चंद्रपूर 55.66 हेक्टर, गडचिरोली 9.87 हेक्टर असा एकूण 183.54 हेक्टरचा अनुशेष आहे. हा अनुशेष भौगोलिक आहे. त्या ठिकाणी अनुशेष नाही असे सांगितले जाते. हा अनुशेष पैशाच्या रुपात काढला तर श्वेतपत्रिकेत सिंचनाचा खर्च 45 हजार 960 कोटी रुपये दिला होता आणि आम्ही तो ग्राह्य धरला. 17 हजार कोटी रुपये ग्राह्य धरले नाहीत. माननीय मंत्री महोदयांनी दिलेला आकडा आम्ही ग्राह्य धरला तर प्रती हेक्टर सिंचनाचा खर्च 5.67 लाख रुपये येतो.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रती हेक्टर 5.67 लाख रुपये खर्च गृहीत धरला तर मघाशी सांगितलेल्या आकडेवारीनुसार बुलढाणा जिल्ह्याचा आर्थिक अनुशेष 13,369.86 कोटी रुपये, अकोला जिल्ह्याचा 8,618.40 कोटी रुपये, वाशिम जिल्ह्याचा 7,733.31 कोटी रुपये, अमरावती जिल्ह्याचा 14,795.86 कोटी रुपये, यवतमाळ जिल्ह्याचा 10,943.10 कोटी रुपये, अशा प्रकारे अमरावती विभागाचा एकूण आर्थिक अनुशेष 55,760.53 कोटी रुपये आहे. कोणत्या जिल्ह्याचा किती अनुशेष आहे हे समजण्यासाठीच आम्ही पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी फायनान्शियल स्टेटमेंट म्हणजेच ग्रीन बुकची मागणी केली होती.

महोदय, नागपूर विभागामध्ये वर्धा जिल्ह्याचा 3,552.25 कोटी रुपयांचा आर्थिक अनुशेष आहे, नागपूर जिल्ह्याचा 3838.91 कोटी रुपये, चंद्रपूर जिल्ह्याचा 3,155.92 कोटी रुपये, गडचिरोली जिल्ह्याचा 559.62 कोटी रुपये, अशा प्रकारे एकूण 10,406.7 कोटी रुपयांचा आर्थिक अनुशेष शिल्लक आहे. सभापती महोदय, अमरावती विभागात 55,760.53 कोटी रुपये आणि नागपूर विभागात 10,406.7 कोटी रुपये, अशा प्रकारे विदर्भात एकूण 66,167.23 कोटी रुपयांचा आर्थिक अनुशेष आहे.

सभापती महोदय, मराठवाडा विभागामध्ये औरंगाबाद जिल्ह्यात सिंचनाचा अनुशेष 98,700 हेक्टर असून, आर्थिक अनुशेष 5,596 कोटी रुपये आहे, जालना जिल्ह्यात 1,23,760 हेक्टर सिंचनाचा अनुशेष असून, आर्थिक अनुशेष 7,011 कोटी रुपये आहे. हिंगोली जिल्ह्यात सिंचनाचा अनुशेष 98,020 हेक्टर असून, आर्थिक अनुशेष 5,557 कोटी रुपये आहे. बीड जिल्ह्यात 89,120 हेक्टर सिंचनाचा अनुशेष असून, आर्थिक अनुशेष 5,053 कोटी रुपये आहे. नांदेड जिल्ह्यात 28,570 हेक्टर सिंचनाचा अनुशेष असून, आर्थिक अनुशेष 1620 कोटी रुपये आहे. उस्मानाबाद/धाराशीव जिल्ह्यात 42,210 हेक्टर सिंचनाचा अनुशेष असून, आर्थिक अनुशेष 2558 कोटी रुपये आहे. लातूर जिल्ह्यात सिंचनाचा अनुशेष 55,230 हेक्टर असून, आर्थिक अनुशेष 2,848 कोटी रुपये आहे. अशा प्रकारे मराठवाड्यात सिंचनामध्ये 5,30,500 हेक्टरचा अनुशेष असून, 30,243 कोटी रुपयांचा आर्थिक अनुशेष आहे. या भागात सिंचनाची सोय नसताना त्या भागातील लोकांना खरोखरच आपण न्याय देऊ शकतो काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

महोदय, कापूस उत्पादक शेतकऱ्यांवर कसा अन्याय होतो ते मी आपल्याला सांगतो. शासकीयदृष्टया सर्वोत्कृष्ट उत्पादन प्रती हेक्टर 10 क्विंटल होते. यानुसार त्याचे उत्पन्न 40 हजार गृहीत धरुया. याचा अर्थ शासनाने जे सर्वोत्कृष्ट उत्पन्न दाखविले आहे त्यामुळे शासनाचे हेक्टरी 10 हजार नुकसान होते. शासनाने 50 टक्के पेक्षा कमी आणेवारी घोषित करण्यासाठी कापसाचे उत्पादन केवळ 5 क्विंटल प्रती हेक्टर एवढे अपेक्षित धरले आहे. त्यातून शेतकऱ्यांचे प्रती हेक्टर 32 हजार नुकसान होते. म्हणूनच शासन 50 टक्क्यांपेक्षा कमी आणेवारी जाहीर करील अन्यथा करणार नाही. कापूस उत्पादक शेतकऱ्यांची शासनाकडून जाणीवपूर्वक फसवणूक केली जात आहे. मागच्या एका अधिवेशनात सर्वोत्कृष्ट उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या पुरस्काराबाबत चर्चा केली होती. आणेवारी कशी काढली जाते आणि प्रत्यक्षात सर्वोत्कृष्ट उत्पादन काय दाखविले जाते या बाबत शासकीय कार्यालयातून मी आकडेवारी मागविली होती. मी मागे जो क्लेम केला होता तो आश्चर्यकारक होता. परंतु त्यावर कोणाचाच विश्वास नव्हता. मी पुन्हा त्या बाबत आपल्याच शासकीय कार्यालयातून ती आकडेवारी मागविली आहे.

नंतर श्री.खंदारे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

या यादीमध्ये हेक्टरी 50 क्विंटलपेक्षा कमी व 20 क्विंटलपेक्षा जास्त पीक घेणारे शेतकरी आहेत. गजानन लक्ष्मण मार्गे, बार्शी टाकळी, जि.अकोला, 35 क्विंटल प्रती एकर व 87 क्विंटल प्रती हेक्टर, वासुदेव गणपत ठाकरे, बार्शी टाकळी, जि.अकोला, 62 क्विंटल प्रती हेक्टर, प्रकाश खेडकर, मूर्तिजापूर, 75 क्विंटल प्रती हेक्टर, राजेश खंडाळकर, मूर्तिजापूर, 80 क्विंटल प्रती हेक्टर, ही सर्व आकडेवारी मंत्री महोदयांच्या कार्यालयातून मिळालेली आहे. मागील वेळी या आकडेवारीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते त्याबाबतची वास्तववादी आकडेवारी मी आता दिलेली आहे. जे काही मी कापसासंबंधी मांडले आहे ते पाहता जोपर्यंत कापसाला किमान हमी भाव प्रती क्विंटल 6 हजार रुपये देणार नाही तोपर्यंत कापूस उत्पादक शेतकऱ्यांना शासन न्याय देऊ शकणार नाही, ही वस्तुस्थिती आहे. राज्य शासनाने केंद्र सरकारला 5268 रुपये भाव देण्याची शिफारस केलेली आहे. प्रत्यक्षात केंद्र सरकारने 4100 रुपये हमी भाव जाहीर केला आहे. माननीय पंतप्रधानांनी नेमलेल्या स्वामीनाथन् समितीच्या शिफारशीचा आधार घेतला असता तर 6765 रुपये प्रती क्विंटल भाव देणे गरजेचे होते. मी प्रती हेक्टरी खर्च सांगू शकतो. पण त्यात वेळ जाईल म्हणून सांगत नाही. कंत्राटी पुरुष असेल तर किती खर्च येतो, महिला असेल तर प्रती हेक्टर 9673 रुपये खर्च येतो. एकूण खर्च काढला तर 2014.45 रुपये प्रती हेक्टर खर्च तसेच कंत्राटी मजूर, गुरांची मजुरी, यंत्रावरील खर्च, बियाणे, खते, कीटकनाशके, विमा खर्च स्वामीनाथन् कमिशनच्या शिफारशीनुसार देणे गरजेचे आहे. याप्रमाणे प्रती हेक्टर 4510 रुपये खर्च येतो. त्यात 2255 नफा धरला तर 6765 रुपये भाव मिळणे गरजेचे आहे. त्यापैकी केंद्र सरकारने 4100 रुपये भाव जाहीर केलेला आहे. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या भावापेक्षा राज्य सरकारने थोडासा जास्त मागितला होता. त्यामुळे शेतकऱ्यांचा उद्वेग होणे स्वाभाविक आहे. या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांना शेतकरी मेळाव्यातून शेतकरी पळवून लावतात. यावरुन लोकांमध्ये या सरकारबाबत किती चीड व राग आहे याचा अंदाज घेतला पाहिजे. अनेकदा कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा मांडलेल्या आहेत.

पांढरकवडा, येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दिनांक 29.11.2013 रोजी व्यापाऱ्यांनी ढगाळ वातावरणाच्या नावाखाली कापसाचे भाव पाडले. त्यामुळे शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला होता. या घटनेमुळे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये प्रचंड खळबळ उडाली होती.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.विनोद तावडे....

त्या दिवशी कापसाची मोठ्या प्रमाणात आवक झाली होती. कालपर्यंत कापसाच्या लिलावाला 4500-4600 रुपये भाव होता. पण ढगाळ वातावरणाच्या नावाखाली 3700-3800 रुपये या दराने खरेदी सुरु केली. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये राग होता. मी मघाशी सांगितल्या प्रमाणे अर्ध्या किलो कापसापासून तयार केलेला शर्ट बाजारात 1 हजार, 2 हजार रुपये किंमतीत विकला जातो. पण त्याच्या बदल्यात शेतकऱ्याला 40 रुपये मिळतात. याचाही माननीय कृषी मंत्र्यांनी कृषी अर्थकारण ठरविताना विचार केला पाहिजे.

काळी ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या प्रचंड आहेत. मुळात ज्वारी हे गरिबांचे अन्न मानले जात होते. मघाशी माननीय सभापतींच्या दालनात सन्माननीय सदस्य श्री.नितीनजी गडकरी हे देखील उपस्थित होते. तेव्हा डाएट फूडबाबत चर्चा झाली.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

आता ज्वारी ही हेल्थ कॉन्शस समाजाचे, श्रीमंत समाजाचे खाद्य व्हायला लागली आहे. ज्वारी पचायला हलकी असते, तिच्यामध्ये फॅटस् कमी असतात म्हणून लोक ज्वारीकडे वळत आहेत. पण ज्वारीचे पीक परिपक्व होत असतानाच पाऊस पडला आणि दाणे काळे पडले की ज्वारी उत्पादक शेतकरी संकटात सापडतो, त्याची ज्वारी कोणी उचलत नाही, ज्वारीला भाव मिळत नाही. ज्वारीची किंमत खाली आल्यामुळे ज्वारी पिकविणारा शेतकरी आर्थिक संकटात सापडतो. आज मराठवाड्याच्या सर्व भागामध्ये फिरल्यानंतर असे दिसून येते की, संकटात सापडलेल्या ज्वारी उत्पादक शेतकऱ्याला शासनाने दिलेल्या पॅकेजचा उपयोग झालेला नाही. 50 टक्क्या पेक्षा जास्त नुकसान झाले तरच शासकीय मदत मिळते. त्यामुळे ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांना कोणतीही मदत मिळत नाही. आपण शेतक-यांना देऊ केलेले 80 रुपयाचे मदतीचे चेक देखील त्यांना मिळत नाही. ज्या ज्वारी उत्पादक शेतक-यांचे नुकसान झालेले आहे. त्यांना हेक्टरी 10 हजार रुपये मदत करावी अशी मी या निमित्ताने शासनाकडे मागणी करीत आहे.

सभापती महोदय, सोयाबीन पिकाला जगभर मागणी आहे. हल्लीच्या हेल्थ कॉन्शस जमान्यामध्ये प्रोटीन्स देणा-या उत्पादनांची मागणी वाढलेली आहे. त्यामुळे सोयाबीनची देखील मागणी वाढलेली आहे. सोयाबीन पासून वेगवेगळे पदार्थ बनविले जातात. गेल्या दोन तीन वर्षापासून या सोयाबीनच्या किंमती वाढत आहेत. सोयबीन पासून तयार केलेले तेल, सोयाबीनच्या वडया, चिप्स यांच्या किंमती देखील वाढत आहेत. परंतु सोयाबीन उत्पादकाला मात्र हे वाढीव दर मिळत नाहीत. याचे कारण असे की, आपला देश 1 लाख टन खाद्यतेल आयात करतो. एनडीअे सरकार असताना माननीय अटलबिहारी वाजपेयी हे पंतप्रधान होते त्यावेळी सोयाबीन तेलाच्या आयातील 45 ते 90 टक्के आयात शुल्क लावले होते. आता युपीए सरकारने हे आयात शुल्क संपूर्णपणे माफ केले आहे. एनडीअे सरकारने एवढी कस्टम डयुटी वाढविली होती की त्यामुळे परदेशातून सोयाबीनचे तेल कमी येत होते आणि देशातील सोयाबीनच्या तेलाला चांगला भाव मिळत होता. परंतु बदललेल्या सरकारने कस्टम डयुटी माफ केल्यामुळे परदेशातून मोठया प्रमाणावर सोयाबीन तेलाची आयात होऊ लागली. परिणामी येथील शेतक-याच्या सोयाबीनचे भाव पडू लागले. अर्थकारण या पध्दतीने बदलते. म्हणून जी कस्टम डयुटी लावणे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

आवश्यक आहे ती लावण्यासाठी आपण आग्रह धरला पाहिजे. सोयाबीनवर प्रक्रिया केल्यानंतर त्यामधून निर्माण होणा-या डीओसीला विदेशामध्ये प्रचंड मागणी आहे. परदेशामध्ये पोल्ट्री फीड म्हणून डीओसीचा वापर केला जातो. आता डॉलरच्या वाढलेल्या किमतीमुळे सोयाबीन शेतकऱ्यांना त्याचा निश्चित लाभ मिळू शकतो. परंतु या डीओसीच्या दराप्रमाणे शेतकऱ्यांना लाभ मिळत नाही. या संदर्भात आपले मंत्रालय काही योजना आखणार आहे काय याची माहिती मंत्री महोदयांनी द्यावी. ऑगस्ट महिन्यामध्ये सोयाबीनचे दर प्रति क्विंटल 5100 रुपये होते. त्यानंतर दरामध्ये अचानक घसरण होऊन ते 3000 रुपयापर्यंत आले. यावर्षी सोयाबीनचे भाव 3900 रुपयापर्यंत वाढलेले होते. पण आता ते 3500 रुपयापर्यंत घसरलेले आहेत. अशा प्रकारे किंमतीमध्ये होणाऱ्या चढउतारामुळे शेतकरी प्रचंड अस्वस्थ आहे. सन 2012-13च्या पणन हंगामासाठी सोयाबीन या पिकासाठी मजूर, बियाणे, सिंचन, कीटकनाशके विमा इत्यादी खर्च धरुन प्रति क्विंटल 3087 रुपये एवढा उत्पादन खर्च येतो.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीपूर्वी नाही

श्री.विनोद तावडे..

माननीय पंतप्रधानांनी स्वामीनाथन समिती नेमलेली आहे. शेतकऱ्यांना किमान 4630 रुपये हमी भाव देणे गरजेचे आहे अशा प्रकारची शिफारस समितीने केलेली आहे, त्याप्रमाणे हमी भाव दिला गेला पाहिजे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, मी धानाच्या विषयाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, पूर्व विदर्भ आणि कोकण या विभागातील आठ-नऊ जिल्हयांचा चरितार्थ धानावर चालतो. धान उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या मेहनतीचा मोबदला मिळत नाही. खते आणि कीटक नाशके यांचा भाव वाढत आहे, उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे, परंतु त्या बदल्यात उत्पन्न अतिशय कमी प्रमाणात होत आहे, अशा दृष्टचक्रात धान उत्पादक शेतकरी अडकलेला आहे. प्रत्येक शेतमालाला उत्पादन खर्च किती येतो, त्या तुलनेत शेतकऱ्यांना किती प्रमाणात उत्पन्न मिळत आहे, शासनाकडून त्यांच्या मालाला किती भाव दिला जातो याची माहिती मी उपलब्ध करुन घेतलेली आहे. धान पिकासाठी मजुरी, गुरांचा खर्च, बियाणे खर्च प्रती क्विंटल 1809 रुपये इतका खर्च होतो, त्यात सिंचनाचा खर्च व इतर खर्च ॲड केला तर 2345 रुपये प्रती क्विंटन धानाचा खर्च येतो. परंतु धान उत्पादक शेतकऱ्यांना फक्त 1280 रुपये प्रती क्विंटल हमी भाव केंद्र शासनाने जाहीर केला. धान हा हलका, मध्यम आणि भारी असा तीन प्रतीचा असतो. केंद्र शासनाकडून जाणीवपूर्वक शेतकऱ्यांचा मध्यम आणि भारी प्रतीचा धान असला तरी त्यास हलक्या प्रतीचा धानाचा भाव जाहीर केला जातो. केंद्र शासनाचा कृषी मूल्य आयोगावर दबाव आहे. देशात राईस मिल लॉबी मोठ्या प्रमाणात कार्यरत आहे. ज्याप्रमाणे लिकर लॉबी आहे, शुगर लॉबी आहे, त्याप्रमाणे राईस मिल लॉबी देशामध्ये अतिशय परिणामकारकपणे काम करीत आहेत. शेतकऱ्याच्या धानाला योग्य तो भाव देण्यात येऊ नये अशा पध्दतीचा दबाव कृषी मूल्य आयोगावर आणला जातो, ही वस्तुस्थिती आहे. प्रत्येक कृषी पिकासाठी उत्पादन खर्च किती आहे, प्रत्यक्षात उत्पन्न किती मिळते व प्रत्यक्षात किती भाव शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादित मालासाठी दिला जातो याची माहिती वेळेअभावी पूर्णपणे सांगू शकत नाही. ती माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती महोदय, भंडारा परिसरातील विदर्भ मार्केटींग फेडरेशन, आदिवासी विकास महामंडळाची खरेदी केंद्रे आहेत. शेतकरी आपला धान सदर खरेदी केंद्रावर आणतात, त्यावेळी

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

त्यांचे धान केंद्राच्या धोरणानुसार दर्जेदार नाही असा ठपका ठेवून 1100 रुपये प्रती क्विंटल भाव देण्यात येतो. तुमच्या धानाचा दर्जा चांगल्या प्रतीचा नसल्यामुळे तुम्हाला जास्तीचा भाव देता येत नाही असे सांगितले जाते. आजही शेतकऱ्यांच्या "अ" प्रतीच्या धानास 1280 आणि "ब" प्रतीच्या धानास 1250 रुपये प्रती क्विंटल दर दिला जात नाही हे दुर्दैव आहे. जिल्हाधिकारी यांच्या मदतीने धान व्यापारी शेतकऱ्यांकडून फक्त 1000 ते 1100 रुपये दराने खरेदी करतात हे वास्तव आहे. शेतकऱ्यांवर एक सुलतानी संकट आलेले असून शेतकरी चिंताग्रस्त झालेले आहेत. शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात फसवणूक करण्यात येत आहे. धान उत्पादकांच्या बाबतीत शासनाने जी भूमिका घ्यावयास पाहिजे ती घेत नाही हे मला खेदाने नमूद करावेसे वाटते. शेतकऱ्यांच्या धानाला 3 हजार रुपये प्रती क्विंटल हमी भाव देण्यात यावा अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, हिवाळी अधिवेशनासाठी नागपूर शहरात आल्यानंतर माननीय श्री.अनिल देशमुख तसेच इतर नेत्यांचे मोठमोठे होर्डिंग्ज बघतो. त्या होर्डिंग्जवर असे लिहिलेले असते की, संत्रा नगरीत आपले स्वागत. आता ही संत्रा नगरी राहिली आहे काय? या संत्रा नगरीतील शेतकऱ्यांची आज काय अवस्था आहे हा प्रश्न माझ्या मनात होर्डिंग्ज बघताना येतो. केंद्रात आणि राज्यात तुमचेच सरकार असताना या विभागातील खासदारांना सत्रा पिकास योग्य तो भाव मिळावा म्हणून दिल्ली येथे गांधीगिरी करावी लागते ही गोष्ट देखील खेदनजक आहे. संत्रा पिकाचे प्रती हेक्टर उत्पादन 8.72 मे.टन होत होते. शासनाच्या दुर्लक्षामुळे 2011-2013 या वर्षात ते उत्पादन प्रती हेक्टर 5.10 मे.टन एवढे खाली आलेले आहे.

यानंतर श्री. भोगले..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

शेतकऱ्यांनी स्वत: आपल्या हाताने संत्र्याची झाडे तोडून टाकली. कारण त्या झाडांपासून उत्पन्न काही मिळत नाही आणि खर्च होत होता. 2004 मध्ये शासनाने 20 कोटी रुपये खर्चून परदेशातून अत्याधुनिक सामुग्री मागविली आणि संत्रा प्रक्रिया उद्योग सुरु केला. मात्र एका वर्षातच तो बंद पडला. प्रक्रिया उद्योग सुरु का केला आणि बंद का पडला याबाबत शासनाने काही खुलासा केलेला नाही. शेवटी या प्रक्रिया उद्योगातील मशिनरी 7.5 कोटी रुपयांना पश्चिम महाराष्ट्रातील खरेदीदाराला विकण्यात आली.

सभापती महोदय, शासनाने अनुदान देण्याऐवजी त्याच निधीतून संत्र्यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगाची पायाभरणी करावी अशी मागणी केली होती. नागपूर जिल्हयातील काटोल आणि अमरावती जिल्हयातील मोर्शी येथे संत्रा प्रक्रिया उद्योग सुरु करण्यात आले. काटोल, मोर्शी, शेंदूरजनाघाट हा परिसर संत्र्यामुळे विदर्भातील कॅलिफोर्निया समजला जातो. ज्या संत्रा पिकामुळे नागपूर शहराला ऑरेंज सिटी म्हणून ओळखले जाते. त्या संत्रा पिकाची अवस्था फार बिकट आहे. शीतगृहाच्या अभावामुळे संत्रा पीक वर्षभर टिकू शकत नाही हे वास्तव आहे. शीत गृहासंबंधी सरकार काय भूमिका जाहीर करणार याकडे विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकरी लक्ष देऊन बसला आहे. यावर्षी अतिवृष्टीचा फटका संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना सहन करावा लागला. अतिवृष्टीने संत्रा झाडाला बहर आला नाही. संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना अद्याप पीक विम्याचा लाभ मिळालेला नाही. त्यामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना प्रती हेक्टर 50 हजार रुपयांची मदत द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केलेली आहे.

सभापती महोदय, सरकार ज्या पध्दतीने बजेटमध्ये खर्च करीत आहे, ज्याप्रमाणे आमदारांना 10-10 कोटी रुपये मतदारसंघातील विकास कामासाठी दिले जात आहेत त्यापेक्षा शेतकऱ्यांना मदत दिली तर ती जास्त उपयुक्त ठरेल. परंतु आमदारांना दिलेल्या निधीमुळे मते जास्त मिळणार आहेत. विकास कामे आणि रस्त्यांची कामे करण्यासाठी आमदारांना दिलेल्या निधीतून कंत्राटदारांना पैसे दिले जातील. त्यातून इलेक्शन फंड मिळेल यासाठी हा उद्योग चाललेला आहे. त्यापेक्षा काटोल येथील फळ संशोधन केंद्राचे बळकटीकरण करण्याची गरज आहे, त्याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

सभापती महोदय, आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न आम्ही सातत्याने मांडत आहोत. आंबा उत्पादक शेतकऱ्यांना फवारणी करावी लागते. फवारणीसाठी रॉकेलची आवश्यकता असते. रॉकेल मिळविण्याची व्यवस्था नसल्यामुळे चोरीच करावी लागते. अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे लक्षवेधी सूचना उपस्थित केल्यानंतर कृषी मंत्रालयाने पाठपुरावा केला पाहिजे असे सांगण्यात आले. आंबा उत्पादक शेतकऱ्यांना किटकनाशक फवारणीसाठी रॉकेलची गरज भासते. ते अधिकृतपणे उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. आम्हाला मंत्री महोदयांनी सांगितले की, तुम्ही वितरक उपलब्ध करुन द्या. आम्ही वितरक उपलब्ध करुन दिला. देवगड खरेदी विक्री बाजार समिती व इतरांची नावे दिली. सरकारने काही केले नाही. कृषी खात्याने या संदर्भात पाठपुरावा करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, यावेळी आंबा उत्पादक शेतकरी अडचणीत आलेले आहेत. वातावरणात होणारे बदल, वेळी अवेळी पडणारा पाऊस यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पीक विमा योजनेतून तातडीने 1 लाख रुपये नुकसान भरपाई द्यावी. तरतूद केलेली आहे. हवामानातील बदलाची नोंद घेण्यासाठी प्रत्येक सर्कलमध्ये यंत्रणा बसविण्यात आली आहे. कोकणामध्ये समुद्र किनाऱ्याजवळ हवामान वेगळे असते आणि सह्याद्रीच्या पायथ्याशी हवामान वेगळे असते. मोजमाप यंत्र ठेवले आहे त्यावर नोंद केली जाते ती जाहीर होत नाही. त्यामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार की नाही हे कळत नाही. यंत्रावर हवामानाची नोंद होत असताना आंबा उत्पादक शेतकरी हजर असावा

नंतर 3एम.1...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.विनोद तावडे...

किंवा अन्य काही उपायोजना करण्यात यावी. आंबा निर्यातीसाठी शासनाने विशेष योजना देणे आवश्यक आहे.

द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचा एकरी उत्पादन खर्च दीड लाख रूपयांपर्यंत असतो. ऑक्टोबर छाटणीसाठी साधारणत: पन्नास हजार रूपयांचा खर्च येतो. ऑक्टोबर छाटणीमध्ये वातावरणात अचानक बदल झाल्यास डावणीचा प्रादुर्भाव होतो व त्यामुळे बागेतील संपूर्ण बहर वाया जाण्याची शक्यता निर्माण होते. बहर वाया गेल्यास पन्नास हजार रूपये देखील वाया जातात. यासाठी खूप कमी नुकसान भरपाई दिली जाते. अचानक गारपीट झाली तर पूर्ण पीक वाया जाऊन सव्वा ते दीड लाख रूपयाचे नुकसान होते. बेदाणा उत्पादनाची नाशिक, तासगाव, पंढरपूर अशी ठराविकच केंद्रे असल्यामुळे त्यात व्यापाऱ्यांची मक्तेदारी निर्माण झाली आहे. त्यामुळे द्राक्ष बागायतदारांना वाहतुकीचा खर्च जास्त येत असतो. गेल्या दहा वर्षापासून बेदाण्याचे दर स्थिरच आहेत. मात्र, उत्पादन खर्चात पाच ते सहा पट वाढ झालेली आहे. गेल्या वेळी बेदाण्याला विशेष सवलत मिळाल्यानंतर देखील त्यातून शेतकरी फार खुश आहेत अशी आज स्थिती नाही. त्यातच अडत 21 टक्के लावली जाते. 21 दिवसाच्या आत शेतकऱ्यांना पैसे दिले पाहिजे असा बाजार समितीचा नियम असताना देखील दोन महिने पैसे देण्यास विलंब होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना 3 ते 5 टक्के व्याज व्यापाऱ्यांना द्यावे लागते. बेदाणा निर्मितीसाठी शेड उभारण्यासाठी साधारणत: एक लाख रूपये खर्च येतो. ते अनुदान देखील कृषि विभागाने बंद केले आहे. ते आपण सुरू करणार आहात काय एवढेच मला या निमित्ताने विचारावयाचे आहे. बेदाण्याची थेट शेतातून निर्यात होणे आवश्यक आहे. तसे केले तरी व्यापारी जी मधली लूट करतात ती त्यातून थांबू शकेल.

सभापती महोदय, हे सर्व विषय मांडत असताना त्यांचा सावकारी विधेयकाशी देखील संबंध आहे. मी येथे सिंचनाचा देखील विषय मांडला आहे. सावकारी विधेयकाबाबत शासनाची अनास्था आहे. या विधेयकासंबंधी शासनाने अध्यादेश का काढला नाही ? आपण इंडिया बुल्सला पाणी देण्यासाठी अध्यादेश काढू शकता. मग सावकारी विधेयकाचा अध्यादेश का काढत नाही ?

सभापती महोदय, कोरडवाहू शेती अभियानासाठी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दहा कोटी रूपयांची घोषणा केली. शासनाने मात्र वर्षाला 200 कोटी रूपये दिले. आपणाला हे अभियान

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

प्रामाणिकपणे राबवायचे असेल तर दरवर्षी 2000 कोटी रूपये द्यावे लागतील. आपण फक्त 200 कोटी रूपये दिलेले आहेत. त्यामुळे आपल्याला हे अभियान प्रामाणिकपणे राबवायचे आहे काय ? त्याद्वारे आपण कोरडवाहू शेतकऱ्याचे भले करू इच्छिता की, नाही हा प्रश्न मनामध्ये येतो.

सभापती महोदय, वाढत्या शहरीकरणामुळे मजूर मिळणे अवघड होत चालले आहे. मजुरी वाढत चालली आहे. तेव्हा वाढलेल्या मजुरीची कुठे तरी दखल घेणे आवश्यक आहे. काही पिकांच्या बाबतीत यांत्रिकीकरणाकडे लक्ष दिले पाहिजे. त्याकडे देखील दुर्लक्ष करण्यात येत आहे. कापूस वेचणीकरिता एकाच वेळी मजूर उपलब्ध होत नसल्यामुळे कापूस वेचणीमध्ये बऱ्याच अडचणी निर्माण होतात. अमेरिकेमध्ये यंत्राद्वारे हजारो क्विंटल कापसाची वेचणी केली जाते. ॲग्रो-वन मध्ये यासंबंधातील सविस्तर माहिती येते. भारतामध्ये तसा पर्याय उपलब्ध व्हावा म्हणून नागपूरातील राष्ट्रीय कापूस संशोधन केंद्राला अंमलबजावणी संस्था म्हणून नियुक्त करण्यात आले. कापूस वेचणी यंत्र तयार करण्याचे काम डॉ.पंजाबराव कृषि विद्यापीठाला देण्यात आले. सन 2004 पासून या प्रकल्पासाठी 40 ते 45 लाख रूपयाची तरतूद संशोधनासाठी करण्यात आली. त्यावर कोणतेही संशोधन पुढे गेलेले नाही.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...

माननीय मंत्री महोदय, विद्यापीठ स्तरावरील महाविद्यालये चांगल्या प्रकारे चालवतात. लोणी मधील विद्यापीठांची नावे पहिल्या 5-7 विद्यापीठांमध्ये येतात. परंतु आपण आता कुलगुरु झाल्यानंतर आपल्या हाताखालील कृषी विद्यापीठे व्यवस्थित चालवू शकत नसाल तर ते आपले अपयश मानले जाईल. त्यामुळे जे कृषी विद्यापीठ चांगले काम करीत नसेल त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. त्यामुळे यामध्ये आपली कार्यक्षमता कृषी विद्यापीठाच्या कामाच्या बाबतीत दिसून येण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, कापूस वेचणी यंत्र आवश्यक असतानाच कपाशीचे नवीन वाण कृषी विद्यापीठाने शोधणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना शेतमाल उत्पादनावर पीक विमा देणे गरजेचे आहे. बियाण्यांच्या संदर्भात मी प्रश्न मांडला होता त्याला माननीय राज्यमंत्र्यांनी थातूरमातूर उत्तर दिले. परंतु आपण या सभागृहात घोषणा केली होती की, आगाऊ बियाणे बुकींग होणार नाही. परंतु बियाण्यांची बुकींग करणाऱ्या कंपन्यांची मी आपल्याला नावे दिली असताना आपण त्यांच्यावर काहीच कारवाई केली नाही. या बियाणे कंपन्याचा आपल्यावर दबाव आहे काय असा प्रश्न आमच्या समोर उभा राहतो. त्यामुळे ज्या कंपन्यांनी आगाऊ बुकींग केली त्या कंपन्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात ? अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने, नागपूरचे हिवाळी अधिवेशन संपत असताना आम्ही शेतकऱ्यांना काही देऊ शकलो अशी भावना घेऊन सन्माननीय सदस्यांनी बाहेर जावे अशी भावना असते. ही भावना घेऊन जावयाचे असेल तर या ठिकाणी मी आकडेवारीनुसार ज्या गोष्टी मांडल्या त्याआधारे आपण कास्तकाराला काही न्याय देणार आहात काय, आपण हमी भावाची काही घोषणा करणार आहात काय? आपल्या घोषणेकडे राज्यातील शेतकरी आतुरतेने वाट पाहत आहे त्यामुळे या शेतकऱ्याला खऱ्या अर्थाने आनंदी करावे एवढेच या निमित्ताने बोलतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.धन्यवाद.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, नियम 259 अन्वयेच्या अंतिम आठवडा प्रस्तावावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महात्मा गांधींच्या सिध्दांताप्रमाणे गरिबी ही अनैसर्गिक अशी स्थिती आहे. कोणी तरी शोषण करीत असल्याखेरीज गरिबी उद्‌भवूच शकत नाही. गरिबांच्या छातीवरुन उठले तर दारिद्रय आपोआप संपेल असे महात्मा गांधींनी म्हटले होते. त्यामुळे गरिबांच्या छातीवर नेमके कोण बसले आहे ? गरिबांच्या मानेवर कोणाचे भूत बसले आहे ? स्वातंत्र्यानंतर शेतकऱ्याला करवंटी घेऊन भीक मागायला कोणी लावले, सत्ता कोणाची आहे ? सत्ताधाऱ्यांनी शेतकऱ्यांचे बळी घ्यायचे, शेतकऱ्यांचे खून पाडावयाचे. अधिवेशन विदर्भात असतांना विरोधी पक्षाने विदर्भातील शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या संदर्भात काहीच चर्चा उपस्थित केली नाही म्हणून उद्या वर्तमान पत्रात बातम्या येतील. विरोधी पक्ष विदर्भातील शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या बाबतीत काहीच बोलले नाही, असेच हात हलवत गेले अशी चर्चा होईल त्यामुळे आम्ही आमचे काम केलेले आहे. परंतु नेहमी प्रमाणे सत्ताधारी पक्षाकडून शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाटाण्याच्या अक्षता लावल्या जातात त्याप्रमाणे आजही तेच होणार आहे. विदर्भामध्ये अधिवेशन झाले पाहिजे या पाठीमागे फार मोठे उद्दिष्ट होते. विदर्भातील दारिद्रय संपावे, विदर्भातील प्रश्नाला न्याय मिळावा यासाठीच विदर्भामध्ये अधिवेशन भरवले जाते. आमच्या सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस शेजारी बसल्या आहेत त्यांच्या भावना कधी कधी भडकतात आणि मधून मधून "जय विदर्भ, जय विदर्भ" त्या करीत असतात. त्यांच्या वेगळया विदर्भाच्या संदर्भात ज्या भावना तयार झाल्या आहेत त्याला जबाबदार कोण आहे ?

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

त्यांच्यावर हा अन्याय कोणी केला ? या ठिकाणी चर्चा करण्यापेक्षा, अधिवेशनाला येण्यापेक्षा माननीय मुख्यमंत्री महोदयांनी महिन्यातून एकदा येथे येऊन आम्ही ज्या काही योजना जाहीर करीत आहोत, जे काही पॅकेज जाहीर करतो त्याची अंमलबजावणी प्रशासन कशा पध्दतीने करीत आहे याची स्वत: माहिती करुन घेतली पाहिजे. तलाठ्यापासून विभागीय आयुक्तापर्यंत, सरपंचापासून मंत्र्यांपर्यंत पॅकेजचा मलिदा कोणाच्या खिशात आणि घशात जाण्यापेक्षा पॅकेजची चांगल्याप्रकारे अंमलबजावणी झाली असती तर आमच्या विदर्भाला न्याय मिळाला असता.

सभापती महोदय, आपण मला अधिक वेळ द्यावा. कोणीकोणी गायी घेतल्या, पंप घेतले, पाईप घेतले याचा मी पर्दाफाश करीन. मी येथे जबाबदारीने बोलत आहे. आपण कुणासाठी पॅकेज देत आहोत ? शेतकऱ्यांनी जे कर्ज घेतले ते कमी न करता तो पैसा व्याजासकट बँकांनी घेतला. या सरकारने फक्त वैयक्तिक स्वार्थापेक्षा काहीही केलेले नाही.

सभापती महोदय, महात्मा गांधीजींचे जे स्वप्न होते त्या स्वप्नांना हरताळ फासण्याचे काम काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसने केले असे मी म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. आपण शेतकऱ्यांना "पोशिंदा" म्हणतो. माननीय केंद्रीय कृषी मंत्री आदरणीय श्री.शरद पवार साहेब यांनी शेतकऱ्यांच्या बाबतीत म्हटले होते की, "जो इतरांचे अन्न देऊन पोट भरतो. पण आज तोच शेतकरी उपाशी असून तो अन्न अन्न करीत आहे." आपण यातून काय धडा घेतला ? या संदर्भात आपली नेमकी भूमिका काय आहे ?

सभापती महोदय, देशाला स्वातंत्र्य मिळून 66 वर्षाच्या काळात या पोशिंद्याची परिस्थिती सुधारल्याचे चित्र दिसत नाही. आज स्वातंत्र्यानंतर 85 टक्के शेतकरी दारिद्र्य रेषेखाली आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या 66 वर्षात 95 टक्के आदिवासी दारिद्र्य रेषेखाली आहेत. मग आपण 66 वर्षात कोणासाठी काम केले याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे. आम्ही सभागृहात यायचे. समोरच्या बाकावरील सदस्यांनी बोलायचे, या बाजूच्या बाकावरील सदस्यांनी बोलायचे, कधी कधी आमने सामने व्हायचे असे करुनही शेतकऱ्यांना न्याय मिळालेला नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, मी खालच्या सभागृहात विरोधी पक्ष नेता असताना शेतकऱ्यांसंबंधी अनेक प्रकारच्या उपाययोजना शासनाला सुचविल्या होत्या, दिल्या होत्या. या ठिकाणी देखील मी त्या दिलेल्या आहेत. आपणास शेतकऱ्यांना न्याय द्यायचा असेल तर आपण त्यांना सर्वप्रथम सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. या सर्व गोष्टी शासनाला माहीत आहेत. शासनाला कळते पण वळत नाही. सर्व पैसा पश्चिम महाराष्ट्राकडे वळविला जातो. शेतकऱ्यांना ताठ मानेने जगवायचे असेल तर आपण त्याला सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. परंतु आज शेतकऱ्यांना कणा राहिलेला नाही. त्यांचा कणा शासनाने मोडलेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

प्रत्येक वेळी पॅकेज मिळण्यासाठी त्यांनी शासनाकडे भीक मागायची काय ? पॅकेज हे एक नाटक आहे, ते अजून किती वर्षे चालणार आहे ? मी तर म्हणेन की, पॅकेज जाहीर करणे बंद करुन, विदर्भातील किंबहुना राज्यातील शेतकरी ताठ मानेने उभा राहील या दृष्टिकोनातून उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्या उपाययोजना करणार असाल तरच बोला, नाही तर बोलू नका आणि येथून निघून जा. येत्या निवडणुकीत जनतेला काय सांगायचे ते आम्ही सांगू. महोदय, विदर्भातील शेतकऱ्यांना न्याय द्यावयाचा असेल, तर हा प्रश्न कायमचा सोडविला पाहिजे. नैसर्गिक परिस्थितीतून, अस्मानी-सुलतानी परिस्थितीतून विदर्भातील शेतकऱ्यांची सुटका करावायची असेल तर त्या अनुषंगाने प्रयत्न केले पाहिजेत. विदर्भातील जलाशयात तीन-चार वर्षे पुरेल एवढा साठा असावयास पाहिजे. विदर्भात सलग दोन-तीन वर्षे दुष्काळ पडला तरी जलाशयात शिल्लक असलेल्या साठ्यातून शेतीला पाणी देता आला पाहिजे. ज्या दिवशी ही परिस्थिती निर्माण होईल त्या दिवशी विदर्भातील शेतकऱ्यांना पॅकेज किंवा मदत देण्यासाठी चर्चा करण्याची वेळ येणार नाही, हे मी जबाबदारी सांगतो.

महोदय, आज सकाळी प्रस्तावावरील उत्तराच्या वेळी माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे एक वाक्य सहजपणे बोलून गेले. मुळात आज सकाळी उपस्थित केलेला प्रस्ताव मराठवाड्याशी संबंधित होता. महोदय, कोयनेचे 67 टीएमसी पाणी समुद्राला जाऊन मिळते. ते पाणी कोकणाला मिळावे म्हणून मी 20 वर्षे प्रयत्न करीत आहे. आम्हाला हजार-दोन हजार कोटी रुपये मिळण्यासाठी मी प्रयत्न करीत आहे. महोदय, समुद्राला जाऊन मिळणारे पाणी कोकणाकडे वळविले तर तो सधन होईल. असे केल्यास कोकणातील एकही माणूस नोकरीसाठी, चाकरीसाठी, पोटाची भूक भागविण्यासाठी, आपली खळगी भरण्यासाठी मुंबई, नाशिक, ठाण्यामध्ये येणार नाही. परंतु आम्हाला पैसे मिळत नाहीत. कोकणातील माणसांनी केवळ स्वप्ने बघायची. सन्माननीय सदस्य भाई जगताप, काही जणांकडून भाजपा-शिवसेनेसोबत भांडले पाहिजे असा प्रयत्न केला जातो. मग आपण बाहेर तलवारी काढतो. आपल्याला माहीत आहे की, आज सकाळी मराठवाड्याच्या पाणी प्रश्नाबाबत मराठवाड्यातील सर्वपक्षीय आमदार एकत्र आले होते. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप, आपण कोकणातील आमदार अशाप्रकारे कधी एकत्र आलो काय ? मी तर म्हणेन की, मराठवाड्यातील आमदारांकडून ही गोष्ट शिकण्यासारखी आहे. परंतु आपण एकमेकांना उद्ध्वस्त करीत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

महोदय, कोकणाचे 25 टीएमसी पाणी मराठवाड्याला देण्याबाबत सांगितले. हे करण्याची आपल्यात हिंमत आहे काय ? मी म्हणेन की, अगोदर समुद्राला जाऊन मिळणारे 67 टीएमसी पाणी कोकणाला द्यावे. यासाठी मी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्याकडे साकडे घातले होते. त्यांनी सांगितले की, या संदर्भात आपण चिपळूणला बैठक घ्यावी. मी अधिकाऱ्यांना बैठकीसाठी पाठवीन. त्यांनी सर्वेक्षणाच्या कामासाठी 1 कोटी रुपये दिले. पण पुढे काय ? काहीच नाही. आमच्या कोकणात "बोलाचाच भात अन् बोलाचीच कढी" अशी एक म्हण आहे. तशाच प्रकारची कार्यवाही या सरकारच्या माध्यमातून होत आहे. मी तर म्हणेन की, राज्य सरकारने कोकणाबरोबरच विदर्भालाही उद्ध्वस्त केले आहे.

सभापती महोदय, केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार म्हणतात की, जोपर्यंत ऊसाला ठिबक सिंचन लावत नाही तो पर्यंत सिंचनाचा प्रश्न सुटणार नाही. कारण महाराष्ट्रामध्ये केवळ 18 टक्के सिंचन असून, देशात ते प्रमाण 52 टक्के आहे. राज्यातील 18 टक्के सिंचनातील 95 टक्के पाणी हे ऊस पिकाला लागते. परंतु कोकण आणि मराठवाडा हा पाण्यासाठी बोंबलतो आहे. परंतु त्या भागात सिंचनाची सोय केली जात नाही. कोकण आणि विदर्भातील शेतकऱ्यांची ही अवस्था कोणी केली ? राज्यामध्ये समान न्याय देण्याची भूमिका आहे की नाही ? पश्चिम महाराष्ट्राला एक आणि कोकणाला एक न्याय लावला जात आहे. सर्व पैसा पश्चिम महाराष्ट्रात जातो. विदर्भ आणि कोकण विभाग मात्र हातात कटोरा घेऊन शासनाकडे भीक मागतो. मी तर म्हणेन की, या राज्यकर्त्यांकडून आम्हाला जाणूनबुजून गरीब ठेवले जात आहे. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून पॅकेज बाहेर येते. महोदय, आपल्या माध्यमातून माझी शासनाला विनंती आहे की, 85 टक्के दारिद्र्यरेषेखाली असलेल्या शेतकऱ्यांना सधन करण्यासाठी, त्यांना इतरांच्या बरोबर आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे सभागृहात नाहीत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते की, माझ्या समाजाचा विकास करण्यासाठी केवळ 10 वर्षांचा कालावधी द्या.

नंतर श्री.खंदारे....

अशुद्धित प्रत / मुद्रित प्रत नाही

श्री.रामदास कदम....

माझा समाज इतर समाजासोबत येईल. पण त्यानंतर 10 वर्षे झाली, 20 वर्षे झाली, 30 वर्षे झाली, 40 वर्षे झाली, 50 वर्षे झाली, 60 वर्षे झाली. आजही मागासवर्गीय बांधव लंगोटीमध्ये आहे. त्याची लंगोटी गेलेली नाही. डॉ.बाबासाहेबांचे स्वप्न साकार झाले आहे असे माननीय कृषी मंत्र्यांनी सांगावे. महात्मा गांधी हे बॅरिस्टर झाल्यानंतर सूटाबुटात आले होते. पण ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची दारिद्र्य अवस्था पाहिल्यानंतर गांधीजींनी असे म्हटले होते की, जोपर्यंत माझ्या देशातील शेवटच्या माणसाच्या अंगावर लाज राखण्या इतपत कपडा येत नाही तोपर्यंत मी माझ्या संपूर्ण अंगावर कपडे घालणार नाही. अशी शपथ त्यांनी घेतली होती. परंतु स्वातंत्र्याच्या 66 वर्षानंतरही महात्मा गांधींचे स्वप्न साकार झालेले नाही त्या काँग्रेस व राष्ट्रवादीच्या सरकारला राज्य करण्याचा नैतिक अधिकार आहे काय ते माननीय कृषी मंत्र्यांनी आम्हाला सांगावे. शेतकऱ्यांच्या मुळावर कोण उठले आहे, शेतकऱ्यांसाठी काय केले आहे ते मंत्री महोदयांनी सांगावे. केंद्र सरकारने खतावरील सबसिडी कमी का केली, एका बाजूला शेतकऱ्यांना न्याय देणार असे सांगितले जाते व दुसऱ्या बाजूला खताची सबसिडी कमी केली जाते. अन्न सुरक्षा कायदा आणावयाचा आणि सबसिडी काढून घ्यावयाची. शेतकऱ्यांची किती दिवस फसवणूक करणार आहात ? शेतकऱ्यांची दिशाभूल किती दिवस करणार, हे सर्व ढोंग व थोतांड आहे. दरवर्षी आम्ही येथे बोलायचे, मंत्री महोदयांनी उत्तर द्यावयाचे, त्यानंतर निघून जायचे. पुढील वर्षी पुन्हा याच विदर्भात यायचे. मी स्वत: शेतकऱ्याचा मुलगा आहे, मी शेतात नांगर धरलेला आहे, मी भाताची लावणी, चिखलणी, अनवाणी पायाने मी डोक्यावर भात घेतलेला आहे. मी मळणी केलेली आहे. त्यामुळे मला जाणीव आहे. कोकणामध्ये असे म्हणतात की, बाळंतिणीचे दुखणे बाळंतिणीलाच माहीत असते. ज्यांनी गरिबीचे चटके सोसले, कष्ट उपसले आहेत त्यांना त्याची जाण असते. तुम्ही गर्भश्रीमंत असाल किंवा मागचे दिवस विसरले असाल. ती जाणीव असती तर शेतकऱ्यांना उपाशीपोटी आत्महत्या करण्यास भाग पाडले नसते. या आत्महत्येला जबाबदार कोण आहे ? आत्महत्येच्या मूळावर का जात नाही, उठसूट पॅकेजचा पर्याय का शोधला जातो ? पॅकेज कधी संपवित नाही, हे पॅकेजचे नाटक कधी तरी संपविले पाहिजे आणि शेतकऱ्यांना न्याय दिला पाहिजे असे शासनाला का वाटत नाही ? सगळे कळते, पण वळत नाही. मिळालेल्या भावातून त्याचा

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.रामदास कदम....

उत्पादनासाठी लागणारा खर्चही भागत नाही. पण लाज, इज्जत जाते म्हणून शेतकरी शेती करीत आहेत त्यांना हमी भाव मिळाला पाहिजे असे या सभागृहात अनेकदा बोललो आहे. तरीही त्यांना हमी भाव मिळत नाही. मग हमी भाव मिळण्यासाठी लोक रस्त्यावर आले की त्यांना गोळ्या घातल्या जातात. शेतीच्या नुकसानीची भरपाई मागण्यासाठी रस्त्यावर उतरले की त्यांना गोळ्या घातल्या जातात. मग त्याची चर्चा आम्ही येथे करावयाची. किती दिवस गोळ्या घालून शेतकऱ्यांना संपविणार आहात ? स्वातंत्र्यांच्या 66 वर्षानंतरही आम्हाला गोळ्या खाव्या लागतात.

कृषी खात्याच्या गोदामांचे भाडे निश्चित केलेले आहे काय, एका बाजूला गोदामातील गोण्या पाण्याने भिजून जातात आणि दुसऱ्या बाजूला लोकांना खाण्यासाठी अन्न मिळत नाही. लाखो टन धान्य पाण्यामुळे कुजून जात आहे.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम....

तुम्हाला उत्पादित मालाची साठवणूक करता येत नसेल, गोडाऊनची व्यवस्था करता येत नसेल, नियोजन करता येत नसेल तर या खुर्चीवर बसण्याचा तुम्हाला अधिकार नाही. तुम्ही जर असेच वागत राहाल तर हा अधिकार जनता हिरावून घेतल्या शिवाय राहाणार नाही. आपण 2 रु. दराने गोडाऊन्स भाडयाने घेतलेली आहेत. हे गोडाऊनचे भाडे आपण वाढवून देत नाही. मग गोडाऊन मालकांनी आंदोलन केल्यानंतर, एक दोन लोक गोळया लागून मेल्यानंतर शासन निर्णय घेणार आहे काय ? तेव्हा शासनाने सर्व गोडाऊन मालकांना बोलावून भाडयाच्या बाबतीत निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, विदर्भामध्ये माजी मालगुजारी तलाव आहेत. माझा विधानसभा आणि विधानपरिषदेचा कार्यकाल 25 वर्षाचा झालेला आहे. विधानसभेमध्ये तर मी माजी मालगुजारी तलावांचा विषय 200 वेळा तरी मांडलेला आहे. विदर्भामध्ये 20 हजार माजी मालगुजारी तलाव आहेत. ब्रिटीश राजवटीच्या आधीपासूनचे हे तलाव आहेत. या तलावांची दुरुस्ती करण्यासाठी मी त्यावेळी 200 कोटी रुपयाची मागणी केली होती. मी सांगितले होते की, या माजी मालगुजारी तलावाची दुरुस्ती केली तर विदर्भातील एक जिल्हा संपूर्णपणे सधन होईल. प्रत्येक तलाव 6-6 लोकांना दिला, त्या तलावामध्ये कोलंबीचे उत्पादन घेतले आणि ती कोलंबी एक्सपोर्ट केली तर एका तलावावर 6 कुटुंबाची उपजीविका होऊ शकेल. एकूण 20 हजार माजी मालगुजारी तलाव आहेत. प्रत्येक तलावावर 6 या प्रमाणे एकूण 1 लाख 20 हजार लोकांच्या हाताला यामुळे काम मिळू शकेल. पाच-सहा वर्षापूर्वी मी ही मागणी केली होती. आता त्याच कामासाठी 500 कोटी रुपये द्यावे लागतील. आम्ही हे या ठिकाणी कितीही ओरडून सांगितले तरी सरकार ढिम्म आहे. सरकार बहिरे आहे. त्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही. विदर्भातील शेतक-यांना पॅकेज दिले पण ते पॅकेजचे पैसे तुमच्या घशात गेले, अशाने तुमची पोटे फुटतील ना.

विदर्भातील शेतक-यांना 16 हजार गाईंचे वाटप करण्यात आले. त्यापैकी किती गाई आता शिल्लक आहेत, या गाईमुळे दुग्धव्यवसायात किती वाढ झाली, किती शेतकरी सधन झाले ? विदर्भामध्ये गायी चरण्यासाठी गवत नसल्यामुळे सर्व गायी खाटीकखान्याकडे गेल्या.

सभापती महोदय, विदर्भातील आदिवासी लोक मोहाची फुले वेचतात. या मोहाच्या फुलापासून वाईन तयार केली तर विदर्भातील आदिवासी सधन होईल. आपण द्राक्षापासून वाईन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

बनविता. कारण आपण त्या भागातील प्रतिनिधी ते करण्यास सक्षम आहात. पण आदिवासींचे कोण आहे ? त्यांना कोण मदत करणार ? आमचे शासन आले तर हा रामदास कदम विदर्भातील आदिवासींना सक्षम केल्या शिवाय राहाणार नाही.

सभापती महोदय, मी विधानसभेमध्ये विरोधी पक्षनेता असताना तालुका निहाय, जिल्हा निहाय उपाययोजना सुचविलेल्या होत्या.

..नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

तुम्ही समित्या नेमल्या, त्या समित्यांनी जे अहवाल दिलेले आहेत त्याची अंमलबजावणी केली काय ? या या समितीचा अहवाल शासनाने शंभर टक्के स्वीकारला, अशी कधी आपण घोषणा केली आहे काय ? आपणाकडून कोणत्याही समितींच्या अहवालाची अंमलबजावणी केली नाही. तुम्ही दारिद्रय रेषेखालील शेतकऱ्यांची यादी तयार केली होती. त्यांना आपण कोणत्याही प्रकारचा लाभ देत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, या ठरावात बियाण्यांचा उल्लेख केला गेला आहे. जे लोक बोगस बियाणे तयार करुन शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करीत आहेत त्यांना फाशीची शिक्षा द्या. या ठिकाणी अंधश्रध्दा निर्मूलन विधेयक कशासाठी आणता ? या विधेयकाच्या प्रत्येक कलमासाठी शिक्षेची तरतूद आहे. परंतु कोणाला तरी खूश करण्यासाठी अशा प्रकारचे विधेयक सभागृहात मांडण्यात आले आहे. परंतु शेतकऱ्यांना बोगस बियाण्याच्या पुरवठा होत आहे, बोगस खतांचा पुरवठा होत आहे, जे लोक शेतकऱ्यांना बोगस बियाणे आणि बोगस खताचा पुरवठा करीत आहेत, त्यांना फाशीची शिक्षा द्यावी. आपल्यामध्ये हिंमत असेल तर यासंदर्भात स्वतंत्र कायदा सभागृहात करावा. तुम्ही या संदर्भात कधीही कायदा करु शकणार नाही, तुम्ही सावकारी बंदी कायदा करु शकत नाहीत. सावकारांना बंधन घालणे तर सोडून द्या, उलट माझ्या माहिती प्रमाणे तुम्ही 2500 सावकारांना लायसन्स दिले आहेत. एका बाजूला सावकारांवर बंदी आणण्याची भाषा करीत आहात, मात्र दुसऱ्या बाजूला आपण सावकारांना लायसन्स देऊन तुम्ही प्रोत्साहन देत आहात, हा तुमचा दुटप्पीपणा आहे. या राज्यामध्ये कोणासाठी कामे केली जात आहेत या गोष्टीचा खुलासा या ठिकाणी झाला पाहिजे.

सभापती महोदय, मी सिंचनाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, कोकणामध्ये फक्त दीड टक्का सिंचन आहे. एकूण 18 टक्के सिंचनातील फक्त दीड टक्के सिंचन कोकणामध्ये झालेले आह 95 टक्के सिंचन पश्चिम महाराष्ट्रात आहे. कोकणाला समान न्याय शासनाकडून कधी दिला जाणार आहे या बाबतचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा. जेवढे पाणी पश्चिम महाराष्ट्राला दिले जाते, तेवढेच पाणी कोकण आणि विदर्भ, खानदेश, मराठवाडा या विभागांना दिले पाहिजे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

महोदय, माझी शासनकर्त्यांना विनंती आहे की, पॅकेजचे ढोंग एकदाचे संपवून टाका. विदर्भातील शेतकरी सधन कसा होईल, याकडे शासनाने प्राथम्याने लक्ष दिले पाहिजे. आपण कोकणातील आंबा, काजू पिकाच्या झालेल्या नुकसानी बाबत 10 कोटी रुपये आर्थिक मदत जाहीर केली म्हणून मी आपले प्रेसच्या माध्यमातून आभार मानले. कोकणात आंबा पिकाचे जे नुकसान झालेले आहे, त्यासाठी 30 कोटी रुपयांची आर्थिक मदत शासनाकडून आली आहे, परंतु ती तशीच पडली आहे. कोकणातील शेतकऱ्यांच्या शेतीची खातेफोड केली पाहिजे अशी आम्ही मागणी करीत आहोत पण महसूल विभागाने खातेफोड केलेली नाही. कोकणात शेत जमिनीच्या 7/12 उताऱ्यावर दहा दहा, बारा-बारा व्यक्तींची नावे आहेत. त्यामुळे खाते फोड करु शकत नाही. त्याचे कारण यातील एक व्यक्ती डिफेन्समध्ये असते, दुसरी व्यक्ती नोकरीसाठी पुणे येथे असते, त्यामुळे या सर्व व्यक्तींचे ॲफिडेव्हिट एकाच वेळी आम्ही देऊ शकत नाही. एकाच वेळी सर्वांच्या सहया घेऊ शकत नाही. त्यामुळे रत्नागिरी जिल्हयासाठी आंबा पिकाच्या नुकसान भरपाईची 30 कोटी रुपयांची रक्कम तशीच पडून आहे. त्यामुळे कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची रक्कम मिळू शकत नाही. त्यामुळे आपण शेत जमिनींची खाते फोड करुन द्यावी व ज्यांचे आंबा पिकाचे नुकसान झालेले आहे त्यांना नुकसान भरपाईचे पैसे उपलब्ध करुन द्यावेत, अशा प्रकारची मी या ठिकाणी मागणी करतो.

सभापती महोदय, जांभूळ, फणस यापासून वाईन बनविण्यासाठी परवानगी द्यावी अशी मी मागील अधिवेशनात मागणी केली होती. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात सांगितले होते की, आपण त्यासंबंधीचे प्रस्ताव पाठवा. त्याप्रमाणे आम्ही प्रस्ताव दिले आहेत. त्यावेळी माननीय श्री.अजितदादा यांनी सांगितले होते की, आपण प्रस्ताव द्यावेत, मी त्यांना तात्काळ मंजुरी देतो. त्याप्रमाणे आम्ही आमचे प्रस्ताव शासनाकडे सादर केलेले आहेत, परंतु त्या प्रस्तावांना अद्यापी मंजुरी देण्यात आलेली नाही. विदर्भ, कोकण, मराठवाडा, खानदेश यांनी घोडे मारले आहेत काय ? तुम्ही पश्चिम महाराष्ट्राचे राजे आहात. निवडणुका डोळयासमोर आहेत, त्यामुळे तुम्ही अनेक घोषणा करणार. आता मुस्लीम समाजासाठी पैशांची खैरात करीत आहात. तुम्ही किती पैसे दिले आहेत, यासंबंधी मी संपूर्ण माहिती गोळा केलेली आहे. मुस्लीम समाजातील एखादा मुलगा फक्त इयत्ता 7 वी पर्यंत शिकला असेल, त्याने फक्त सही केली तरी त्यास सुशिक्षित

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

बेरोजगार म्हणून कर्ज उपलब्ध करुन द्यावयाचे असे प्रकार सुरु आहेत. मदरशाच्या माध्यमातून जी मुले शिकतील, तेथील एका मुलास 25 लाख रुपयांचे कर्ज मिळू शकते. विदर्भ आणि कोकणातील विद्यार्थ्यांसाठी आपण काय करत आहात ते सांगा. तुम्ही विशिष्ट समाजासाठीच फक्त अशा सवलती देणार असाल तर समाजासमाजामध्ये तुम्ही भिंती पाडत आहात. हिंदू-मुस्लीम अशी भिंत तुम्ही पाडता आहात. लोकांचे मन डायव्हर्ट करण्याच्या हेतूने तुम्ही जादूटोणा विधेयक आणले आहे. मी अतिशय जबाबदारीने बोलत आहे. आपण शेतकऱ्यांसाठी नेमके काय करणार आहात ?

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

विदर्भासाठी काय करणार आहात, शेतकरी सधन केव्हा होणार? आता पॅकेज देणे थांबवा. पुन्हा सांगतो, पॅकेज थांबवा आणि कायमस्वरुपी उपाययोजना करा. माननीय मुख्यमंत्री स्टेटमेंट करतात की, 70 हजार कोटी रुपये खर्च होऊनही सिंचनामध्ये 0.1 टक्का वाढ झाली नाही. मग पैसे कुठे गेले ते सांगा. ते राज्याचे मुख्यमंत्री आहेत. ते स्टेटमेंट देतात त्या अर्थी त्यांनी हेही सांगितले पाहिजे की, हे पैसे कुठे गेले, अजित पवारांनी हे पैसे कसे खाल्ले, कुठे खाल्ले? एखादे स्टेटमेंट करुन मोकळे व्हायचे.....

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्री श्री.अजित पवार यांनी पैसे खाल्ले असा उल्लेख माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी केला आहे. या प्रकरणाचा तपास पूर्ण व्हायचा आहे. तपास सुरु आहे. वैयक्तिक दोषारोप करणे चुकीचे आहे. त्यामुळे माननीय सदस्यांनी केलेले वक्तव्य रेकॉर्डवरुन काढण्यात यावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी असे म्हटले की, सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवारांवर मुख्यमंत्री आरोप करतात. मग अजित पवारांनी पैसे कसे खाल्ले हे त्यांनी जनतेला समजून सांगावे. महाराष्ट्रामध्ये वाद निर्माण करुन वातावरण निर्मिती करायची आणि गप्प बसायचे हे चुकीचे आहे. मी शासनकर्त्यांना सांगू इच्छितो की, आता तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवा, त्याला जगू द्या, त्याच्या शेतमालाला हमी भाव द्या, त्याच्या शेताला पाणी द्या. सिंचनाच्या निधीचे सिंचन कुठे होते हे योग्यवेळी आमच्यासमोर आले तर आम्ही तुम्हाला सोडणार नाही. संपूर्ण चौकशी करणार आहोत. आज तुम्ही सत्तेवर असल्यामुळे कितीही समित्यांचे अहवाल दाबून ठेवा. उद्या आम्ही सगळे बाहेर काढल्याशिवाय राहणार नाही. एवढे सहजासहजी समजू नका. आम्ही कायमचे सत्ताधारी बाजूच्या खुर्चीत बसलो आहोत, जे मिळेत ते आम्ही राष्ट्रवादी आणि काँग्रेस पक्ष भाऊ भाऊ मिळून सर्व खाऊ असे तुमच्या डोक्यात असेल तर ते काढून टाका. भविष्यात प्रत्येकाला भोगावे लागेल. शेतकऱ्यांची तुम्ही हाय घेत आहात. 10 हजार शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणे हे तुमच्यासाठी भूषणावह नाही. विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकणावरील अन्याय थांबवा. अन्यथा उद्याच्या निवडणुकीमध्ये महाराष्ट्राची जनता तुम्हाला जाब विचारल्याशिवाय राहणार नाही, हा इशारा देतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड.अनिल परब)

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी आवेशपूर्ण भाषणाच्या ओघात काही गोष्टींचा उल्लेख केला ते अयोग्य आहे असा माझा समज आहे. आपण रेकॉर्ड तपासून पहावे. सरकार म्हणून आणि महाराष्ट्र म्हणून सुध्दा ते वक्तव्य रेकॉर्डवर राहणे योग्य नाही. अल्पसंख्याकाच्या संदर्भात उल्लेख करीत असताना त्यांनी मदरशाचा उल्लेख केला आहे. असे कोणत्याही कायद्यामध्ये नाही. मदरशाला देऊ केलेली मदत फक्त 3 टक्केच मदरशांनी उचलली आहे ही वस्तुस्थिती आहे. धर्माच्या भिंती वगैरे वगैरे शब्दप्रयोग करण्यात आलेला आहे ते रेकॉर्डवर असणे योग्य होणार नाही. ते तपासून घ्यावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, केंद्र शासनाने आणलेल्या योजनेमध्ये सगळे आहे. तुम्ही तपासून घ्या. नसेल तर माननीय सदस्य म्हणतात त्याला माझी हरकत नाही. मागासवर्गीयांच्या संदर्भात 23 हजार कोटी रुपये तुम्ही खाल्ले. 23 हजार कोटी रुपये त्यांना दिले नाहीत. हा पैसा कुठे गेला? तुमच्याकडे आला नाही. मागासवर्गीयांवर, महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांवर, विदर्भावर, कोकणावर, खानदेशावर अन्याय आहे असे मी म्हटले.

तालिका सभापती (ॲड.अनिल परब) : योग्य ते तपासून घेतले जाईल.

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नाही

<u>अकोला येथे झालेल्या शिक्षिकेच्या खूनासंबंधी</u>

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, विदर्भामध्ये विधिमंडळाचे अधिवेशन सुरु आहे. कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळलेली आहे. पोलिसांचा धाक शिल्लक राहिलेला नाही. अकोला येथे एका शिक्षिकेचा व मुलीचा काल रात्री खून झालेला आहे. तिचा मुलगा बेपत्ता झालेला आहे. अद्याप शोध लागलेला नाही. शासनाने ताबडतोब याबाबत दक्षता घेऊन मारेक-यांना शोधून अटक करावी.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : संबंधित विभागाला कळविण्यात येईल.

नंतर 3 यू.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कृषी क्षेत्रातील विविध अडचणींमुळे शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या

मु.शी.: कृषी क्षेत्रातील विविध अडचणींमुळे शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, नागो पुंडलिक गाणार, भगवानराव साळुंखे, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरू.....

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, विरोधी पक्षातर्फे मांडण्यात आलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना योग्य तो हमी भाव मिळाला पाहिजे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. महाराष्ट्रातील शेतकरी बांधव हे आमचे प्रमुख घटक व केंद्रबिंदू असल्यामुळे त्यांच्या शेतीमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे याबद्दल शंका असण्याचे कारण नाही. देशातील इतर राज्यांचा विचार करता शेतकऱ्यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहण्याची भूमिका महाराष्ट्र शासन सातत्याने घेत आहे हे दिसून येते.

आज विदर्भ व मराठवाड्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. त्याचे आम्ही कधीही समर्थन करणार नाही. त्या का होत आहेत याच्या मुळाशी जाणे हे सरकारचे कर्तव्य आहे. ते सरकारने पार पाडले पाहिजे अशी आमची रास्त मागणी आहे. कापसाला आपण पांढरे सोने म्हणतो. कापूस, संत्री म्हटले की, विदर्भ-नागपूरचे पीक आहे हे लक्षात येते. आज मराठवाड्यामध्ये देखील कापसाचे उत्पादन होत आहे. मराठवाड्यातील औरंगाबाद आणि जालना येथे मोसंबीचे उत्पादन होते. विदर्भातील पांढरे सोने, संत्री यांना योग्य तो हमीभाव देण्यासबंधीची मागणी करणे चुकीचे आहे असे मला वाटत नाही. माझे तर असे म्हणणे आहे की, संत्री, मोसंबी, कापूस, सोयाबीन, धान, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला योग्य तो हमीभाव मिळाला पाहिजे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

सभापती महोदय, एक गोष्ट मान्य करावी लागेल की, महाराष्ट्र शासन असे शासन आहे की, शेतकऱ्यांना जेवढ्या म्हणून अडचणी येतात त्याच्या विरोधात शेतकऱ्यांच्या पाठीमागे खंबीरपणाने उभे राहते. त्यामुळेच पांढऱ्या सोन्याला अधिक हमी भाव मिळाला पाहिजे अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, या खात्याला अभ्यासू मंत्री लाभले आहेत. त्यांच्याकडे शिक्षण खाते देखील होते. तेव्हा देखील त्यांनी चांगले निर्णय घेतले होते. आता ते कृषि मंत्री या नात्याने नवनवीन योजना कृषि विभागामध्ये आणण्याचे काम करीत आहेत.

यानंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

कापसाचे पीक घेण्यासाठी प्रत्येक प्रादेशिक विभागामध्ये वेगवेगळे वातावरण व वेगवेगळी माती असू शकते. त्यामुळे या मातीचे योग्य ते परीक्षण करुन तेथे कोणते वाण घेतले पाहिजे यासंदर्भात शेतकऱ्याला मार्गदर्शन करुन तेथील हवालामानाला पोषक असे कापसाचे कोणते वाण आहे याबाबतीतील संशोधन होण्याची आवश्यकता आहे. कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून संशोधन होणे गरजेचे आहे. कपाशी, धान, संत्री, ऊस, द्राक्ष यामधील कोणत्या जाती कोणत्या भागात चांगल्या येऊ शकतात तसेच जे वाण रोगाला कमी पडते अशा वाणाचे संशोधन करुन ती बियाणे शेतकऱ्यांना योग्य भावात मिळाली पाहिजे यासाठी येणाऱ्या काळात आपल्याला तातडीने पावले उचलावी लागणार आहेत. आज आपण कापूस संशोधन केंद्रे स्थापन केलेली आहेत. त्यांच्या माध्यमातून कोणते संशोधन होत आहे तसेच कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून कोणते संशोधन होत आहे याचा आढावा घेण्याचे काम आपल्याला करावे लागणार आहे. शेवटी आमचा शेतकरी सुखामध्ये जगला पाहिजे एवढाच आपला ध्यास असला पाहिजे. कापसावर मोठया प्रमाणात रोगांचा प्रादुर्भाव होत असल्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होत असते. कपाशीसाठी लागणारी कीटकनाशके अतिशय महागडी आहेत. रोगाला कमीत कमी बळी पडतील अशा नवनवीन वाणांचे संशोधन करुन ते आमच्या शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करुन देण्याचे काम आपल्याला पुढील काळात करावे लागणार आहे.

सभापती महोदय, मराठवाडयात नगदी पीक म्हणून सोयाबीन घेतले जाते. सोयाबीन हे मराठवाडयातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेले आहे. एकेकाळी मराठवाडयात नगदी पीक म्हणून ज्वारी, तूर,मूग घेतले जात होते. परंतु आता कमी कालावधीत व जास्त उत्पादन देणारे पीक म्हणून सोयाबीनकडे बघण्याचा दृष्टीकोन शेतकऱ्यांचा झाला आहे. त्यामुळे सोयाबीनसाठी आपल्याला हमी भाव द्यावा लागणार आहे. सोयाबीनचे नवीन वाण आपल्याला देता येणार आहे काय ? याबाबतीत सुध्दा संशोधन करुन शेतकऱ्यांना सोयाबीनचे नवीन वाण उपलब्ध करुन द्यावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, महाबीज ही शासनाची अंगीकृत कंपनी असून ती बियाण्यांच्या बाबतीत संशोधन करीत असते. यासाठी आपण वेगळे महामंडळ सुध्दा काढलेले आहे. परंतु या कंपन्याच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

माध्यमातून आमच्या शेतकऱ्यांना चुकीचे बियाणे दिले गेले किंवा जे बियाणे दिले गेले ते उगवलेच नाही अशी अनेक उदाहरणे घडलेली आहेत. बोगस बियाण्यामुळे आमच्या शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान होते. बोगस बियाण्यामुळे शेतकऱ्याचे एका पीकाचे पूर्ण नुकसान होते. त्यामुळे बोगस बियाणे शेतकऱ्यांना मिळणार नाही याची दक्षता आपल्याला निश्चितपणे घ्यावी लागणार आहे. यासंदर्भात संबंधितावर कठोर कारवाई केली तर मला खात्री आहे की, यामुळे शेतकऱ्यांना निश्चितपणे झळ पोहचणार नाही.

सभापती महोदय, बियाण्यांच्या काळया बाजाराची समस्या आपल्या सरकारपुढे आहे. त्यामुळे बियाण्यांचा काळा बाजार होणार नाही यासाठी आपल्याला पावले उचलावी लागणार आहेत.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

आपल्याला सोयाबीन किंवा इतर पिकांसाठी अधिकाधिक चांगल्या प्रकारचे वाण निर्माण करुन,रोगाला प्रतिबंध करणाऱ्या व्हयराटी शेतकऱ्यांना उपलब्ध करुन द्याव्यात अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, सोयाबीनला चांगला भाव मिळाला पाहिजे. हे सातत्याने लागणारे पीक आहे. सोयाबीन पासून खाद्यतेल तयार होते. सोयीबीन पिकाला रास्त हमीभाव मिळाला पाहिजे अशी आमच्या शेतकऱ्यांची मागणी असते.

सभापती महोदय, तत्कालीन सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल हे आमच्या लातूरचे आहेत. ते चुकून दुसऱ्या बाजूला बसत असत. ते सातत्याने शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी लढत असतात. माननीय केंद्रीय कृषी मंत्री आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी दूरदर्शीपणा ठेवून ते दुसऱ्या पक्षातील सदस्य असले तरी शेतकऱ्यासाठी काही चांगले निर्णय घेतील म्हणून त्यांनी त्यांची देशाच्या कृषी मूल्य आयोगावर सदस्य म्हणून नियुक्ती केलेली आहे, हे मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो. ते शेतकरी चळवळीतील असल्यामुळे शेतकऱ्यांसाठी काही निर्णय होऊ शकतील अशी त्यांची भावना होती. शेतीच्या संदर्भातील जे दर आहेत ते केंद्र शासनाच्या मार्फत ठरविण्याचे काम भविष्य काळात होईल अशी मला खात्री आहे.

सभापती महोदय, ऊसासारखे नगदी पीक पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात घेतले जाते. विदर्भात सुध्दा मोठ्या प्रमाणावर ऊस उत्पादक शेतकरी आहेत. ऊसाला चांगला हमीभाव मिळण्यासाठी अनेक वेळा आंदोलने झालेली आहेत. ऊसाकडे नगदी पीक म्हणून पाहिले जाते. ऊसाला हमीभाव मिळाला पाहिजे यादृष्टीने शासनाने पावले उचलली पाहिजेत अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, विदर्भामध्ये धान मोठ्या प्रमाणावर होते. परंतु राईस मिलच्या लॉबीमुळे धान उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव मिळत नाही. सरकारने ही राईस मिल लॉबी मोडीत काढून त्यावर नियंत्रण आणले पाहिजे. विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांना चांगला हमी भाव मिळाला पाहिजे अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

सभापती महोदय, द्राक्षासारखे महत्वाचे पीक आहे. द्राक्षावर संशोधन करण्यासाठी पुणे येथे एक संशोधन केंद्र उभारले आहे. त्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या दृष्टीने कोणते काम करण्यात येते याचा आढावा घेतला पाहिजे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांची शेती पावसावर अवलंबून आहे. चांगला पाऊस झाला तर नदीला पूर येतो, नदीला पूर आला की आमच्या विहिरींना पाणी लागते आणि आमच्या शेताला पाणी मिळते अशी आमच्या येथील शेतकऱ्यांची अवस्था आहे. निसर्गसुध्दा प्रत्येक वेळेला शेतकऱ्यांना साथ देतो असे नाही. कधी खूप पाऊस पडतो तर कधी पावसाचा दुष्काळ असतो. या वर्षी विदर्भात काही ठिकाणी चांगला पाऊस झाला तर काही ठिकाणी ओला दुष्काळ पडला. परंतु ज्या ज्या वेळी शेतकरी अडचणीत आला त्या त्यावेळी आघाडी सरकारने शेतकऱ्यांना मदत करण्याचा निर्णय घेतलेला आहे. आमचे आदरणीय नेते माननीय श्री.शरद पवार साहेब हे केंद्रात कृषी मंत्री आहेत. महाराष्ट्रातील शेतकरी अडचणीत आल्यास ते लगेच राज्य शासनाला शेतकऱ्यांना मदत करण्याच्या सूचना देतात.

सभापती महोदय, कांद्याचा भाव असो, कापसावर पडलेला लाल्या रोगाचा विषय असो किंवा अन्य कारणामुळे शेतकऱ्यांच्या पिकाचे झालेले नुकसान असो, शेतकऱ्यांना तातडीने मदत करण्याची भूमिका केंद्र अणि राज्य सरकारने घेतलेली आहे याचा उल्लेख मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, आपण शेतकऱ्यांसाठी असे काही केले म्हणून शेतकऱ्यांचे फार भले होते असे काही नाही. अडचणीत सापडलेला शेतकरी पुन्हा कसा उभा राहील अशी राज्य शासनाची भूमिका राहिलेली आहे आणि ही भूमिका आगामी काळात देखील राहील अशी मला आशा वाटते.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

महोदय, शेतकरी दरवर्षी खरीप व रब्बी हंगामात पेरणी करतो. त्यावेळी त्याला कर्ज काढावे लागते. अशा प्रकारे अनेक शेतकऱ्यांनी कर्जे घेतलेली होती. देशाला स्वातंत्र्या मिळून 60-65 वर्षांचा कालावधी लोटला आहे. या कालावधीत कधी ऐतिहासिक निर्णय झाला नव्हता. परंतु माननीय केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार साहेबांच्या प्रयत्नांनी या देशातील शेतकऱ्यांचे 72 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याचा क्रांतिकारक निर्णय घेण्यात आला. त्या निर्णयाच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांचे कर्ज माफ झालेले आहे.

महोदय, यापुढे जाऊन राज्य सरकारने दोन पावले टाकली. राज्यातील जे शेतकरी 50 हजार रुपयांपर्यंत कर्ज घेतील त्यांना शून्य टक्के व्याज दराने आणि जे 1 लाख रुपयांपर्यंत कर्ज घेतील त्यांना 2 टक्के व्याज दराने कर्ज देण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय यासाठी क्रांतिकारक आहे की, जे छोटे शेतकरी आहेत, शेवटचे शेतकरी आहेत त्यांना या निर्णयामुळे न्याय मिळाला आहे. त्यांना आपली शेती करता आली पाहिजे, शेतीतून उत्पादन घेता आले पाहिजे, हा उद्देश आहे. अशा प्रकारे हा निर्णय घेऊन शेतकऱ्यांना बळकट करण्याचा निर्णय घेतला आहे. किंबहुना शेतकऱ्यांच्याच हिताच्या दृष्टीने तो घेतला आहे. त्या निर्णयाचा फायदा हजारो शेतकऱ्यांना होत आहे याचा आम्हाला आनंद वाटतो.

महोदय, राज्य सरकारची अल्प व्याज दराची योजना असली तरी अजूनही ग्रामीण भागात काही शेतकरी सावकारांकडून कर्ज घेतात. अशा सावकारांचे समूळ उच्चाटन झाले पाहिजे. सावकारी नष्ट झाली पाहिजे यासाठीच सावकारी प्रतिबंधक विधेयक मंजूर करणे आवश्यक आहे. मराठवाडा, विदर्भ हा एकसंघ राहतो आहे. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र हा आमचा आहे. कारण आम्ही महाराष्ट्राचे नागरिक आहोत, मराठी नागरिक आहोत. भविष्यात राज्यातील सर्व विभागांना सारखाच न्याय मिळाला पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करतो. विदर्भातील एकही शेतकरी आत्महत्या करणार नाही, या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करुन त्याला उभा किंवा प्रगत करण्याचे काम निश्चितपणे कृषी विभागाकडून करण्यात येईल अशी माननीय मंत्री महोदयांकडून अपेक्षा करतो व येथेच थांबतो.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचे मुद्दे

(पुढे सुरु.....)

श्री.रमेश शेंडगे: सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, मी या विषयावर काल औचित्याचा मुद्दा दिला होता. परंतु आज औचित्याचे मुद्दे ज्यावेळी चर्चेला घेण्यात आले त्यावेळी मी सभागृहात उपस्थित नव्हतो. मी माननीय सभापतींना भेटून हा मुद्दा उपस्थित करण्याबाबत विनंती केली. त्यांनी मला हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी दिलेली आहे. त्यामुळे आपण मला तो मुद्दा मांडण्याची अनुमती द्यावी.

महोदय, महाराष्ट्र राज्यामध्ये धनगर समाजाचा समावेश केंद्र सरकारने अनुसूचित जमाती प्रवर्गामध्ये केलेला आहे. परंतु 'धनगर' आणि 'धनगड' असा शब्दांचा अपभ्रंश करण्यात आला. केंद्र सरकारच्या अनुसूचित जनजातीच्या यादीमध्ये 'धनगर' आणि 'धनगड' या दोन्ही जाती नमूद आहेत. पूर्वीच्या यादीमध्ये 'धनगड' असे नमूद केले होते. परंतु आता नवीन यादीमध्ये 'धनगर' नमूद केले आहे. उत्तरेकडे 'र' चा उच्चार 'ड' असा केला जातो. माननीय श्री.मुरली देवरा यांचा उल्लेख उत्तरेमध्ये 'मुरली देवडा' असा केला जातो. बलराम जाखर यांचा उल्लेख 'बलराम जाखड' असा केला जातो. तशाच प्रकारे 'धनगर' ला 'धनगड' असे म्हटले गेले. परंतु राज्य सरकारने 'धनगर' आणि 'धनगड' या दोन जाती वेगवेगळ्या आहेत असे सांगून धनगर समाजाला सवलती नाकारल्या आहेत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आम्हाला ज्या सवलती दिलेल्या होत्या त्या सवलती 'र' आणि 'ड' या अक्षरांमुळे नाकारण्यात आल्या आहेत. मी पुन्हा सांगू इच्छितो की, 'धनगर' आणि 'धनगड' असा शब्दांचा अपभ्रंश करण्यात आलेला आहे. केंद्र सरकारच्या जनजाती आयोगाच्या 2008 पासून आतापर्यंतच्या अहवालामध्ये मुद्रांक शुल्काचा जो बदल झाला आहे त्या बाबत राज्याचा जो अहवाल आलेला आहे त्यामध्ये 'धनगर' या जातीचा समावेश अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये झालेला आहे. त्या पलीकडे सांगायचे झाल्यास 1881, 1931 मध्ये ब्रिटिशांनी जनगणना करुन धनगर समाजाचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये केला. स्वातंत्र्यानंतर हीच यादी भारतीय संविधानाने 1950 मध्ये स्वीकारली. त्यानंतर 1955-56 मध्ये मागासवर्गीय समाजासाठी पहिल्यांदा कालेलकर आयोग गठीत करण्यात आला. त्या आयोगाने सुध्दा धनगर समाज हा अतिमागास असल्याचा अहवाल केंद्र सरकारला दिला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

आज आमच्या धनगर समाजाचा मोर्चा निघाला होता. जवळजवळ 50 ते 60 हजार लोक त्यामध्ये सहभागी झाले होते. राज्याच्या संपूर्ण भागातून लोकप्रतिनिधी आले होते. मी सुध्दा त्या मोर्चात सहभागी होण्यासाठी गेलो होतो. आमच्या समाजाची भावना अतिशय तीव्र आहे. धनगर समाजाला अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करण्यासंदर्भात आम्ही अनेक पुरावे राज्य व केंद्र सरकारला दिलेले आहेत. विधानसभा सदस्यांनी देखील अशा प्रकारचे अनेक पुरावे दिलेले आहेत. काल मी माननीय मुख्यमंत्री यांच्यासोबत चर्चा केली. माननीय श्री.अजितदादा पवार, माननीय श्री.हर्षवर्धन पाटील यांच्यासोबत चर्चा सुध्दा चर्चा केलेली आहे. आदरणीय श्री.पवार साहेबांनी आमच्या मोर्चासमोर येऊन जाहीर केले आहे की, धनगर समाजाला सवलती देण्यासाठी आटोकाट प्रयत्न करण्यात येतील. परंतु या संदर्भात जोपर्यंत राज्य शासनाकडून केंद्र सरकारकडे शिफारस केली जात नाही तो पर्यंत काही होणार नाही. 1981 मध्ये केलेली शिफारस रद्द करण्यात आली. ती का रद्द केली याचे कारण आम्हाला माहीत नाही. केंद्र सरकार म्हणते की, राज्य सरकारकडून शिफारस आली की, आम्ही सवलती लागू करु.

महोदय, आम्हाला आदिवासींच्या हिश्श्यातून सवलती नकोत. धनगर समाज एनटीमध्ये येतो. त्यांच्यासाठी 3.5 टक्के आरक्षण आहे. हे 3.5 टक्के आरक्षण एसटीमध्ये डायव्हर्ट करुन आम्हाला सवलती द्याव्यात. मी पुन्हा सांगतो की, कोणाच्या वाट्याचे आम्ही घेणार नाही. हा अतिशय गहन आणि जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. माझ्या वडिलांच्या काळापासून आम्ही यासाठी दऱ्या-खोऱ्यांमध्ये लढत आहोत. धनगर समाजाचा अनुसूचित जमातीच्या यादीमध्ये समावेश झालेला असल्यामुळे त्या बाबतची अंमलबजावणी तातडीने करावी अशी मी पोटतिडकीने विनंती करतो.

नंतर श्री.खंदारे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आमचे पक्षप्रमुख आदरणीय उद्ध्वजी ठाकरे यांनी हा विषय मुद्दाम सांगितला होता. ते माझ्याही लक्षात नव्हते. ते म्हणाले होते की, ड आणि र मुळे किती तरी लोकांचे नुकसान झालेले आहे. त्यांना कोणी तरी भेटले असतील त्याची मला आठवण झाली. आपल्या महाराष्ट्रातील धनगर समाज एखाद्या ड आणि र मुळे वंचित झालेला आहे. तुम्हाला सभागृहात कधी संधी मिळाली तर यावर अवश्य बोला असे त्यांनी मला सांगितले होते. सन्माननीय सदस्यांनी ब्रिटिश काळापासून काय झाले आहे ते सर्व मांडलेले आहे. माझी अशी विनंती आहे की, आपण निर्देश द्यावे की शासनाने आपले मत केंद्र सरकारला कळवावे. केंद्र सरकार महाराष्ट्रासाठी ड चा र असा बदल करुन पाठवील. त्यानंतर राज्य शासनाने पाठपुरावा केला तर ते नक्की होईल. शब्दांमध्ये फेरफार झाल्यामुळे एक समाज वंचित राहिलेला आहे. इतर राज्यात धनगर समाजाला अनुसूचित जमातीच्या सवलती मिळत आहेत, या राज्यात मिळत नाही.

तालिका सभापती (ॲड.अनिल परब) : जर एखाद्या शब्दामुळे एखादा समाज वंचित राहत असेल तर शासनाने याबाबत ताबडतोब उचित व योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या या विषयासंबंधीच्या भावना माननीय मुख्यमंत्र्यांकडे मांडून तशा प्रकारची राज्य सरकारने शिफारस करावी अशी त्यांना विनंती करण्यात येईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कृषी क्षेत्रातील विविध अडचणींमुळे शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या

मु.शी.: कृषी क्षेत्रातील विविध अडचणींमुळे शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, नागो पुंडलिक गाणार, भगवानराव साळुंखे, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु.....)

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आज अंतिम आठवडा प्रस्तावाच्या अनुषंगाने विदर्भातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय उपस्थित करण्यात आलेला आहे. या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

शेतकऱ्यांच्या जीवनाचा विचार करणारा हा प्रस्ताव आहे. यामध्ये कापूस, सोयाबीन, धान, संत्रा, बेदाणा, द्राक्ष इतक्या पिकांचा समावेश केला असला तरी शेतकऱ्यांची जी अवस्था निर्माण झालेली आहे त्याचे दिग्दर्शन करणारा हा प्रस्ताव आहे. अशा प्रकारचे प्रस्ताव या विधिमंडळात आजपर्यंत आले नव्हते का ? मी या विधिमंडळात 1978 पासून कामकाज करीत आहे. या विधिमंडळात अशा प्रकारचे शेतकऱ्यांसंबंधीचे प्रस्ताव आलेले आहेत. कधी उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाला पाहिजे, कधी शेतीला हमी भाव मिळाला पाहिजे अशा प्रश्नांवर चर्चा झालेल्या आहेत.

सभापती महोदय, आमचे दुर्दैव आहे की, शेतकऱ्यांचा हा प्रश्न ऐरणीवर कधी आला ? ज्यावेळी विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ लागल्या आणि त्याचा आकडा फुगत फुगत 5 हजारापर्यंत पोहोचला त्यावेळी देशाचे केंद्र सरकारही हादरले. त्यानंतर आमच्या विदर्भात पंतप्रधानांना यावे लागले. पंतप्रधान 3 दिवस विदर्भात होते.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

त्यावेळी आम्ही पंतप्रधानाना भेटलो होतो. पंतप्रधानांनी विदर्भातील परिस्थिती पाहिली आणि 3750 कोटी रुपयाचे पॅकेज विदर्भाला जाहीर केले. त्या पॅकेजचे काय झाले ? पंतप्रधानांनी पॅकेज जाहीर केल्यानंतर त्याच वर्षी नागपूरला राज्याचे हिवाळी अधिवेशन झाले आणि त्या अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी 1000 कोटी रुपयाचे पॅकेज जाहीर केले. केन्द्र सरकारचे 3750 कोटी रुपये आणि राज्याचे 1000 कोटी रुपये असे मिळून 4750 कोटी रुपयाचे पॅकेज विदर्भाला देण्याचा प्रयत्न झाला. हे पॅकेज दिल्यानंतर शेतक-यांच्या आत्महत्या थांबल्या का ? दिलेल्या पॅकेजचे काय झाले, ते कसे वापरले, ताडपत्री आणि अन्य वस्तू कशा पध्दतीच्या देण्यात आल्या याचे प्रदर्शन आम्ही भरविले हाते. या आत्महत्या थांबल्या नाहीत. आत्महत्यांचा आकडा आता 10 हजारापर्यंत गेलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्या प्रमाणे 1 जानेवारी ते डिसेंबर पर्यंतच्या एका वर्षामध्ये 750 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. या आत्महत्या का होतात याच्या मुळाशी जायला सरकार तयार नाही. सरकारचे खरे दुखणे हेच आहे. पॅकेजची मलमपट्टी करुन शेतकऱ्याला वाचविण्याचा प्रयत्न केला जाणार असेल तर हे आत्महत्याचे सत्र थांबणार नाही. ते वाढतच राहील. हा प्रस्ताव शेतकऱ्यांच्या नसेवर बोट ठेवणारा आहे. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी सांगितले की, महाराष्ट्र सरकारने शेतक-यांना इतक्या सवलती दिल्या आहेत, इतकी मदत केली आहे की देशात कोणत्याही राज्याने तितकी मदत शेतकऱ्याला केली नाही. देशात महाराष्ट्र सरकार असे आहे की त्या सरकारने शेतकऱ्याला हातभार लावलेला आहे.

सभापती महोदय, देशाला स्वातंत्र्य मिळाले. भारत हा कृषी प्रधान देश आहे असे म्हटले जाऊ लागले. देशातील 70 ते 75 टक्के लोक शेती करतात. देश स्वतंत्र झाल्यानंतर महात्मा गांधीनी असे म्हटले होते की, हिंदुस्थान आता स्वतंत्र झालेला आहे. या स्वतंत्र हिंदुस्थानाचा विकास करावयाचा असेल तर खेडयाकडे चला. प्रथम खेड्याचा विकास करा. 7 लाख गावाचा विकास झाला तर हिंदुस्थानचा विकास आपोआप होईल. शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग तालुक्या तालुक्यामध्ये उभे करा, शेतकऱ्याला त्या कारखानदारीचे मालक करा, शेतकऱ्याच्या शेतीला उद्योगाचे स्थान द्या असे सांगितले. परंतु हे झाले नाही. शेतकऱ्याच्या शेतीला प्रथम स्थान

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

दिले गेले नाही. शेतीला कनिष्ठ दर्जा देण्यात आला आणि शेतकऱ्याचे दुखणे तेथून सुरु झाले. शेती ऐवजी उद्योगाला प्रथम दर्जा देण्यात आला. पाणी, वीज आणि अन्य सवलती या उद्योगासाठी प्रथम देण्यात आल्या आणि शेतकऱ्याला मात्र पाणी, वीज आणि अन्य सवलतीपासून वंचित ठेवण्यात आले.

सभापती महोदय, कारखान्यात तयार होणाऱ्या मालाची किंमत ठरविण्याचे अधिकार कारखान्याच्या मालकाला असतात. परंतु शेतक-याला शेतात तयार होणाऱ्या मालाची किंमत ठरवता येत नाही. केवळ मलमपट्टी करुन शेतक-याचे दारिद्र्य दूर होणार नाही. या शेतक-यांना कशासाठी पॅकेज देता. फक्त एकच गोष्ट शासनाने करावी. शेतकऱ्याच्या शेतीला उद्योगाचा दर्जा द्यावा, त्याच्या शेतीला पुरेसे पाणी द्यावे, वीज द्यावी, त्याच्या मालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव द्यावा. या गोष्टी शेतकऱ्याला दिल्या तर शेतकरी तुमच्याकडे भीक मागणार नाही. परंतु आपल्या देशात हे होत नाही. महाराष्ट्रामध्ये हा आत्महत्येचा आकडा 10 हजारावर पोहोचला असला तरी देशपातळीवर हा आकडा दीड लाखाच्यावर गेलेला आहे. देशामध्ये दरवर्षी दीड लाख आत्महत्या होतात असे एका प्रश्नाच्या उत्तरामध्ये मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

सभापती महोदय, या प्रस्तावाचा मूळ गाभा काय आहे ? शेतकऱ्यांच्या शेत मालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाला पाहिजे, हा या प्रस्तावाचा मूळ गाभा आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग वित्तमंत्री असताना ज्यावेळी संसदेत शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा झाली त्यावेळी स्वामिनाथन आयोगाची स्थापना करण्यात आली होती. मी त्यावेळी संसदेत होतो. स्वामिनाथन आयोगाचा अहवाल शासनाला सादर झाला. इतर आयोगांचे अहवाल येतात आणि आपण ते अहवाल कार्यान्वित करतो. मग स्वामिनाथन आयोगाचा अहवाल अडगळीत का पडलेला आहे ? स्वामिनाथन आयोगाने आपल्या अहवालात शेतकऱ्यांच्या संदर्भात ज्या शिफारशी केलेल्या आहेत त्या का लागू होत नाहीत, हे आम्हाला कळत नाही.

शेतकऱ्यांच्या शेत मालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाला पाहिजे, अशी आम्ही मागणी करतो. विदर्भ, मराठवाडा आणि खान्देशातील कापूस हे मुख्य पीक आहे, नगदी पीक आहे. परंतु मागील 15 वर्षापासून कापूस उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था अत्यंत वाईट झालेली आहे. शासनाने त्यांच्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. आज कापूस हे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पीक झालेले आहे, असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. यावर्षी जवळपास 37 लाख हेक्टर क्षेत्रावर कापूस पिकाची लागवड करण्यात आलेली आहे. मागील वर्षापेक्षा यावर्षी कापूस पिकाचा पेरा 2 लाख हेक्टरने घटलेला आहे. यावर्षी सोयाबीन पिकाचा पेरा 2 लाख हेक्टरने वाढलेला आहे. परंतु जरी सोयाबीन पिकाचा पेरा 2 लाख हेक्टरने वाढला असला तरी सोयाबिनचा भाव मात्र वाढलेला नाही. आज राज्यात 37 लाख हेक्टर क्षेत्रावर कापूस पिकाची लागवड करण्यात आलेली आहे. परंतु कापसाचा भाव काय आहे ? केंद्र शासनाने आखूड धाग्याच्या कापसाला 3800 रुपये हमी भाव जाहीर केलेला आहे आणि लांब धाग्याच्या कापसाला 4 हजार रुपये हमी भाव जाहीर केलेला आहे. आपल्या राज्यात कापूस पणन महासंघ आहे. कापूस पणन महासंघामार्फत हमी भावाने कापसाची खरेदी केली जाते, म्हणून राज्यात यावर्षी 100 कापूस खरेदी केंद्रे सुरु करण्यात आली. परंतु आतापर्यंत शेतकऱ्यांनी कापसाच्या एका बोंडाची देखील पणन महासंघात विक्री केलेली नाही. बाजारात कापसाला प्रती क्विंटल 4200 ते 4500 रुपये भाव मिळतो. व्यापारी कापसाला प्रती

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

क्विंटल फक्त 300 रुपये जास्त भाव देत आहेत. कापूस उत्पादक शेतकरी 300 रुपयांसाठी पणन महासंघाला कापूस न देता व्यापाऱ्याला देतात.

सभापती महोदय, आपल्या राज्यातील कापूस आंध्र प्रदेश, गुजरात राज्यात जातो. आज गुजरात राज्यात कापसाला प्रती क्विंटल 5 हजार रुपये भाव आहे. मी परवा या संदर्भात चौकशी केली. विदर्भातून गुजरात राज्यात कापूस नेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रती क्विंटल 300 रुपये खर्च येतो. गुजरात राज्यात कापसाला प्रती क्विंटल 5 हजार रुपये भाव मिळत असल्यामुळे विदर्भातील शेतकरी गुजरात राज्यात कापूस नेतात आणि तेथे कापसाची विक्री करतात, अशी परिस्थिती आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मघाशी कापूस उत्पादक शेतकऱ्यांना येणाऱ्या खर्चाची माहिती सांगितली. आता बाजारात बी.टी. बियाणे आलेले आहे. ज्यावेळी बी.टी. बियाणे बाजारात आले त्यावेळी असे सांगितले गेले की, बी.टी. बियाणे खूप उत्पादन देणारे बियाणे आहे. बी.टी. बियाण्यांच्या पिकावर कीड पडणार नाही, कोणत्याही प्रकारचा रोग पडणार नाही. शेतकऱ्यांना बी.टी. बियाण्यांच्या पिकावर कोणत्याही प्रकारची फवारणी करावी लागणार नाही. परदेशातून आलेले महागडे बी.टी. बियाणे शेतकऱ्यांच्या माथी मारले गेले. आज बी.टी. बियाण्याची काय अवस्था आहे ? विदर्भात बी.टी. बियाण्यांच्या पिकावर 13 ते 14 वेळा फवारणी करावी लागते. आज कीटकनाशकांचे भाव एवढे वाढलेले आहेत की, शेतकऱ्यांनी आत्महत्या करावयाचे म्हटले तरी तो कीटकनाशक पिऊन आत्महत्या करीत नाही तर आता तो फाशी घेऊन आत्महत्या करतो. कीटकनाशकांचे भाव मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहेत. शेतकऱ्यांना पिकांवर जवळपास 14 वेळा फवारणी करावी लागते. खतांचे भाव देखील वाढलेले आहेत. पूर्वी 200 ते 250 रुपयांना मिळणारी खताची एक गोणी आता 1300 रुपयांना मिळते.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)

यानंतर श्री.भोगले.....

अशुधीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

उत्पादन करण्यासाठी लागणाऱ्या वस्तूंचे भाव दिवसेंदिवस वाढत आहेत. बियाण्यांचे भाव वाढले आहेत. बियाण्यांची परिस्थिती मंत्री महोदयांना माहिती आहे. या संदर्भात या सभागृहात अनेकदा चर्चा झालेली आहे. राज्यामध्ये बियाणे महामंडळाची निर्मिती करण्यात आलेली आहे. हे महामंडळ म्हणजे पांढरा हत्ती आहे. या महामंडळाची निर्मिती करण्यामागे उद्देश हा होता की, राज्यातील शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे पुरविले जावे. आज बियाणे महामंडळ काय करीत आहे? बियाणे महामंडळाचे उत्पादन शेतकरी घेत नाहीत. कारण बाजूच्या प्रदेशातील कॉटन मार्केट किंवा बाजार समितीमधून शेतकऱ्यांचा माल खरेदी केला जातो, तो या ठिकाणी आणून थैल्यांमध्ये भरण्यात येतो आणि महामंडळाचे उत्कृष्ट बियाणे म्हणून शेतकऱ्यांना विक्री केली जाते हे अनेकदा सिध्द झाले आहे. या सभागृहात मध्यप्रदेश कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पावत्या आणून दाखविल्या आहेत. शेतकऱ्यांचा खरेदी केलेला माल सर्टिफाईड नव्हता. तो शेतकऱ्यांच्या माथी मारण्याचा प्रयत्न होतो.

सभापती महोदय, या राज्याचे कृषी विद्यापीठे आहेत. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने 468 जातीचे एक वाण शोधून काढले, त्यानंतर एकही नवीन वाण निर्माण झालेले नाही. कृषी विद्यापीठांकडून दर्जेदार संशोधन झालेले नाही. परदेशातील वाणांवर शेतकऱ्यांना अवलंबून रहावे लागते. बियाणे महामंडळ उत्कृष्ट दर्जाचे बियाणे म्हणून शेतकऱ्यांची फसवणूक करीत असेल तर शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र थांबू शकत नाही. शेतकरी शेतात महागडे बियाणे पेरतो, ते उगवले नाही तर त्याच्यापुढे आत्महत्येशिवाय पर्याय नसतो. कापूस उत्पादक शेतकऱ्याचे दुसरे दुखणे म्हणजे कापसावरील निर्यात बंदी हे आहे. हिंदुस्थानातील कापूस बाहेरच्या प्रांतात पाठविला जात नाही. परदेशातील कापूस आपल्या देशात आयात होतो. त्यामुळे कापसाचे भाव पडतात. परदेशातील कापसावर इंपोर्ट ड्युटी कमी लावली जाते. आपला कापूस निर्यात झाला तर त्यातून शेतकऱ्यांना जास्त भाव मिळू शकतो. असे धोरण आजपर्यंत सरकारने आखलेले नाही. एका बाजूला कापूस उत्पादक शेतकऱ्याचा उत्पादन खर्च महागाईमुळे वाढत चालला आहे. त्या प्रमाणात त्याच्या मालाचा भाव वाढत नाही, हे त्याचे दु:ख आहे. त्यांचे अर्थकारण बिघडत आहे. आज कापसाची शेती हा घाट्याचा सौदा सुरु आहे. तो शेतात जे घालतो त्या मानाने पीक येत नाही. कापूस उत्पादक शेतकऱ्याची शेती हा आतबट्टयाचा धंदा झालेला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

सभापती महोदय, विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये सिंचन कमी आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांना निसर्गाच्या भरवशावर शेती करावी लागते. पीक आले तर भरपूर येते नाही तर दुष्काळ पडतो. यावर्षी इतका पाऊस झाला की शेतकऱ्याचे पीक नष्ट झाले. कधी पावसामुळे पीक जाते, तर कधी कापसाच्या पिकावर अनेक प्रकारच्या रोगाचा प्रादुर्भाव होतो. विदर्भामध्ये लाल्या नावाचा रोग प्रसिध्द आहे. कापसावर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाला की पीक संपले म्हणून समजा. बीटी बियाणे तुम्ही आणले त्यावर रोग पडणार नाही असे सांगितले होते. आता कापूस पिकावर लाल्या रोग येणार नाही अशी कोणी हमी देऊ शकत नाही. कशाकरिता शेतकऱ्यांची फसवणूक केली? बियाणे महामंडळाच्या माध्यमातून उत्कृष्ट बियाणे न पुरविता निकृष्ट दर्जाचे बियाणे पुरविले जाते. कृषी विद्यापीठाकडून कापसावर संशोधन केले जात नाही. कापूस संशोधन केंद्रांकडून चांगल्या वाणाचे संशोधन केले जात नाही, शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून दिले जाते.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

नंतर 4 सी.1....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

सभापती महोदय, उत्पादन खर्च कसा काढतात हे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले आहे. माननीय श्री.विखे-पाटील साहेब आपण शेतमाल भाव समितीचे अध्यक्ष आहात. या वर्षी आपण कापसाला रूपये 6068 आणि आखूड धाग्याला रूपये 5100 भाव द्यावा अशी शिफारस केंद्र शासनाला केली. आपण केंद्राला शिफारस केल्यानंतर केंद्राच्या कृषि मूल्य आयोगाने काय केले ? त्यांनी आखूड धाग्याला 3800 रूपये आणि लांब धाग्याला 4000 रूपये हमीभाव देण्याचे मान्य केले. उत्पादन खर्चाची आकडेवारी सांगितली तर असे दिसून येईल की, उत्पादन खर्च वर चालला असून उत्पादन कमी होत चालले आहे. आपण चार हजार रूपये क्विंटलचा भाव दिलेला आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना योग्य भाव मिळण्यासाठी आपण आपले वजन दिल्लीला का खर्च करत नाही ?

मी सन्माननीय कृषि मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांना सांगू इच्छितो की, 1995 मध्ये युती शासन महाराष्ट्रात आले त्यावेळी कापसाचा भाव 1400 रूपये होता. युतीच्या जाहीरनाम्यात कापसाला 2100 रूपये भाव देण्याची घोषणा केली होती. माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी अकोल्याच्या सभेत ही घोषणा केली. युतीचे सरकार आले तेव्हा पणन महासंधाचा मी अध्यक्ष होतो. त्यावेळी सहकार मंत्री डॉ.मुंदडा व नंतर श्री.रावते साहेब देखील होते. कापसाला भाव देण्याचा विषय सुरू झाला तेव्हा माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी श्री.मनोहर जोशी आणि श्री.गोपीनाथ मुंडे यांना सांगितले की, काहीही चालणार नाही युती शासनाच्या जाहीरनाम्याप्रमाणे कापसाला 2100 रूपये भाव दिलाच पाहिजे. 2100 रूपये भावाची घोषणा केल्यानंतर महाराष्ट्राच्या इतिहासात खरेदी झाला नसेल एवढा कापूस युतीच्या काळात खरेदी झाला. दर दिवसाला दीड कोटी रूपयाचा कापूस जमा करून घेऊन पणन महासंघाने शेतकऱ्यांना पैसा दिला. केंद्राने कापसाला हमी भाव कमी दिला होता. परंतु, महाराष्ट्र सरकारने शेतकऱ्यांना रूपये 700 इतका अधिक भाव दिला व महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे जीवन उंचावण्याचा प्रयत्न केला. आज आपल्या सरकारने चार हजार रूपयांचा भाव दिला. तेव्हा आमची स्वामीनाथन समिती प्रमाणे भाव देण्यात यावा अशी मागणी आहे. स्वामीनाथन आयोगाची अशी शिफारस आहे की, उत्पादन खर्च अधिक 50 टक्के नफा द्यावा. आपण 6068 इतका हमी भाव द्यावा अशी मागणी केली असेल तर त्यात अधिक 50 टक्के मिळवावेत किंवा केंद्र शासनाने 4000 रूपयांचा हमी भाव जाहीर केला असेल तर

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

त्यात 50 टक्के नफा अधिक मिळविल्यास तो भाव देखील सहा हजार रूपये इतका येतो. तेव्हा आपण कापसाला रूपये 6000 इतका हमी द्यावा. आम्ही आमच्या पदरचा आकडा सांगत नाही. किमान भावासंबंधी तरी स्वामीनाथन समितीच्या शिफारशींचा आदर करावा. हा आयोग माननीय पंतप्रधानांनी नेमला असून त्या आयोगाने ही शिफारस केली आहे. हमी भाव अधिक पन्नास टक्के नफा एवढा जरी भाव दिला तर मग शेतकऱ्याला थोडा आधार दिल्या सारखे होईल. आपल्या समितीने सोयाबीनसाठी रूपये 3957 इतक्या भावाची शिफारस केली आहे. त्यात अधिक 50 टक्के नफा मिळवावा. त्याचा भाव रूपये 6000 पर्यंत जातो. आम्ही साडेचार हजार रूपयांची मागणी केली आहे. याचे कारण असे की, मागील 2-3 वर्षातील बाजारपेठेतील आकडा आम्ही पाहिला. त्यामुळे आपण सोयाबीनला किमान साडेचार हजार रूपये भाव दिला पाहिजे. आज कमी दर्जाच्या धानाचा भाव रूपये 1310 आहे. यासाठी रूपये 2609 इतका भाव देण्यात यावा अशी शिफारस करण्यात आली होती. त्यात नफ्याचे 50 टक्के मिळविल्यास धानाचा रूपये 4000 इतका भाव निघतो.

यानंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

हमी भाव जाहीर करतांना कृषी मूल्य आयोगाने बाजार भावाचाही विचार केला पाहिजे. पंजाबमध्ये शेतकऱ्याने गव्हाच्या ऐवजी मका लावला तर शेतकऱ्याला 10 हजार रुपये अनुदान दिले जाते. छत्तीसगड राज्यात शेतकऱ्यांनी धानाच्या ऐवजी मका लावला तर शेतकऱ्याला 2500 रुपये अनुदान दिले जाते. इतर राज्याप्रमाणे आपल्या राज्यात कापसाच्या ऐवजी सोयाबीन लावले तर शेतकऱ्याला अनुदान दिले जाणार आहे काय ?

सभापती महोदय, या वर्षी 39 लाख हेक्टर क्षेत्रामध्ये सोयाबीनची लागवड करण्यात आली आहे. गेल्या वर्षी संपूर्ण देशातील सोयाबीनचे उत्पादन 123 लक्ष मे.टन झाले होते. यावर्षी 156 लक्ष मे.टन सोयाबीनचे उत्पादन होईल असा अंदाज वर्तवण्यात आला होता परंतु अंदाज चुकला. पाऊस खूप झाल्यामुळे सोयाबीनचे नुकसान झाल्यामुळे या वर्षी केवळ 102 लक्ष मे.टन उत्पादन झाले. या वर्षी 54 लक्ष मे.टन सोयाबीनचे उत्पादन कमी झाले. मागच्या वर्षी सोयाबीनचे उत्पादन जास्त झाले तरी सोयाबीनचा भाव 4200 रुपये होता परंतु या वर्षी सोयाबीनचे उत्पादन कमी झाले असतांना 3500 रुपये भाव आहे. सोयाबीनचे उत्पादन जास्त होते त्यावेळेस जास्त भाव आणि उत्पादन कमी झाले असतांना कमी भाव का ? ज्यावेळेस शेतकऱ्याच्या घरात सोयाबीन आले तेव्हा 3500 रुपये भाव होता आता शेतकऱ्याच्या घरातील सोयाबीन हळू हळू गेल्यावर सोयाबीनचा भाव 3800 रुपये झाला आहे. पेरा वाढला परंतु उत्पादन घटले. उत्पादन कमी झाल्यानंतरही भाव कमी झाले याचे गणित माननीय मंत्री महोदयांनी आम्हाला समजून सांगण्याची आवश्यकता आहे.

गॅट करारात सांगितले आहे की, खाद्य तेल आयात करावयाचे असेल तर 300 टक्क्यापर्यंत आयात शुल्क लावता येते. मघाशी विरोधी पक्ष नेत्यांनी उल्लेख केला की, माननीय अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात खाद्य तेल आयात केले त्यावेळेला 40 टक्क्यापासून ते 90 टक्क्यापर्यंत आयात शुल्क लावल्यामुळे त्यावेळी मार्केटमधील मालाचे भाव टिकून असल्यामुळे शेतकऱ्याला योग्य भाव मिळत होता. आज मात्र तशी परिस्थिती राहिली नाही. या देशाच्या कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष श्री. गुलाटी आहेत. त्यांनी सरकारला सुचविले होते की, तुम्हाला जर तेलबिया आयात करावयाच्या असतील तर किमान 15 टक्के तरी आयात शुल्क लावले गेले पाहिजे. परंतु सरकारने आयात तेलबियावर आयात शुल्क लावले नाही. आपल्या शेतकऱ्याच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

मालाला खरोखरच भाव द्यावयाचा असेल तर माननीय मंत्री महोदय आपण केंद्र सरकारला शिफारस करा की, किमान कापूस,सोयाबीन आणि धान या गोष्टी आयात करावयाच्या असतील तर त्यांच्या आयात शुल्कात वाढ करावी. असे करण्यामध्ये गॅट कराराने तुम्हाला अडवले नाही. परंतु कारखानदारांच्या दबावाखाली येऊन सरकार काम करणार असेल तर हे आयात शुल्क जास्त लावू शकत नाही. हे सरकार शेतकऱ्याला प्राधान्य देणार आहे की, कारखानदाराला प्राधान्य देणार आहे हे या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सांगण्याची आवश्यकता आहे. सन 2004 मध्ये सोयाबीनला 3100 रुपये भाव होता आणि आज 2013 मध्ये तोच भाव आहे. मार्केटमधील काही किमती 100 पटीने वाढल्या असतांना शेतकऱ्याच्या मालाची किंमत 8-9 वर्षापूर्वीचीच राहणार असेल तर शेतकरी कसा जगणार?

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

या वर्षी ऑगस्ट महिन्यापर्यंत 1 लाख 17 हजार मेट्रीक टन तेल आयात करण्यात आले त्यामुळे आपले 61 हजार कोटी रुपये परदेशात गेले. हाच पैसा आपल्या देशात राहिला असता आणि आपण तो शेतकऱ्यांना दिला असता तर आज आपल्या शेतकऱ्यांना सोयाबीनचा भाव पाच हजार रुपये मिळाला असता. आपण दुसऱ्या देशासाठी 61 हजार कोटी रुपये मोजतो. पण आपल्या देशातील शेतकऱ्यांना ते देत नाही याचे दु:ख आहे. आपली नियोजनाची दिशा चुकली आहे हे आपण मान्य करा किंवा करु नका. परंतु या देशाची नियोजनाची दिशा चुकली आहे. शेतकऱ्यांना कनिष्ठ दर्जा देण्यात आला म्हणून देशाला स्वातंत्र्य मिळून 65 वर्षे झाल्यानंतरही शेतकऱ्यांची ही अवस्था आहे. महात्मा गांधी यांनी सांगितल्याप्रमाणे शेतीला प्रमुख उद्योगाचे स्थान दिले असते तर आज शेतकऱ्यांवर आपल्याकडे भीक मागण्याची वेळ आली नसती. आपण उद्योगधद्यांना ज्या सवलती देता त्या सवलती शेतकऱ्यांना दिल्या असत्या तर शेतकऱ्यांवर भीक मागण्याची वेळ आली नसती.

सभापती महोदय, एक काळ असा होता की, आपणास सर्व धान्य परदेशातून आयात करावे लागत होते. दे दाता के नाम, तुझको अल्लाह रखे. हमको गेंहू दो. जवार दो, हमको मिलो दो असे म्हणावे लागत होते. पण आपल्या देशातील शेतकऱ्यांनी कंबर कसून, घाम गाळून आपल्या देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण केले. आपण हे क्रेडीट घ्यावे, आमचे काही म्हणणे नाही. आज आपला देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झालेला आहे. देशात दोन वर्ष दुष्काळ पडला तरी देशाला धान्याचा तुटवडा भासणार नाही इतके धान्य देशातील शेतकऱ्यांनी पिकविले आहे. आज त्या शेतकऱ्याला काय मिळाले आहे ? आपणास शेतकऱ्यांचे दु:ख दूर करायचे असेल तर आपण ज्या मलमपट्टया लावत आहोत त्या बंद कराव्यात. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी जे सांगितले त्याला माझा पाठिंबा आहे. आम्हाला पॅकेज वगैरे देऊ नका. आम्हाला वीज द्या. आम्ही फुकट वीज मागत नाही. आम्हाला पुरेशी वीज द्या. मागेल त्याला वीज द्या. आम्हाला लागेल तेवढी वीज द्या, पाणी द्या.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, आज सकाळी विदर्भातील आणि मराठवाड्यातील सिंचना संबंधी चर्चा झाली. मी या ठिकाणी राजकीय भाषण करणार नाही. मराठवाडा, खानदेश आणि विदर्भात सिंचन का वाढले नाही ? शेतकऱ्यांच्या शेतीला पुरेसे पाणी मिळाले असते, पुरेशी वीज मिळाली असती आणि शेतकऱ्यांच्या मालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळाला असता, त्यांच्या मालाला मार्केटची व्यवस्था करुन दिली असती, माल निर्यात करण्याची परवानगी दिली असती तर शेतकऱ्यानी कधीही आपल्याकडे मदतीची मागणी केली नसती. त्याच्यावर दहा संकटे आली असती तरी त्याला तो सामोरा गेला असता. त्याने आपल्याकडे कधीही मदतीची मागणी केली नसती. पण 65 वर्षामध्ये या मूळ दुखण्यावर विचार झाला नाही. आमची आजही मागणी आहे की, शेतीला प्रमुख उद्योगाचा दर्जा द्यावा. शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादन खर्चावर आधारित भाव द्यावा. संत्रा, द्राक्ष पिकांची देखील अशीच अवस्था आहे.आज महाराष्ट्रातील कोणत्याही प्रकारचे धान्य पिकविणारा शेतकरी सुखी नाही.

सभापती महोदय, शासनाच्या समितीने कितीही शिफारशी केल्या तरी कृषी मूल्य आयोग त्या शिफारशींचा काहीही विचार करीत नाही. या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. राज्याने कृषी मूल्य आयोगाला शिफारस केली असेल तेवढा भाव कृषी मूल्य आयोगाने दिला पाहिजे असे बंधन त्यांच्यावर घातले पाहिजे. आपण स्वामीनाथन समितीच्या शिफारशीप्रमाणे 50 टक्के नफा दिला तर कापूस उत्पादक शेतकऱ्यांना 9 हजार रुपये भाव मिळू शकतो. राज्य शासनाने कृषी मूल्य आयोगाकडे पाठविलेली शिफारस मान्य करण्यात आली नाही. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी आपले वजन दिल्लीत खर्च करावे व राज्य सरकार जेवढी शिफारस करील तेवढा भाव केंद्राच्या कृषी मूल्य आयोगाने शेतकऱ्यांना द्यावा असे त्यांना बंधनकारक करावे. परंतु असे होत नाही. आपण सुचविलेला भाव ते बदलतात. अशा प्रकारे भाव बदलणारे ते कोण आहेत ?

सभापती महोदय, मी खासदार असताना शेतकऱ्यांच्या मालाचा भाव ठरविणारे कृषी मूल्य आयोगाचे कार्यालय कसे असेल हे पाहण्यासाठी गेलो. आपला शेतकरी झोपडीत राहतो. शेतावर राहतो. मला वाटले अशीच कृषी मूल्य आयोगाची झोपडी असेल.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कृषी मूल्य आयोगाची 5 मजल्यांची इमारत वातानुकूलित आहे. जे कधीच शेतीवर जात नाहीत ज्यांना शेती विषयक ज्ञान नाही, जे कधीच रस्त्याने जात नाहीत असे वातानुकूलित इमारतीत बसणारे कृषी मूल्य आयोगाचे सदस्य शेत मालाचा भाव ठरवितात. ज्यांना शेतीचे ज्ञान नाही त्यांच्याकडून शेत मालाचा भाव ठरविला जात असेल तर आपण कदापि शेतकऱ्यांना न्याय देऊ शकणार नाही, असे मला वाटते.

सभापती महोदय, राज्य सरकारने कृषी मूल्य आयोगाला जी शिफारस केली होती ती शिफारस त्या आयोगाने मान्य केली नाही. त्यांच्यावर या आयोगाचा विश्वास नाही. मुळात राज्याचे कृषी मंत्री हे राज्य शेतमाल भाव समितीचे अध्यक्ष असतात. एका जबाबदार मंत्र्याच्या अध्यक्षतेखालील समितीला, त्यांच्या शब्दाला किंवा त्यांनी केलेल्या शिफारशीला केराची टोपली दाखविली जात असेल तर शेतकऱ्यांना कधीच न्याय मिळणार नाही. यासाठी राज्य सरकारने आपले धोरण बदलले पाहिजे. एवढेच नव्हे तर उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावयास पाहिजे. कारखान्यात निर्माण होणाऱ्या वस्तूचा भाव ठरविण्याचा अधिकार जसा त्या मालकाला असतो, तशाच प्रकारे शेती मालाचा भाव ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्याला दिला तर खऱ्या अर्थाने शेतकरी हा देशाचा मालक होऊ शकतो. परंतु या बाबतीत आपण निर्णय घेऊ शकत नाही.

महोदय, माझ्या मतदारसंघातील खामगांव येथे हिंदुस्थान लिव्हर लिमिटेड या कंपनीचा साबणाचा उद्योग आहे. त्या ठिकाणी साबण तयार होते. तेथे उत्पादित होणाऱ्या साबणाची किंमत कशी ठरते याची माहिती घेण्यासाठी मी त्या कंपनीच्या मॅनेजरला फोन केला. त्या मॅनेजरने मला संपूर्ण कारखाना दाखविला. मी त्यांना साबण कसे निर्माण होते असे कुतूहलाने विचारले. त्यांनी कच्च्या मालापासून ते साबण तयार होईपर्यंतची सर्व प्रक्रिया मला समजून सांगितली. मी त्या मॅनेजरकडे साबणाची किंमत कशी ठरविली जाते, या बाबत विचारणा केली. त्यांनी मला सांगितले की, कच्च्या मालाचा खर्च, मशिनरीचा खर्च, कर्मचाऱ्यांचा खर्च, पॅकींगचा खर्च, बॉक्सचा खर्च, सील करण्याचा खर्च, टॅक्सचा खर्च इ. सर्व खर्च साबणाची किंमत ठरविताना विचारात घेतला जातो. एवढेच नव्हे तर त्याने पुढे असेही सांगितले की, आमच्या कंपनीचे डायरेक्टर मुंबईला राहतात. ते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

मुंबईहून अकोल्यापर्यंत विमानाने येतात. अकोल्याहून खामगांवपर्यंत मोटारीने येतात. कधी कधी त्यांची पत्नी देखील सोबत येते. त्यांच्या प्रवासाचा सर्व खर्च साबणाच्या किंमतीमध्ये समाविष्ट करतो आणि त्यानंतर साबणाची अंतिम किंमत निश्चित करतो. महोदय, जगाला कापूस, सोयाबीन, द्राक्ष, बेदाणे पुरविणाऱ्या शेतकऱ्याच्या शेती मालाचा भाव मात्र अन्य तिसरीच व्यक्ती किंवा दलाल ठरविते.

महोदय, या निमित्ताने सांगू इच्छितो की, कापूस असेल, सोयाबीन असेल, द्राक्ष असेल, संत्रा असेल, धान असेल या सर्व पिकांच्या किंमतीबाबत स्वामीनाथन समितीने केलेली शिफारस अधिक 50 टक्के नफा लागू करुन शेतकऱ्यांच्या शेती मालाला भाव देण्याचा निर्णय या अधिवेशनात जाहीर केला तर तो ऐतिहासिक निर्णय होऊ शकेल, एवढेच या निमित्ताने सांगतो.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो व माझे भाषण पूर्ण करतो.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे. आपण पूर्वीही विदर्भातील अतिवृष्टीच्या, शेतकऱ्यांच्या व्यथा या संदर्भातील विषय मांडण्याचा प्रयत्न केला होता. आज सकाळीही मराठवाड्यांतील शेतकऱ्यांच्या व्यथांपासून अनुशेषापर्यंत आम्ही आमच्या भावना व्यक्त केल्या. दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांनी शासनाची निष्क्रियता उघड केली आणि एक गोष्ट सिध्द झाली की, शेतकऱ्यांच्या संदर्भातील विषय मांडत असताना पक्षांच्या पलीकडे जाऊन सर्व आमदार एक होतात. आम्ही सरकारने न केलेल्या गोष्टीच्या बाबतीत धारेवर धरण्याचा प्रयत्न करतो. राजकारण कदाचित होईल. पण राजकारण करण्यासाठीच आपण येथे येतो. सभागृह त्याकरिताच आहे. तुम्हाला सत्तेवरून पायउतार करण्यासाठी जे सांगता येईल ते सांगण्याचा प्रयत्न आम्ही करतो. आपल्याकडील सदस्य बोलतात. आपली सत्ता जाऊ नये असे वाटत असेल तर तुम्ही जे केले आहे ते लवकर निस्तरा नाहीतर भारी पडेल, असे सांगण्याकरिता बोलतात. आमची एकवाक्यता असते. सरकारला काही समज देण्याच्या भाषा वेगवेगळ्या पध्दतीच्या असतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांविषयी आम्ही नेहमी बोलतो. रोज मरे त्याला कोण रडे अशी परिस्थिती आज निर्माण झाली आहे. काही प्रमाणात हा मदत व पुनर्वसनाचा विषय वाटत असला तरी तो कृषीचाच विषय आहे. शेतकरी मरत आहेत. आम्हाला तुमच्याकडून उत्तर अपेक्षित आहे. सदनात किंवा कृषी धोरणात योग्य बदल करणे, ही खात्याची नैतिक जबाबदारी आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या सन 2013 च्या जानेवारीमध्ये 67, फेब्रुवारीमध्ये 58, मार्चमध्ये 64, एप्रिलमध्ये 57, मेमध्ये 62, जूनमध्ये 74, जुलैमध्ये 72, ऑगस्टमध्ये 69, सप्टेंबरमध्ये 67, ऑक्टोबरमध्ये 63, नोव्हेंबरमध्ये 62 आणि डिसेंबरमध्ये आता सुरू असलेल्या तारखेपर्यंत 27 अशा मिळून 742 आत्महत्या झाल्या. सन्माननीय सदस्य म्हणाले की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रचंड वाढल्या होत्या, त्यानंतर काही काळ त्या कमी झाल्या, पुन्हा त्याचा वेग वाढला आहे. हे कशाचे लक्षण आहे, शेतकरी सातत्याने आत्महत्या का करीत आहेत ? त्यामुळे शासनाने या संदर्भात त्वरित निर्णय घेण्याची गरज आहे. शासन या संदर्भात निर्णय घेत नाही, हे दुर्दैवी आहे. शासन निर्णय घेत नसल्यामुळेच असे होत आहे. सदनात आलेल्या दिवसापासून आम्हाला हाच विषय

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सतावत होता. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या विषयांपासून लोकांना दूर करण्याकरिता अंधश्रध्दा निर्मूलनाच्या विधेयकाचे ढोल वाजवून प्रचार केला. अधिवेशन जणू काही तेवढ्याकरिताच भरले आहे. जादूटोण्यामुळे लोक मरत आहेत, असे सांगण्यात आले. पण जादूटोणा न करताही हजारो माणसे मरणार असतील तर त्या गोष्टीला किंमत आहे की नाही ? प्रत्येक अधिवेशनात एक विषय आणायचा आणि लोकांचे लक्ष दुसरीकडे वळवायचे हे आपल्या नाकर्तेपणामुळे सुरू आहे. प्रत्येक अधिवेशनात निर्माण झालेली ही परिस्थिती आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मागणी केली आहे, हेही आपण लक्षात घ्यावे. आता मी धान, सोयाबीन याबद्दल बोलणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जे काही सांगितले त्यामध्येही मी जात नाही. किती हेक्टर क्षेत्र बाधित झाले, पुरामुळे शेतकऱ्यांचे काय हाल झाले, यामध्येही मी जात नाही. कापूस व्यापाऱ्याची खरेदी चार हजार रूपयांपासून साडे चार हजार रूपयांपर्यंत चालली आहे. कापूस खराब झाला या नावाखाली व्यापारी 3500-3800 रूपयांपर्यंत कापूस घेत आहेत. आपण कापसाला 6000 रूपये भाव द्या नाही तर ठीक होणार नाही. 100 केंद्रे जाहीर होऊन सुध्दा तुम्ही एकही केंद्र सुरू केलेले नाही. मला यामुळे धक्काच बसला आहे. आपण या संदर्भात उत्तरात सांगितले तर मला आनंद होईल. माझ्या माहितीप्रमाणे तरी एकही केंद्र तुम्ही सुरू केलेले नाही. मग शेतकऱ्यांनी कोणाच्या आशेवर जगायचे, व्यापाऱ्यांच्या ताब्यात जाऊन जगायचे का ? राज्य पणन महासंघाचे अध्यक्ष यवतमाळचे डॉ. हिराणी आहेत. आपण तेही मोडीत काढले. मी मंत्री होतो. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. गणपतराव देशमुख हे पणन मंत्री होते.

(नंतर श्री. खंदारे ....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्या दालनात एक बैठक झाली होती. माजी पणन मंत्री म्हणून त्यांनी मला बोलविले होते. दुर्दैवाने पणन महासंघ मोडीत निघालेला आहे. पण नको असलेला स्टाफ पोसणारा तो महासंघ आहे. त्यांच्या पगाराचा प्रश्न आहे. कापसाला प्रती क्विंटल 6 हजार रुपये भाव मिळत नसल्यामुळे त्यांच्यावर आपत्ती आलेली आहे. मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दुष्काळाने उद्ध्वस्त केले आहे तर विदर्भातील धान, सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकरी अतिवृष्टीमुळे उद्ध्वस्त झाले आहेत. म्हणून मी मघाशी बोललो होतो की, सरकारने सबसिडीचा विचार करावा. 1500-2000 रुपये क्विंटलमागे सबसिडी त्याच्या खात्यावर जमा केली तर या शेतकऱ्यांना जगण्याची आशा निर्माण होईल.

सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी सोयाबीनला 4500 रुपयांची मागणी केली आहे. आता सोयाबीनला 3500-3800 भाव मिळत आहे, तो 4000 रुपयांपेक्षा जास्त मिळाला पाहिजे. तो मिळत नाही. त्यामुळे 1 हजार रुपयांची सबसिडी दिली तर त्या शेतकऱ्यांना आधार मिळेल.

या विदर्भात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी व शेतकरी संघटनांनी मोर्चा आणून केलेली आहे. शेतकऱ्यांच्या कर्जाचे शासनाने पुनर्वसन केले तर निदान त्याला सावकाराकडे न जाता नवीन कर्ज काढता येईल. मंत्री महोदयांचा हा विषय नसला तरी विदर्भातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा विषय झालेला आहे. त्यांना काहीही देता येत नसेल, कर्ज देता येत नसेल तर निदान कर्जाचे पुनर्वसन करावे जेणे करुन त्याला नवीन कर्ज घेण्याचा मार्ग मोकळा होईल.

या सदनाचे माजी सदस्य श्री.अनंत तरे यांनी या विदर्भातील कोळ्यांचा आरक्षणासंबंधी मोर्चा आणला होता. हे कोळी मच्छीमारीवर जगतात. विदर्भातील अतिवृष्टीमुळे अनेक तलावातील मासे मृत झाले, वाहून गेले आहेत. विदर्भात मत्स्य शेतीचा खूप मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. महादेव कोळी असतात त्यांची वाट लागलेली आहे. त्यामुळे या मच्छीमारांना किमान 500 रुपयांचे अनुदान दिले पाहिजे. राज्य सरकार ते देणार नाही, राज्य सरकार केंद्राकडे मागणी करणार त्यानंतर ते लोकांना देणार. पण ते लोक आज उपाशी आहेत, केंद्र सरकारने दिल्यानंतर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

श्री.दिवाकर रावते....

राज्याच्या तिजोरीत भरावे. आजच्या उपाशी माणसाचे पोट भरण्याकरिता त्यांनी केंद्राकडे बघत बसायचे, त्यानंतर ते राज्यात येणार. त्यानंतर राज्य सरकार मदत देणार. अधिकारी तर नस्त्या इकडून तिकडे फिरविण्यासाठी अनेक क्लृप्त्या लढवितात. लोकांना अनुदान कसे मिळणार नाही याची त्यांना अधिक चिंता असते. 1 तारखेचा पगार 2 तारखेला झाला तर त्यांना तो चालत नाही. राज्यातील शेतकरी उपाशी मरत आहे, मी ज्यांच्यासाठी पगार घेत आहे, ज्यांच्याकरिता माझी नेमणूक केलेली आहे त्यांच्यासाठी मी जास्तीत जास्त तत्परता निर्माण करीन. मी जर त्या जागी असेन किंवा माझा भाऊ त्या जागी असेल याकरिता कोणत्याही खात्याचे कोणतेही अधिकारी विभागाची नस्ती तत्परतेने हलवित नाहीत. ही मोठी व्यथा आहे. अतिवृष्टीमुळे या मच्छीमारांच्या हजारो कुटंबीयांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. तो प्रश्न सोडविला तर बरे होईल.

सभापती महोदय, राज्यामध्ये चाऱ्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची आता वेळ आलेली आहे. पूर्वी चाऱ्याचा प्रश्न उपस्थित होत नव्हता. आपण ज्यावेळी फिरत होतो त्यावेळी सगळीकडे ज्वारी व बाजरीचे पीक मोठ्या प्रमाणात दिसत असे. आता मराठवाड्यात ज्वारी व बाजरीचे पीक कमी झालेले आहे. वार्षिक अहवालात खरिपाच्या पिकाचा ज्वारीचा पेरा उणे 28 टक्के व रब्बीचा उणे 9 टक्के आहे. ज्वारी व बाजरीचा पेरा कमी झाल्यामुळे चाऱ्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. या संदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे. 50 एकरपेक्षा ज्यांच्याकडे जास्त शेती आहे त्यांनी चाऱ्याची लागवड करावी. सरकार तो चारा डेपोसाठी विकत घेईल. ज्यावेळी दुष्काळ निर्माण होईल त्यावेळी त्याचा वापर करता येईल. दुष्काळाच्या वेळी चाऱ्यासाठी सरकारची करोडो रुपयांची तिजोरी रिकामी होणार नाही. म्हणून 50 एकराच्या शेतकऱ्यांनी किमान 5 एकर शेतीमध्ये ज्वारी व बाजरीचा चारा निर्माण करणारे पीक घेतले पाहिजे. अशी काही व्यवस्था सरकारने केली तर राज्यातील चारा समस्येवर आपण कायम स्वरुपी मात करु शकू.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

नंतर श्री.शिगम.....

श्री. दिवाकर रावते....

यामध्ये विदर्भ, मराठवाडा, आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्हे पोळले गेले आहेत. तेव्हा या चा-याच्या संदर्भात शासन कोणते धोरण जाहीर करणार आहे ते या सभागृहाला अवगत करावे.

सभापती महोदय, मागील वेळी कृषी खात्याच्या संदर्भात चर्चा करीत असताना मी ऊसाच्या शेतीबाबत माझे विचार मांडले होते. ऊसाच्या शेतीसाठी 80 टक्के पाणी लागते असे मी सांगितले. त्यावेळी श्री. अजितदादा पवार यांनी घोषणा केली. विरोधी पक्षाने दिलेल्या ठरावाच्या माध्यमातून शासनाने घेतलेला तो निर्णय होता. विरोधी पक्षाच्या ठरावाला सकारात्मक प्रतिसाद मिळाला होता. त्यावेळी श्री. अजितदादा पवार यांनी सांगितले की, 3 वर्षात ठिबक सिंचन करु. हा विरोधी पक्षाचा विजय होता. सरकारने हा निर्णय जाहीर करुन एक वर्ष झालेले आहे. कदाचित 8-10 महिने झाले असतील. या निर्णयानुसार सरकारने आदेश काढलेले आहेत काय, नियोजन केले आहे काय ? साखर कारखान्याच्या परिसरातील शेती ठिबक सिंचनाची केल्याने वाचलेले पाणी इतर शेतकऱ्यांना मिळण्यासाठी काय व्यवस्था केलेली आहे याबाबत मंत्री महोदयांनी सभागृहाला अवगत करावे

सभापती महोदय, देशातील आयातीचा निर्णय अतिशय गंभीर झालेला आहे. मी सोन्याच्या आयाती बाबत बोलत नाही. कापसाची निर्यात झाली तर कापसाला चांगला भाव मिळू शकेल. शेतमालाच्या किंमती ह्या आयात निर्यातीवर अवलंबून असतात. कांद्याचा गोंधळ आपल्याला माहीत आहे. देशामध्ये खाद्यतेलाची 80 टक्के आयात होते. खाद्यतेल सर्वांना लागते. झोपडीमध्ये राहाणाऱ्यापासून ते महालामध्ये राहाणाऱ्यापर्यंत सर्वांना खाद्यतेल लागते. आपला देश 80 टक्के खाद्यतेलाची आयात करतो. जर आपण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना तेलबियांचे उत्पादन करण्याकरिता प्रवृत्त केले, तेलबियांच्या निर्मितीसाठी शेतक-याला कायमस्वरुपी सबसिडी दिली तर महाराष्ट्र हा खाद्यतेलाच्या बाबतीत स्वयंपूर्ण तर होईलच आणि शेतक-यालाही चार पैसे मिळू शकतील. तेलबियांच्या शेतीमुळे कोरडवाहू शेती फायदेशीर होईल, शेतकरी दुष्काळापासून दूर जाईल आणि शेतक-याला या शेतीमध्ये आर्थिक नुकसान होणार नाही.

सभापती महोदय, धान्यापासून दारु निर्माण करण्याचा विषय खूप गाजला. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना मदत करणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. या सरकारने धान्यापासून दारु निर्माण करण्याचा संकल्प केला.लातूरमध्ये धान्यापासून दारु

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

निर्माण करण्याकरिता 700 कोटी रुपयाची सबसिडी दिली. धान्यापासून दारु निर्माण करणारा कारखाना उभा राहिला. या कारखान्यातून किती दारु निर्माण झाली यामध्ये मला स्वारस्य नाही. पण दारु निर्माण करण्याकरिता किती शेतकऱ्यांकडून धान्य घेतले, त्यामुळे किती शेतक-यांना फायदा झाला याची माहिती मंत्री महोदयांनी सभागृहाला दिली तर बरे होईल. दारुवरील करामुळे, एक्साईजमुळे आपले राज्याचे उत्पन्न वाढते. या राज्यामध्ये दारु विकून तिजोरीमध्ये पैसा येतो. मग दारु निर्माण करणा-या कारखान्यांना पैसे देऊन किती शेतक-यांना आर्थिक लाभ झाला, किती शेतकरी संपन्न झाले हे मी जाणून घेण्यास उत्सुक आहे.

सभापती महोदय, कृषी उत्पन्न बाजार समित्यासंबंधी सरकारी अधिका-यांच्या नाकर्तेपणामुळे विदर्भामध्ये शेतकऱ्यांनी आंदोलन केले. त्यावेळी पोलिसांनी शेतकऱ्यांवर लाठीचार्ज केला. काही शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले. माझी विनंती आहे की, शेतक-याच्या मालाला आपण योग्य भाव देत नाही, उलट त्यांच्या पाठीवर लाठया देता. तेव्हा या शेतकऱ्यांवरील गुन्हे शासनाने मागे घ्यावेत अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

अन्यथा शेतकऱ्यांवर शेतीकरिता नव्हे तर वकिलाकरिता कर्ज काढून कर्जबाजारी होण्याची वेळ येईल. आम्ही विदर्भातील शेतकऱ्यांच्या ज्या व्यथा मांडलेल्या आहेत त्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी ठोस उत्तर दिले तर शेतकऱ्यांना आधार मिळेल. मी माननीय मंत्री महोदयांकडून ठोस उत्तराची अपेक्षा करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

धन्यवाद, जयहिंद, जय महाराष्ट्र.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आम्हाला बोलण्याची संधी मिळालेली नाही. आमच्याकडे लोकांचे बरेच प्रश्न पोहोचलेले असतात. आम्ही 30-35 मिनिटे बोलण्याचा आग्रह धरत नाही. आम्हाला किमान आमचे मुद्दे मांडण्याची परवानगी द्यावी. आमच्या पक्षाने आपल्याकडे आमची नावे दिलेली आहेत. आपण आम्हाला न्याय द्यावा, अशी आमची अपेक्षा आहे.

प्रा.सुरेश नवले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे आणि इतर सन्माननीय सदस्यांनी जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विशेषत: मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांची परिस्थिती अतिशय विदारक आहे. मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर घसरलेला आहे. शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचवायचा असेल तर त्यासाठी राज्य शासनाने ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांच्या संदर्भात सभागृहात बहुतांशी चर्चा होते. ऊस उत्पादक शेतकऱ्यांना किंवा कारखानदारांना मोठ्या प्रमाणावर अनुदान दिले जाते. परंतु राज्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या व्यतिरिक्त इतर शेतकरी देखील आहेत. महाराष्ट्र राज्यात कापूस उत्पादक शेतकरी, सोयाबीन उत्पादक शेतकरी, धान उत्पादक शेतकरी आहेत. शेतकऱ्यांच्या शेत मालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळावा यासाठी माननीय कृषी मंत्र्यांनी आवश्यक ते प्रयत्न करावेत, अशी मी त्यांना आग्रहाची विनंती करणार आहे.

सभापती महोदय, पुढील 12 वर्षात देशाची लोकसंख्या दीडशे कोटीपेक्षा जास्त होणार आहे. त्यासाठी आपल्याला धान्याचे उत्पादन दुपटीने वाढवावे लागणार आहे. मग या संदर्भात कृषी विभागाने कोणते नियोजन केलेले आहे ? आज जेवढे धान्य लागते त्यापेक्षा दुप्पट धान्य 12 वर्षानंतर लागणार आहे. महाराष्ट्र राज्यावर अवर्षण किंवा नैसर्गिक संकट कोसळले तर त्यातून मार्ग काढण्यासाठी धान्य उत्पादन वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर संशोधन होण्याची आवश्यकता आहे. मला असे वाटते की, राज्यातील कृषी विद्यापीठांनी बियाण्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर संशोधन करण्याची आवश्यकता आहे. पर्यावरणात बदल होत आहेत. हवामान विभागाचे सर्व अंदाज चुकत आहेत. शेतकऱ्यांना निसर्गाच्या दुष्ट चक्राला बळी पडावे लागत आहे. त्यामुळे महाराष्ट्रात

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

हवामानाला पूरक, पोषक, अनुकूल अशी पीक पद्धती निर्माण केली तर महाराष्ट्रातील शेतकरी निसर्गाच्या दुष्ट चक्रावर मात करु शकेल, अशी माझ्या सारख्याची अपेक्षा आहे.

यानंतर श्री.भोगले.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

बीड जिल्हयातील मंत्री या ठिकाणी बसलेले आहेत. पूर्वी मराठवाडा आणि विदर्भामध्ये मोठया प्रमाणात ज्वारीचे उत्पादन घेतले जात असे. आंतरपीक म्हणून करडई आणि जवस मोठया प्रमाणात घेतले जात होते. माझ्या घरात चार-चार हंड्या भरलेल्या असायच्या. आज अर्धी हंडी ज्वारी उत्पादन होत नाही. जवस आणि करडई संदर्भात मोठया प्रमाणात संशोधन केले पाहिजे. याचे कारण असे की, आज हृदयरोग्यांची संख्या महाराष्ट्रामध्ये वाढली आहे. हृदयरोगावर मात करण्यासाठी जवस आणि करडईचे तेल पोषक ठरते असे वैज्ञानिकांकडून आणि शास्त्रीय पातळीवर दिसून आले आहे. म्हणूनच जेवणानंतर जवस खातात. पूर्वी सुपारी खायचे. जवसामुळे धमण्यातून वाहणा-या रक्ताचा मार्ग खुला होतो. शास्त्रीय पातळीवर उतरलेले हे धान्य आहे. त्यामुळे जो शेतकरी करडई आणि जवसाचे उत्पादन घेईल त्याला शासनाने अनुदान दिले पाहिजे. 25 वर्षानंतर करडईचे पीक काढायचे झाले तर काढायचे कसे? पंजाबमध्ये यंत्राच्या सहाय्याने शेती केली जाते. आमच्या काळात हाताला पोते बांधायचे आणि करडई काढली जायची. कारण करडईला काटे असतात. तरी सुध्दा करडई उपयुक्त धान्य आहे. कृषी मंत्र्यांनी प्रोत्साहन देऊन करडई व जवसाचे उत्पादन घेण्याकरिता शेतकऱ्यांना प्रेरित केले तर महाराष्ट्रामध्ये मोठया प्रमाणात या पिकाचे उत्पादन घेता येईल.

सभापती महोदय, राज्य शासनाने केंद्र शासनाला 6068 रुपये प्रती क्विंटल कापसाला भाव द्यावा अशी शिफारस केलेली आहे ही बाब स्वागतार्ह आहे. राज्य शासनाने केलेली शिफारस केंद्रीय कृषी मूल्य आयोग तडकाफडकी मान्य करील अशी अपेक्षा करु नये, अन्यथा अपेक्षाभंग होण्याची शक्यता आहे. कृषी मंत्री आणि मुख्यमंत्री यांनी माननीय पंतप्रधानांची भेट घ्यावी आणि 6068 रुपये कापसाला भाव देण्याबाबत शिफारस केली आहे ती स्वीकारण्यात यावी अशी विनंती करावी. ही शिफारस स्वीकारली तर मराठवाड्यातील व विदर्भातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती स्थिरस्थावर होण्यास उपयुक्त ठरू शकेल. ज्वारीचा हमी भाव 1500 रुपये जाहीर केला आहे. राज्य शासनाने कृषी मूल्य आयोगाकडे 2244 रुपये इतक्या भावाची शिफारस केली आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, ज्वारीपासून दारुची निर्मिती केली जाते. आज खायला पुरेशी ज्वारी मिळत नाही. ज्याचे शारीरिक वजन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

वाढले आहे ते म्हणतात पोळी खाण्याऐवजी ज्वारीची भाकरी खा. अनेक मंत्र्यांना याची माहिती आहे. ज्वारीच्या सेवनामुळे वजन वाढत नाही. कारण त्यात साखरेचे प्रमाण जास्त आहे. ते शरीराला उपयुक्त आहे. ज्वारीमुळे शरीराला अधिक उष्मांक मिळतो. कृषी मंत्र्यांना विनंती आहे की, 2244 रुपये हमी भाव देण्याची राज्य शासनाने शिफारस केली आहे. महाराष्ट्रातील विशेषत: विदर्भातील शेतकऱ्यांना ज्वारी पिकासाठी 2244 इतका हमी भाव देण्याची केंद्रीय कृषी मूल्य आयोगाला शिफारस केली तिचा फायदा निश्चितपणे होईल.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केलेला मुद्दा स्वागतार्ह आहे. राज्य कृषी मूल्य आयोग आणि केंद्रीय कृषी मूल्य आयोग यांच्यामध्ये समन्वय असेल तर राज्य कृषी मूल्य आयोगाच्या अनेक अभ्यासक शिफारशी केंद्रीय कृषी मूल्य आयोगाला स्वीकाराव्या लागतील,

नंतर 4एल.1.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

अशा प्रकारचे बंधन केंद्र व राज्य सरकारने घालावे. तरच शेतकऱ्यांना सक्षम करता येईल. तेव्हा शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी कृषि मंत्र्यांनी प्रयत्न करावेत अशी मी विनंती करतो. त्यांच्या कार्यतत्परतेवर आमचा विश्वास आहे. ते अतिशय दक्ष आहेत. कृषि खात्याला दिशा देण्याचे काम त्यांनी मोठ्या प्रमाणावर केले आहे. या खात्यातील अपहार, भ्रष्टाचार कमी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. त्यात त्यांना यश आले आहे. त्यांना अजून बरीच वाटचाल करावयाची आहे. त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न करत रहावे. अशा पांथस्थाला आमच्या शुभेच्छा आहेत. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करावा एवढी आग्रहाने विनंती करतो आणि थांबतो.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे या पुण्याच्या असल्याने मी त्यांना आता बोलण्यासाठी संधी देत आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या निदर्शनास नम्रपणे आणून देते की, केंद्रीय कृषि मंत्री श्री.शरदराव पवार हे देखील पुणे जिल्ह्यातील आहेत. त्यामुळे पुण्याचा काही निकष असू शकत नाही. शेतकऱ्यांच्या सुख दुःखाशी काय नाते जोडले आहे याचा त्याच्याशी संबंध असतो असे मला वाटते. त्यामुळे कोण पुण्याचा आहे, कोण नागरपूरचा आहे, कोण नगरचा आहे हा विषय असू शकत नाही.

सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय आहे. आपण एका बाजूला स्त्रियांना न्याय देण्याचा प्रयत्न करतो. आज पर्यंत लक्षावधी शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. तेव्हा त्यांच्या कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी, ती जमीन त्याच्या वारसदारांच्या नावे केली पाहिजे. संयुक्त कुटुंब व्यवस्थेमध्ये किंवा विभक्त कुटुंब व्यवस्थेमध्ये जमिनी नावावर करण्यामध्ये अनेक अडचणी आहेत. त्यासंबंधी अनेक जी.आर.काढले आहेत. त्याची किती टक्के अंमलबजावणी झाली आहे, याचा देखील अंदाज घेतला पाहिजे. कारण यवतमाळ जिल्ह्यामधील ज्या अनेक गावांमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत त्या जमिनी अजून शेतकऱ्यांच्या विधवा पत्नीच्या नावे झालेल्या नाहीत ही वास्तविकता आहे. गेल्या दहा महिन्यामध्ये विदर्भात 228 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. त्यापैकी अनेक कुटुंबे अपात्र ठरलेली आहेत. मध्यंतरी माहितीच्या अधिकारात शेतकरी कुठून कर्ज घेतात हे जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला तेव्हा जास्तीत जास्त कर्जे खाजगी सावकारांकडून घेण्यात येत आहेत, असे आढळून आले. भारतातील आकडेवारी अशी आहे की, खाजगी सावकारांकडून 1 लाख 25 हजार जणांनी कर्जे घेतली आहेत, खाजगी बँकांकडून 1 लाख 17 हजार शेतकऱ्यांनी कर्ज घेतली आहेत. यात त्यांनी महाराष्ट्राची देखील माहिती दिली. जेव्हा ग्रेडेशन केले तेव्हा त्यांनी खाजगी सावकार, नंतर बँका, नंतर सहकारी संस्था, नंतर सरकार, त्यानंतर मित्र आणि नातेवाईक असे केले आहे.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

आपण वेगवेगळ्या समित्यांच्या घोषणा केल्या आहेत. त्यात स्वामीनाथन समितीचा देखील समावेश आहे. जेनेटिकली मॉडिफाईड क्रॉप्स तयार करणाऱ्या खाजगी संस्थांचे पेव रोखण्यासाठी डॉ.काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती तयार केली होती. त्या समितीने पुढे काय केले आहे त्या समितीच्या शिफारशीच्या अंमलबजावणी संबंधी काय कार्यवाही केली आहे यासंबंधी माननीय कृषि मंत्र्यांनी त्यांचे विचार मांडावेत. येथे जे अनेक मुद्दे मांडण्यात आलेले आहेत. त्यांची मी पुनरूक्ती करणार नाही. यवतमाळ जिल्ह्यांचे उदाहरण पहिले तर अनेक कुटुंब अपात्र ठरल्याचे दिसून येते. या संबंधातील आकडेवारी माझ्याकडे असून ती मी पटलावर ठेवणार आहे.

आज सर्व ठिकाणी 50 पैशाच्या आत आणेवारी आहे. असे असताना देखील एका बाजूला कर्ज वसुलीचा तगादा सुरू असल्याचे दुष्टचक्र आपल्याला दिसत आहे. अतिवृष्टीने गांजलेल्या शेतकऱ्यांना कर्ज फेडण्यासाठी ठिकठिकाणी आंदोलने करावी लागत आहेत. पांढरकवड्याला देखील असेच उग्र आंदोलन झाले. पश्चिम महाराष्ट्रामध्ये ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे आंदोलन झाले. काल आम्ही संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसंबंधी नियम 93 अन्वयेची सूचना मांडली होती. त्यावेळी सरकारने स्वत:हून पर हेक्टरी मदत किती देणार हे सांगितले होते.

यानंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

डॉ.नीलम गोऱ्हे .....

शासनाने सुरुवातीला हेक्टरी 15 हजार रुपये नुकसान भरपाई दिली परंतु ही नुकसान भरपाई दोन टप्प्यात दिली गेली. पहिल्या टप्प्यात 10 हजार रुपये तर दुसऱ्या टप्प्यात 5 हजार रुपये देण्यात आले. सन 2013 मध्ये हेक्टरी 12 हजार रुपये नुकसान भरपाई दिली गेली. एका बाजूला महागाई वाढलेली असतांना आपण सन 2008-2009 मध्ये प्रती हेक्टरी 10 हजार रुपये देता आणि त्यानंतर 15 हजार नुकसान भरपाई देता आणि नंतर मात्र प्रती हेक्टरी 12 हजार रुपये नुकसान भरपाई देता हे कोणत्या नियमाने देता असा प्रश्न निर्माण होतो. भंडारा येथे 15 कोटी रुपयांचा निधी परत गेला आहे तर कुरखेडा भागात आदिवासी विकास महामंडळाने 7 कोटी रुपयांचे खरेदी केलेले धान उघडयावरच पडलेले आहे. शेतकऱ्यांची आंदालने ठिकठिकाणी होतात तेव्हा त्यामध्ये शेतकऱ्यांना हिंसक ठरवले जाते. काही वेळेला "शेतकरी आंदोलनाचा कार्यक्रम करा" असे जाहीरपणे बोलले जाते त्यामुळे हा कार्यक्रम नक्की काय असतो ? राज्य सरकारने नगर जिल्हयामध्ये पणन महामंडळाच्या माध्यमातून मका खरेदी सुरु केली. साठवणूक करण्याचे काम महसूल खात्याकडे दिले परंतु गोदामे उपलब्ध करुन देण्यामध्ये महसूल विभागाने पाहिजे तेवढे सहकार्य दिले नाही. महसूल मंत्री आणि कृषी मंत्री हे दोघेही नगर जिल्हयातील असल्यामुळे त्या दोघांचे अतिशय जिव्हाळयाचे संबंध आहेत. असे असतांना मका उत्पादकांना आंदोलन करण्याची वेळ का यावी हा प्रश्न माझ्या समोर पडलेला आहे.

सभापती महोदय, विदर्भामध्ये अधिवेशन होत असतांना केवळ उपचार म्हणून नव्हे परंतु ज्या कुटुंबामध्ये आत्महत्या होते त्या कुटुंबातील स्त्री निराधार, विधवा होत असते. त्यामुळे मला असे वाटते की, पृथ्वीतलावावरती जिला आपण वसुंधरा म्हणतो ती एका एका क्षणाने मनाने दु:खी होत असते. भूकंपग्रस्तांसाठी शासनाने 2 ते 3 हजार स्त्रियांसाठी शेती विकासाचा कार्यक्रम राबविला होता त्याच प्रमाणे ज्या ज्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत त्या आत्महत्याग्रस्त कुटुंबातील स्त्रियांसाठी कार्यक्रम राबवावा अशी विनंती आहे. मला येथे सांगावेसे वाटते की, आपण महिलेच्या हस्ते अन्न सुरक्षा योजनेचे उद्घाटन केले होते परंतु त्या महिलेच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे .....

घरात टीव्ही आणि फॅन होता. प्रश्न असा निर्माण होतो की, ज्या महिलांच्या घरात टीव्ही व फॅन आहे अशा महिलांचे आपण कौतुक करतो, त्यांना फायदा देतो व प्रत्यक्षात आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिला निराधार होऊन संकटाचा मुकाबला करीत आहेत. या प्रस्तावामध्ये आम्ही जे भाव सुचविले आहेत त्यानुसार धानाला 3 हजार, ऊसाला 3 हजार, सोयाबीलनला 4.5 हजार रुपये व कापसाला 6 हजार रुपये भाव देण्यात यावा. उत्पादनाच्या प्रमाणामध्ये ज्वारी उत्पादक, संत्रा उत्पादक,बेदाणे उत्पादक तसेच महाराष्ट्रातील विविध ठिकाणच्या शेतकऱ्यांना योग्य तो भाव मिळत नसल्यामुळे मोठया प्रमाणात जनतेला आणि शेतकऱ्यांना संकटाचा मुकाबला करावा लागतो आहे. बऱ्याच वेळा शिवसेनेवर टीका होते की, आम्हाला शेतीचे काय कळते ? परंतु आजच्या दैनिक लोकमतचा सर्व्हे पाहिला तर शेतकऱ्यांमध्ये शिवसेनेला बऱ्यापैकी जनाधार दिसून आलेला आहे हे मी नम्रपणे नमूद करु इच्छिते.

धन्यवाद, जय भीम, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनीष जैन (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, नियम 259 अन्वये अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे. अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये शेतकऱ्यांचा मुख्य विषय आहे. शेतकऱ्याला जात, समाज किंवा पक्ष नसतो. शेतकरी हा कष्ट करण्याचेच काम करीत असतो. शेतकरी हा काळया आईची सेवा करणारा असतो. शेतकरी आपल्या पिकातून आपल्याला काय उत्पन्न मिळेल यावरच लक्ष ठेवत असतो. शेतकरी सकाळ झाली की, शेतात जातो दिवसभर काम करतो आणि संध्याकाळ झाली की, घरी येतो. आपल्या पिकाला जास्त भाव कसा मिळेल याकडेच त्याचे लक्ष असते.

सभापती महोदय, मी जळगाव जिल्हयाचे प्रतिनिधित्व करीत असल्यामुळे मी माननीय कृषी मंत्र्यांना सांगू इच्छितो की, आमचा जळगाव जिल्हा कापसाच्या उत्पादनामध्ये संपूर्ण देशात पहिल्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात वेगवेगळया तारखेला पाऊस पडत असतो. जळगाव जिल्हयातील आमचे शेतकरी पाऊस येण्याच्या अगोदर जमिनीची मशागत करुन,ड्रीपची लाईन तयार करुन ठेवतात.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनीष जैन...

त्यांना वेळेवर बियाणे उपलब्ध होत नसल्यामुळे लवकर पेरणी करता येत नाही. तेव्हा जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना लवकर बियाणे उपलब्ध होण्याच्या दृष्टीने माननीय मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे. जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना लवकर बियाणे उपलब्ध झाल्यास त्यांना लवकर पीक मिळू शकेल आणि त्यांना जास्तीचे दोन पैसे मिळतील.

सभापती महोदय, जळगाव जिल्ह्यात कापूस जास्त पिकतो. आमच्या कापूस परिषदेमध्ये माननीय मुख्यमंत्री आले होते त्यावेळी त्यांनी घोषणा केली होती की, कापूस संशोधन केंद्र जळगावमध्ये उभारण्यात येईल. या गोष्टीला आठ महिने झाले, परंतु त्या संदर्भात अजून काहीही कार्यवाही झालेली नाही. आताचा सीझन निघून गेला आहे. पुढील सीझनच्या आत कापूस संशोधन केंद्र उभारल्यास येथील शेतकरी खूश होतील आणि आपले आभार मानतील.

सभापती महोदय, महाराष्ट्रात 41.46 लाख हेक्टर क्षेत्रावर कापूस पिकाची लागवड करण्यात आली होती. गुजरात राज्यामध्ये 24 लाख हेक्टर क्षेत्रावर कापूस लागवड करण्यात आली होती. आंध्र प्रदेशमध्ये 22.69 लाख हेक्टर क्षेत्रावर कापूस लागवड करण्यात आली होती. या वर्षी महाराष्ट्रात 40 लाख हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यात आली. गुजरात राज्यामध्ये मागील वर्षापेक्षा एक-दोन टक्के जास्त लागवड झालेली आहे तर आंध्र प्रदेशमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत पाच टक्क्यांनी कमी लागवड झालेली आहे. आपण उत्पादनाचा विचार केला तर मागील वर्षी महाराष्ट्रात 70-75 लाख कापसाच्या गाठी तयार झाल्या. या वर्षी सुध्दा साधारणत: तेवढेच उत्पादन झालेले आहे. गुजरात राज्यामध्ये कापसाच्या लागवडीचे क्षेत्र 24 ते 25 लाख हेक्टर आहे. मागील वर्षी त्यांनी 87 लाख कापसाच्या गाठी तयार केल्या होत्या. या वर्षी त्यांनी 120 लाख गाठी तयार केल्या.

सभापती महोदय, आपण शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भर घातली पाहिजे. मी तर असे म्हणेन की, आपण शेतकऱ्यांना 6 हजार रुपये भाव दिला पाहिजे. सध्या 4500 रुपये भाव आहे म्हणजे जवळपास 1500 रुपयांचा भार शासनास सहन करावा लागेल. एका शेतकऱ्याकडे पाच एकर जमीन असली तर 1500X5 म्हणजे 7500 रुपये होतात. आपणास शेतकऱ्यांना 7500 रुपये देण्याची इच्छा असेल आणि आपण शेतकऱ्यांचे एक क्विंटल उत्पन्न वाढवून दिले तर शेतकरी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनीष जैन...

आपल्याकडे भाव वाढवून मागणार नाही. आपण शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावर भर दिला पाहिजे.

सभापती महोदय, सोयाबीनवर अडीच टक्के इम्पोर्ट डयुटी आकारण्यात येते. ही कस्टम डयुटी अडीच टक्क्यावरुन 100 टक्क्यापर्यंत वाढविली तर शेतकऱ्यांचा फायदा होईल. मला माहीत आहे की, कस्टम ड्युटी हा राज्य शासनाचा विषय नाही. माननीय मंत्री महोदय दिल्लीमध्ये जातात. आपण दिल्लीत जाऊन कस्टम डयुटी वाढविण्यासाठी प्रयत्न केला तर त्याचा शेतकऱ्यांना फार मोठा फायदा होईल.

सभापती महोदय, आपण शेतकऱ्यांना स्वाभिमानी करावे. त्यांच्या मालाला हक्काचा भाव द्यावा. शासन शेतकऱ्यांकडे चांगल्या प्रकारे लक्ष देईल अशी भावना व्यक्त करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री.बोर्डे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (कृषी मंत्री) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 259 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर बोलताना सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री भाऊसाहेब फुंडकर, रामदास कदम, विक्रम काळे, माजी मंत्री श्री.दिवाकर रावते, प्रा.सुरेश नवले, डॉ.नीलम गोऱ्हे आणि श्री.मनीष जैन यांनी चांगल्या सूचना केल्या आहेत. एका बाजूला सूचना करीत असताना त्यांनी दुसऱ्या बाजूला सध्याच्या पध्दतीतील उणिवा निदर्शनास आणून दिल्या आहेत. ज्या सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावावरील चर्चेत सहभाग घेतला त्या सर्वांचे मी आभार मानतो.

महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने बोलताना अनेक सन्माननीय सदस्यांनी राज्य व केंद्र सरकारकडून अनेक अपेक्षा बाळगलेल्या आहेत. राज्यात दोन वर्षे सातत्याने दुष्काळ पडत आहे. काही भागात दुष्काळी स्थिती आहे. विदर्भात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती जीवनावर आधारित असलेल्या व्यवसायांवर विपरित परिणाम झाल्याचे चित्र दिसते. या सर्व परिस्थितीवर मात करीत दुष्काळ, अतिवृष्टीचा शेतकऱ्यांच्या वैयक्तिक जीवनावर परिणाम होत असला तरी त्याने शेती व्यवसाय करणे थांबविले नाही. या सर्व परिस्थितीवर मात करीत त्याने आत्मविश्वासाने, भविष्यामध्ये आणखी चांगले उत्पादन घेण्याचा प्रयत्न केला. महोदय, अशा प्रकारचा नवीन आशावाद घेऊन राज्यातील शेतकरी काम करीत असतो.

महोदय, या प्रस्तावाच्या निमित्ताने अनेक बाबी उपस्थित करण्यात आल्या आहेत. या सभागृहात अनेक वर्षांपासून काम करीत असलेले सदस्य आहेत. पूर्वीच्या कालखंडात प्रत्येक अधिवेशनात बियाण्यांचा आणि खतांचा काळा बाजार, शेतकऱ्यांवर झालेला लाठीमार यावर चर्चा होत होती. परंतु मला सभागृहाला सांगण्यास आनंद होतो की, गेल्या दोन वर्षाच्या कालावधीत अशा विषयांवर चर्चा झाली नाही, हीच या आघाडी सरकारची उपलब्धी आहे. बियाणे, खते यांच्या विक्री व्यवस्थेत पारदर्शकता आणल्यामुळे राज्यातील शेती व्यवस्थेशी निगडित असलेल्या शेतकऱ्यांना खते आणि बियाण्यांच्या उपलब्धीबाबत आघाडी सरकार एकप्रकारे आधार देऊ शकले. महोदय, या ठिकाणी आकडेवारी सांगून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. कृषी विभागाच्या माध्यमातून मोठमोठ्या कंपन्यांवर, विक्रेत्यांवर कारवाई केल्याचाच हा सर्व परिणाम आहे, असे मला वाटते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

महोदय, गेल्या वर्षी महिको सारख्या मोठ्या कंपनीवर विभागाच्या माध्यमातून कारवाई करण्यात आली. याचा परिणाम असा झाला की, गेल्या वर्षीच्या हंगामात जे बियाणे उपलब्ध होते त्या बियाण्यांचा साठा करण्याचे धाडस कोणीही करु शकले नाही. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, दोन वर्षांपासून शेतकऱ्यांना शेतीच्या बांधावर बियाणे देण्याची योजना सुरु केली आहे. त्या योजनेचा चांगला परिणाम आपल्याला दिसून येत आहे. किमान शेतकऱ्यांना कृषी बियाणे, खते, कीटकनाशके उपलब्ध करुन देण्याबाबत ज्या अडचणी येत होत्या त्या थांबविण्यात राज्य सरकारला यश आल्याचे समाधान शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर पहावयास मिळते.

(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड.अनिल परब)

महोदय, दुष्काळाच्या परिस्थितीत सर्व साधनांचा उपयोग करुन शेत मालाचे उत्पादन घेण्याचा शेतकऱ्यांनी प्रयत्न केला. 2013 मध्ये राज्यात तेलबिया आणि कापसाचे प्रथमच सर्वात जास्त उत्पादन येणे अपेक्षित आहे. एका बाजूने हे सर्व प्रयत्न करीत असताना दुसऱ्या बाजूने शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीची मदत देण्याची भूमिका राज्य सरकारने स्वीकारली आहे.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ....

सन 2012-13 मध्ये रब्बी हंगामात 200 कोटी रूपये दिले. अशी एकूण 562 कोटी रूपयांची भरपाई एका वर्षात शासनाने शेतकऱ्यांना दिलेली आहे. मघाशी पॅकेज द्यायचे किंवा द्यायचे नाही, या संदर्भात उल्लेख झाला. दीर्घकालीन धोरण आखून पॅकेजमधून शेतकऱ्यांना बाहेर काढण्याच्या प्रयत्नाला शासन लागले आहे. आता ग्लोबल वॉर्मिंग, क्लायमेट चेंजचा परिणाम शेती व्यवस्थेवर थेट होत आहे. 2000 रूपये, 3000 रूपये रकमेचे प्रती हेक्टरी पॅकेज देऊन शेतकऱ्यांचे समाधान होत नाही, त्यांचे नुकसान भरून येत नाही. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांचा सातत्याने आग्रह होता की, विभागाने, शासनाने पॅकेजच्या पलीकडे जाऊन या संबंधीचा विचार केला पाहिजे. शासनाने 2 वर्षांपूर्वी फळपिकांसाठी हवामान आधारित पीक विमा योजना आणली आणि मागच्याच वर्षी जळगावातील केळी उत्पादकांना त्याचा सर्वांत जास्त फायदा झाला. हा पहिला प्रयोग होता, त्यानंतर आपण त्यामध्ये आंबा फळपिकाचा समावेश केला. तसेच, अन्य 7 फळपिकांचा त्यामध्ये समावेश केला. आता त्याची व्याप्ती अजून वाढविण्याची आवश्यकता आहे. प्रायोगिक तत्वावर 2 वर्षापूर्वी सुरू केलेल्या प्रयोगाला यश मिळत आहे, शेतकऱ्यांचा प्रतिसाद मिळत आहे. आपण आणखी जास्त व्याप्ती वाढवू शकलो तर येणाऱ्या आपत्तीतून विम्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोठी मदत करता येईल.

या वर्षीच्या रब्बी हंगामापासून काही जिल्ह्यांत प्रयोगिक तत्वावर अन्य पिकांसाठीही हवामानावर आधारित पीक विमा योजनेला सुरूवात केली आहे. सध्याच्या प्रचलित विमा योजनेतील कार्यपध्दतीमध्ये बऱ्याच सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आहे. आपण हवामानावर आधारित पीक विमा योजनेला चांगल्या प्रकारचे स्वरूप देऊ शकलो. नैसर्गिक आपत्तीत पॅकेज देण्यापेक्षा या माध्यमातून थोडी फार मदत करण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. पीक विम्याच्या माध्यमातून त्यापेक्षाही अधिक मोठी मदत शेतकऱ्यांना देण्याच्या संदर्भात शासनास निश्चितपणे यश येईल. सातत्याने होणारी पॅकेजची चर्चा भविष्यात होणार नाही किंवा त्याची आवश्यकता राहणार नाही. प्रचलित व्यवस्थेचा विचार करता शेतकऱ्यांना मदत करण्याचे दायित्व शासनावर आहे. सन 2012-13 ची आकडेवारी सांगताना मी मागील 3 वर्षांचा उल्लेख केला. दुष्काळ व अतिवृष्टीच्या 3 वर्षांत राज्यातील 90 लाख शेतकऱ्यांसाठी 4 हजार कोटी रूपयांची तरतूद शासनाने केली होती.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ....

प्रत्यक्ष रूपाने 3 वर्षांत जवळजवळ 2600 कोटी रूपयांचे वाटप शेतकऱ्यांना केले आहे. एवढी मोठी मदत दिल्याने अन्य योजनांवर काय परिणाम होतो हे पाहण्यापेक्षा शेतकऱ्यांना मदत झाली पाहिजे ही भूमिका सरकारने स्वीकारून 4 हजार कोटी रूपयांपर्यंत मदत केली आहे. भविष्यातील प्रत्येक आपत्तीमध्ये शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहील, हे मला सांगितले पाहिजे. परंतु, या सर्व प्रयत्नातून शेतकऱ्यांचे समाधान झाले आहे का, हेही पाहिले पाहिजे. विदर्भातील शेतकऱ्यांची मागणी कापूस, सोयाबीन यांच्या भावासंबंधी आहे. मराठवाड्यातील शेतकरीही तशी मागणी करीत आहेत. प्रत्येक वर्षी हमी भाव वाढवून मिळाला पाहिजे, अशी सातत्याने मागणी असते. हमी भाव व जागतिक बाजारपेठेमध्ये होणारे परिणाम, याचा शेती मालाच्या किंमतीवर होणारा परिणाम याला आपल्याला सामोरे जावे लागते.

(नंतर श्री. खंदारे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

भावाच्या दरांमध्ये चढउतार होत असतानाही राज्यातील शेतक-यांनी उत्पादन कमी केलेले नाही. कापसाच्या उत्पादनाबाबत मी मागील 10 वर्षाची आकडेवारी सभागृहासमोर ठेवू इच्छितो. पूर्वी 25 लाख गाठी उत्पादन होत होते. आता शेतकऱ्यांनी 75 लाख गाठीपर्यंत उत्पादन घेतलेले आहे. पूर्वीच्या पारंपरिक पध्दतीच्या कापसावर बोंड अळी पडते म्हणून बी.टी.कॉटनचा स्वीकार करण्यात आला होता. बी.टी.कॉटनचा स्वीकार करीत असताना त्या त्यावेळी सरकारने निर्बंध घालण्याची आवश्यकता होती. दुर्दैवाने आपण या कंपन्यांना मोकळे रान देतो. कृषी विद्यापीठाने नांदेड-44 व अन्य वाण तयार केले होते. त्यामध्ये आणखी संशोधन करण्याची आवश्यकता होती. सरकारने कृषी विद्यापीठांना मॅन्डेट दिलेला आहे. यामध्ये आणखी संशोधन करुन बी.टी.कॉटनच्या पलीकडे जाऊन देशी वाण निर्माण करण्याची गरज आहे. आज देशामध्ये जेनिटिकली मॉडिफाईड पिकासंबंधी चर्चा केली जाते. काही मंडळी त्याचा पुरस्कार करीत आहेत तर काही मंडळी त्याला विरोध करीत आहेत. परंतु समाज जीवनावर या संशोधनाचा किती परिणाम होत आहे, याचा विचार करणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने पूर्वी सर्रासपणे परवानगी देण्याचा प्रयत्न सुरु केला होता. त्याला राज्य सरकारांनी विरोध केल्यानंतर राज्य सरकारच्या एनओसीसाठी ते काम आपल्याकडे आले आहे. यासाठी शासनाने ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ.अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली आहे. त्यामध्ये विद्यापीठांचे कुलगुरु होते, शास्त्रज्ञ होते, त्या समितीचा अहवाल शासनाला प्राप्त झालेला आहे. या काकोडकर समितीने अटी व निर्बंध घालून त्याचे पालन केल्यानंतर ट्रायल करण्याची शिफारस केलेली आहे. त्यावेळी केंद्र सरकारकडून थेट परवानगी दिली जात होती.

मला येथे मॉन्सेन्टो कंपनीचा उल्लेख केला पाहिजे. त्या कंपनीने बी.टी.कॉटनच्या नावाखाली या देशामध्ये व राज्यामध्ये पैसे कमविण्याचा उद्योग सुरु केला होता. त्याची मोठी किंमत आज आपल्या शेतकऱ्यांना मोजावी लागली आहे. बी.टी.कॉटनचे वाण इरिगेटेड क्षेत्रासाठी उपयोगी आहे, आपण मात्र तो दुष्काळी भागामध्ये वापरतो. ज्यांनी ठिबक सिंचन केलेले आहे त्यांचे उत्पादन 20 क्विंटलपर्यंत गेलेले आहे. पण निव्वळ पावसावर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना लाल्या रोगाने कापूस उत्पादक संपविला. त्याबाबत जे वेगळे वास्तव आहे ते

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ D/ ST/ KTG/

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील....

आपल्याला स्वीकारले पाहिजे. पूर्वी कापूस किंवा इतर बियाण्यांच्या कंपन्यांना मोकळे रान होते. शासनाने 2 वर्षापूर्वी या कंपन्यांवर बंधन घातलेले आहे. आता कोणत्याही बियाण्याच्या कंपनीला राज्यात बियाण्याचे उत्पादन सुरु करण्यापूर्वी राज्य सरकारला दोन वर्षापूर्वी नोटीस द्यावी लागते. दोन वर्षानंतर त्यांना कृषी विद्यापीठाबरोबर ट्रायल घेण्याचे बंधन घातलेले आहे. दोन वर्षे विद्यापीठाबरोबर ट्रायल घेतल्यावर व विद्यापीठाच्या मान्यतेनंतरच त्यांना राज्यात बियाणे आणता येईल असे बंधन घालणारे देशातील पहिले राज्य होते. त्याच्या विरोधात ही मंडळी उच्च न्यायालयात गेलेली आहेत. आम्ही संशोधन करणार आहोत, आम्हाला ते बियाणे वापरण्यास आम्हाला परवानगी द्यावी. ती परवानगी दिल्यानंतर शेतकऱ्यांनी ते वापरल्यानंतर उगवित नव्हते असा अनुभव होता. त्यामुळे बियाणे महामंडळाचा उल्लेख करण्यात आला आहे. बियाणे महामंडळाच्या कारभारात सुधारणा करण्याची गरज आहेच. त्या महामंडळाचा कारभार सुधारण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व वाढविण्याचा प्रयत्न सुरु आहे. सध्या काही ठराविक भागातील शेतकरी प्रतिनिधी म्हणून जातात. राज्यातील प्रत्येक महसूल विभागातून एक प्रतिनिधी जावा अशी मी घोषणा केली होती. खरे म्हणजे यामध्ये केंद्र सरकारचे प्रतिनिधी आहेत आणि त्यांचे भागभांडवलही आहे. केंद्र सरकारचे संपूर्ण भागभांडवल परत केले पाहिजे, अशा सूचना मी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. हे महामंडळ राज्याचे आहे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी कायद्यात बदल केले पाहिजेत.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील....

प्रत्येक भागाचे वैशिष्टय वेगळे आहे. त्याअनुषंगाने पुढच्या काही महिन्यामध्ये बियाणे महामंडळाच्या मूलभूत कामकाजामध्ये सुधारणा करण्यात येईल. शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करणारे असे हे बियाणे महामंडळ होते. आजही राज्यातील लाखो शेतकरी बियाणे महामंडळाचे बियाणे डोळे झाकून घेतात. शेतकऱ्यांचा विश्वास कमी होऊ न देण्याचे दायित्व राज्य सरकारचे राहाणार आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या बाबतीत निश्चित स्वरुपाची कार्यवाही आपण करीत आहोत.

सभापती महोदय, राज्यातील मूलभूत बाबी संबंधी विचार करीत असताना राज्यातील कृषी विद्यापीठा संबंधी या ठिकाणी चर्चा झाली. राज्यामध्ये 9 हवामान प्रदेश आहेत. प्रत्येक हवामान प्रदेशाचे वैशिष्टय वेगळे आहे. कोकणामध्ये 8 हजार मिमी पाऊस पडतो, खानदेशामध्ये 600 ते 700 मिमी पाऊस पडतो, डेक्कन टापूमध्ये 400-500 मिमी पाऊस पडतो आणि विदर्भामध्ये गेल्या वर्षी 1800 मिमी पाऊस झाला. परंतु आपल्याकडे एकच कृषी धोरण आहे. यांत्रिकीकरणाचा किंवा अन्य कोणत्याही योजनेचा उल्लेख करताना आपण त्या त्या भागातील शेतकऱ्यांना न्याय देऊ शकलो नाही. म्हणून चारही कृषी विद्यापीठाच्या कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली ॲग्रो क्लायमेटिक झोनवर आधारित एक समिती गठीत केली होती, त्या समितीमध्ये त्या भागातील शेतकरी घेतले होते. आता सर्व समित्यांमध्ये अधिकारी आणि नोकरदार असतात. परंतु त्याच बरोबर जो स्टेकहोल्डर आहे त्या शेतकऱ्याचा सुध्दा समावेश प्रत्येक समितीमध्ये करण्याचे ठरविलेले असून तशी कार्यवाही प्रत्येक समितीमध्ये होत आहे. त्यामुळे कार्यालयात बसून कोणी एकतर्फी रिपोर्ट तयार करीत नाही. सन्माननीय कुलगुरु हे त्या त्या भागामध्ये फिरले. मला सांगण्यास आनंद वाटतो की, चारही कुलगुरुंचे अहवाल राज्य सरकारकडे प्राप्त झालेले आहेत. राज्यातील 9 हवामान प्रदेशावर आधारित राज्याचे नवीन कृषी धोरण आपण तयार करीत असून 2014मध्ये त्याची अंमलबजावणी होईल असे मी या ठिकाणी सभागृहाला आश्वासित करु इच्छितो. या निमित्ताने राज्याच्या कृषी धोरणामध्ये एक मोठा बदल होणार आहे आणि तो त्या त्या भागातील शेतक-याला अनुरुप असेल. शेतकऱ्याच्या मागणीचा विचार करुन, त्या भागातील शेती संशोधनाचा विचार करुन आपण कार्यवाही करतो. मघाशी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील....

कोरडवाहू शेतीसंबंधी उल्लेख केला. राज्याचे 82 टक्के क्षेत्र हे कोरडवाहू आहे. या कोरडवाहू शेतकऱ्यासंबंधी आदरणीय मुख्यमंत्र्यांनी दोन वर्षापूर्वी घोषणा केली आणि 10 हजार रुपयाचा आऊटले असलेल्या कोरडवाहू मिशनची स्थापना केली. नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. वाय.एस.थोरात यांना कोरडवाहू मिशनचे कार्यकारी अध्यक्ष केले ज्यामुळे बँकांचा सहभाग आपल्याला या सर्व योजनामध्ये करुन घेता येईल. यावर्षी दीडशे दोनशे कोटी रुपयाची तरतूद केली. परंतु 20 हजार कोटी रुपयाचा व्यापक प्रस्ताव करुन आणि त्यामध्ये केन्द्राचा अंतर्भाव करुन तो निधी मिळण्यासंबंधी राज्य मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव पाठविलेला आहे. राज्यातील 30 लाख हेक्टर क्षेत्र हे कोरडवाहू आहे. पुढच्या 5 वर्षामध्ये किमान 15 लाख हेक्टर क्षेत्र अवर्षणमुक्त करता आले पाहिजे अशा प्रकारचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. अशा प्रकारे आम्ही कोरडवाहू मिशनअंतर्गत राज्यात काम करायला सुरुवात केलेली आहे. 80 टक्के क्षेत्रामध्ये राहणाऱ्या कोरडवाहू शेतकऱ्याला न्याय कसा देता येईल यादृष्टीने कृषी विभागाचा प्रयत्न सुरु आहे. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येबाबत पुष्कळ चर्चा झाली. डॉ.स्वामीनाथन यांचा अहवाल आला. डॉ. स्वामीनाथन समितीच्या शिफारशी केन्द्राने स्वीकारल्या आणि त्या शिफारशी प्रमाणेच नॅशनल मिशन ऑफ फुड सेक्युरिटी, राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि तेलबियाण्याच्या उत्पादनासंबंधीचा कार्यक्रम आणि फळप्रक्रियेवर आधारित उद्योग या गोष्टी स्वीकारल्यानंतर एक दीर्घकालीन कार्यक्रम केन्द्र सरकारच्या मार्गदर्शनाखाली राज्य सरकारने सुरु केलेला आहे.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत/शीघ्रलेखाची नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

डॉ.स्वामीनाथन समितीच्या शिफारशींचा चांगला परिणाम नजीकच्या काळात पहावयास मिळाला आहे. विदर्भातील कापूस उत्पादक शेतकरी आत्महत्या करीत असल्याबाबतचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. माननीय विरोधी पक्ष नेते म्हणाले की, या राज्यात मेकॅनिकल हार्वेस्टर आले पाहिजे. आपण दोन वर्षांपूर्वी ब्राझिलच्या धर्तीवर हाय डेन्सिटी प्लांटेशनचा नवीन प्रयोग सुरु केला आहे. त्याचे परिणाम चांगले दिसून येत आहेत. परंतु आपण दोन, तीन, चारपर्यंत पिकींग करतो. माननीय श्री.पांडुरंग फुंडकर साहेब, आपण चार फ्लश घेतो. ब्राझिल किंवा ऑस्ट्रेलियामध्ये सिंगल फ्लशमध्ये कापूस पिकतो. त्यामुळे सर्व मेकॅनिकल हार्वेस्टर त्या ठिकाणी वापरले जाते. परंतु आपल्याकडे तशी व्यवस्था नाही. नागपूर येथे कॉटन रिसर्च इन्स्टिटयुट आहे. या ठिकाणी तसे संशोधन झालेले नाही.

महोदय, आपल्याकडे केंद्रीय संशोधन संस्था असून, दुर्दैवाने तिचे खऱ्या अर्थाने मूल्यमापन करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. कृषी संशोधनामध्ये मूलभूत बदल करण्यासाठी राज्यातील कृषी विद्यापीठातील संशोधनाचे मूल्यमापन करण्याची किंवा त्यांच्या कामकाजाचे मूल्यमापन करण्याची वेळ आली आहे. राज्यातील कृषी विद्यापीठे जमिनीचा किती प्रभावीपणे वापर करु शकेलेले आहे याचे मूल्यमापन करण्याची वेळ आलेली आहे. भविष्यात त्यामध्ये कोणते बदल करावेत हे ठरवावे लागेल.

सभापती महोदय, केंद्रीय नियोजन आयोगाचे माजी सदस्य आणि युपीएससीचे माजी अध्यक्ष श्री.वाय.के.अलक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या कामकाजामध्ये मूलभूत बदल करण्याच्या अनुषंगाने त्या समितीच्या माध्यमातून शिफारशी करण्यात येतील. राज्याच्या स्थापनेनंतर कृषी विद्यापीठामध्ये एवढा मोठा बदल प्रथमच केला जात आहे. हा बदल शेतकरी आणि शेती संशोधनासाठी पूरक राहणार आहे.

या चर्चेच्या अनुषंगाने अनेक मुद्दे चर्चिले गेले. मी आपला जास्त वेळ घेणार नाही. प्रामुख्याने दोन-तीन बाबी महत्त्वाच्या असल्यामुळे त्या निदर्शनास आणून देणार आहे. हवामानावर आधारित पीक विमा योजनेकरिता राज्याच्या 2100 महसूल ठिकाणी ऑटोमॅटिक वेदर स्टेशन बसविण्यासाठी विभागाच्या निविदा अंतिम झालेल्या आहेत. पुढील तीन-चार महिन्यात ऑटोमॅटिक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

वेदर स्टेशनच्या माध्यमातून सर्व शेती विषयक माहिती मोबाईलद्वारे शेतकऱ्यांपर्यंत पोहचेल. आज 15 लाख शेतकरी क्लोजर युजर ग्रुपमध्ये कृषी विभागाशी संलग्न आहेत. या माध्यमातून शेतकऱ्यांना शेती विषयक संपूर्ण माहिती देण्यात येते. अशाच प्रकारे ऑटोमॅटिक वेदर स्टेशनच्या माध्यमातून माहिती देण्याचा आमचा प्रयत्न आहे. आम्ही गेल्या दोन वर्षांपूर्वी 1800 क्रमांकाची टोल फ्री दूरध्वनी सेवा सुरु केलेली आहे. बियाणे किंवा खतांचा काळा बाजार झाल्यास शेतकरी या क्रमांकावर फोन करुन तक्रार नोंदवितात. बहुतांश शेतकरी माझ्या स्वत:च्या मोबाईलवर सुध्दा फोन करतात. महोदय, पारदर्शकता आणल्यानंतर कारभारात किती सुधारणा होते हे विभागाच्या कार्यवाहीवरुन दिसून येईल. अशा प्रकारे माहिती व तंत्रज्ञानाचा उपयोग प्रभावीपणे करुन त्याचा आज जो परिणाम शेतकऱ्यांच्या शेती जीवनामध्ये दिसत आहे तो भविष्यात अजून प्रभावीपणे कसा वाढविता येईल या बाबत विचार करता येईल.

महोदय, शेती मालाच्या किंमतीबद्दल या ठिकाणी उल्लेख केला गेला. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, किमान आधारभूत किंमतीच्या कार्यपध्दतीमध्ये खूप मोठी सुधारणा केली आहे. राज्याच्या 50 वर्षांमध्ये गेल्या वर्षी पहिल्यांदा 30 लाख मे.ट. धान्याची खरेदी झाली. या माध्यमातून ज्वारी, उडीद, मूग, सोयाबीन, तूर या धान्यांची खरेदी झाली. चालू वर्षात आम्ही एक महिना अगोदर खरेदी सुरु केली आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांकडून माहिती घ्यावी. एमएसपी ऑपरेशन वेळेवर सुरु राहिल्यामुळे व्यापाऱ्यांवर प्रचंड दडपण होते. त्याचा परिणाम शेतकऱ्यांना दोन वर्षांमध्ये चांगले भाव मिळाले. गेल्या दोन वर्षातील एमएसपी ऑपरेशनच्या परिणामांची सर्व आकडेवारी पटलावर ठेवण्यास मी तयार आहे. त्या आकडेवारीवरुन आपल्या निदर्शनास येईल की, एमएसपी ऑपरेशनचा परिणाम काय होऊ शकतो.

महोदय, कृषी मूल्य आयोगाबाबतचा उल्लेख माननीय श्री.विनोद तावडे यांनी केला. कृषी मूल्य आयोगाबाबत बोलण्यापूर्वी मी शेती मालाच्या थेट विक्रीसंबंधी सांगतो. अनेक वर्षे आपण चर्चा करतो की, शेतकऱ्यांना एपीएमसीमध्ये का जावे लागते ?

नंतर श्री.भोगले....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी माही

श्री.राधाकृष्ण विखे पाटील.....

कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे काम अनेक वर्षे सुरु होते. आता त्याना स्वत:ला बदलावे लागले आहे. काळाच्या ओघात त्यांना सरकार फार संरक्षण देईल अशी स्थिती नाही. कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडे पाहिले तर फक्त दुकाने बांधायची आणि व्यापा-यांना ती वाटायची एवढाच धंदा सुरु राहिला आहे. आपण साठवणूक व्यवस्था निर्माण करु शकलो नाही. वखार पावतीतून आमचा प्रयत्न आहे की, शेती मालाची किंमत पडली तर माल ठेवण्याकरिता शेतकऱ्यांना गोडावून पाहिजे. आपल्याकडे पुरेशी गोडावून नाहीत.

सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मक्याचा उल्लेख केला आहे. मका खरेदीबाबत आपण मोठी झेप घेतली आहे. मका उत्पादन वाढले आहे. मक्यामध्ये मॉयश्चर 12 टक्क्यावरुन 14 टक्क्यापर्यंत वाढविले आहे. अन्न व नागरी पुरवठा विभागाचा यामध्ये संबंध आहे. जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी गोडावून द्यायची. त्यांचे भाडे कोणी द्यायचे यामध्ये मतभेद होते. आता नव्याने आदेश काढले आहेत. भाडे एपीएमसीने द्यावे. नंतर त्याचा परतावा देण्यासंबंधी कार्यवाही करता येईल. आज मका खरेदी करताना मॉयश्चर मीटर वापरले जाते. तो शेतकरी माल भरायचा, बाजारात आणायचा आणि खरेदी केंद्रावर आल्यानंतर आमचे लोक सांगायचे मॉयश्चर 16 टक्के आहे, तू माल परत घेऊन जा. मग तो शेतकरी मका नाईलाजाने लोकल बाजारात कमी किंमतीत व्यापाऱ्याना विकायचा. त्याच्यापुढे पर्याय नसायचा. यावर्षी प्रत्येक गावात मॉयश्चर मीटर उपलब्ध करुन देत आहोत. त्या गावातील कृषी सहाय्यक ग्रामपंचायतीमध्ये बसेल, सोसायटीमध्ये बसेल. त्या शेतकऱ्याला वाटले की माझा मका बाजारात घेऊन जायचा आहे तर मॉयश्चर मीटर त्याला गावातच मिळेल. तेथेच तपासून घेईल आणि नंतरच माल भरेल. त्याला हमालीचा भुर्दंड बसणार नाही. अशी त्यामध्ये सुधारणा आहे.

सभापती महोदय, एपीएमसी धोरण आणताना पीपीपी मधून गोडावून बांधण्याची नवीन योजना राज्यात आणली आहे. बाजारभाव पडल्यानंतर शेतकरी घरात माल ठेवू शकत नाही. माल पावसात भिजण्याची भीती असते. उत्पादित माल ठेवण्याची क्षमता नाही. त्यासाठी पैसे पाहिजेत. म्हणून यावर्षी स्टार ॲग्रो कंपनीबरोबर करार केला असून 48 तासात शेतकऱ्यांना मालाचे पैसे मिळाले पाहिजेत अशी व्यवस्था केली आहे. दोन दोन महिने शेतकऱ्यांना पैसे मिळत

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे पाटील.....

नव्हते. 48 तासात पैसे मिळाले तर बँकेचे व्याज जास्त भरावे लागणार नाही. बँकेच्या व्याजाचा दर 12 टक्के असला तरी 5 टक्के सवलत शेतकऱ्यांना द्यायचे ठरविले आहे. 7 टक्के व्याजाचा भुर्दंड शेतकऱ्यांना सहन करावा लागेल.

सभापती महोदय, 140 मे.टन धान्याचे उत्पादन म्हटले तर 25 लाख टनाची साठवणूक क्षमता आहे. वखार महामंडळाची गोडावून्स स्टील आणि सिमेंट व्यापाऱ्यांना भाड्याने दिली आहेत. आम्हाला तुमची गोडावून्स रिक्त करा अशा त्यांना सूचना द्याव्या लागल्या. शेतकऱ्यांचा माल ठेवण्यासाठी गोडावून द्या. यामध्ये बाजार समितीने पुढाकार घेतला पाहिजे.

सभापती महोदय, कृषी उत्पन्न बाजार समितीकडून थेट भाजीपाला, फळे विक्री करण्याचे सुरु केले आहे. सभागृहात मला सांगायला आनंद होतो. कृषी पणन अधिनियमातून डाळ, गूळ, साखर, गहू, मैदा, ड्रायफ्रूट, एडिबल ऑईल वगळण्याचा निर्णय घेतला आहे. हे कृषी उत्पन्न बाजार समितीकडे द्यायचे, त्याचा परिणाम बाजारामध्ये भाव कमी जास्त व्हायचे. महागाई कमी होण्यास मदत होईल. कृषी उत्पन्न बाजार समितीचा संबंध राहणार नाही. या बाबतीत हरकती मागविल्या आहेत. त्यामध्ये पहिला टप्पा पूर्ण करीत आहोत.

सभापती महोदय, भाजीपाला आणि फळे थेट वितरण करण्याचा प्रयोग मुंबई आणि पुण्यामध्ये सुरु केला आहे. शेतकऱ्यांचे गट स्थापन होत आहेत. प्रत्येक गावामधून शेतकऱ्यांचा भाजीपाला येणार आहे. त्या ठिकाणीच पॅकेजिंग व प्रोसेसिंग होईल. त्यासाठी मुंबईमध्ये थांबण्याची गरज नाही. त्या ठिकाणी थेट बायडिंग करुन थेट भाजीपाला मुंबईच्या बाजारामध्ये येईल. गोरेगाव येथे कृषी उद्योग महामंडळाची जी व्यवस्था होती त्या ठिकाणी रिसिव्हींग सेंटर करीत आहोत. मोबाईल व्हॅनद्वारे मुंबईमध्ये शेतीमाल विक्री व्यवस्था करीत आहोत. शेतकरी माल घेऊन येईल, व्यापारी आणणार नाही किंवा कोणी दलाल आणणार नाही. ग्राहक व शेतकरी यांचे नाते प्रस्थापित होतील. दोन वर्षात फळ आणि धान्य महोत्सवातून शेतकरी आणि ग्राहक हे नाते निर्माण करु शकलो.. राज्यातील सुरु केलेला हा प्रयोग देशात पहिला प्रयोग आहे. शेतकऱ्यांचा उत्पादित माल थेट ग्राहकांपर्यंत जाण्याची कार्यवाही सुरु आहे.

नंतर 4यू.1...

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील...

सभापती महोदय, हे निर्णय व्यवस्थेच्या विरूद्ध आहे. त्यासंबंधीचा संघर्ष केव्हा तरी होणार आहे. पणन मंडळ आणि कृषि खाते यांचे एकत्रीकरण आदरणीय मुख्यमंत्र्यांनी केले आहे. शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या विक्रीचे नवीन स्वरूप, धोरण आणताना दोन्ही विभागाची मदत होते म्हणून त्यांनी दोन्ही यंत्रणा एकत्रित केल्या आहेत. त्याचा परिणाम शेतकऱ्यांवर होत आहे. राज्य सरकारची हीच भूमिका आहे की, शेती उत्पादन केलेल्या मालाची किंमत ठरविण्याचा अधिकार व्यापाऱ्याकडे न राहता शेतकऱ्यांकडे असला पाहिजे. त्यादृष्टीने आम्ही पावले उचलत आहोत.

मध्यंतरीच्या काळामध्ये काजू आणि मँगो बोर्ड स्थापना करण्यासंबंधीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. काजू व मँगो बोर्ड स्थापन करून सर्व काजू व मँगो उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आपण एक पाऊल पुढे टाकलेले आहे.

सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मृत शेतकऱ्याच्या विधवा पत्नीच्या नावावर जमीन हस्तांतरण करण्यासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला आहे. कृषि विभागातर्फे महसूल विभागाला अशा जमिनी शेतकऱ्यांच्या विधवा पत्नींच्या नावे करण्यासंबंधी विशेष मोहीम घेण्याबाबत कळविण्यात येईल. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना दत्तक घेण्यासंबंधी कृषि विभागाने योजना तयार केली आहे. या कुटुंबांचे पुनर्वसन कसे करता येईल याचा प्रयत्न दोन वर्षांपासून करत आहोत. त्यात आम्हाला फार यश मिळाले नाही हे मी मान्य करतो. शेवटी त्या लोकांना काय भविष्य आहे ? आत्महत्या कशामुळे केली हा चर्चेचा विषय नाही. त्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन कसे करायचे हा महत्त्वाचा प्रश्न आहे. कृषि विद्यापीठे, राज्यातील कृषि विभागांना व खाजगी कृषि विद्यापीठांना आपण प्रत्येक गाव दत्तक घेण्यास सांगितले आहे. त्यांनी मॉडेल व्हिलेज तयार करावे अशा सूचना दिल्या आहेत. शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा तेथे निर्माण कराव्यात असे सांगितले आहे. त्यामुळे अन्य गावांना उत्पादनापासून सर्व काही मिळेल. एवढेच नव्हे तर त्यातून त्यांना प्रशिक्षण देखील मिळेल व चांगले काम करता येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील...

कृषिसाठी स्वतंत्र बजेट असावे अशी राज्यातील सर्व शेतकऱ्यांची मागणी आहे. यासाठी आमचा प्रयत्न सुरू आहे. बजेट म्हटले की, रिसिट आणि पेमेंट आले. याचा आपल्याला केव्हा तरी गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. मघाशी संत्रा उत्पादकांचा उल्लेख झाला. विदर्भातील संत्रा उत्पादकांचे थेट मार्केटींग करण्याकरिता यावर्षी आपण पाऊल उचलले आहे. भंडारा, चंद्रपूर, गोंदिया येथील धानाचे मुंबईमध्ये मार्केटिंग करण्याचे आम्ही ठरविले आहे. हे मार्केटिंग पणन महामंडळाच्या माध्यमातून मुंबईतील मॉलना थेट करण्याची कार्यवाही आम्ही आता करीत आहोत. राज्यात गेल्या दोन वर्षामध्ये 250 कोटी रूपये खर्च करून 45 निर्यात केंद्र सुरू करण्यात आली आहेत. आता आम्ही सर्व जिल्ह्यांच्या याद्या तयार केल्या आहेत. छोटे-छोटे उद्योजक, संस्था पुढे येत असतील तर त्यांना शेतकरी सहकारी संस्था चालविण्यास देण्यास तयार आहोत. सुरूवातीसाठी लागणारे भांडवल देखील देण्यास आम्ही तयार आहोत. त्यांना आम्ही प्रक्रिया केंद्र, मॉडेल व्हिलेज चालविण्यास देण्यास तयार आहोत. सुरूवातीला पहिली 2-3 वर्षे सबसिडी द्यावी लागेल. त्यासाठी मदत करण्यास देखील आम्ही तयार आहोत. उत्पादित केलेल्या मालाची विक्री करण्याची व्यवस्था आपण निर्माण केली असून ती व्यवस्था शेतकऱ्यांनी चालविली तर त्यासाठी लागणारा पैसा देखील सुरूवातीला देण्यास राज्य शासनाची तयारी आहे. एवढे व्यापक काम त्यात आहे. शेती माल भाव समितीची पुनर्रचना करण्याची घोषणा आपण गेल्या वेळी केली होती. त्यानुसार आम्ही पुनर्रचना केली आहे.

यानंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील .....

सभापती महोदय, या सभागृहाचे माजी सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांचे खऱ्या अर्थाने अभिनंदन केले पाहिजे. त्यांनी पाठपुरावा करुन समितीची पुनर्ररचना करुन घेतली. मला सांगण्यास आनंद होत आहे की, आपण केंद्र शासनाला दोन वर्ष सातत्याने शिफारशी केल्यामुळे व पाठपुरावा केल्यामुळे हमी भावाच्या किंमतीमध्ये वाढ झाली आहे. पूर्वी 1300 रुपये हमी भाव होता आता तो 4300 रुपयांपर्यंत गेलेला आहे. शेतीमाल भाव समितीचे रुपांतर राज्य कृषी मूल्य आयोगामध्ये करण्याची या निमित्ताने मी घोषणा करतो. राज्य कृषी मूल्य आयोगाच्या माध्यमातून राज्याला एक चांगली व्यवस्था निर्माण करता येईल. राज्यातील शेतकऱ्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याबाबत आपल्याला चांगल्या प्रकारे विचार करता येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या काही सूचना केल्या होत्या त्या सूचनांना उत्तरे देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या प्रयत्नामुळे आपण गेल्या 3 वर्षापासून कापसाची निर्यात बंदी होऊ दिली नाही. कांद्याची निर्यात बंदी करण्यापेक्षा मिनीमम एक्सपोर्ट प्राईज (एमईपी) वाढवली होती. एमईपी जवळ जवळ 1100 डॉलरपर्यंत केली होती. आदरणीय मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून गेल्या दोन दिवसापासून कांद्याची मिनीमम एक्सपोर्ट प्राईज कमी करण्यासंदर्भात केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. यासंदर्भात लवकरच बैठक होणार असून कांद्याची एमईपी पूर्णपणे काढून टाकावी अशी आम्ही मागणी करीत आहोत. एमईपीची जी अट घातली होती ती काढून टाकली तर कांद्याची निर्यात वाढेल व पर्यायाने कांद्याचे आता जे भाव पडले आहेत ते वाढण्यामध्ये मदत होईल. त्यामुळे राज्य सरकारच्या वतीने यासंदर्भात विशेष प्रयत्न सुरु आहेत.

सभापती महोदय, जळगावच्या कापूस संशोधन केंद्राची घोषणा करण्यात आली होती व त्या प्रमाणे जळगाव कापूस संशोधन केंद्रास निधी दिला जाणार असून प्रत्यक्षात जळगाव येथे कापूस संशोधन केंद्र सुरु होईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मला सन्माननीय सदस्यांना आश्वासित करावयाचे आहे की, व्यापक स्वरुपात किंवा पहिल्यांदाच राज्याच्या कृषी धोरणामध्ये तसेच पणनच्या धोरणात केलेले बदल भविष्यात शेतकऱ्यांना निश्चितपणे आधार देतील किंबहूना शेतकऱ्यांच्या विश्वासाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील .....

पात्र ठरण्याचे काम आम्ही सातत्याने करीत असून त्यामध्ये राज्यातील शेती व्यवस्थेला नवी उभारणी देण्याचे काम निश्चितपणे होईल अशी अपेक्षा व्यक्त करतांना मी सांगू इच्छितो की, ठिबकचे पूर्वी प्रत्येक कंपन्यांचे भाव वेगवेगळे होते. कोणत्या कंपनीचे ठिबक घ्यावे हे शेतकऱ्यांना माहीत होत नव्हते. त्यावेळेस 50 टक्के सबसिडी दिली जात होती. आमचे लोक फॉर्म भरुन शिक्के मारुन देत असत. परंतु आता ग्लोबल टेंडरमुळे ठिबक सिंचनाचे दर कमी झाले,सगळ्या राज्यातील कंपन्यांचे भाव एक झाले, तंत्रज्ञानाच्या नावाखाली शेतकऱ्यांची लूट थांबली. ठिबक सिंचनासाठी राज्य सरकारला किमान 700 कोटी रुपये सबसिडीच्या रुपाने द्यावे लागणार असून हे पैसे उपलब्ध करुन देण्याचा विभागाचा प्रयत्न आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी किमान ऊसाची शेती पुढील 3/4 वर्षात ठिबक खाली आली पाहिजे अशी भावना व्यक्त केली असून यासाठी खात्याने कार्यक्रम देखील तयार केलेला आहे. ठिबक सिंचनासाठी निधी उपलब्ध करुन देण्यासंबंधी आमचे प्रयत्न सुरु आहेत. विदर्भ इन्टेंसीव्ह एरीगेशनमध्ये 75 टक्के सबसिडी दिली जाते व विदर्भ सोडून इतर भागाला 50 टक्के सबसिडी ठिबक सिंचनासाठी दिली जाते.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. केंद्रीय कृषी मंत्री श्री. पवार साहेबांनी राज्य शासनाला सांगितले होते की, ऊसाला ठिबकनेच पाणी दिले गेले पाहिजे. आपल्याकडे जेवढे पाणी आहे त्यातील 95 टक्के पाणी ऊसासाठी दिले जात आहे. आपल्याला जर जमिनीतील पाणी शिल्लक ठेवायचे असेल तर ऊसाला जास्तीत जास्त ठिबक सिंचनने पाणी दिले पाहिजे. ठिबक सिंचन उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी राज्य शासनाने तातडीने घेतली पाहिजे असे केंद्रीय कृषी मंत्री श्री.पवार साहेबांनी सांगितल्या नंतरही त्यांच्या सूचनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासनानकडे पैसे कसे काय नाहीत ? एकदा धोरण जाहीर झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी शासनाने केलीच पाहिजे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ठिबक सिंचनाचा जो उल्लेख केलेला आहे त्याप्रमाणे ठिबक सिंचनाच्या सबसिडीसाठी राज्य शासनाला 700 कोटी रुपये लागणार आहेत. ठिबक सिंचनाच्या सबसिडीचे पैसे वर्ष दीड वर्षानंतर शेतकऱ्यांना मिळत असतात. खरे म्हणजे विभाग म्हणून हे आमचे अपयश आहे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील...

निधी वेळेवर उपलब्ध होत नाही. पूर्वी कंपन्यांच्या खात्यावर पैसे जमा होत असल्यामुळे किती पैसे मिळतात हे शेतकऱ्यांना माहीत नव्हते. आपण गेल्या वर्षापासून सबसिडीची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यास सुरुवात केली. त्यामुळे शेतकरी प्रत्येक गोष्ट पाहू लागला. कंपनीने कोणते ड्रीप, पाईप बसविले आहेत हे तो पाहू लागला. त्यामुळे दर्जा सुधारला. आता कंपन्यांकडून शेतकऱ्यांची होणारी फसवणूक थांबलेली आहे. राज्यात ठिबक सिंचनाचा वापर अधिकाधिक पध्दतीने वाढविण्याचा आमच्या विभागाचा प्रयत्न आहे. राज्यातील शेतकऱ्यांच्या ठिबक सिंचनाच्या बाबतीत ज्या अपेक्षा आहेत त्या संदर्भात एक धडक कार्यक्रम निश्चितपणे घेण्यात येईल असे मी आश्वासित करु इच्छितो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी येथे निधीचा उल्लेख केला. या सदनाचे नेते आणि माननीय उपमुख्यमंत्री यांनी सांगितले होते की, येत्या तीन वर्षात सर्व ऊसाची शेती ठिबक पध्दतीने करण्यात येईल. ते अर्थमंत्री देखील आहेत. त्यांनी सभागृहात असे उत्तर दिलेले असल्यामुळे त्यांनी ती जबाबदारी घेतलेली आहे. आपण येथे सांगत आहात की, निधी उपलब्ध नाही. माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी येथे शब्द दिलेला आहे. ठिबकसाठी निधीची व्यवस्था होत नाही असे भविष्यात ऐकायला मिळू नये अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांचा या गोष्टीला विरोध नाही. परंतु सध्याच्या वेगवेगळया योजनांमध्ये, तसेच अतिवृष्टी आणि दुष्काळासाठी दिलेल्या निधीचा परिणाम स्वाभाविकपणे राज्याच्या योजनेवर होतो. आता सन 2014-2015 चे बजेट पाठविताना माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी दिलेले आश्वासन आणि विभागाने केलेली मागणी याची निश्चितपणे कार्यवाही होईल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

श्री.सुभाष झांबड : सभापती महोदय, माननीय कृषी मंत्री महोदयांनी येथे बरीच माहिती दिलेली आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. मी त्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी औरंगाबादसाठी मका प्रक्रिया केंद्र उघडण्यात येईल अशी घोषणा केली होती. त्याबद्दल त्यांनी आम्हाला माहिती द्यावी अशी मी आपल्यामार्फत त्यांना विनंती करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, औरंगाबाद येथे अपेडाच्या मदतीने कॉर्नहब निर्माण करण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेतलेला आहे. औरंगाबाद येथे कॉर्नहब उभारण्याच्या दृष्टीने पावले लवकरच उचलली जातील.

सभापती महोदय, औरंगाबाद येथील जुने टर्मिनल बंद पडलेले आहे. त्या संदर्भात एअरपोर्ट ऑथॉरिटीशी चर्चा करुन तेथे ॲग्रो एक्सपोर्ट झोन करुन तेथून कृषी मालाची निर्यात करण्यासाठी त्या विमानतळाचा वापर कशा पध्दतीने करता येईल या दृष्टीने एअर पोर्ट ऑथॉरिटीशी चर्चा करुन त्या संदर्भात लवकर निर्णय घेणार आहोत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण राज्य कृषी मूल्य आयोगाची घोषणा केली. म्हणजे यापुढे शेतीचे हमीभाव राज्यात निश्चित होणार. आयोग स्थापन केला म्हणजे शेतीच्या मालावे भाव राज्यात ठरणार आहेत. त्यासाठी केंद्र सरकारकडे जाण्याची गरज नाही. जर केंद्र सरकारकडे जाण्याची गरज असेल तर या आयोगाचा उपयोग काय ? मला वाटते आयोगाला स्वायत्तता आहे. या आयोगाला सरकर आणि राजकारणापासून दूर ठेवले तर आयोगाला नि:पक्षपातीपणे काम करता येईल. राज्य कृषी मूल्य आयोग शेतीच्या मालाचे भाव ठरविणार असेल तर ते खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या उपयोगी आहे. अन्यथा फक्त नाव बदलले ,काम तेच आहे असा प्रकार होईल.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, गेल्या दोन वर्षात बियाणांसाठी लाठीमार करावा लागला नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

लातूर, नांदेड या भागात गेल्या दोन वर्षांपासून दुष्काळ आहे. मुळात त्या भागात दुष्काळ असल्यामुळे शेतकऱ्यांवर लाठीमार कसा होईल, माननीय मंत्र्यांनी काहीही आकडेवारी सांगायची आणि आम्ही ती ऐकायची काय ? या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, माननीय मंत्री महोदय, आपण माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या बाजूला बसल्यामुळे आपल्यावर एवढा परिणाम झाला आहे काय ?

महोदय, माननीय कृषी मंत्र्यांनी सांगितले की, आघाडी सरकारने गेल्या दोन वर्षात चांगले काम केले आहे. आघाडी सरकारने चांगले काम केले असेल तर शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची आकडेवारी कमी व्हावयास हवी होती. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी राज्यातील कोणत्या जिल्ह्यात किती आत्महत्या झाल्या याची सविस्तर आकडेवारी सांगितली आहे. 170 आत्महत्या झाल्यानंतर 10 हजाराचा आकडा पार होईल. त्यामुळे कृषी विभाग किंवा आघाडी सरकारकडून चांगले काम झाल्याचे प्रमाणपत्र घेण्याचे काहीच कारण नाही.

महोदय, दोन वर्षापूर्वी माननीय कृषी मंत्र्यांनी ॲडव्हान्स बुकींगवर बंदी आणल्याचे घोषित केले होते. या निमित्ताने माझे माननीय कृषी मंत्र्यांना आव्हान आहे की, ॲडव्हान्स बुकींग करणाऱ्या ज्या बियाणे कंपन्या आहेत त्यांचे गेल्या दोन वर्षातील बँक अकाऊंटस् मागवून ते तपासावे. त्या कंपन्यांचे बँकेत व्यवहार झाले आहेत की नाही हे त्यावरुन दिसून येईल. मी अशी खाती मागविली असून, त्या खात्यात व्यवहार झाल्याचे माझ्या निदर्शनास आलेले आहे. त्या कंपन्यांकडून ॲडव्हान्स बुकींगचे व्यवहार होऊन सुध्दा त्यांच्यावर कारवाई केली नसेल तर आपण केवळ घोषणा करता, कारवाई करीत नाही असेच म्हणावे लागेल.

मी सन्माननीय सदस्य श्री.सुभाष झांबड यांना सांगू इच्छितो की, आपण माननीय मंत्र्यांच्या घोषणांमुळे खूष होऊ नका. आपण नवीन सदस्य आहात. आपण हे लक्षात घ्यावे की, या शासनाने घोषणा केल्यानंतर कधीच काही होत नाही.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाऊसाहेब फुंडकर यांनी मला सांगितले की, बुलढाणा जिल्ह्यातील बियाणे कंपन्यांकडून 150 कोटी रुपयांची ॲडव्हान्स बुकींग झाली आहे. हे त्या कंपन्यांच्या बँक खात्यावरुन दिसून येते. यावरुन आपली घोषणा किती पोकळ आहे हे दिसून येते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

महोदय, मी कृषी विज्ञान विद्यापीठाच्या संशोधनाचा विषय मांडला होता. आपण इशाऱ्याने सांगितले की, ते सर्व झोपलेले आहेत. या बाबत आपण खूप प्रामाणिक होता याचे मी कौतुक करतो. पण पुढे काय करणार आहात ? या निमित्ताने सांगतो की, ज्या कृषी विज्ञान विद्यापीठांकडून संशोधनाचे काम होत असेल त्यांना इन्सेंटीव्ह देण्याची आणि ज्यांच्याकडून काम होत नसेल त्यांना पेनल्टी लावण्याची कारवाई विद्यापीठाचे कुलगुरु या नात्याने आपण करणार काय, पुढील तीन वर्षात अमुक पाच गोष्टी झाल्या पाहिजेत असे बंधन त्यांच्यावर घालणार काय ? परंतु या बाबतचा उल्लेख उत्तरामध्ये झाला नाही.

महोदय, आम्ही कापसाला प्रती क्विंटल 6 हजार रुपये, सोयाबीनला 4500 रुपये, धानाला 3 हजार रुपये, काळ्या ज्वारीला 10 हजार रुपये प्रती क्विंटल आणि संत्र्याला 50 हजार रुपये प्रती हेक्टर भाव जाहीर करण्याबाबत मागणी केली होती. पण तो भाव दिला नाही. आम्हाला वाटले होते की, या संदर्भातील घोषणा माननीय मंत्र्यांच्या उत्तरामध्ये होईल. नागपूर येथून जाताना सरकार शेतकऱ्यांना काही तरी देऊन गेले अशी भावना निर्माण होईल असे वाटले होते. परंतु दुर्दैवाने त्या बाबतचा उल्लेख उत्तरामध्ये झाला नाही. माननीय कृषी मंत्री, आपण युती सरकारमध्ये मंत्री होता तेव्हा पॉवरफुल होता. दिवंगत प्रमोद महाजन हे आपले कौतुक करायचे. परंतु आता आपला पूर्वीसारखा प्रभाव दिसत नाही. आता त्यांची अशी अवस्था का झाली ?

महोदय, या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने शेतकऱ्यांना ठोस स्वरुपाची मदत करता आली असती. माननीय कृषी मंत्र्यांनी विदर्भातील शेतकऱ्यांचीच नव्हे तर राज्यातील शेतकऱ्यांची घोर निराशा केली आहे. त्याचा मला निषेध करावासा वाटतो.

श्री.दिवाकर रावते : महोदय, शेतकऱ्यांच्या मालाला भरीव किंमत मिळावी म्हणून आम्ही मागणी केली होती. माननीय कृषी व पणन मंत्री या परिस्थितीत शेतकऱ्यांच्या मालाच्या खरेदीची हमी देत नसतील तर आम्ही त्यांचे काही ऐकून घेऊ इच्छित नाही. सरकारच्या या बाबीचा निषेध करुन आम्ही सभात्याग करतो.

तालिका सभापती : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

नंतर श्री.कांबळे....

अशुद्धीत मत / शुद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यात महिला व बालकांवर होत असलेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये होत असलेली वाढ.

मु.शी.: राज्यात महिला व बालकांवर होत असलेल्या लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये होत असलेली वाढ, या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र. पाटील, सुमंतराव गायकवाड, चंद्रकांत पाटील, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.रणजित पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विजय ऊर्फ भाई गिरकर, नागो पुंडलिक गाणार, भगवान साळुंखे वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरू ....

श्री. आर.आर.पाटील (गृहमंत्री) : महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या महिलांच्या सुरक्षिततेबद्दलच्या प्रस्तावावर उत्तर देण्यासाठी मी उभा आहे. राज्यात महिलांच्या बाबत अन्याय, अत्याचार, गुन्हे घडत आहेत, त्या संदर्भात चिंता व्यक्त करण्यात आली आहे. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चाही झाली आहे. पण सभागृहात अन्य कामकाजामुळे या प्रस्तावाचे उत्तर थोडेसे विलंबाने होत आहे. आपण सर्वांनीच संवेदनशीलपणे या प्रकरणांकडे पाहण्याची गरज आहे. राज्यातील गुन्हेगारीचा चार्ट पाहिला तर आपल्याला असे दिसेल की, सन 2012 च्या तुलनेमध्ये ऑक्टोबर, 2013 पर्यंत हुंड्यासाठी खून यामध्ये 22 ने घट आहे, हुंड्यासाठी खुनाचा प्रयत्न यामध्ये 1 ने वाढ आहे, हुंडाबळींची संख्या यामध्ये 55 ने घट आहे, आत्महत्येस प्रवृत्त करणे यामध्ये 30 ने घट आहे, बलात्कारांच्या घटनांत मात्र 993 ने वाढ आहे, अपहरण आणि पळवून नेणे यामध्ये 661 ने वाढ आहे, पती व पतीच्या नातेवाईकांकडून अत्याचार यामध्ये 1094 ने वाढ आहे. सर्वांत जास्त वाढ विनयभंग या कॅटेगरीमध्ये असून 3461 घटनांची जास्तीची नोंद झाली आहे, अनैतिक व्यापार प्रतिबंधक यामध्ये 68 ने गुन्हे कमी झाले आहेत,

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

अश्लील प्रदर्शन यामध्ये नाममात्र वाढ आहे, हुंडाप्रतिबंधक कायद्यानुसार केवळ 2 ने वाढ आहे. सर्व गुन्हे पहिल्यानंतर आपल्याला असे दिसेल की, विनयभंग, पती व पतीच्या नातेवाईकांकडून अत्याचार व छेडछाड यामध्ये ॲबनॉर्मल वाढ आहे. राज्यात एकूण किती गुन्हे घडले, गुन्ह्यांची संख्या किती हे सांगण्यात मी वेळ घालवत नाही. सदनातील सर्वच सन्माननीय सदस्यांना याची कल्पना आहे की, जेवढे गुन्हे प्रत्यक्षात होत आहेत, त्याच्या किती टक्के गुन्हे नोंदविले जातात. महिला सोशिकपणे घेत असल्यामुळे किंवा छेडछाड केली तरी या बाबतीत वाच्यता झाली तर बदनामी नको या भीतीमुळे अजूनही सर्व गुन्ह्यांची नोंद होत नाही. सर्व गुन्ह्यांची नोंद होत आहे, असा दावा मी करणार नाही. नोंद होत असलेल्या गुन्ह्यांपेक्षा कित्येक पटींनी अधिकचे गुन्हे प्रत्यक्षात घडत असतील ही वस्तुस्थिती मलाही मोकळेकपणाने मान्य करावीशी वाटते आणि मी ते मान्य करतो. घडलेल्या गुन्ह्यांमध्ये थोडीशी वाढ आहे याचीही सरकारने गांभीर्याने दखल घेतली आहे. महिला राज्यात सुरक्षित असाव्यात, यासाठी शासनाने उपाययोजना केली आहे. गृह विभागाने ही वाढ होण्यामागील कारणांचे अनॅलिसिस देखील केले आहे.

सभापती महोदय, दिल्लीत निर्भयाची घटना घडल्यानंतर समाजामध्ये जागृती निर्माण झाली आहे. अन्याय होत असेल तर न्याय मागितला पाहिजे, अशी महिलांची भूमिका दिवसेंदिवस वाढत चालली आहे आणि ही चांगली गोष्ट आहे. अन्याय सहन करण्यापेक्षा न्याय मागणे केव्हाही निश्चितपणे चांगले आहे. महिला गुन्ह्यांची नोंद करण्यासाठी पुढे येऊ लागल्या आहेत. शासनाने सुध्दा पोलिसांना विशेष व कडक सूचना दिल्या आहेत की, असे गुन्हे नोंदविण्यास कोणी कसूर केली तर कठोर कारवाई करण्यात येईल. शासनाने पोलिसांवर कारवाई करण्याची भूमिका स्वीकारली आहे. गुन्हे योग्य पध्दतीने नोंदविले नाहीत तर अधिकाऱ्यांना निलंबित करण्याची कठोर भूमिकाही शासनाने घेतली आहे. दिल्लीच्या घटनेनंतर महिला गुन्हे नोंदविण्यासाठी पुढे येत आहेत, अन्याय सहन करीत नाहीत. शासनाने घेलेल्या भूमिकेमुळे गुन्हा समजावून बाहेरच्या बाहेर न मिटविता किंवा बळजबरीने परत न पाठविता, गुन्ह्यांच्या नोंदी केल्या जात आहेत. त्यामुळे कदाचित हे गुन्हे वाढलेले दिसत आहेत.

(नंतर श्री. खंदारे ....

अशुद्धीसह प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

सभापती महोदय, एक दावा मात्र मी विनम्रपणे करीन की, एका बाजूला गुन्ह्यात होत असलेली वाढ मी मान्य करीन पण देश स्तरावर महानगरांमध्ये व राज्यामध्ये गुन्ह्यांचे दर लाख लोकसंख्येमागे प्रमाण पाहिले तर या देशामध्ये महिलांच्या बाबतीत महाराष्ट्र एक सुरक्षित राज्य आहे. आपली मुंबई ही महानगरांमध्ये अत्यंत सुरक्षित महानगर आहे. हे सर्व पोलिसांमुळे होत आहे असा खोटा दावा मी कधीच करणार नाही. एकूणच राज्यात झालेली जनभावना व आतापर्यंत झालेल्या चळवळी, महिलांकडे आदराने बघण्याचा नागरिकांचा दृष्टीकोन यामुळे हे शक्य झालेले आहे. पोलिसांकडून सर्व गोष्टी नियंत्रित होत नाहीत. लोकांच्या सहकार्यातून, लोकांचा महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन यातून या गोष्टी होत असतात. महाराष्ट्रातील एकूण जनमानस महिलांचा सन्मान केला पाहिजे अशा स्वरुपाचा आहे. ज्यावेळी चांगल्या प्रवृत्तीचे लोक असतात त्याच समाजामध्ये वाईट प्रवृत्तीचेही लोक असतात. चांगल्या प्रवृत्तीच्या लोकांची संख्या जास्त आहे, तशीच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांची संख्याही आहे. हेही आपल्याला अमान्य करता येणार नाही. दरवर्षी मुंबईमध्ये नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोकडून जी आकडेवारी समोर येते त्यामध्ये नोंद होणाऱ्या गुन्ह्यांचे प्रमाण पाहिले तर देशभरात जी 53 शहरे आहेत. त्यामध्ये मुंबईचा 49 वा क्रमांक आहे. याचा अर्थ देशामधील अन्य 48 शहरांमध्ये मुंबईपेक्षा जास्त गुन्हे होत आहेत. ही आकडेवारी स्वयंस्पष्ट आहे. महाराष्ट्रात व मुंबईत महिला सुरक्षित आहेत, गुन्हे तर होत आहेत. जास्तीचे गुन्हे नोंदविले जात आहेत.

एका बाजूला आपण सुरक्षित आहोत असे म्हणत असताना दुसऱ्या बाजूला वाढत असलेले गुन्हे लक्षात घेऊन राज्य सरकारने काही उपाययोजना केलेल्या आहेत. प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये महिला सहायक कक्ष स्थापन केलेला आहे. महिला जर पोलीस स्टेशनमध्ये आल्या तर त्याची गंभीरपणे दखल घेतली पाहिजे, त्यांना मदत करणारे कक्ष निर्माण केलेले आहेत. राज्यातील 98 टक्के पोलीस स्टेशनमध्ये 1089 पोलीस स्टेशनमध्ये सदर कक्ष स्थापन केलेले आहेत. या कक्षामध्ये एक पोलीस निरीक्षक, एक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस हवालदार व कॉन्स्टेबलचा समावेश आहे. महिला सुरक्षा समित्या तयार केलेल्या आहेत. आयुक्तालये व जिल्हा पोलीस स्टेशन पातळीवर दर महिन्याला बैठका होत आहेत. महिलांच्या सुरक्षिततेबाबत त्या त्या जिल्ह्यात आयुक्ताकडून आढावा घेतला जातो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

महिला व बालविकास विभागाने चांगली कामगिरी केलेली असल्यामुळे पोलीस स्टेशनच्या इमारतीमध्ये महिला समुपदेशन कक्ष गठित केलेले आहेत. त्यामध्ये कर्मचारी, सहायकांना नेमले आहे, त्यांचे वेतन व मानधन राज्य सरकारने वाढविले आहे. महिलांवरील अत्याचाराचे व बलात्काराचे खटले लवकर निकालात काढण्यासाठी विशेष न्यायालयांची स्थापना केलेली आहे. अहमदनगर, अकोला, अमरावती, औरंगाबाद, बीड, जालना, जळगांव, नागपूर, यवतमाळ, ठाणे, पुणे, कोल्हापूर व मुंबई अशी एकूण 13 विशेष न्यायालये स्थापन केलेली आहेत.

उच्च न्यायालयाने मंजूर केल्या प्रमाणे राज्यात 100 जलदगती न्यायालये कार्यरत आहेत. पुढील 5 वर्षासाठी या जलदगती न्यायालयांना उच्च न्यायालयाने मान्यता दिलेली आहे. यापैकी 25 न्यायालये महिलांवरील अन्याय दूर करण्यासाठी, अत्याचाराचे निराकरण करण्यासाठी, न्याय देण्यासाठी व गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी वापरली जावी व त्याचा उपयोग त्यासाठी व्हावा ही शासनाची मागणी मान्य झालेली आहे. त्यामुळे आज जे दावे प्रलंबित राहत आहेत ते दावे पुढील काळात मार्गी लागतील.

कौटुंबिक वादाची प्रकरणे निकाली काढण्यासाठी 23 कौटुंबिक न्यायालये कार्यरत आहेत. त्यामध्ये आणखी वाढ केली पाहिजे. कुटुंबातील भांडणांचाही निर्णय लवकर झाला पाहिजे यादृष्टीनेही गृह विभागाचा प्रयत्न आहे. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करावे म्हणून 2005-06 मध्ये कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण करणारा अधिनियम तयार केलेला आहे. त्यामध्ये महसूल व गृह खात्याच्या यंत्रणांनी काम करावे अशी अपेक्षा आहे.

नंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

त्या आणखी सक्षम करण्याच्या बाबतीत आम्ही प्रयत्नशील आहोत. बलात्कारासारख्या ज्या गंभीर गुन्ह्याच्या घटना घडतात त्यांना प्रतिबंध करण्यासाठी ज्या उपाययोजना केलेल्या आहेत त्यामध्ये शीघ्रगती न्यायालयाची स्थापना करणे, भारतीय पुरावा कायदा कलम 155(4)मध्ये सुधारणा करणे, सीआरपीसीच्या कलम 309 नुसार केसेसची दैनंदिन सुनावणी करणे, दोषारोप पत्र दाखल झाल्यापासूनच्या 30 दिवसाच्या आत केसेसची सुनावणी करणे, वैज्ञानिक सहाय्यक प्रयोग शाळेने नमुने दिल्यापासून 3 आठवड्यामध्ये अहवाल देणे, सुनावणी इन कॅमेरा करणे, केसेसच्या सुनावणीची प्रसिध्दी करण्यास प्रतिबंध करणे, कायद्यामध्ये कमीत कमी व जास्तीत शिक्षे बद्दल स्पष्ट तरतुदी करणे अशा केससच्या सुनावणीसाठी कोर्टातील न्यायाधीश शक्यतो महिला असाव्यात यासाठी हायकोर्टाला विनंती करणे अशा प्रकारच्या अनेक उपाययोजना राज्य सरकारने केलेल्या आहेत. पार्लमेण्टमध्ये निर्भया केसनंतर एक पुरोगामी कायदा, गुन्हेगारांना जरब बसविणारा आणि शिक्षा करणारा कायदा पार्लमेण्टने केलेला आहे. परंतु मी सन्माननीय सदस्यांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, हा कायदा होण्यापूर्वी अशा स्वरुपाचा कडक कायदा असला पाहिजे आणि या कायद्याचे प्रारुप तयार करुन तो मान्यतेसाठी केंद्राकडे पाठविणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील एकमेव राज्य आहे. कायदे करण्याच्या बाबतीत आपल्या राज्याने नेहमीच पुढाकार घेतलेला आहे. ज्या कायद्यांच्या बाबतीत आपण सूचना केल्या होत्या त्यासंदर्भात निवृत्त मुख्य न्यायधीश यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमलेली होती. त्या समितीने केलेल्या शिफारशी पाहिल्या तर अशाच स्वरुपाचा कायदा दिल्लीमध्ये निर्भया प्रकरण होण्यापूर्वी महाराष्ट्राने केला होता. केन्द्राने आम्हाला असे कळविले की, केन्द्र सरकार सुध्दा याबाबतीत विचार करीत आहे. कन्करण्ट लिस्टमध्ये राज्याचा कायदा असेल आणि केन्द्राने वेगळा कायदा केला असेल तर केन्द्राचा कायदा लागू होतो म्हणून केंद्राने आम्हाला कळविले होते. कायद्यामध्ये यंत्रणा सक्षम केल्या पाहिजेत, कायद्यामधील त्रुटी दूर केल्या पाहिजेत. न्याय यंत्रणेतील कमतरता दूर केली पाहिजे यासाठी राज्य सरकार निश्चितपणे प्रयत्नशील आहे आणि प्रयत्नशील राहिलेले आहे.

सभापती महोदय, हुंडाबळी प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्यामुळे गुन्ह्याची प्रकरणे कमी दाखल होत असली तरी सुध्दा प्रतिष्ठित लोकांमध्ये हुंडा घेतला जातो. या पोलिसांनी हाताळायच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

बाबी असल्या तरी हे प्रश्न कायदा आणि सुव्यवस्थेशी मर्यादित नाहीत. हे प्रश्न सामाजिक आहेत आणि आर्थिक आहेत. महिलांच्या सुरक्षेचा विचार करु, त्यांच्या प्रतिष्ठेचा विचार करु त्यावेळी पोलीस यंत्रणा करीत असलेले काम, राज्यातील कायदे, या बरोबरच आज चालू असलेले समाजकारण, अर्थकारण याचाही मेळ घालून सगळयांनीच कार्यरत राहिले तर महिला अधिक सुरक्षित राहू शकतील, त्यांना प्रतिष्ठा मिळू शकेल.

सभापती महोदय, राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रूणहत्येची प्रकरणे घडत आहेत. ही प्रकरणे थांबविण्यासाठी जनजागृती करणे गरजेचे आहे. लोकांच्या मनामध्ये भीती असते की, मुलगी जन्माला आली तर हुंडा द्यावा लागतो, तिच्या शिक्षणावर केलेला खर्च परक्याचे धन बनते, आपल्यावर भार पडतो, म्हणून मुलींचे जन्म नाकारले जात होते आणि ते सुधारलेल्या लोकांमध्ये नाकारले जात होते ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. ज्या ठिकाणी पर कॅपिटा इन्कम जास्त आहे त्याठिकाणी भ्रूणहत्येचे प्रमाण जास्त आहे. जेथे शिक्षणाचे प्रमाण जास्त आहे तेथे देखील भ्रूणहत्येचे प्रमाण अधिक आहे. महाराष्ट्रामध्ये शून्य ते सहा वयोगटामध्ये मुलांच्या तुलनेत मुलींचे चांगले प्रमाण असलेल्यामध्ये गडचिरोली जिल्हा पहिल्या क्रमांकावर आणि नंदूरबार जिल्हा दुस-या क्रमांकावर आहे. लौकिकार्थाने जे जिल्हे आपण मागास मानतो ते महिलांच्या बाबतीत मात्र महाराष्ट्रामध्ये पुढारलेले जिल्हे आहेत आणि लौकिकार्थाने जे पुढारलेले जिल्हे आपण मानतो ते महिलांच्या बाबतीत मागासलेले जिल्हे आहेत या गोष्टी आकडेवारीनिशी स्पष्ट होतात. शहरी भागामध्ये मुंबई पहिल्या क्रमांकावर आहे.

श्री. दिवाकर रावते : महिला मागासलेल्या अशा प्रकारचा उल्लेख मंत्री महोदय करीत आहेत...

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. आर. आर.पाटील : महाराष्ट्रात जे पुढारलेले जिल्हे म्हणतो, त्यांचा महिलांच्या बाबतीतील दृष्टीकोन मात्र मागासलेला आहे. जे जिल्हे शिक्षणाच्या बाबतीत, उत्पन्नाच्या बाबतीत, प्रगतीच्या बाबतीत मागासलेले मानतो, त्यांचा महिलांच्या बाबतीतील दृष्टीकोन मात्र अत्यंत पुढारलेला आहे. म्हणून शून्य ते सहा वयोगटामध्ये गडचिरोली जिल्हा महाराष्ट्रात एक नंबरवर आहे. दुसरा नंदुरबार जिल्हा आहे. कदाचित संस्कृतीचे पावित्र्य राखणाऱ्या आदिवासींमुळे या गोष्टी शक्य आहेत. ते लोक संस्कृती रक्षक आहेत. स्त्री-पुरुष भेदाभेद, स्त्रियांना दुय्यम स्थान त्यांच्या व्यवस्थेमध्ये नसल्यामुळे कदाचित या गोष्टी होत असाव्यात. आज आपल्याकडून त्यांनी काही शिकण्यापेक्षा किमान या बाबतीत तरी महाराष्ट्रातील गरीब आदिवासींकडून उच्चभ्रू लोकांनी शिकावे अशी एकंदरीत परिस्थिती आहे. एकंदरीत होणाऱ्या भ्रूणहत्त्या लक्षात घेतल्या तर गरीब कुटुंबामध्ये मुलींचे जन्म नाकारले जात आहेत. म्हणून सरकारने सुकन्या योजना सुरु करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यासाठी अर्थसंकल्पात तरतूद देखील केली जाईल. लवकरच ही योजना महाराष्ट्रात सुरु केली जाणार आहे.

महिला व बालकल्याण विकास मंत्री प्रा.वर्षा गायकवाड यांचे मी मनापासून अभिनंदन करतो की, ही योजना लोकशाही आघाडीच्या जाहीरनाम्यात येण्यासाठी खूप प्रयत्न केले. मी त्यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा अध्यक्ष होतो. कारण मध्य प्रदेशात ही योजना अतिशय यशस्वी ठरलेली आहे. भारतीय जनता पार्टीकडे काही चांगले असेल तर त्याचा खुल्या मनाने आम्ही स्वीकार करतो. मध्य प्रदेशात ही योजना चांगली चाललेली आहे. माझ्या अनेक मित्रांनी या योजनेच्या बाबतीत सांगितल्यानंतर त्या योजनेची माहिती घेऊन आमच्या जाहीरनाम्यामध्ये ही योजना आणण्यासाठी मी प्रयत्न केले होते, ही वस्तुस्थिती आहे. ती कोणाला नाकारता येणार नाही. माननीय श्री.तावडे साहेब, जे चांगले असते ते आम्ही स्वीकारतो. ही एक योजना सोडली तर अजून दुसरे काही शोधून सुध्दा चांगले सापडत नाही अशी माझी अडचण आहे. आपल्याकडे काही चांगले असेल ते आम्ही घेऊ. पण जाहीरनाम्यात आलेल्या योजनेची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी व्हावी, आपण जनतेला आश्वासन दिले आहे, ते पाळले जावे. म्हणून आपल्या महिला व बालकल्याण विकास मंत्र्यांनी केलेल्या प्रयत्नांची दखल या सभागृहाने देखील घेतली पाहिजे. आम्ही सगळयांनीच त्यांना साथ दिली असती तर त्यांनी आणखी चांगले काम केले असते. ही सुकन्या योजना महाराष्ट्रामध्ये आल्यानंतर भ्रूणहत्येच्या प्रमाणात निश्चितपणे घट होईल असे मला निश्चित वाटते.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

महोदय, महिला अडचणीत असतात, त्यासाठी आम्ही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे ठरविले होते. पूर्वीच्या काळी हेल्पलाईन, मोबाईलवरुन फोन करणे, इत्यादी भूमिका आपण स्वीकारलेलीच आहे. पण याबाबतीत नवीन सॉफ्टवेअर तयार करण्यात येत असून अत्याचार महिलेचे लोकेशन कळावे, ती महिला अडचणीत असेल तर तिचा ठावठिकाणा लवकर समजावा. तिच्या नातेवाईकांना तसेच पोलिसांना माहिती व्हावी असे सॉफ्टवेअर महिलांना उपलब्ध करुन देऊ जेणेकरुन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर महिलांच्या सुरक्षिततेसाठी आपल्याला करता येईल.

महोदय, महिलांची छेडछाड होते, त्याबाबतीत मी मघाशीच माहिती सभागृहात दिलेली आहे. एकंदरीतच ज्या काही घटना घडत आहेत, त्यातील वाढ गंभीर आहे. त्यादृष्टीने पोलिसांनी गंभीर होण्याची आवश्यकता आहे.

महोदय, हरवलेली मुले, हरवलेल्या महिला, महिलांची सुरक्षितता यासाठी जादा मनुष्यबळाची आवश्यकता होती. परवा मंत्रिमंडळाच्या बैठकीत नव्याने 61 हजार पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आलेला आहे. 61 हजार पोलिसांची वाढीव पदे निर्माण केली जाणार आहेत. त्यातील 7 हजार पदे या कामासाठी वापरली जाणार आहेत. कोणाचा मुलगा हरवला तर त्या बाबत तक्रार नोंदवून घेतली जाते, परंतु ती तक्रार तशीच राहते. तो मुलगा घरी परत आला तरी तो पोलीस स्टेशनच्या रेकॉर्डला मिसिंगमध्ये राहतो.

महोदय, आज आपल्या पोलीस दलामध्ये 20 हजार महिला पोलीस अधिकारी आणि कर्मचारी कार्यरत आहेत. हा आकडा देशामध्ये सर्वोच्च आहे. लोकसभेमध्ये सुध्दा हा आकडा जाहीर करण्यात आलेला आहे. आता आपण जी पदे भरणार आहोत, त्यातील 30 टक्के पदे महिलांसाठी राखीव ठेवली जाणार आहेत.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

सभापती महोदय, आतापर्यंत आरक्षणाचे प्रमाण ठरविल्यानंतर सुध्दा महिलांची पदे भरली जात नव्हती. याचे प्रमुख कारण म्हणजे वजन आणि ऊंची या निकषाची पूर्तता होत नव्हती. अजूनही फार उच्चभ्रू घरातील मुली कॉन्स्टेबल व्हायला तयार होत नाहीत. मुलींचे कुपोषण कुटुंबा-कुटुंबांमध्ये होते हे उघड सत्य मी सुध्दा मान्य केले पाहिजे. वजनाचा निकष होता त्याप्रमाणे मुली उपलब्ध व्हायच्या नाहीत. खायला प्यायला चांगले मिळाले नसल्यामुळे ऊंची कमी असायची. कमी वजनाबाबत काय करायचे हा प्रश्न आला. त्यामुळे वजन व उंचीची अट शिथिल केली गेली. आता महिलांची पदे भरली जात आहेत.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये मागील पोलीस भरतीच्या अनुषंगाने महिलांची आतापर्यंत सर्वोच्च पदे भरली आहेत. 61 हजार पदांमधील 30 टक्के पदे महिलांसाठी राखीव आहेत. ती सगळी पदे भरली जाणार आहेत. काही ठिकाणी तक्रारी आहेत. गडचिरोली सारख्या ठिकाणी 700 मुली कॉन्स्टेबल झाल्या आहेत. त्यांना काय काम द्यायचे हा प्रश्न आहे. त्यांना जंगलामध्ये किंवा बंदोबस्तासाठी काम दिले आणि काही अनुचित प्रकार घडला तर आम्ही आतापर्यंत जे अनुभवतो आहोत त्यानुसार असे विचारले जाईल की, संवेदनशील ठिकाणी महिलांना पाठविले जाते का? एका बाजूने रिझर्व्हेशन वाढवायचे असेल, मुलींचे प्रमाण वाढवायचे असेल तर आपल्याला जरुर विचार करावा लागेल. मुलींना अशा धोक्यासाठी, लढण्यासाठी संधी उपलब्ध करुन दिली जावी म्हणून पोलीस दलातील महिलांचे प्रमाण वाढविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

सभापती महोदय, मी गडचिरोली जिल्हयाचा पालकमंत्री आणि राज्याचा गृहमंत्री आहे. अनेकदा त्या जिल्हयामध्ये मला जावे लागते. 700 महिला कॉन्स्टेबल त्या जिल्हयात आहेत. त्या जिल्हयातील महिला कॉन्स्टेबलकडून मागणी केली की, आम्हाला फक्त शहरातील ट्रॅफिकची ड्युटी दिली जाते, नक्षलवाद्यांबरोबर दोन हात करण्यासाठी आम्हाला जंगलामध्ये जायचे आहे. त्या जिल्हयातील नवीन भरती झालेल्या मुलींनी जंगलातील डयुटी वाटून घेतली. बंदुका घेऊन पोलीस दलातील कर्मचारी जंगलामध्ये लढण्यासाठी गेल्या. रोड ओपनिंगचे महत्वाचे काम करुन दाखविले. पोलीस दलातील महिला पुरुषांइतके चांगले काम करु शकतात हे गडचिरोली जिल्हयामध्ये आम्ही अनुभवतो आहोत. त्यामुळे 30 टक्के महिलांची पदे आताच्या भरतीमध्ये सुध्दा भरली जातील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

सभापती महोदय, लोकसभेमध्ये प्रश्न उपस्थित झाला होता. त्या अनुषंगाने केंद्रीय मंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी देशातील पोलीस दलातील महिलांची आकडेवारी देत असताना सर्वात जास्त महिला पोलीस कर्मचारी महाराष्ट्रामध्ये आहेत असे सांगितले आहे. आणखी भरती केली तर ही आकडेवारी निश्चितच वाढणार आहे. उद्या महिलांच्या संदर्भातील अन्य तक्रारी, महिलांचे कक्ष, महिलांकडूनच करता येणे सरकारला शक्य आहे. महिला आणखी सुरक्षित व्हाव्यात, त्यांच्यासाठी असलेल्या योजना चांगल्या पध्दतीने अंमलात याव्यात. त्यांच्या योजनांवर अधिकाऱ्यांनी डल्ला मारु नये, मुलांच्या तोंडचे खाऊ नये म्हणून प्रस्तावामध्ये दोन तक्रारी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केलेल्या आहेत. बालगृह त्याचबरोबर कुपोषण निर्मूलनासाठी जो खर्च झाला त्यामध्ये काही घोटाळे झाले आहेत. कंत्राटदारांनी काही चुका केलेल्या आहेत. विरोधी पक्षनेत्यांनी प्रस्तावात नमूद केले आहे त्याप्रमाणे कुठे भ्रष्टाचार झाला असेल हे महिला व बालविकास विभागाला वाटत असल्यास त्याची अँटी करप्शन विभागाने तपासणी करायची आहे. इतर गुन्हयाकडे दुर्लक्ष झाले तरी लहान मुलांना न्याय दिला पाहिजे. गरीब मुले कुपोषणाने मरत असताना त्यांच्यासाठी दिलेला पैसा त्यांच्यापर्यंत पोहोचत नसेल, मध्येच कोणी डल्ला मारत असेल असे महिला व बालविकास विभागाला वाटत असल्यास अँटी करप्शन विभागाकडून चौकशी करु. यामध्ये कोणी दोषी आढळले तर असेल नसेल तेवढी ताकद पणाला लावून त्याला धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही एवढी ग्वाही देतो.

सभापती महोदय, दोन प्रश्न उपस्थित केले आहेत. पोलिसांची संख्या वाढत आहे. खेड्यात फार मोठया प्रमाणात लोक वस्त्यांमध्ये राहतात. एकच वस्ती असते, दरोडेखोर जातात आणि दरोडा टाकतात, बलात्कार केले जातात, वयस्कर महिलांना सुध्दा सोडले जात नाही. अशा अनेक घटना महाराष्ट्रामध्ये घडतात. ज्या ठिकाणी प्रोटेक्शनची व्यवस्था नाही अशा ठिकाणी दुर्दैवाने काही घटना घडल्या आहेत. शहरामध्ये काही ठिकाणी मुलींची हॉस्टेल्स आहेत.

नंतर 5डी.1...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

तेथे छेडछाडीचे प्रमाण जास्त आहे. याकडे ना नागरिक संवेदनशीलपणाने बघत ना पोलीस लक्ष ठेवत आहेत. त्यामुळे असे प्रकार करणाऱ्यांची हिंमत वाढत जाते. अशा गुन्हेगारांच्या विरोधात तक्रारी कुठे करायच्या हा प्रश्न महिला, मुलींना पडतो.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांची एक सूचना मी शब्दश: स्वीकारतो आहे. आम्ही सर्व बाबतीत ऑडिट करतो. आपण महिलांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत कधीच ऑडिट करत नाही. ही कल्पना आम्हाला कधीच सुचली नव्हती. प्रत्येक पोलीस ठाणे निहाय ऑडिट केले जावे. पोलीस ठाण्यापासून, गावापासून शहरापासून दूरवर एकटी महिला राहात असेल, गावांमध्ये मुलींची वसतिगृहे असतील, हायस्कूल्स असतील व तेथे महिलांचा वावर मोठ्या प्रमाणावर असेल तर अशा ठिकाणी सुरक्षेच्या विविध उपाययोजना करणे गरजेचे आहे. तेथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, स्टाफ वाढविणे, खाजगी वेशातील पोलीस ठेवून महिलांचे संरक्षण करून गुन्हेगारांना शासन करणे या गोष्टी शक्य आहेत. काही ठिकाणी महिला फिरायला गेल्या की, दागिने खेचले जातात. चेन स्नॅचर हे नवीन संकट आज महिलांसमोर उभे राहात आहे. विशिष्ट विभागामध्ये महिला फिरायला गेल्या नंतर चेन खेचण्याचे प्रकार जास्त होतात. आता पर्यंत घडलेल्या गुन्ह्यांचा आढावा घेऊन ज्या विभागामध्ये, ज्या रस्त्यावर, गावापासून दूरच्या भागात, महिलांवर अत्याचार व अन्याय जास्त होत आहेत त्याचे पोलीस ठाणे निहाय ऑडिट करू. जेथे पोलिसांचा बंदोबस्त अधिक ठेवण्याची आवश्यकता आहे तेथे अधिकचे पोलीस ठेवले जातील. त्या भागामध्ये तशा प्रकारचे गुन्हे परत परत घडणार नाहीत याची काळजी घेतली जाईल. अशा वेळी त्या ऑडिटचा वापर करणे आम्हाला सहज शक्य होईल. आम्ही विरोधी पक्ष नेत्यांची सूचना स्वीकारली आहे. आपण शांतपणाने चांगल्या सूचना केल्या तर स्वीकारण्याची दानत आमच्या मध्ये आहे. पण अनेक वेळा ते शांतपणाने सूचनाच करीत नाही. आपण एकत्र आलो तर काही तरी चांगले मार्ग निघू शकतात. ही आपली चांगली सूचना आहे. ती आम्ही स्वीकारली आहे. महिलांची सुरक्षा करण्यास पोलीस कमी पडत असतील तर त्याकडे दुर्लक्ष करण्याची भूमिका स्वीकारली जाणार नाही. स्वीकारली जात नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी येथे आणखी एक सूचना केली आहे की, दिंडोशी येथे जी गंभीर घटना घडली आहे त्या घटनेतील गुन्हेगाराला शिक्षा होण्यासाठी चांगला वकील द्यावा. सामुदायिक बलात्काराची केस असेल तर आपण पीडित मुलीला, महिलेला विचारूनच तिला पाहिजे असलेला वकील देण्याची तरतूद ठेवली आहे. त्यांनी वकील सिलेक्ट करावा. या केसमध्ये सुद्धा त्यांना हवा असलेला वकील देता येईल. पण अनेक वेळा प्रमुख 2-3 वकिलांची मागणी केली जाते. त्यांच्याकडे केसेस जास्त आहेत. त्यामुळे केस प्रलंबित राहण्याची शक्यता आहे. ज्या वकिलांची मागणी करण्यात येईल ते वकील दिले जातील.

आजही माझा विनम्र दावा आहे की, देशात महिलांच्या बाबतीतील पाहिले धोरण महाराष्ट्र राज्याने आखलेले आहे. महिलांच्या सुरक्षिततेच्या बाबतीतील अनेक उपाययोजना महाराष्ट्र शासनाने केलेल्या आहेत. महिलांच्या सुरक्षिततेच्या, प्रगतीच्या बाबतीत, सन्मानाच्या बाबतीत ज्या काही उणिवा आहेत त्यासाठी न्या.धर्माधिकारी यांची समिती गठित केली आहे. लवकरच या समितीचा अहवाल शासनाकडे येईल. जे पहिले तीन अंतरिम अहवाल आले आहेत त्यातील 80 टक्के शिफारशी संपूर्ण अहवाल मान्य करण्यापूर्वीच स्वीकारलेल्या आहेत. त्यातील अनेक शिफारशींवर कार्यवाही देखील सुरू झालेली आहे. महिलांच्या बाबतीत राज्य सरकारने उपाययोजना केल्या आहेत. महिलांना सन्मान मिळाला पाहिजे, त्या दुय्यम नाहीत ही आमची राजकीय आणि सामाजिक भूमिका असल्यामुळेच महाराष्ट्रात आज महिला सुरक्षित आहेत. भविष्यात त्या आणखी सुरक्षित राहतील. ज्या काही उणिवा असतील त्या दूर होतील याची ग्वाही मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना देतो. या सदनाच्या माध्यमातून राज्यातील तमाम भगिनींना ही ग्वाही देतो की, देशामध्ये महाराष्ट्र हे महिलांच्या बाबतीत एक सुरक्षित राज्य आहे. महिलांच्या बाबतीत मुंबई शहर हे देशातील सर्वात सुरक्षित शहर मानले जाते. भविष्यामध्ये देखील ही ओळख कायम ठेवली जाईल. ज्या काही उणिवा असतील त्या दूर केल्या जातील याची ग्वाही देतो. धन्यवाद.

.....

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, चांगल्या सूचना केल्यानंतर त्या सूचनांचे स्वागत आबा कधी कधी करतात. स्त्रीभ्रूण हत्येच्या चर्चेमध्ये मी एक चांगली सूचना केली होती. जे डॉक्टर ॲबॉर्शन करतात अशा डॉक्टरांची पदवीच गेली पाहिजे. ज्यावेळेस मी इंडियन मेडिकल रिसर्च कौन्सिलला विचारले त्यावेळेस ते म्हणाले की, आमच्याकडे अशा प्रकारची तक्रारच येत नाही. त्यावेळेस माननीय गृहमंत्र्यांनी असे सांगितले होते की, मी डीजी यांना असे आदेश देईन की, अशा प्रकरणामध्ये जे डॉक्टर्स सापडतील त्यांना इंडियन मेडिकल रिसर्च कौन्सिलकडे पाठविण्यात येईल. परंतु आज पर्यंत यासंदर्भातील पत्र काही निघाले नाही. आम्ही नेहमी चांगल्या सूचना करीत असतो परंतु आपल्या मुडवर त्या ॲक्सेप्ट होत असतात की, काय ते माहिती नाही. त्यामुळे आम्ही जी सूचना केली होती त्या सूचनेची अंमलबजावणी का झाली नाही याचे उत्तर मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी काल विचार मांडले होते की, कस्टडीमध्ये आता पूर्वीसारखा पोलिसांचा धाक राहिलेला नाही. संजय दत्त यांना दारु कशी मिळते किंवा जेलमध्ये जो आतंकवादी मारला गेला होता त्याच्या पोस्टमार्टेम रिपोर्टमध्ये काही आले होते. या ठिकाणी मी जी काही माहिती दिलेली आहे ती 110 टक्के खरी आहे. त्यामुळे यासंदर्भात चौकशी केली जाणार आहे काय ? संजय दत्त बरोबर असणाऱ्या गुन्हेगाराला खुलेआम सर्व व्यवस्था मिळते याबाबत आपण काही चौकशी करणार आहात काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, ज्या आरोपीच्या पोटात दारु आढळली त्या रिपोर्ट बाबत काही साशंकता असल्यामुळे त्यासंदर्भात चौकशी सुरु आहे. आरोपीच्या पोटात दारु सापडली त्यासंदर्भात काही लोकांच्या मनात संशय आहे तसेच जेल ॲथोरिटीच्या मनात सुध्दा संशय आहे. ही गोष्ट सिध्द झाली आहे की, दवाखान्यातील लॅब मधून येणारे रिपोर्ट सुध्दा काही वेळेस बरोबर नसतात. एका केसमध्ये एका मुलीचे हृदय पुरुषाचे आहे असे सांगण्यात आले होते. परंतु दुसऱ्या फॉरेन्सीक लॅबचा रिपोर्ट घेतल्यानंतर ते हृदय मुलीचेच असल्याचा रिपोर्ट आला होता. तसेच त्या कर्मचाऱ्यांने लिहून दिले आहे की, माझी मानसिक स्थिती बरोबर नव्हती, घाई गडबडीने काम केले, माझी चूक झाली. दुसऱ्या राज्याच्या फॉरेन्सीक लॅबकडून पुन्हा एकदा खात्री करण्यास मी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

सांगितले आहे. गुजरातची फॉरेन्सीक लॅब चांगली असल्यामुळे त्या ठिकाणावरुनही टेस्ट करण्यास सांगितले आहे. यासंदर्भात अंतिम निर्णय पॉझिटीव्ह आला तर त्या डयूटीवर जे जे कर्मचारी होते त्यातील एकालाही मी नोकरीत ठेवणार नाही.

सभापती महोदय, संजय दत्तला 110 टक्के दारु दिली जाते असे विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले आहे. 110 टक्के हे गणितातील योग्य परिमाण असेल तर त्याचा आधार घेऊन मी खात्रीने सांगू इच्छितो की, 220 टक्के संजय दत्तला दारु दिली गेली नाही, दिली जात नाही. त्याला अंडा सेलमध्ये ठेवण्यात आले आहे. अंडा सेल मध्ये मर्डर झाले म्हणजे अंडा सेल मध्ये दारु जात नसेल का ? अंडा सेलमध्ये जे मर्डर झाले होते ते तेथील गुन्हेगारानेच केले होते. अंडा सेलमध्ये बाहेरची व्यक्ती पोहचू शकली नाही. विजारीच्या नाडया काढून... बीन नाडीची, बीन बटनाच्या नाडीचा शोध लागला तर तसेही कपडे गुन्हेगारांना देण्यात येतील. अंडा सेलमध्ये ठराविकच कर्मचाऱ्यांना जाण्याची परवानगी असते. जेल मधील सर्व कर्मचारी अंडा सेल मध्ये जाऊ शकत नाहीत. जेल अधिकाऱ्याच्या विश्वासातीलच कर्मचारी अंडा सेलमध्ये जात असतात. संजय दत्त जेलमध्ये गेल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जाऊन कोठडीची झडती घेतली,रिमार्क्स लिहिले. अगदी नव्याने दाखल झालेल्या अधिकाऱ्यापासून ते सिनियर अधिकाऱ्यांपर्यंत तपासण्या झालेल्या आहेत. त्या जेलमध्ये संजय दत्तच्या बाबतीत कधीही,काहीही आढळून आलेले नाही. विरोधी पक्ष नेत्यानी सारखे सारखे दारु पुरवली असे सांगितले असले तरी मी खात्रीने सांगू इच्छितो की, संजय दत्तला दारु पुरवली गेली नाही. मग आता प्रश्न येईल काही पुरावे देण्याचा. जर विरोधी पक्ष नेत्यांचे 110 टक्के बरोबर असेल तर 110 टक्क्यामधील अर्धा टक्का जरी पुरावा आपल्याकडे असेल तर तो त्यांनी द्यावा.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

मी येथे आजच घोषित करतो की डयुटीवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांना 311 चे कलम लावून नोकरीतून काढून टाकण्यात येईल. अधिकाराचा गैरवापर केला म्हणून त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील. नोकरीतून काढल्यानंतर त्यांना सरळ घरी जाऊ देणार नाही. ते कर्मचारी जेलमध्ये जातील. तेव्हा संजय दत्तला जेलमध्ये काही दिले जाते, तो चैनीत आहे असे काही नाही. कोणत्याही प्रकारची अवैध दारु आतमध्ये पोहोचत नाही. रम तर बिलकूल पोहोचत नाही. न्यायालयाने ज्या गोष्टींसाठी परवानगी दिलेली आहे त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही गोष्टी आत जाणे शक्य नाही आणि तसे काही दिलेले नाही. तेथे कार्यरत असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना तीन-तीन वेळा विचारुन महाराष्ट्रातील जनतेकरिता मी हे सांगत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय,...

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी): माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांना पुरावा द्यावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण मला बोलू द्यावे...

तालिका सभापती : मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, राईट ऑफ रिप्लायमध्ये एकच प्रश्न विचारता येतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी कोणत्याही विषयावर बोलत नाही. माननीय मंत्री महोदयांनी नाव घेतले म्हणून मला बोलायचे आहे. माननीय गृह मंत्री महोदयांना एक टक्का नाही तर त्यापेक्षा जास्त टक्का पुरावा आम्ही देऊ. आम्ही पुरावा दिला तर तो साशंक आहे, तो असत्य असू शकतो अशा बाबी सांगितल्या जातात. मी संजय दत्तचा विषय मांडताना तुरुंगात अतिरेक्याचा मृत्यू झाल्यानंतर जो पोस्टमार्टेमचा रिपोर्ट आला होता तो मी येथे मांडला होता. आम्ही असे पुरावे दिल्यानंतर ते साशंक आहेत असे आपण म्हणणार असाल तर आम्ही काय म्हणायचे ? आपण 220 टक्के सांगितले त्यावेळी मला वाटले होते की, संजय दत्तची अल्कोहोलची टेस्ट केली आहे आणि आपण त्या संदर्भातील माहिती सादर करीत आहात. परंतु आपण तशी टेस्ट केलेली नाही. मी कधीही सवंग आरोप करीत नाही हे आपण पाहिले असेल. जे काही करतो ते माहितीच्या अधिकाराखाली करतो. आपणास ही माहिती देऊन तीन-चार दिवस झालेत. अतिशय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

संवेदशनशील असणाऱ्या गृहमंत्र्यांनी अल्कोहोल टेस्ट करुन मला येथे त्या संदर्भातील माहिती दिलेली आहे असे मला वाटले. परंतु तसे काही झालेले नाही. परंतु आपण जे सांगत आहात तसे पुरावे आपणास नक्की देण्यात येतील.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, जेलमध्ये काही अनुचित प्रकार घडत असतील, परंतु मी सर्व जेलमध्ये अधिकारी म्हणून बसत नाही की गेटवर उभा राहत नाही. पोलीस विभागातील चांगले अधिकारी तेथे नेमणे आणि जेलमधील त्रुटी दूर करणे इतकेच काम मला गृहमंत्री म्हणून करावे लागते. ज्यांच्या इंटीग्रीटीबद्दल कोणतीही शंका नाही अशांची नियुक्ती करण्यात येते. श्रीमती मीरा बोरवणकर यांची जेलचे ॲडीशनल डी.जी.म्हणून नियुक्ती केलेली आहे. त्या बारकाईने सर्व गोष्टी पाहत आहेत. जे चुकीचे वागत आहेत त्यांची बदली करण्यात येत आहे त्यांच्यावर कारवाई केली जात आहे. त्या ठिकाणी श्रीमती बोरवणकर सारखे अधिकारी असताना कोणी चुकीचे वागण्याची हिंमत करेल असे मला तरी वाटत नाही. त्यांचे तेथे चांगल्या प्रकारे नियंत्रण आहे.

सभापती महोदय, मी येथे नमूद करु इच्छितो की, संजय दत्त प्रकरणी मी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून पुन्हा पुन्हा माहिती घेतली. कारण माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी बाहेरही टीका केली होती. चहापानाच्या वेळी देखील टीका केली होती. तेव्हा मी खूप गांभीर्याने चौकशी करुन उत्तर देत आहे. जर कोण चुकीचे वागत असेल तर त्यांना शिक्षा केली जाईल. ते माझे नातेवाईक नाहीत.

सभापती महोदय, मी सदनाच्या माहितीसाठी सांगतो की, संजय दत्त ज्यावेळी जेलमधून सुटला होता त्यावेळी पोलीस विभागातील काही कर्मचाऱ्यांनी एखादा हिरो भेटल्यावर हस्तांदोलन करतो त्या पध्दतीने संजय दत्त बरोबर हस्तांदोलन केले. टी.व्ही.वर मी हे सर्व पाहिले. जामिनीवर सुटलेल्या एका आरोपीशी हस्तांदोलन करण्यासाठी त्याच्या पाठीपाठी काही पोलीस फिरत होते. ज्यांनी ज्यांनी संजय दत्त बरोबर हस्तांदोलन केले होते त्या सर्वांना निलंबित करण्याचा मी निर्णय घेतला. त्यांच्यावर कठोर कारवाई केली. जामिनावर सुटलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

आरोपीशी हस्तांदोलन केले म्हणून त्यांना निलंबित केले. कोणालाही पाठीशी घालण्याची सरकारची भूमिका नाही. आपण 110 टक्के सांगत आहात तर मी 220 टक्के सांगतो. आपण त्यांच्या ब्लड टेस्टचा रिपोर्ट मागत आहात. आपण कशाच्या आधारे हा आरोप करीत आहात ? त्यांनी मला अर्धा टक्का पुरावा द्यावा. त्यांनी कोणत्या दुकानातून दारु घेतली त्याचे बिल आपल्याकडे आहे, दारु आतमध्ये पोहोचल्याची माहिती आपल्याकडे आली काय हवेतल्या आरोपाला काय अर्थ आहे ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, दहशतवादी कैद्याचा तुरुंगात मृत्यू झाल्यानंतर त्याचे पोस्टमार्टेम करण्यात आले. तेव्हा त्याच्या पोटात चार तासापूर्वी अल्कोहोल होती असा फॉरेन्सीकचा रिपोर्ट आहे. आम्ही काही पुरावे दिले तर ते साशंक आहेत असे सांगितले जाते. मी आपणास संबंधित लोकांची भेट घालून देतो. आपणास खऱ्या लोकांची भेट घडवून आणतो.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, आपण मला त्यांची भेट घडवून द्यावी. त्यांच्या खरेपणावर विश्वास ठेवून आणि गरज लागली तर ब्लड टेस्ट देखील घेण्यात येईल. पण ते खरे लोक पाहिजे. जर ते खोटे ठरले तर ते जेलमध्ये जातील. त्यांनी ती माहिती आपल्याला पिऊन दिली किंवा कसे याची देखील चौकशी करु.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्या सर्वश्रीमती विद्या चव्हाण, डॉ.नीलम गोऱ्हे, अलका देसाई, शोभाताई फडणवीस, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, श्री.हेमंत टकले, श्री.प्रकाश बिनसाळे यांनी म.वि.प. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर विचार व्यक्त करताना अनेक बाबी निदर्शनास आणून दिल्या आहेत.

महोदय, मी गेल्या चार दिवसांपासून सातत्याने विनंती करीत आहे की, या प्रस्तावावर उत्तर देण्याची संधी मला उपलब्ध करुन द्यावी. कारण हा महिलांच्या दृष्टिकोनातून सर्वात महत्त्वाचा विषय आहे. सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावावरील चर्चेच्या अनुषंगाने ज्या बाबी मांडल्या त्या संदर्भात विभागाने काय काम केले हे मला या प्रस्तावावरील उत्तराच्या भाषणातून सांगता येईल. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आणि इतर सन्माननीय सदस्यांनी या प्रस्तावावरील चर्चेवर बोलताना कोणतीही टीका न करता, सामंजस्याने यावर काय उपाययोजना कराव्यात या बाबत सूचना केल्या आहेत. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे व सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी स्त्री भ्रूणहत्यांसंदर्भात भाष्य केले होते. या ठिकाणी माननीय गृह मंत्र्यांनी उल्लेख केला की, दिनांक 1 जानेवारी, 2014 पासून 'सुकन्या' ही योजना राज्य सरकारच्या माध्यमातून सुरु करीत आहोत. या योजनेंतर्गत मुलीचा जन्म झाल्यानंतर एलआयसी किंवा बँकेमध्ये तिच्या नावे 21,200/- रुपयांची ठेव ठेवणार आहोत. या योजनेचा फायदा बीपीएल कुटुंबातील दोन मुलींपर्यंत मिळणार आहे. वयाची 18 वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्या मुलीच्या खात्यात 1 लाख रुपये जमा केले जाणार आहेत. बीपीएल कुटुंबातील जुळ्या मुली तसेच अनाथ मुलींसाठी ही योजना आहे. अपत्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. शिवाय तिच्या आई वडिलांना जनश्री विमा योजनेचा फायदा मिळणार आहे. या वर्षाचे बजेट तयार केलेले आहे. त्यामुळे पुरवणी मागण्यांमध्ये आदिवासी आणि इतर आदिवासी उपयोजनेतून प्रत्येकी 9 कोटी रुपये आणि विशेष घटक योजनेतून 50 कोटी रुपयांची पुरवणी मागणी केली आहे. शिवाय सर्वसाधारण योजनेतून 75 कोटी रुपये मागितले आहेत. वार्षिक बजेट 576 कोटी रुपयांचे आहे. महोदय, बीपीएलखालील मुलींना हा मदत करण्याचा प्रयत्न असला तरी या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी जनजागृती करण्यावर जास्तीत जास्त भर दिला पाहिजे ही गोष्ट मला मान्य आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड....

मध्यंतरीच्या काळात आषाढी एकादशीच्या वारीचा....

डॉ.दीपक सावंत : मी सन्माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी आपल्या उच्चारांचा वेग कमी करावा.

प्रा.वर्षा गायकवाड : महोदय, मी पुन्हा एकदा सांगते की, 'सुकन्या' योजना मुलींसाठी राबविण्यात येणार आहे. दुसरी योजना जनजागृती मोहिमेची होती. या योजनेच्या माध्यमातून असा प्रयत्न केला होता की, आषाढी एकादशीच्या निमित्ताने वारी निघते तेव्हा परिसरात पोस्टर्स, कटआऊट लावून किंवा पथनाट्य अथवा अभंगाच्या माध्यमातून तेथे जाऊन लोकांचे प्रबोधन करण्याचा कार्यक्रम घेतला होता.

महोदय, दिनांक 3 जानेवारीला सावित्रीबाई फुले यांची आणि 12 जानेवारीला राजमाता जिजाऊ यांची जयंती असते. त्यांच्या जयंतीचे औचित्य साधून त्या दिवसांमध्ये जनजागृती अभियान केले होते. राज्य, विभागीय, जिल्हा, प्रकल्प आणि अंगणवाडी अशा विविध स्तरांवर कायद्याच्या संदर्भात चर्चासत्रे आयोजित करुन विविध प्रयोग आयोजित केले होते.

महोदय, आपल्याला माहीत आहे की, केंद्र सरकारने दरम्यानच्या काळात तीन कायदे केले आहेत. आम्ही अभियानाच्या माध्यमातून जनजागृतीचा प्रयत्न करणार आहोत. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक त्रासापासून संरक्षण अधिनियम असेल, निर्भया घटनेच्या अनुषंगाने क्रिमीनल कायद्यामध्ये केलेला सुधारणा कायदा असेल किंवा मुलांच्या संदर्भातील पॉस्का कायदा असेल, या सर्वांची माहिती लोकांना झाली पाहिजे. या कायद्यांची अंमलबजावणी कशी करावी यासाठी चर्चासत्र आयोजित केले पाहिजे, प्रवचने आयोजित केली पाहिजेत. जेणेकरुन त्या बाबतची माहिती खालच्या स्तरापर्यंत पोहोचली पाहिजे असा प्रयत्न अभियानाच्या माध्यमातून करीत असतो. अशा प्रकारचे विविध प्रयत्न अभियानाच्या माध्यमातून करीत असतो. महोदय, मागच्या वर्षी लिंगनिदान आणि स्त्री भ्रूण हत्येसंदर्भात मोठ्या प्रमाणावर अभियान राबविले होते.

महोदय, दुसरी महत्त्वपूर्ण योजना 'मनोधैर्य योजना' असून, या योजनेबाबतचा उल्लेख सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्या सर्वश्रीमती डॉ.नीलम गोऱ्हे, विद्या चव्हाण यांनी आपल्या भाषणात केला. एखाद्या मुलीवर/महिलेवर बलात्कार झाल्यानंतर, तिच्यावर ॲसिड फेकल्यानंतर, तिच्यावर प्रथमोपचार करुन तिचे समुपदेशन करावे लागणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड....

तिला कायदेशीर मदत करावी लागणार आहे, तिचे पुनर्वसन करावे लागणार आहे. या सर्व बाबींच्या दृष्टिकोनातून अशा पीडित महिलांचे मनोधैर्य वाढण्यासाठी 'मनोधैर्य योजना' सुरु केली आहे.

नंतर श्री.कांबळे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड ....

आपण यामध्ये 2 लाख रूपयांपासून 3 लाख रूपयांपर्यंतचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांच्या समितीला दिले आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या संदर्भातील पैसे मिळाले नाहीत. मी सांगू इच्छिते की, आतापर्यंत आमच्याकडे एकूण 96 प्रकरणे आली आणि 30 प्रकरणे मंजूर झाली. ही योजना दिनांक 2 ऑक्टोबर, 2013 पासून सुरू केली आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते व सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी देखील एका घटनेचा उल्लेख केला. परंतु, ती घटना त्या आधीची असल्यामुळे मनोधैर्य योजनेत येत नाही. 2 ऑक्टोबरनंतर घडणाऱ्या घटनांसाठी ही योजना करण्यात आली आहे. आपल्याला मिळालेले 10 लाख रूपये आधीच दिलेले आहेत. त्या व्यतिरिक्त उणे पध्दतीने म्हणजे मायनस बजेटिंग करून वित्त विभागाकडे पैसे मागत आहोत. आम्ही जीआरसुध्दा काढला आहे, त्या माध्यमातून पैसे मिळणार आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी व सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी महिला कौटुंबिक हिंसाचार संरक्षण अधिनियम व सरंक्षण अधिकाऱ्यांच्या संदर्भात प्रश्न विचारला. तसेच, समुपदेशन केंद्राच्या संदर्भात देखील प्रश्न विचारला होता. पूर्ण वेळ संरक्षण अधिकारी निर्माण करणारे महाराष्ट्र राज्य हे पहिले राज्य आहे. पूर्ण वेळ संरक्षण अधिकारी 37, विधी सल्लागार यांची डेटा एंट्री करण्यास घेतली आहे. भविष्यात 2 तालुक्यांना मिळून एक संरक्षण अधिकारी करीत आहोत, जेणेकरून सर्व उपाय खालच्या पातळीपर्यंत जावेत. कौटुंबिक हिंसाचारापासून ज्या महिलांना त्रास असतो त्यांना काऊन्सिलिंगची मदत कशी मिळेल, यासाठी आपण प्रयत्न करीत आहोत. समाजकल्याण बोर्डाच्या माध्यमातून 62 कौटुंबिक समुपदेशन केंद्रे असल्याबाबत उल्लेख माननीय गृहमंत्र्यांनी केला. टाटांच्या मध्यमातून 39 समुपदेशन केंद्रे आधीच सुरू होती. आम्ही असा विचार केला की, पोलीस स्टेशनला गेल्यानंतर महिलांना तेथेच मदत मिळाली पाहिजे. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात जेथे महिलांवरील अत्याचाराच्या केसेस जास्त आहेत, अशा 3 ठिकाणी या प्रमाणे 105 ठिकाणी नव्याने समुपदेशन केंद्र देण्याचे ठरविले आहे. राज्यात एकूण 124 ठिकाणी समुपदेशन केंद्रे आहेत. आता पोलीस स्टेशनच्या आवारात समुपदेशन केंद्रे स्थापन करण्याचा प्रयत्न केला आहे आणि तसे झाले आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड ....

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी 2-3 बाबींचा उल्लेख केला. त्यामध्ये त्यांनी महिलांची सनद, महिला सुरक्षा ऑडिट, महिला आरक्षण याबाबत सांगितले. आपण हे सर्व मुद्दे महिला धोरणामध्ये घेतले आहेत. महिला धोरण तयार करणारे आपले पहिले राज्य आहे. आता एक महिन्याच्या आत तिसरे महिला धोरण मंत्रिमंडळापुढे येईल. तिसऱ्या महिला धोरणात लैंगिक अत्याचारात बळी पडलेल्या, देहविक्री करणाऱ्या महिला, तृतीयपंथी, एकल महिला, देवदासी, माहिला लोककलावंत, असंघटित महिला कामगार या सर्वांकरिता उपाय करण्याचे प्रयत्न केले आहेत. आपण नव्याने एक गोष्ट सुरू केली आहे आणि ती म्हणजे महिला लोकशाही दिन. हा उपक्रम प्रथम आपल्या राज्याने सुरू केला आहे.

सभापती महोदय, महसूल स्तरावर, तालुका स्तरावर, जिल्हा स्तरावर व राज्य स्तरावर दुसऱ्या महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन असतो, त्या दिवशी महिला आपली तक्रार घेऊन डायरेक्ट आमच्यापर्यंत येऊ शकतात, त्या संदर्भात त्यांना 2 महिन्यांच्या काळात उत्तर मिळते. मार्च, 2013 ते ऑक्टोबर, 2013 च्या दरम्यान जिल्हा स्तरावर 382 प्रकरणे, विभागीय स्तरावर 75 प्रकरणे आणि आमच्या स्तरावरील प्रकरणे अशी एकूण 457 प्रकरणे या काळात हाताळली गेली आणि आपण त्यांना न्याय दिला. महिलांच्या संदर्भात विविध धोरणांच्या माध्यमातून प्रयत्न केले आहेत, वेगळे प्रोग्रेसिव्ह धोरण आणण्याचा प्रयत्न केला आहे. आमच्या कार्यक्रमामध्ये जेंडर बजेट आहे, ऑडिट आहे, सुरक्षेचे विषय आहेत, स्वच्छतागृहाचे विषय आहेत. आम्ही सर्व विषयांचा अंतर्भाव केला आहे. आता ते आम्ही मंत्रिमंडळापुढे आणत आहोत. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस व श्रीमती विद्या चव्हाण यांनी महिलांच्या सुधारगृहांच्या संदर्भात प्रश्न विचारला होता. मला सांगावयाचे आहे की, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांच्याच अध्यक्षतेखाली एक समिती आहे, आम्ही त्यांना अधिकार दिले आहेत, त्यांच्या माध्यमातून जो रिपोर्ट येतो त्यानुसार ॲक्शन घेतली जात आहे. नवजीवन, करूणा, प्रियदर्शनी या संदर्भात आम्ही कार्यवाही करीत आहोत. पुण्यातील दोन महिला सुधारगृहांचे नव्याने बांधकाम आणि नूतनीकरण करीत आहोत.

(नंतर श्री. खंदारे ....

अशुद्धीत पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड....

सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी नाईट शेल्टरचा मुद्दा मांडला होता. या संदर्भात टाटा संशोधन केंद्राचा रिपोर्ट मुंबईसाठी आलेला आहे. मुंबईत 37 हजार मुले रस्त्यावर राहतात. याकडे शासनाने नक्की लक्ष दिले पाहिजे अशी शासनाची भूमिका आहे. नाईट शेल्टर हा मुलांच्या दृष्टीकोनातून संवेदनशील विषय आहे. या संदर्भात स्थानिक स्वराज्य संस्थेला जरी जबाबदारी दिली असली तरी राज्य शासन म्हणून आमचीही जबाबदारी आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्या डॉ.गोऱ्हे यांच्याबरोबर चर्चा करुन नक्कीच निर्णय घेण्यात येईल.

विशाखा गाईडलाईन्ससंबंधी शासनाने दि.4.10.2010 रोजी जी.आर.काढलेला आहे. आता त्याबाबतचा ॲक्ट आला असून याबाबत आम्ही कामगार आयुक्तांबरोबर चर्चा करीत आहोत. शासनाने मजलीसबरोबर एमओयू केलेला आहे. राहत च्या माध्यमातून शासनाने एक अहवाल तयार केलेला आहे. ज्यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभाग, विधी व न्याय विभाग, गृह विभाग, महिला व बालविकास या सर्व विभागांचे चर्चासत्र आयोजित केले होते. हा अहवाल मी सर्व सन्माननीय सदस्यांना पाठविते.

सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी व सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी कुपोषणाचा विषय मांडला आहे. त्यांनी सांगितल्या प्रमाणे शासन खूप चांगल्या योजना आखत आहे. देशात महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे की, ज्या राज्यात कुपोषणासाठी मिशन तयार केलेले आहे. त्या मिशनद्वारे तीन अभियान निर्माण केले आहेत. ग्राम अभियान, शहर अभियान आणि शहर व ग्राम अभियान निर्माण केले आहे. (अडथळा) शासनाने पहिले, दुसरे व तिसरे अभियान सुरु केलेले आहे. पहिले अभियान हे बाल दिनापासून सुरु केलेले आहे. तसेच तिसरेही अभियान सुरु केलेले आहे. यामध्ये नव्याने जिल्हे पुढे आलेले आहेत. त्यांनी नवीन उपक्रम सुरु केले आहेत त्यांचे कौतुक केले पाहिजे. यामध्ये मूठभर धान्य, बालगोपाल पंगत, नवदांपत्यांना समुपदेशन, कुटुंब प्रमुखाचे समुपदेशन , बाल कोपरा , अंगणवाडी केंद्र, पहिला वाढदिवस साजरा करणे, गर्भसंस्कार शिबिर असेल, होम व्हीसीबीसी असे उपक्रम प्रत्येक जिल्ह्यांनी सुरु केलेले आहेत. अहमदनगर, नाशिक, औरंगाबाद, सातारा, पुणे, नांदेड या जिल्ह्यांमध्ये आयएसओच्या माध्यमातून अंगणवाड्या सुरु आहेत. शासन प्रयत्न करीत आहे. मधल्या काळात माननीय मुख्यमंत्र्यांनी दिनांक

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ ST/

प्रा.वर्षा गायकवाड....

15 ऑक्टोबर रोजी एक बैठक घेतली होती. सिटिझन अलायन्सची ती बैठक होती, या बैठकीत सर्व खासदार, सर्व महानगरपालिकांमधील अतिमहत्वाची व्यक्ती, या क्षेत्रातील तज्ज्ञांना बोलवून यासाठी कसे काम करता येईल म्हणून प्रयत्न केला होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी 5 कलमी कार्यक्रम सांगितला होता. यामध्ये हिमोग्लोबीन, किशोरीवयीन मुले, कमी वजनाची मुले, स्तनपान, अति कुपोषित बालकांचे व्यवस्थापन, सहा महिन्याच्या वरच्या मुलांच्या आहाराचा कार्यक्रम आहे. यावेळी 5 कलमी कार्यक्रम माननीय मुख्यमंत्र्यांनी निश्चित केलेला आहे.

महाराष्ट्र राज्याचे खूप कौतुक झालेले आहे. याबाबत सन्माननीय सदस्यांनीही सरकारने याबाबत चांगले काम केल्याचे म्हटले पाहिजे. युनिसेफ व आयआयपीएसचा रिपोर्ट आला आहे. त्यामध्ये बुटक्या मुलांमध्ये घट झाल्याचे नमूद केलेले आहे.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बुटक्या मुलांमध्ये 39 टक्यावरुन 26 टक्क्यापर्यंत घट झालेली आहे. उंचीच्या मानाने कमी वजनाच्या मुलांमध्ये 19 टक्क्यावरुन 15 टक्क्यापर्यंत घट झालेली आहे. वयाच्या मानाने कमी वजन असलेल्या बालकांच्या संख्येमध्ये 8 टक्के घट झालेली आहे. माझ्याकडे कॅगचा अहवाल आहे. त्या अहवालाची प्रत सन्माननीय सदस्यांना देण्याची माझी तयारी आहे. या अहवालामध्ये गुजराथ 10 व्या आणि महाराष्ट्र 24 व्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्राची टक्केवारी 45 वरुन 23वर आली आणि गुजरातची टक्केवारी 71 वरुन 39 वर आली. मी सांगू इच्छिते की, नियोजन आयोगाने आपल्या राज्याचे कौतुक केलेले आहे. मॉण्टेकसिंग अहलुवालिया यांनी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री आणि मुख्य सचिवांचे कौतुक केलेले आहे. कॅनडाच्या मायक्रो न्युट्रिअण्ट इंटिमेशन यासंस्थेचा अहवाल आलेला आहे. त्यांनी देखील महाराष्ट्राने चांगले काम केले असल्याचा उल्लेख केलेला असून महाराष्ट्राप्रमाणे देशाने देखील चांगले काम करावे अशा प्रकारचे उद्‌गार त्यांनी काढलेले आहेत. भारतीय जनता पार्टीचे प्रवक्ते श्री. रविशंकर प्रसाद यांनी महाराष्ट्र राज्य कुपोषण निर्मूलनाचे काम इतर राज्यांच्या तुलनेत चांगले करीत आहे असे मत व्यक्त केलेले आहे. जेव्हा सिटीझन अलायन्स बैठक झाली होती त्यावेळी देखील खासदार शहानवाज हुसेन यांनी महाराष्ट्राचे कौतुक केले होते.

सभापती महोदय, आम्ही अनेक गोष्टी नव्याने करण्याचा प्रयत्न करीत आहोत.त्यामध्ये मला सन्माननीय सदस्यांची मदत अपेक्षित आहे. आता काही तालुक्याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. ठाणे जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा, नाशिक जिल्हयातील त्रिंबक, सुरगाणा, पेठ, नंदूरबार मधील धारगाव, अक्कलकुवा, गडचिरोली जिल्हयातील भामरागड, अहेरी, एटापल्ली, यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा, वणी मेळघाट मधील धारणी, चिखलदरा अशा 16 प्रकल्पावर लक्ष देऊन काम करण्याचे ठरविलेले आहे. ज्या काही गोष्टी नव्याने ठरविण्यात आल्या त्यामधील काही गोष्टी मी या ठिकाणी मांडते. त्याबाबतीत सन्माननीय सदस्य निश्चितच सूचना करु शकतात. आमचा विचार असा आहे की 16 प्रकल्पातील सर्व संवर्गातील अधिकाऱ्यांची पदे भरली गेली पाहिजेत. शून्य ते 6 वयोगटातील बालकांची संख्या, त्यांची वजने, मध्यम आणि तीव्र कमी वजनाच्या बालकांची संख्या निश्चित करुन कृती कार्यक्रमास सुरुवात करण्यास आम्ही सांगितलेले

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड....

आहे. एएनएम वर्कर, आशा, दायी, सेविका यांचे प्रशिक्षण शिबिर घेण्याची आवश्यकता आहे. माता सक्षमीकरणावर आमचा भर असणार आहे. सबला योजना 11 जिल्ह्यासाठी आणि इंदिरा गांधी मातृत्व योजना 2 जिल्ह्यासाठी आहे.शासनाच्या वतीने या योजना अन्य जिल्ह्यामध्ये देखील सुरु केल्या पाहिजे. सबला योजनेचा फायदा किशोरवयीन मुलींना होतो आणि इंदिरा गांधी मातृत्व योजनेचा फायदा गरोदर मातांना होतो. हया ज्या गोष्टी आम्ही केलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्यांनी काही सूचना केल्या तर त्यांचे निश्चितच स्वागत करण्यात येईल.

सभापती महोदय, आश्रमशाळेमध्ये जी मुले-मुली राहातात त्यांना आरोग्याच्या बाबतीत स्वसंरक्षणाच्या बाबतीत प्रशिक्षण दिले पाहिजे, व्यावसायिक प्रशिक्षण दिले पाहिजे. मुलींचे लग्न कमी वयामध्ये होता कामा नये, तसेच मुलांमध्ये किती अंतर असायला पाहिजे यासंबंधीचे प्रबोधन केले पाहिजे. ग्रामीण भागामध्ये सिकलसेलचे प्रमाण अधिक आहे. त्यासंदर्भात देखील लोकामध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे, त्याच प्रमाणे व्यसने आणि बालविवाह या संदर्भात देखील लोकांमध्ये जनजागृती करण्याचे काम सुरु केलेले आहे. या बाबतीत सन्माननीय सदस्यांच्या काही सूचना असतील तर त्यांचे निश्चितपणे स्वागत केले जाईल.

सभापती महोदय, कुपोषणाच्या बाबतीत एक दोन प्रश्न या ठिकाणी विचारण्यात आले होते.माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक टास्कफोर्स कमिटी आहे आणि जिल्हास्तरावर विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली टास्कफोर्स कमिटी आहे. श्वेतपत्रिका एक दोन महिन्यामध्ये येईल. मेळघाटमध्ये टीएचआर स्कीम बंद का करण्यात आली असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला. मेळघाटमध्ये पूर्णिमा उपाध्याय विरुध्द अप्पर मुख्य आरोग्य अधिकारी, महाराष्ट्र यांनी दाखल केलेल्या याचिकेमुळे 4 मे 2011 रोजी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार धारणी आणि चिखलदरामध्ये टीएचआर बंद करुन गरम ताजा आहार दिला जातो.

..नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड...

सभापती महोदय, या ठिकाणी आपण सबला व राजीव गांधी योजनेबाबतचा उल्लेख केला आहे. या योजनांसदर्भातील माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवीन.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आयुर्वेदिक बिस्किट संदर्भातील मुद्दा उपस्थित केला होता. त्या बाबतीत माहिती सांगू इच्छित की, 2009-10 मध्ये जव्हार या ठिकाणी दोन हजार मुलांवर अभ्यास झाला होता. त्यांना ही बिस्किटे देण्यात आली आहेत. त्यात श्रेणीवाढ, वजन वाढ यासंदर्भात चाचण्या केल्या गेल्या. हा प्रकार 90 दिवसातून चार वेळा करण्यात आला. जे.जे. हॉस्पिटलचे बालरोग तज्ज्ञ, पोद्दार हॉस्पिटलचे डॉ.नांदे यांनी या बाबतीत अभिप्राय दिलेले आहेत. त्यासंदर्भात ई-निविदा काढून टेंडर देण्यात आले आहे. तरी तुमच्या सांगण्याप्रमाणे या बाबतची चौकशी करुन घेईन.

महोदय, या ठिकाणी इलेक्ट्रॉनिक काटयाच्या संदर्भातही उल्लेख केला गेला. सदर खरेदी ही जिल्हा परिषदेच्या माध्यमातून केली जाते. अशा प्रकारची खरेदी करताना त्यांनी आयुक्तांची परवानगी घेतली पाहिजे, अशा प्रकारचे आदेश काढण्यात येतील. तसेच चार्जिग हा महत्वाचा मुद्दा आहे. त्यासंदर्भात भविष्यामध्ये ही गोष्ट खरेदी असताना त्या गोष्टीचा देखील विचार केला जाईल.

महोदय, आदिवासी जिल्हयात मोठया प्रमाणात पाळणाघरे सुरु करण्यात आली पाहिजेत असाही या ठिकाणी मुद्दा उपस्थित केला गेला. मला या ठिकाणी सांगितले पाहिजे की, आजच्या स्थितीत 300 पाळणाघरे सुरु आहेत. या पाळणाघरांसाठी 1 कोटी रुपयांचा निधी खर्च झालेला आहे.

सभापती महोदय, बालगृहाच्या संदर्भात चर्चा उपस्थित करण्यात आली होती म्हणून त्यासंबंधीची देखील थोडक्यात माहिती सांगू इच्छिते. आपल्याकडे 1174 बालगृहे आहेत. त्यातील 192 बालगृहे बंद करण्यात आली आहेत. या 192 बालगृहाचे काही संचालक उच्च न्यायालयात गेलेले आहेत. त्यांची प्रकरणे आजही न्यायालयात सुरु आहेत. तसेच 190 बालगृहांना आम्ही नोटीसा दिलेल्या आहेत. याचा अर्थ आम्ही बालगृहांच्या बाबतीत सातत्याने प्रोसीजर करीत असतो. बालगृहांच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात विभागाकडून कार्यवाही करण्यात आलेली आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी "जय मातादी संस्था", अहमदनगर या बाबत उल्ले्ख केला.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड...

श्री.बापुराव गिरी यांची ती संस्था आहे. आमच्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्या संस्थेची 17 वेळा तपासणी केली आहे. त्या संस्थेत बरेच निकष कमी असल्यामुळे त्या अनुषंगाने त्यांना दहा वेळा नोटीसेस दिल्या आहेत. त्यानंतर त्यांची मान्यता रद्द करण्यात आली. सदर संस्थेबाबत तक्रार केली, त्या तक्रारीची चौकशी झाली, त्या चौकशीमध्ये त्यांनी फक्त ॲफिडेव्हिट दिले. विभागास जे पुरावे पाहिजे होते, ते पुरावे ती संस्था देऊ शकली नाही. आमच्या विभागाचे अधिकारी त्या बालगृहात गेले, 20 मुलांची क्षमता असताना त्या ठिकाणी जास्त मुले ठेवण्यात आली होती. त्यामुळे त्यांची मान्यता रद्द केली गेली. या ठिकाणी श्री. बिनसाळे यांनी विद्यार्थ्यांच्या बाबतीत संगणक सिस्टीम सुरु करता येईल काय, असा महत्वाचा मुद्दा मांडला होता. आपण संगणक सिस्टीम सुरु करणार आहोत.

दुसरे असे की, आम्ही चाईल्ड ट्रॅकिंग सिस्टीम सुरु करणार आहोत. समजा एखादा मुलगा हरवला. तो मुलगा संस्थेमध्ये गेला, पोलीस स्टेशनमध्ये गेला तर त्याचा फोटो नेटच्या माध्यमातून दिसू शकेल, अशा पध्दतीची चाईल्ड ट्रॅकिंग सिस्टीम सुरु करीत आहोत. आमच्या विभागाने खूप चांगले चांगले निर्णय घेतलेले आहेत. मी त्या गोष्टींचा थोडक्यात उल्लेख करणार आहे. आयआयटीच्या माध्यमातून 50 मुलींना प्रशिक्षण, कर्मवीर भाऊराव स्वावलंबन योजना, जी मुले बालगृहात अथवा आश्रमशाळेत राहतात, ते 17 वर्षाचे झाल्यानंतर त्यांना व्होकेशनल ट्रेनिंग देणे, तेथे राहणारे आणि बाहेर राहणारे मुले यांच्यात फरक न राहता एकत्रितरित्या महोत्सव साजरा करणे, अनाथ मुलांसाठी सर्टिफिकेट देण्याचे सुरु केले, त्यांच्यासाठी आरक्षण ठेवण्याचा विचार करीत आहोत. ऑर्ट ऑफ लिव्हींगच्या माध्यमातून 7500 मुलांना प्रशिक्षण दिले आहे. या व्यतिरिक्त कॉम्प्रीहेन्सीव प्लॅन तयार केलेला आहे, त्या संदर्भातील निकषामध्ये बदल केलेला आहे. आम्ही बाल धोरण तयार केलेले आहे. ते प्रस्ताव भविष्यात मंत्रिमंडळापुढे ठेवण्यात येतील. ऑर्ट ऑफ लिव्हींगमध्ये 7500 मुलांना प्रशिक्षण दिले आहे. आम्ही नवनवीन उपक्रम नव्याने सुरु करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी बचत गटाच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला आहे. आज आम्ही मोठ्या प्रमाणात बचत गटांना कामे दिलेली आहेत. येत्या एक दोन महिन्यात 330 बचत गटांना काम मिळेल. 223 बचत गटांना कामे देण्यासाठी जाहिरात

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड...

दिलेली आहे. या बाबतचे सगळे अधिकार जिल्हाधिकारी यांना दिलेले आहे. दिनांक 4.10.2000 च्या पत्रान्वये जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले आहे की, तुम्हाला एखादी कंडीशन डायल्यूट करावयाची असेल तर ती आपण करु शकता. पण बचत गटांनाच कामे दिली गेली पाहिजेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असे होते की, पुरुष गटत बचत गट पुढे आलेले आहेत.

डॉ.दीपक सावंत : एकाच घरातील लोकांनी बचत गट तयार केलेले आहेत. त्यासंबंधीची यादी तुम्हाला सादर केलेली आहे.

प्रा.वर्षा गायकवाड : धुळे, जालना, बुलढाणा, या ठिकाणची यादी तुम्ही माझ्याकडे सादर केलेली आहे. त्या यादीच्या अनुषंगाने तपासणी केली जाईल.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड.....

ज्या तऱ्हेच्या गोष्टी या ठिकाणी बोलल्या गेल्या त्यासंदर्भात मी आपल्या सगळ्यांचे आभार मानते. मला असे वाटते की, महिलांच्या विषयी चर्चा होत असताना चर्चा जर तीन तास होत असेल तर उत्तर देण्यासाठी सुध्दा आम्हाला संधी दिली गेली पाहिजे. महिला व बाल विकास विभागाचा प्रामाणिक प्रयत्न आहे की, योजना चांगल्या करायच्या, धोरणे चांगली निर्माण करायची. जेणेकरुन महिला व मुलींचे प्रश्न सोडविता येतील. आज महिलांकडे बघण्याचा विभागाचा दृष्टीकोन कल्याणकारी आहे. महिला या विकासाचा पाया आहेत हा दृष्टीकोन ठेवला गेला पाहिजे. मी आपल्या सगळ्यांचे आभार मानते. आमच्या विभागामध्ये आम्ही सर्व ॲक्शन घेत आहोत. आमच्या विभागात कोणताही भ्रष्टाचार झालेला नाही. मी हे नमूद करु इच्छिते की, कोणत्याही चौकशीची आवश्यकता नाही. धन्यवाद.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मनोधैर्य योजनेबाबत मंत्री महोदयांनी 116 युवतींचा आकडा सांगितला आहे. ऑक्टोबर 2013 या एकाच महिन्यात 216 बलात्कार झाल्याचे मी आणि गृहमंत्र्यांनीही सांगितले. बलात्कार पीडित महिलेकडे गुन्हा घडल्यानंतर महिला व बाल विकास विभाग ही योजना मूव्ह करणार की तिने तुमच्याकडे येऊन मागणी करायची आहे. प्रोसीजर काय आहे? शेवटी अशा घटना घडल्या आहेत. ऑक्टोबर या एका महिन्याची आकडेवारी 216 इतकी आहे. इतरांनी अर्ज केले नाही किंवा आपल्याकडून कोणी त्यांच्यापर्यंत पोहोचलेले नाही. या संदर्भात गृह खात्याशी समन्वय साधून अशी घटना घडली तर आपण नियम बनविले आहेत, त्यानुसार ठराविक स्टेजनंतर द्यायचे आहे. त्याचे कोऑर्डिनेशन आपल्या खात्याकडून सुमोटो झाले पाहिजे. तिने यायची वाट पहायची, ती अर्ज करेल मग जिल्हाधिकारी कार्यवाही करणार असे न होता महिला व बालविकास आणि गृह विभाग यांचे कोऑर्डिनेशन होईल अशी एक यंत्रणा या कामासाठी उभी केली पाहिजे.

सभापती महोदय, गिरी नावाच्या व्यक्तीने ॲफिडेव्हीट सादर केले त्याची चौकशी केली हे खरे आहे. याने माझ्याकडे पैसे मागितले असे सांगितले आहे. खात्रीलायक माहिती तो भेटल्यानंतर ती माणसे सांगतात. ते पुढे सिध्द करतील. आपल्या विभागाकडून चौकशी होणार नाही. त्याची चौकशी अँटी करप्शन विभागाकडे दिली तर यातील भ्रष्टाचार बाहेर पडेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड : ज्यावेळेला एफआयआर दाखल झाला त्यावेळी या संदर्भात माननीय मुख्यमंत्री आणि मी सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी आणि सर्व विभागीय आयुक्तांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे या गोष्टी सांगितल्या होत्या. जिल्हाधिकारी यांची समिती आहे. त्या समितीमध्ये जिल्हयाचे एसपी, जिल्हा शल्य चिकित्सक, दोन काम करणारे एनजीओ सदस्य आहेत. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मागणी केली की, एफआयआर दाखल झाला की त्याची प्रत महिला व बालविकास अधिकाऱ्यांना आणि जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठविण्यात यावी. 7 दिवसात एफआयआरची प्रत पाठवून 15 दिवसात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक लावायची आहे. त्यांच्या विभागातील सर्व जिल्हा एसपीना कशा तऱ्हेने सामावून घेता येईल या संदर्भात मी गृह मंत्र्यांशी चर्चा करते. या प्रकरणाची महिला व बालविकास आयुक्तांमार्फत चौकशी करते.

उप सभापती : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कांदा निर्यातीच्या आधारभूत किंमतीसंबंधी

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (कृषी व पणन मंत्री) : सभापती महोदय, नियम 259 अन्वये सभागृहात उपस्थित करण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चेच्या दरम्यान माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी कांद्याच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता.

या संदर्भातील केंद्र सरकारचा निर्णय आताच प्राप्त झाला आहे. केंद्र सरकारने कांद्याची किमान आधारभूत किंमत 1125 डॉलरवरुन कमी करुन 350 डॉलर करण्यात आली आहे. त्यामुळे या निमित्ताने मी या सभागृहाच्या वतीने केंद्र सरकारचे आभार मानतो.

नंतर 5एम.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

L. A. BILL NO. XXXVII OF 2013

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL UNIVERSITIES (KRISHI VIDYAPEETHS) ACT, 1983.)

श्री.राधकृष्ण विखे-पाटील (कृषि मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 37 - महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम,1983 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या विधेयकाची प्रत आमच्या हातामध्ये आलेली आहे. त्यातील काही शब्दांबद्दल माझा आक्षेप आहे. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, तो शब्द बरोबर असेल तर तसा ठेवावा. नसेल तर तो बदलावा. पान दोन वरील खंड 3 मधील दुसऱ्या परिच्छेदामध्ये "आणि उपाध्यक्ष, या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून त्यांच्या नेमणुकीच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या कालावधीकरिता पद धारण करील. उपाध्यक्ष, राज्य शासनाची मर्जी असेल तो पर्यंत पद धारण करील." यातील "राज्य शासनाची मर्जी" काय आहे हे आम्हाला कळले नाही. इंग्रजी मसुदा आम्ही बघितला तेव्हा त्याच्यामध्ये 'pleasure' असा शब्द आहे. 'pleasure' हा शब्द देखील चुकीचा आहे. 'मर्जी' हा शब्द देखील चुकीचा आहे. इंग्रजीमध्ये 'discretion' हा अधिक योग्य शब्द वाटतो. 'discretion'ला पर्यायी मराठी शब्द शोधावा अशी मी आपल्याला हे बिल मांडताना विनंती करतो.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, या विधेयकामध्ये 'pleasure', 'मर्जी' हा शब्द वापरण्यात आला आहे. तो तात्पुरता या विधेयकामध्ये ठेवू या. आवश्यकता वाटल्यास त्यात सुधारणा करण्याकरिता हे विधेयक नंतर आणता येईल.

उप सभापती : ठीक आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 37 महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, 1983 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

उप सभापती : आता सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी भाषणास सुरूवात करावी.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, हे विधेयक विद्यापीठाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे असे मला वाटते. यात विद्यापीठाच्या संशोधना संबंधातील विषय आहे. त्यासंबंधी नियुक्ती कोणाची असावी, कशी असावी या संबंधातील हे विधेयक आहे. भारत सरकारच्या कृषि मंत्रालयाने जे केले आहे त्याच धर्तीवर आपण महाराष्ट्र कृषि विद्यापीठ सेवा प्रवेश मंडळ स्थापन करीत आहात. परिषदेच्या उपाध्यक्षाची नेमणूक करण्याचा अधिकार राज्य शासनाने स्वत:कडे घेतलेला आहे. हा या विधेकयाचा मूळ गाभा आहे. विद्यापीठातील अध्यापन,संशोधन आणि शिक्षणाचा विस्तार यावर आपण मघाशी चर्चा केलेली आहे. बी.टी.कापसाच्या धर्तीवर आपल्या येथील प्रादेशिक वाणावर संशोधन करावे असा विषय येथे मघाशीच आपण मांडलेला आहे. हा विषय कृषि विद्यापीठाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. हा विषय कापसासह इतर बाबतीत देखील घेण्यात येईल. आता केंद्रा पासून वाद चालला आहे. आता आपण बी.टी.वांग थांबविले आहे. श्री.शरद पवार साहेब म्हणाले होते की, बी.टी.वांग ताबडतोब बाजारात आणायला काही हरकत नाही. अशा प्रकारे बी.टी.संदर्भात वाद सुरू आहे. बी.टी.संबंधात माझे काही रिझर्व्हेशन्स आहेतच. तो आता चर्चेचा विषय नाही.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, बीटी कॉटनच्या संदर्भात राहुरी कृषी विद्यापीठाच्या संशोधन करणाऱ्या प्राध्यापकांनी बीटी कॉटन शेतकऱ्यांच्या हिताचे नाही अशा प्रकारचा पहिला अहवाल दिला होता. परंतु राहुरी कृषी विद्यापीठाने तो अहवाल बदलला. यासंदर्भात मी स्वत: राहुरी येथे गेलो त्यावेळेस मी त्यांच्याकडे पहिला अहवाल मागितला तेव्हा त्यांनी सांगितले की, आपल्याला फक्त वाचण्यासाठी देतो आता तो आमचा अधिकृत राहिलेला नाही. एक प्राध्यापक संशोधन करुन असे जेव्हा म्हणतो तसेच मला जी माहिती मिळालेली आहे त्या प्रमाणे माझेही तेच मत होते परंतु माझे मत त्यावेळेला मला सभागृहात मांडता आले नाही. त्यावेळेला माननीय श्री. बाळासाहेब थोरात हे कृषी मंत्री होते. बीटी बियाण्यांच्या संदर्भात युरोप मध्ये जे काही घडले होते ते मी पाहून आलो होतो. तसेच ऑस्ट्रेलियामध्ये बीटी बियाण्याच्या संदर्भात जे आंदोलन झाले होते त्यांचीही मी भेट घेऊन आलो होतो तसेच चायनामध्ये सुध्दा यासंदर्भात मी माहिती घेतली होती. बीटी बियाण्यांच्या संदर्भात मी अनेक प्राध्यापकांशी चर्चा देखील केली होती. बीटी बियाण्यांच्या विधेयकाच्या वेळी मी उपस्थित नसल्यामुळे मला बीटी बियाण्यांच्या संदर्भात मत मांडता आले नाही.

सभापती महोदय, विधेयकाच्या पृष्ठ क्रमांक 2 मधील खंड 3 मध्ये असे म्हटले आहे की, "आणि उपाध्यक्ष, या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, त्याच्या नेमणुकीच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या कालावधीकरिता पद धारण करील.उपाध्यक्ष, राज्य शासनाची मर्जी असेल तोपर्यंत पद धारण करील."

सभापती महोदय "मर्जी" हा शब्द कायद्यामध्ये कधीही येत नाही. कायद्यामध्ये शब्द ठाम असावे लागतात. सहकार मंत्र्यांच्या विधेयकामध्ये असे आढळून आले होते. त्या विधेयकाप्रमाणे या ठिकाणीही उपाध्यक्षांच्या बाबतीत ठाम शब्द येणे आवश्यक होते परंतु ते आले नाही याचे दु:ख आहे.

सभापती महोदय, विधेयकामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "राज्य शासनाची मर्जी असेल तोपर्यंत पद धारण करील आणि राज्य शासनास, लोकहितास्तव तसे करणे आवश्यक व इष्ट आहे असे दिसून आल्यास, आदेशाद्वारे, कोणत्याही वेळी, त्यास पदावरुन दूर करता येईल."

==2==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, या ठिकाणी नेमलेले सन्माननीय उपाध्यक्ष कोण असतील ते स्पष्ट केलेले आहे. ते प्राध्यापक असतील,उच्च शिक्षित असतील. अगोदर जसा "मर्जी" असा शब्द होता तसा

आता "लोकहितास्तव" शब्द घातलेला आहे. या विधेयकात व्हेग शब्द वापरण्यात आलेले आहेत. मी संपूर्ण विधेयक वाचले आहे परंतु मला लोकहित म्हणजे काय हे दिसून आलेले नाही. कृषी मंत्री म्हणून आपले काम चांगले चालले आहे त्याबद्दल वाद नाही. मिश्र खतांच्या संदर्भात तुम्ही ठाम निर्णय घेतल्यामुळे महाराष्ट्रात खतांचा प्रश्न शिल्लक राहिलेला नाही त्याबद्दल मी आपले अभिनंदनही केलेले आहे. कृषी खात्याच्या बी-बियाण्यांच्या संदर्भात आपण फार चांगले काम केलेले आहे याची मला कल्पना आहे. मिश्र खतांच्या संदर्भात निर्मात्यांची जी नाडवणूक झाली होती त्याची आपल्याला कल्पना आहे. मिश्र खते इतर राज्यांपेक्षा महाराष्ट्रातच जास्त वापरली जातात.

सभापती महोदय, सक्षमपणे काम करणाऱ्या कृषी मंत्र्यांच्या मनामध्ये "लोकहितास्तव" या शब्दाचा अर्थ नक्कीच असला पाहिजे.

यानंतर श्री.अजित.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : सभागृहाची वेळ दोन्ही विधेयकांवरील चर्चा पूर्ण होईपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या मनात जी संकल्पना आहे ती दुसऱ्या मंत्री महोदयांच्या मनात असेल असे सांगता येत नाही. आज जे कृषी अधिकारी आहेत त्यांना या सर्व गोष्टी माहीत असतील. पण उद्या त्या अधिकाऱ्याची बदली झाली तर ती संकल्पना काय असेल याची कायद्यामध्ये स्पष्टता येत नाही. कायद्यामध्ये अधांतरी शब्द ठेवणे अयोग्य आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, हे विधेयक कृषी विद्यापीठांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे हे मी सांगितले आहे. पण मला ज्या गंभीर बाबी वाटतात त्या मी येथे मांडलेल्या आहेत. या संदर्भात आपणास बदल करणे आवश्यक वाटत असेल तर ते आपण करावेत. हे विधेयक पुढील अधिवेशनात मंजूर झाले तरी चालेल. अन्यथा ते भविष्यात मारक होईल अशी माझी कल्पना आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या माध्यमातून उच्च दर्जाच्या कृषी संशोधनाकरिता कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून कुशल शास्त्रज्ञ निर्माण करायचे आहेत असे मला जाणवते आणि अशा व्यक्तींची निवड करण्याकरिता हे मंडळ आहे.

सभापती महोदय, मी या निमित्ताने काही कृषी विद्यापीठाच्या समस्या मांडण्याचा येथे प्रयत्न करणार आहे. त्या समस्या त्यांनी सोडविल्या तर फार बरे होईल. कारण आपणाला संशोधन करायचे आहे संशोधनाची क्षमता वाढवावयाची आहे. हे सर्व करीत असताना त्या ठिकाणी असलेली उपलब्धी किती आहे, त्या ठिकाणी उपलब्ध नसलेल्या बाबी तुम्ही पूर्ण करणार आहात काय ? हा विषय फार मोलाचा आहे असे मला वाटते. महाराष्ट्र कृषी शास्त्रज्ञ निवड मंडळ तयार करीत असताना उपाध्यक्ष हा कृषी शास्त्रामधील तज्ज्ञ व उच्च पदस्थ काम केलेला असवा असे म्हटलेले आहे. म्हणजे तो कोण असावा याचे निकष ठरलेले आहेत. निवृत्त कुलगुरू उच्च पदस्थ म्हणून नेमणार आहात काय ? ते अनुभवी असतात, ते कुलगुरु असल्यामुळे त्यांच्या हाताखाली अनेक संशोधन झाल्याचा त्यांना अनुभव असतो. त्यांना त्रुटी माहीत असतात, प्राध्यापकांना कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे हे त्यांना माहीत असते. तेव्हा तिकडे बसलेली व्यक्ती ही अशी अनुभवी असेल तर त्याला फार महत्व आहे. त्या संदर्भातील आपल्या संकल्पना काय आहेत हे मी जाणून घेऊ इच्छितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, निवड मंडळाचे सदस्य हे कृषी विद्यापीठाचा कुलगुरू, कार्यालयीन एक सदस्य, राज्यपाल नियुक्त कृषी क्षेत्रातील दोन तज्ज्ञ किंवा दोन विषयांतील तज्ज्ञ अशी आपली निवडीची धारणा आहे. हे तज्ज्ञ कोणत्या क्षेत्रातील असावेत असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, तुरडाळीवर धुके पडल्यावर रोग पसरतो. ही फार मोठी समस्या होती. मी येथे त्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता की, तुरडाळ उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून काय अनुदान देणार आहात. मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून त्यावर संशोधन करण्यात आले. त्यांनी आपणास डेमो दाखविला. मराठवाड्यातील कृषी शास्त्रज्ञांनी धुक्यामुळे कीड पडणार नाही अशा डाळीचे वाण निर्माण केले. आता धुक्यामुळे तुरडाळीवर कीड पडत नाही. अशा प्रकारचे विकसित तंत्रज्ञान या मंडळीकडून विकसित होते. तेव्हा या विषयातील दोन तज्ज्ञ कोणत्या विषयातील असतील याची माहिती द्यावी.

सभापती महोदय, मंडळामध्ये सहाय्यक प्राध्यापक ते संचालक पदासाठी निवडीद्वारे व पदोन्नतीद्वारे नेमणुका करण्यात याव्यात अशा प्रकारची सूचना मला करायची आहे. तसेच सर्व पदांच्या आंतरविद्यापीठांतर्गत बदल्या करण्याचा नियम करावा.

यानंतर श्री.बोर्डे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

चारही विद्यापीठामध्ये त्यांच्या संशोधनाचा वाटा असेल तो सर्वत्र फिरत राहील आणि चारही विद्यापीठांमध्ये सक्षम विज्ञानाचे प्रयोग होतील. परिणामी त्या भागातील विद्यार्थ्यांना लाभ होईल. त्यामुळे त्यांची सर्व ठिकाणी बदली करण्याचा नियम केल्यामुळे सध्या अस्तित्वात असलेला प्रांतवाद संपून जाईल आणि सर्व भागातील ज्ञानी मंडळी एकमेकांच्या भागात जाऊन संपूर्ण राज्यात ते तंत्रज्ञान देतील, म्हणून मी ही सूचना मांडली आहे.

महोदय, निवड प्रक्रियेमध्ये ग्राह्य ठरण्यात येणाऱ्या नवीन निर्देशांकामध्ये चार ते पाच वर्षात निवृत्त होऊ घातलेल्या शास्त्रज्ञांसाठी निकषावर शिथिलता निर्माण करणार काय ? काल सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितले की, प्राध्यापंकाचे सेवानिवृत्तीचे वय 60 वर्षावरुन 64 वर्षे केल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीचे वय सुध्दा 58 वर्षांवरुन 60 वर्षे करावे. महोदय, परिपक्व झालेले शास्त्रज्ञ स्वत:ला संशोधनात जेवढे गाडून घेतात तेवढा त्यांचा जास्त फायदा होतो. त्या निकषामध्ये शिथिलता असावी असे मी सांगितले आहे.

महोदय, या विधेयकामुळे शैक्षणिक सुधारणा होणार आहेत काय ? कारण याचा फायदा त्या त्या भागातील विद्यापीठांतील विद्यार्थ्यांना होणार आहे. म्हणून पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश क्षमता वाढवावी लागेल. त्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावे लागेल. मनुष्यबळ किती कमी आहे हे मी पुढे सांगेन. आता पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आणि महाविद्यालयांची संख्या यामध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. या सर्व बाबींवर माननीय मंत्री लक्ष ठेवून आहेत याचा मला आनंद आहे. कारण या बाबतची माहिती मला कळत असते. नवीन अभ्यासक्रम हा व्यवसायाभिमुख, तसेच प्रत्यक्षात अनुभवावर आधारित असल्यामुळे, विद्यापीठाला वाढीव निधी देण्याबाबत आपण काय करणार आहात ? अत्यंत क्लिष्ट, सातत्यपूर्ण आणि त्यामध्ये काम करणाऱ्यांना साहित्याच्या उपलब्धीची गरज लागणार आहे. त्यासाठी निधीची आवश्यकता पडणार आहे. त्यामुळे या वाढीव निधीसाठी आपण कोणती उपलब्धी करुन देणार आहात ?

महोदय, संशोधनासाठी सध्याच्या परिस्थितीत राज्य शासन विद्यापीठाला कोणत्याही प्रकारचे अनुदान उपलब्ध करुन देत नाही. या संदर्भात आपण काही निकष ठरविणार आहात काय ? एक चांगला प्रयोग महाराष्ट्राच्या प्रगत शेतीच्या संदर्भात निर्माण करणार असाल तर त्या संदर्भात राज्य सरकारने जबाबदारी घ्यावी अशा अपेक्षेने ही सूचना मांडतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या धर्तीवर, पीक निहाय व गरजेनुसार राज्य सरकारचे संशोधन केंद्र शेतकऱ्यांसाठी निर्माण करणे आवश्यक आहे. मागे मी परभणी येथे इस्त्रायल कॉटनचा 200 एकर शेतीवर प्रयोग केला होता. तो प्रयोग पाहण्यासाठी महाराष्ट्रातील एक ते दीड लाख शेतकऱ्यांनी भेट दिली होती. वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातून मी त्या प्रयोगाला निधी उपलब्ध करुन दिला होता. इस्त्रायलमध्ये कापसाची उत्पादन क्षमता का वाढते, याची माहिती घेण्याचा प्रयत्न शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने केला. अशा प्रकारे निर्माणनिहाय गरजेनुसार संशोधन केंद्र निर्माण होण्याची आवश्यकता आहे.

महोदय, विद्यापीठात निर्माण होणाऱ्या विविध पिकांच्या वाणांची रॉयल्टी त्या विद्यापीठाला मिळाली पाहिजे. ते वाण निर्माण केल्यानंतर त्याची रॉयल्टी व्यापारी किंवा प्रायोजित कंपनीकडे जाते. मॉन्सॅटो कंपनी बीटी कॉटनच्या माध्यमातून काही करोडो रुपयांची रॉयल्टी कमवित आहे. ती रॉयल्टी अमेरिकेत चालली आहे. आपल्या शेतकऱ्यांच्या खिशातील पैसा रॉयल्टीच्या माध्यमातून अन्य देशात जात आहे. कारण रॉयल्टीचे अधिकार त्यांना मिळाले आहेत.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

विद्यापीठांकडे लक्ष देणे, आपल्याला फार महत्त्वाचे ठरणार आहे. आपण हा निर्णय घेतला तर सर्व कृषी विद्यापीठांना कायमस्वरूपी संशोधन करता येईल आणि त्यांच्याकडे असलेल्या प्रचंड जमिनीवर स्वत:चे बीज निर्माण करून कोणाच्या तरी मार्फत विकण्याकरिता फार मोठी मदत होणार आहे आणि म्हणून त्यांना रॉयल्टी मिळाली पाहिजे, अशी मी आपल्याला सूचना करतो. आपण संशोधन करण्याकरिता हे सर्व केले आहे. तेथे महत्त्वाची यंत्रणा उभारून शास्त्रज्ञ नियुक्त करणार आहात, मग त्याच्या विस्ताराचाही विषय निर्माण झाला. विद्यापीठाचे संशोधन शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहचणे आवश्यक आहे. विद्यापीठाच्या प्राध्यापकांनी जाऊन डेमो द्यावा, असा अग्राह मी नेहमी धरतो. कृषी विभागाने त्या संदर्भात स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी आणि चारही कृषी विद्यापीठांच्या शास्त्रज्ञांनी विकसित केलेले तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याकरिता प्रयत्न करावेत. आपण वेगवेगळ्या यंत्रणा निर्माण करून काही क्रांतिकारक निर्माण करू इच्छित आहात. परंतु, बी-बियाणांच्या निर्माणाच्या बाबतीतील आणि शोधाच्या बाबतीतील गोष्टींचा फायदा शेतकऱ्यांना झाला पाहिजे. शेवटी हे शेतकऱ्यांसाठीच करायचे आहे. आपण करीत असलेल्या क्रांतिकारी गोष्टींचा फायदा शेतकऱ्यांना व्हावा, याकरिता मी सूचना करीत आहे. मग त्यामध्ये कृषी विद्यापीठांतील विद्यार्थी आलाच. नवीन विद्यार्थी संशोधनामध्ये शिकणार आहे.

सभापती महोदय, मी कृषी विद्यापीठातील मागास विद्यार्थ्यांचा मुद्दा मांडला होता. मला खूप वाईट वाटते. राज्यात सर्व पातळीवर सर्व बाबतीत मागासवर्गीयांना शिष्यवृत्ती आहे. पण मग कृषी विद्यापीठामध्ये ती का मिळत नाही ? माननीय मंत्री श्री. शिवाजीराव मोघे साहेबांनी या संदर्भात उत्तर दिले. आपण कृषी विद्यापीठांचे प्र-कुलगुरू आहात आणि त्यानंतर माननीय राज्यपाल महोदय येतात. मग हा विषय माननीय राज्यपालाकडे कशाला जायला पाहिजे ? आपण माननीय मंत्री आहात. आपण मंत्रिमंडळात हा विषय मांडू शकता. सर्व क्षेत्रांतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत असेल तर कृषी विद्यापीठांमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याकरिता आपण तातडीने तजवीज करावी, अशी मी आपणाला त्या विद्यार्थ्यांच्या वतीने विनंती करतो. आपल्याला विनंती करण्याचा त्यांना अधिकार आहे. परंतु, आम्ही त्यांच्या वतीने

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

आपल्याला विनंती करीत आहोत. मला येथपर्यंत हा प्रश्न मांडण्याची वेळ यायला नको होती. मी एकदा या संदर्भात उल्लेख केला असता माननीय मंत्री श्री. शिवाजीराव मोघे साहेबांनी उत्तर दिले नाही, ते एवढेच बोलले की, मी विचार करतो आणि देण्याचा प्रयत्न करतो. त्यांचे उत्तर नकारात्मक नव्हते. सर्व कामांसाठी निधी लागणारच आणि त्यामुळेच कृषी विद्यापीठांसाठी निधीची तरतूद केली जाते. मी अनेकदा या संदर्भात संबंधित खात्यांशी चर्चा करतो. कृषी विद्यापीठांना वेळेवर निधी दिला जात नाही. इतर खात्यांप्रमाणे 31 मार्चला निधी दिला जातो. सभापती महोदय, ही सतत चालणारी प्रोसेस आहे. तेथे करोडो रूपयांच्या उलाढालीचा विषय नसतो. कृषी क्षेत्रासाठी फार मोठा निधी नसतो. कृषी क्षेत्राचा बजेट 0.0001 टक्का नसतो, त्यामुळे त्यांना तो वेळेवर मिळाला पाहिजे. वित्त खात्याच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली तर विद्यापीठांची अवेळी येणाऱ्या आर्थिक भाराची चिंता संपेल. सभापती महोदय, हे सर्व शिक्षक असतात. ते या टेंशनमध्ये जगत नाहीत, ते कामात रमतात. पैसे कुठून आणायचे या संदर्भात मानसिक त्रास देणे योग्य नाही. त्यांचा निधी वेळेवर कसा जाईल, हे आपण पाहू शकला तर त्यांना फार बरे वाटेल. त्यांच्यासाठी काम करणारे प्र-कुलगूरु म्हणून मी तुमच्याकडे पाहतो. कारण तुम्ही सर्व ठिकाणी लक्ष घालता. मी राहुरी कृषी विद्यापीठ, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ यांचे काम पाहिले आहे. कोकण कृषी विद्यापीठाचे काम सन्माननीय विरोधी पक्षनेते पाहतात. आपण त्यांच्या निधीकडे लक्ष द्यावे, एवढीच विनंती आहे.

सभापती महोदय, परभरणीच्या कृषी विद्यापीठामध्ये 40 ते 50 टक्के पदे रिक्त आहेत. मग त्यांचा कारभार कसा चालेल ? पदे रिक्त असल्यामुळे शिक्षण, संशोधन, विस्तार या सर्व कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे. मला बाकीच्या विद्यापीठांतील रिक्त पदांच्या संदर्भात माहीत नाही.

(नंतर श्री. खंदारे ....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

इतर कृषी विद्यापीठांची परिस्थिती योग्य असेल असे मला वाटत नाही. 1332 पैकी 954 पदे रिक्त आहेत. या रिक्त पदांबाबत शासनाने निर्णय घेणे आवश्यक आहे. निवड मंडळाच्या माध्यमातून रिक्त भदे भरण्याबाबत नियमितता असावी अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे.

सभापती महोदय, नांदेड जिल्ह्यातील किनवट हा आदिवासी भाग आहे. त्या भागामध्ये कृषी महाविद्यालय स्थापनेसाठीच्या प्रस्तावाला विद्यापीठाने मान्यता दिली, कार्यकारी परिषदेने मान्यता दिली, त्यानंतर तो प्रस्ताव कृषी परिषदेमार्फत शासनास पाठविलेला आहे. हा प्रस्ताव पाठवून दीड ते दोन वर्षे झालेली आहेत. त्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेतला तर बरे होईल. येत्या जून महिन्यापासून हे कृषी महाविद्यालय सुरु करावे. त्यामुळे आदिवासी व मागास भागातील विद्यार्थ्यांची सोय होईल.

मराठवाड्यामध्ये 12 घटक व 32 खाजगी विना अनुदानित तत्वावर तसेच 9 घटक व 53 खाजगी विना अनुदानित तत्वावर कृषी तंत्र विद्यालये आहेत. या वेळी प्रथमच माजी सदस्य श्री.पाशा पटेल यांनी एक धाडस करुन कृषी तंत्र महाविद्यालयाची मागणी केली आहे. शासनाने ते मंजूर केलेले आहे. कृषी विभागामध्ये अवजारांमध्ये क्रांती होत आहे. सर्व व्यवस्था संगणकीकृत होत आहे. या तंत्रज्ञानाचे शिक्षण देणारे मराठवाड्यात एकही महाविद्यालय नव्हते. त्यांनी ती संकल्पना मांडलेली आहे. त्यासाठी आवश्यक असलेले इन्फ्रास्ट्रक्चर उभे केलेले आहे. त्यामुळे ते प्रथमच सुरु होणार आहे. यापुढे ट्रॅक्टर सुध्दा हळूहळू मानवरहित संगणकीकृत असणार आहेत.

घटक महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी सध्याचे अनुदान अपुरे आहे, त्याची मंत्री महोदयांनाही कल्पना आहे. विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या 10 ते 15 टक्के अनुदान (Contingency) मिळते. सध्या विद्यापीठामध्ये 40 टक्केच्या जवळपास जागा रिक्त आहेत, त्यामुळे त्यांच्यावर ताण येतो, ही यंत्रणाच विसकळीत झालेली आहे. 40 ते 50 टक्के म्हणजे साधी गोष्ट नाही. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे अकोला व

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

राहुरी यांच्या धर्तीवर स्वतंत्र पदव्युत्तर संस्था स्थापन करण्याची आवश्यकता आहे, ही मागणी मी मंत्री महोदयांकडे करीत आहे. सध्या दोन ठिकाणी आहे, तिसरे निर्माण केले तर आम्हाला बरे वाटेल. नव्याने सुरु झालेल्या पदवी अभ्यासक्रमाच्या आठव्या सत्रासाठी भारतीय कृषी अनुसंधान परिषदेने अनुभवावर आधारित प्रशिक्षण केंद्र स्थापनेसाठी एकाच वेळेस अनुदान दिले आहे. त्याप्रमाणे ते उभे राहिले. परंतु त्यांच्या दैनंदिन खर्चाबाबत आपण मार्गदर्शन केले तर बरे होईल. त्याची निर्मिती झाली, परंतु खर्च कसा भागवावयाचा हा प्रश्न निर्माण झालेला आहे. अन्नतंत्र महाविद्यालय, परभणी येथे खाद्य गुण नियंत्रण प्रयोगशाळा निर्माण झालेली नाही, ती स्थापन करण्याची गरज आहे. विद्यापीठ स्तरावर उद्योगावर आधारित प्रशिक्षण केंद्र उभे केले पाहिजे, घटक व खाजगी विना अनुदानित महाविद्यालयातून पदवी धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. त्यामुळे धाराशिव व अंबेजोगाई येथे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्याची आवश्यकता आहे हे मी आपल्या निदर्शनास आणत आहे. विद्यापीठातील प्राध्यापकांच्या गुणवत्ता वाढीसाठी त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करुन देऊन त्यासाठी विशेष निधी उपलब्ध करुन दिला तर मराठवाड्यातील मुले त्याचा चांगला लाभ घेऊ शकतील म्हणून मी ही सूचना करीत आहे. पदव्युत्तर व आचार्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ/राज्य सरकारतर्फे शिष्यवृत्ती (Fellowship) देण्याची मी विनंती करीत आहे. मराठवाड्यासाठी आंबा, मका, डाळिंब, हळद, मसाला पिके, मिरची इत्यादी पिकांसाठी स्वतंत्र संशोधन केंद्र स्थापन करण्याची विनंती करतो. विद्यापीठासाठी मंजूर अखिल भारतीय समन्वयीत प्रकल्पातील शास्त्रज्ञाच्या जागा रिक्त राहिल्यास अशा जागा भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांनी भरणे बंद केलेले आहे. त्या जागा लॅप्स होतात असे सांगितले असल्यामुळे सदर जागा तातडीने भरणे आवश्यक आहेत.

नंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत मूल / शुद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्या जागा जर दिल्लीने लॅप्स केल्या तर आपली कोणतीही जागा भरता येणार नाही. त्या संदर्भात तातडीने कारवाई करावी अशा प्रकारची मी विनंती करतो.

कृषी विद्यापीठांतर्गत असलेल्या विविध संशोधन केंद्रासाठी भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली यांच्याकडून अनुदान मिळत नसल्याने सदरील संशोधनाच्या कार्यासाठी व बळकटीकरणासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी विनंती करीत आहे. बदलत्या हवामानानुसार कृषी क्षेत्रावर होणाऱ्या विविध परिणामाच्या संशोधनासाठी स्वतंत्र केंद्र स्थापन करणे आवश्यक आहे. या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. विद्यापीठात विकसित झालेले तंत्रज्ञान व संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये विस्तार कार्यासाठी स्वतंत्र विभाग व मनुष्य बळ नाही. त्यामुळे शेतक-यापर्यंत तंत्रज्ञान पोहोचत नाही. त्यासाठी अत्याधुनिक उपकरणे व तंत्रज्ञासहीत विस्तार कार्यासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करणे आवश्यक आहे. असे नमूद करुन या विधेयकाला पाठिंबा देतो. आपण ज्या जाणिवेने विद्यापीठाकडे लक्ष देत आहात आणि खासकरुन राहुरी आणि मराठवाड्याकडे जे लक्ष देत आहात त्याच भावनेतून या सगळया गोष्टी मी तुमच्या पुढे मांडलेल्या आहेत. विद्यापीठाला बळकटी देत असताना त्यामध्ये असलेल्या त्रुटींकडे आपण लक्ष द्यावे अशी मी आपणास विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र कृषि विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयकावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कृषि विद्यापीठामध्ये जे शास्त्रज्ञ नेमले जाणार आहेत त्यांच्याकडून काम करुन घेतले पाहिजे. कोकण कृषि विद्यापीठावर मी 1987साली निवडून गेलो. त्यावेळी जे टिश्यू कल्चर होते ते आजही तशाच परिस्थितीमध्ये आहे. कोकणातील कृषी विद्यापीठामध्ये कोणतेही संशोधन केले जात नाही. आंब्यावर देखील संशोधन झालेले नाही. आंबा हे पीक शाश्वत नाही. आंब्यावर काळे डाग पडतात. ते डाग पडू नयेत म्हणून कोणतेही संशोधन झालेले नाही. कल्तारा वापरुन लवकर पीक काढण्यास सांगितले जाते. कल्तार वापरल्यामुळे झाडांची वाट लागलेली आहे. त्या बाबतीत कोणतेही संशोधन केले जात नाही. इस्त्रायलमध्ये मी स्वत: जाऊन पाहणी केलेली आहे. त्याठिकाणी जवळ लागवड करुन आंब्याची छाटणी केली जाते. छाटणी केल्यामुळे तेवढाच आंबा मिळतो. पण इस्त्रायलमधील तंत्रज्ञानाप्रमाणे कोणतेही संशोधन आपल्या राज्यात झालेले नाही. कृषी विद्यापीठातून संशोधन होत नसेल तर या कृषी विद्यापीठांचा काय उपयोग आहे ? कोकणामध्ये काजू मोठ्या प्रमाणावर होतो. या काजूवर कोणत्याही प्रकारचे संशोधन होत नाही. वेंगुर्ला जात निर्माण केली. पण या जातीच्या बियातील काजूच्या गराचा आकार फार लहान आहे. कोकणामध्ये रातांबा पीक आहे. कोकमावर कोणताही शोध लागलेला नाही. कोकम हे पूर्वापार आहे तसेच आहे. आता बाजारामध्ये सिलोनमध्ये पिकणारे कोकमासारखे दिसणारे फळ मिळते ते फळ कोकणामध्ये होऊ शकते. पण त्यादृष्टीने कृषि विद्यापीठाने कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. या फळाला बाजारात खूप किंमत आणि मागणी आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये 1 लाख 10 हजार टन ऊसाची लागवड झालेली आहे. परंतु ऊसाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचे संशोधन झालेले नाही. मी माननीय कृषी मंत्री महोदयांना या बाबतीत विनंती केल्यानंतर त्यांनी श्री. पवार नावाच्या हुशार व्यक्तीला पाठवले. त्यांनी कोकणामध्ये ऊसाच्या 18 जाती लावल्या. कोकणामधील कृषी विद्यापीठाला ऊसाची एकही जात माहीत नाही. ऊस म्हणजे काय हे माहीत नाही. त्यामुळे ऊसावर संशोधन नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्या प्रमाणे या तज्ज्ञ मंडळीनी सगळीकडे फिरुन माहिती घेतली पाहिजे. कोकणामध्ये भात पिकतो. परंतु भातापासून जास्त उत्पन्न मिळत नाही. म्हणून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोकणातील माणूस नोकरी करण्यासाठी मुंबईला येतो. कोकणामध्ये ऊसावर संशोधन झाले तर कोकणातील माणूस मुंबईकडे येण्याचा थांबेल. आज कोकणातील बी.ए., बी.कॉम. झालेली मुले ऊसाची शेती करायला लागली आहेत.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत....

आमच्या भागात बी.ए.,बी.कॉम झालेले लोक आता ऊसाची शेती करु लागले आहेत. आता लोकांची नोकरी करण्याची इच्छा होत नसल्यामुळे वैभववाडी व फोंडाघाट मध्ये लोक शेती करीत आहेत. वैभववाडीत ऊस संशोधन केंद्र मंजूर करण्याचे ठरवले असून त्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे आलेला आहे. हा प्रस्ताव दिल्ली येथे पाठवून तो मंजूर करुन आणला तर वैभववाडी येथे ऊस संशोधन केंद्र सुरु होऊ शकेल. कृषी विद्यापीठामध्ये संशोधकांची संख्या कमी असून त्यांना पैशाचे पाठबळ मिळत नाही. आपल्याकडे केवळ टीश्यू कल्चरपासून केळी तयार करण्याचे काम केले जाते बाकी टीश्यू कल्चरचे कोणतेही काम होत नाही. कोकणातील शेतकऱ्यांना कृषी विद्यापीठाचा जेवढा उपयोग व्हावयास पाहिजे तेवढा होत नाही. 1987 पासून पाहिजे तेवढया प्रमाणात आपल्याकडे संशोधन झालेले नाही. त्यामुळे कृषी विद्यापीठाचे संशोधन शेतकऱ्यांपर्यंत जास्तीत जास्त जाण्याची आवश्यकता आहे. कृषी विद्यापीठाच्या संशोधनाचा फायदा रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्हयातील शेतकऱ्यांना झाला तर ते आंबा, काजू पिकाचे जास्त उत्पन्न काढू शकतील.

कोकणामध्ये आज ऊसाचे कारखाने अधिक निर्माण होण्याची आवश्यकता आहे. पश्चिम महाराष्ट्रात ऊस मोठया प्रमाणात पिकवला जात असला तरी आता कोकणात ऊसाचे उत्पन्न बऱ्यापैकी निघत आहे त्यामुळे कोकणात ऊसाचे कारखाने निर्माण केले तर कोकणातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होईल. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (कृषी मंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम 1983 च्या सुधारणेसंबंधी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व सन्माननीय सदस्य श्री. विजय सावंत यांनी या विधेयकावर चर्चा करीत असतांना काही मूलभूत सूचना केल्यामुळे मी त्यांचा आभारी आहे. कृषी विद्यापीठाच्या कार्यपध्दतीमध्ये निवड प्रक्रिया पारदर्शी व्हावी व त्याच बरोबर चारही कृषी विद्यापीठांमध्ये योग्य समन्वय व्हावा अशा प्रकारची भूमिका राज्य शासनाची आहे.

माननीय राज्यपाल महोदय हे चारही कृषी विद्यापीठाचे कुलपती आहेत. या विषयाच्या संदर्भात त्यांच्या बरोबर जेव्हा बैठक झाली त्यावेळेस माननीय मुख्यमंत्री तसेच काही अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य कृषी विद्यापीठ भरती मंडळ स्थापन करण्याबद्दलचा निर्णय झाला व त्या अनुषंगाने या ठिकाणी हे विधेयक आणण्यात आले आहे.

सभापती महोदय, आजच्या नियम 260 च्या प्रस्तावावरील चर्चेमध्ये मी सुस्पष्ट उल्लेख केला आहे की, विद्यापीठाचे एकूण जे संशोधन आहे, त्याच बरोबर शिक्षण विस्तार सुध्दा आहे. राज्य शासनाने विद्यापीठाला हजारो एकर जमिनी दिलेल्या असून आवश्यक त्या पायाभूत सुविधाही उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. परंतु या सर्वांचे मूल्यमापन करण्याची आवश्यकता असल्याकारणाने आपल्या देशातील कृषी शास्त्रज्ञ डॉ.वाय.के.अलग यांनी या क्षेत्रासंदर्भात देशाच्या नियोजन मंडळात काम केलेले आहे. गुजरातमध्ये निरमा सारख्या ॲग्रीकल्चरल मॅनेजमेंट इन्स्टीटयूटची स्थापना करण्यात त्यांचा पुढाकार होता. किंबहुना युनियन पब्लीक सर्व्हीस कमिशनचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे. तसेच नर्मदा सरोवर प्रकल्पाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे. सध्या ते गुजरात विद्यापीठाचे कुलपती आहेत.

सभापती महोदय, सध्याच्या कृषी विद्यापीठाच्या एकूण कार्यपध्दतीमध्ये मूलभूत बदल करण्याची आवश्यकता आहे. विद्यापीठे ही संशोधन केंद्र राहण्यापेक्षा शिकविण्याकरिता संस्था उभ्या राहिल्या आहेत, विद्यापीठाचे स्वरुप बदलत चालले आहे असे विचार सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी व्यक्त केले आहेत. कृषीच्या संदर्भात संशोधन व्हावे अशी कृषी विद्यापीठामागची मूळ संकल्पना होती. सुरुवातीच्या काळात सरकारच्या माध्यमातून कृषी महाविद्यालये सुरु झाली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील .....

कृषी महाविद्यालयांचा विस्तार व्हावा यासासाठी शासनाने विना अनुदान तत्वावर कृषी महाविद्यालये सुरु केली. परंतु यांनी कृषीच्या मूलभूत संशोधनासाठी जे लक्ष द्यावयास पाहिजे होते ते दिले गेले नाही. या मागे वेगवेगळी कारणे असू शकतील. परंतु संशोधनामध्ये आपण कमी पडत चाललो आहोत हे वास्तव आपल्याला नाकारता येत नाही. माझ्या भाषणात मी बी.टी.कॉटनचा उल्लेख केला होता.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे पाटील.....

आम्ही परदेशी किंवा देशी कंपन्याच्या, खाजगी कंपन्याच्या माध्यमातून होणारे संशोधन स्वीकारीत आहोत. त्यामध्ये विद्यापीठे सुध्दा बघ्याची भूमिका घेण्याचे काम करीत आहेत. अनेक वर्षे एकाच जातीचे संशोधन करुन त्यामध्ये समाधान मानण्याचे काम सुरु आहे. या वाय.के.अलग यांच्या समितीच्या माध्यमातून त्यामध्ये मूलभूत बदल होईल. विद्यापीठांना राज्य सरकारने एवढा निधी दिल्यानंतर खरे म्हणजे आतापर्यंत कृषी विद्यापीठे स्वयं अर्थसहाय्यित संस्था झाल्या पाहिजे होत्या. संशोधनातून त्यांना रॉयल्टी मिळाली असती किंवा उपलब्ध असलेल्या जमिनीमधून मिळणा-या उत्पन्नाचा उपभोग, त्याचा 100 टक्के लाभ विद्यापीठांनी घेतला पाहिजे होता. जो उल्लेख बियाण्यांच्या बाबतीत झाला त्या संदर्भात विद्यापीठांना आपण सूचना दिलेल्या आहेत. जास्तीत जास्त जमिनीचा वापर स्वत:चे बियाणे उत्पादन करण्यासाठी करा. त्यातून मिळणारी रक्कम 100 टक्के विद्यापीठांना ठेवण्यास सांगितले आहे. त्यातून येणारे पॅटर्न आहेत त्याचे पॅटर्निंग घेण्यासाठी सुध्दा सूचना केली आहे. विद्यापीठांनी उत्तम संशोधन केले त्याचे पॅटर्न करा. पॅटर्न त्यांच्याकडे राहील. त्यातून निधी उपलब्ध होईल. पॅटर्नच्या माध्यमातून रॉयल्टी मिळेल. उपलब्ध साधनांचा उपयोग त्यांनी प्रभावीपणे केला तर निधी त्यांना मिळेल.

सभापती महोदय, मध्यंतरी माननीय राज्यपालांच्या उपस्थितीत बैठक झाली. त्या बैठकीत 500 कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी विद्यापीठाच्या व्यवस्थापनाकरिता द्यावा असे ठरले आहे. दरवर्षी 100 कोटी रुपये द्यायचे असून त्यातून 25 कोटी रुपये प्रत्येक विद्यापीठाला मिळतील. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात जी सरकारी कृषी महाविद्यालये आहेत त्या ठिकाणी पायाभूत सुविधा निर्माण कराव्या लागतील. दरवर्षी 25 कोटी रुपये प्रत्येक विद्यापीठाला द्यायचे असे राज्यपाल महोदयांसमोर ठरले आहे. या वर्षापासून ती कार्यवाही आपण सुरु करीत आहोत. त्यामुळे निधीची उपलब्धता पायाभूत सुविधांच्या सक्षमीकरणासाठी वापरली जाईल. हे पाऊल त्यामध्ये टाकलेले आहे. खाजगी कृषी महाविद्यालयांकरिता सुध्दा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी परवानगी देण्याचे या वर्षापासून सुरु करणार आहोत. फक्त विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु होणार नसून ज्या महाविद्यालयांना किमान 5 वर्षे पूर्ण झालेली आहेत अशा महाविद्यालयांना ॲक्रिडेशन करण्याची आपण सक्ती करीत आहोत. नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडेशनच्या माध्यमातून

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे पाटील.....

ॲक्रिडेशन करावयाचे झाले की आपोआप पायाभूत सुविधा निर्माण कराव्या लागतील. ॲक्रिडेशन झालेल्या संस्थांमध्ये पोस्ट ग्रॅज्युएशन सुरु करण्याची परवानगी देत आहोत. त्यामुळे दर्जा टिकून राहील. हा एक नवीन निर्णय केला आहे.

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये 225 शेती शाळा होत्या. दोन वर्षाचा डिप्लोमा द्यायचे काम त्यांच्याकडून केले जात होते. काळानुरुप ते बदलायला तयार नव्हते. सध्या कृषी क्षेत्रात यांत्रिकीकरणाचा वापर सुरु झालेला आहे. सर्वच स्तरावर कृषी विषयासंबंधी तांत्रिक ज्ञान वाढविले पाहिजे ही भूमिका होती. म्हणून दोन वर्षापूर्वी सगळ्या शेती शाळांचे कृषी तंत्र निकेतनामध्ये रुपांतर केले आहे. 2 वर्षाऐवजी 3 वर्षाचा डिप्लोमा होईल. सर्व संस्थांना दोन वर्षाचा ग्रेस पिरिएड दिला आहे. पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यामध्ये आपले राज्य पहिले ठरेल, ज्या राज्यामध्ये 225 शेती शाळांचे कृषी तंत्र निकेतनामध्ये रुपांतर केले आहे. महाराष्ट्राने मोठी झेप घेतली आहे. या संस्था विनाअनुदान तत्वावर राहणार आहेत. त्यामुळे शेती शाळांचे अपग्रेडेशन होऊन नवीन तंत्रज्ञान विकसित करण्यात येईल. नव्याने शेतीबद्दलच्या तंत्रज्ञानाची माहिती विद्यार्थ्यांना मिळेल. जी मुले पॉलिटेक्नीक मधून फस्ट क्लासने पास होतील ते डिग्रीसाठी दुसऱ्या वर्षात ॲडमिशन मिळण्यास पात्र ठरतील. त्यामुळे कृषी तंत्र निकेतनला संधी मिळेल.

सभापती महोदय, आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स कॉलेजमध्ये एमसीव्हीसी कोर्स सुरु आहे. त्या कोर्सच्या मुलांना सुध्दा डायरेक्ट सेकंड इयरच्या ॲडमिशनला क्वॉलिफाय केले आहे. त्यामुळे कृषी तंत्र निकेतने सक्षम होतील. ज्या कृषी महाविद्यालयातील जागा गेल्या वर्षापर्यंत रिक्त रहायच्या त्या ठिकाणी या वर्षी 11 हजार जागा भरुन 22 हजार विद्यार्थ्यांची प्रतीक्षा यादी होती. हे पहिल्यांदा घडले आहे. कृषी विषयक अभ्यासक्रमामध्ये वाढणारी आपुलकी आणि आस्था याचे ते उदाहरण म्हटले पाहिजे. ज्यामध्ये एवढे मोठे परिवर्तन आपण आणत आहोत.

नंतर 5व्ही.1...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

सभापती महोदय, हे विधेयक आणण्यामागे शासनाची भूमिका अशी होती की, निवड मंडळामध्ये पारदर्शकता यावी. विद्यापीठांमध्ये प्रादेशिक पद्धतीने भरती होत होती. त्याला आता बगल देऊन ही प्रक्रिया चारही विद्यापीठांची मिळून होईल. त्यामुळे राहुरी विद्यापीठातील प्राध्यापक राहुरी येथेच राहील असे नाही. तो अकोला, परभणी येथे जाऊ शकेल. काल पर्यंत विद्यापीठांतर्गत मक्तेदारी निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. त्याचा परिणाम संशोधनावर झाला. शिक्षण व्यवस्थेवर परिणाम झाला. त्यामुळेच आपण हा मोठा बदल करीत आहोत. हे आपण प्राध्यापक वर्गासाठी मर्यादित करीत नाही. राज्य सरकार अजून एक पाऊल पुढे टाकत आहे. GRSR च्या रिक्रूटमेंट सुद्धा या बोर्डाच्या माध्यमातून भरण्याची प्रक्रिया सुरू केलेली आहे. अनेक वेळा वर्तमानपत्रातून तक्रारी यायच्या की, भरती प्रक्रियेमध्ये घोटाळा झाला. ते प्रकार आता थांबतील. त्यातून ही सर्व प्रक्रिया पूर्ण होईल.

येथे कोकण कृषि विद्यापीठासंबंधी भावना व्यक्त करण्यात आली आहे. आता काजू-मँगो बोर्डाची स्थापना झाल्यामुळे संशोधनाला गती येईल. वैभववाडी येथे स्वतंत्र ऊस संशोधन सुरू करण्यासाठी कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात येतील. त्यामुळे कोकणात ऊस वाढीच्या कामाला देखील सुरूवात होईल. वेंगुर्ला येथील काजू संशोधन केंद्राचे बळकटीकरण करण्यासाठी गेल्या वर्षी आपण पाच कोटी रूपये दिले आहेत. त्यात मूलभूत काम झाले आहे. त्याचे गेल्याच महिन्यात उद्घाटन झाले. संशोधनाला गती देण्यासंबंधी आपल्याला पावले उचलावी लागतील. मला सभागृहाला सांगावेसे वाटते की, माननीय मुख्यमंत्र्यांनी चारही कृषि विद्यापीठातील गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी, संशोधन बघण्यासाठी पाठविण्या बाबतच्या सूचना केल्या आहेत. त्यामुळे आपल्या राज्यातील चारही कृषि विद्यापीठातील मुलांना एक्सपोजर मिळेल. आमचा पुढे जाऊन असा प्रयत्न आहे की, विद्यापीठाने शिष्यवृत्ती योजना तयार करून पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी विद्यार्थ्यांना त्यांच्या चॉईस प्रमाणे परदेशी विद्यापीठांमध्ये पाठवायचे, एक्सचेंज प्रोग्रॅम करावा असा आमचा प्रयत्न असून त्यादृष्टीने एक पाऊल पुढे टाकत आहोत. त्यामुळे परदेशामध्ये जाऊन तेथील संशोधन आपल्या येथील विद्यार्थ्यांना पाहता येईल. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील...

आपण उपाध्यक्षाच्या निवडीबद्दल उल्लेख केला आहे. त्यासाठी पूर्ण कालावधी नव्हता. आता आपण तीन वर्षाचा कालावधी सीमित केला आहे. त्यामुळे आता त्याला कालावधीची मर्यादा राहणार आहे. या समितीवरील अध्यक्ष हा तज्ज्ञ असणार आहे. यावर आपण नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ.वाय.सी.थोरात यांना रिक्रूटमेंट बोर्डाचे अध्यक्ष नेमण्याचा निर्णय घेतलेला आहे. ते रिझर्व्ह बँकेत डेप्युटी डायरेक्टर या पदावर राहिले होते. ते इकॉनॉमिस्ट आहेत. त्यामुळे त्यांची निवड समितीचे अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. आम्ही मुद्दामहून विद्यापीठा बाहेरील माणूस घेण्याचा प्रयत्न केला आहे. माजी कुलगुरू किंवा विद्यापीठातील तज्ज्ञ घेण्या पेक्षा बाहेरील माणूस घेतला आहे. त्यामुळे रिक्रूटमेंट मध्ये अडचणी येणार नाहीत अशी आमची भावना आहे. परभणी विद्यापीठामध्ये स्वतंत्र पदव्युत्तर संस्था स्थापन करण्यासंबंधीची सूचना करण्यात आली आहे. निश्चितपणे ती सूचना तपासून पाहण्यात येईल. आता आपण गोळेगाव येथे कृषि महाविद्यालय सुरू केले आहे. आता शासनाने प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक शासकीय महाविद्यालय देण्याचे ठरविले आहेत. या वर्षी 5 कृषि महाविद्यालये सुरू करण्याची सूचना आहे. यवतमाळ आणि कराड येथे ते सुरू करण्यात आले आहे. आता आपल्या राज्यामध्ये पाच वर्षामध्ये प्रत्येक जिल्ह्यामध्ये एक शासकीय कृषि महाविद्यालय स्थापन होताना दिसेल. ते नांदेडला करायचे की किनवटला करायचे या संबंधीचा प्रस्ताव तपासून पाहण्यात येईल. हा राज्य सरकारच्या दृष्टीने प्रतिष्ठेचा प्रश्न नाही. विद्यापीठाच्या एकूण कार्यपद्धतीमध्ये मूलभूत बदल घडवून आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. येथे गुणवत्तेचा सर्वंकष निकष लागणार आहे. त्यासंबंधी सकारात्मक पाऊल उचललेले आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ....

या विधेयकाच्या निमित्ताने शासनाने सकारात्मक पाऊल उचलले असल्यामुळे आपण तसेच सन्माननीय सदस्य श्री. सावंत साहेबांनी पाठिंबा दिल्याबद्दल मी आभार व्यक्त करतो व सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे अशी विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आता कृषी विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांचा मोठया प्रमाणात ओघ वाढतो आहे. श्री. नाना पाटील कृषी विभागाचे सचिव होते त्यावेळेस मी त्यांना सांगितले होते की, 11 वी व 12 वी मध्ये कृषीचा विषय घेतला तर कृषी विद्यापीठामध्ये किती विद्यार्थी येतील याची अगोदरच आपल्याला माहिती मिळेल. तसेच त्यांनी हा विषय घेतला असल्यामुळे कृषी विद्यापीठामध्ये त्यांना सहज प्रवेश मिळेल. परंतु यासंदर्भात पाटील साहेब खास उत्सूक दिसले नाहीत. कृषी विद्यापीठाचा अभ्यासक्रम घेऊन पुढे जाणारे ग्रामीण भागातील विद्यार्थी असतील तर त्यांना याचा फायदा होईल. ॲग्रीकल्चरच्या विद्यार्थ्यांना आता बँकेकडून मोठया प्रमाणात मागणी येत असल्यामुळे ॲग्रीकल्चरकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा ओघ वाढतो आहे. दुसरे मला एवढेच सांगावयाचे आहे की, आपण प्रत्येक जिल्हयामध्ये एक कृषी महाविद्यालय सुरु करणार आहात. आता आपण विना अनुदानित कृषी महाविद्यालय देत आहोत परतु या ठिकाणी शिक्षक वर्ग उपलब्ध होत नाही. यासंदर्भात मी अशी सूचना केली होती की, चारही कुलगुरुंच्या समोर विषय मांडा त्यामध्ये सहा महिन्याचा किंवा एक वर्षाचा डिप्लोमा कोर्स शिकवण्यासाठी शिक्षक तयार केले तर ते शिक्षक या कृषी महाविद्यालयामध्ये शिकवण्यासाठी ॲथोराईज होऊ शकतील. अशा प्रकारची संकल्पना मांडून चारही विद्यापीठांना शिक्षक उपलब्ध करुन दिले तर महाराष्ट्रातील जास्तीत जास्त मुले शिक्षक होतील. या ठिकाणी पगार सुध्दा खूप चांगले असतात व या विद्यार्थ्यांना निश्चित स्वरुपात नोकरी मिळेल. आता शिकवायला शिक्षक मिळत नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. आता एक शिक्षक दोन तीन फॅकल्टीच्या विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे कृषी महाविद्यायासाठी शिक्षक निर्माण करण्याच्या संदर्भात विचार केला तर फार बरे होईल.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी ज्या सूचना केल्या त्या योग्य आहेत. शालेय अभ्यासक्रमात कृषी विषयक अभ्यास घ्यावा यासंदर्भात मी माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांशी चर्चा करीत आहे. दहावी बारावी च्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील....

अभ्यासक्रमाध्ये जसा डेअरी सायन्स हा ऑप्शनल सब्जेक्ट असतो त्या प्रमाणे ॲग्रीकल्चर हा ऑप्शनल सब्जेक्ट घेता येईल काय याबाबत शिक्षण विभागाशी चर्चा करावी लागेल. मी शालेय शिक्षण मंत्री असतांना ॲग्रीकल्चर टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट (एटीएम) असा अभ्यासक्रम आणण्याचा माझा प्रयत्न होता. आठवी पासून विद्यार्थ्यांना ॲग्रीकल्चरची थोडीशी तरी माहिती होईल व त्याचे कृषीच्या संदर्भात आकर्षण तयार होईल असा त्या मागचा उद्देश होता. आता कृषी शाळा राहिलेल्या नाहीत त्यांचे रुपांतर झालेले आहे. सातवी,आठवी,नववी, दहावी, अकरावी व बारावीला कृषीचा विषय ऑप्शनल म्हणून करता येईल काय याचा सध्या विचार सुरु आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्राध्यापकांच्या स्तरावरील मुद्दा उपस्थित केलेला आहे. आता फॅकल्टी मिळणे अवघड आहे. परंतु यासंदर्भातील आपले प्रयत्न सुरु आहेत. प्रायव्हेट सेक्टरमध्ये ॲग्रीकल्चर ग्रज्यूएटला मिळणाऱ्या जॉबचे प्रमाण चांगले आहे. परंतु आपण सूचना केली आहे की, अधिक ओरिएंटेशन कोर्सेस करुन शिक्षकांची गुणवत्ता वाढवू शकलो तर महाविद्यालयाची अडचण आपोआप सोडविता येईल. कोकमच्या संदर्भात विद्यापीठांना सूचना देण्यात येतील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती :विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 11 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन 2013 चे वि.स.वि. क्रमांक 37संमत करण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2013 चे वि.स.वि. क्रमांक 37 संमत झाले आहे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या)ऊस दराचे विनियमन विधेयक

L.A. BILL NO. XLII OF 2013

(A BILL TO REGULATE THE PRICE OF SUGARCANE SUPPLIED TO SUGAR FACTORIES IN THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.हर्षवर्धन पाटील (सहकार मंत्री): सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 42, महाराष्ट्र राज्यातील साखर कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या ऊसाच्या दराचे विनियमन करण्याकरिता विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 42 - महाराष्ट्र राज्यातील साखर कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या ऊसाच्या दराचे विनियमन करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, हे विधेयक अतिशय महत्वाचे आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या संदर्भातील हे विधेयक आहे. हे विधेयक आणताना काही साखर कारखानदारांची अडचण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शेतकऱ्यांना न्याय देण्याकरिता हे विधेयक आणलले आहे. वारंवार ऊस भावाच्या संदर्भात जी आंदोलने होतात आणि त्यातून शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे म्हणून खूप विचार करुन त्या संदर्भातील हे विधेयक आणलेले आहे.

सभापती महोदय, आपण विधेयकात सर्व बाबी नमूद केलेल्या आहेत. याची उद्दिष्टे देखील विधेयकात दिलेली आहेत. थोडक्यात सांगायचे झाले तर आपण एक बोर्ड स्थापन करीत आहोत. या बोर्डाचे अध्यक्ष राज्याचे मुख्य सचिव असतील, वित्त विभाग, कृषी विभाग आणि सहकार विभागाचे प्रधान सचिव या बोर्डाचे सदस्य असतील. शासन नियुक्त करील असे पाच कारखान्यांचे प्रतिनिधी, शासन नियुक्त करील अशा पाच शेतकरी किंवा शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्ती असतील आणि साखर आयुक्त त्याचे मेंबर सेक्रेटरी असतील अशा पध्दतीचे एक बोर्ड आपण स्थापन करीत आहोत. साधारणत 70 आणि 75 टक्के असा रेव्हेन्यू प्रॉफीट शेअरींग रेशिओ निश्चित केलेला आहे. कर्नाटक राज्याने अशा प्रकारचा बोर्ड केलेला आहे. महाराष्ट्र राज्य हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील....

देशातील ऊस पिकविणाऱ्या राज्यांपैकी सर्वात मोठे राज्य आहे. तेव्हा ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्याला दराबाबत कायम स्वरुपी शाश्वती मिळावी म्हणून हे विधेयक आणलेले आहे. सभागृहाने या विधेयकाला मान्यता द्यावी अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक-42 वर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या सभागृहाच्या माध्यमातून मी माननीय खासदार श्री.राजू शेट्टी आणि श्री.खोत यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. शेतकऱ्यांनी अंगावर लाठ्या आणि गोळ्या झेलल्यानंतर त्या संघर्षातून हे विधेयक या ठिकाणी आलेले आहे. त्यामुळे कोणीही या विधेयकाकडे कुत्सितपणे पाहता कामा नये.

महोदय, हे विधेयक या ठिकाणी येण्यामागील पार्श्वभूमी अतिशय गंभीर आहे. गेल्या वर्षी साखरेचा भाव 3300 रुपये होता. गेल्या 10-12 वर्षांपासून ऊस दरावरुन आंदोलन सुरु आहे. दरवर्षी आंदोलन केले जाते. त्यानंतर त्या आंदोलनाचा असा परिणाम झाला की, शेतकरी नेत्यांना काही काम नसल्यामुळे ते ऊस पीक आले की, आंदोलन करतात असे म्हटले जाऊ लागले. मध्यंतरी ही परिस्थिती असेल. ते मी नाकारत नाही. परंतु मी देखील गेल्या दोन-तीन वर्षांतील आंदोलनात स्वत: सहभागी होतो. शिवसेनेच्या वतीने त्यांच्या आंदोलनात सहभागी होण्याचा आमचा प्रयत्न असतो. शिवसेना पक्ष आणि माननीय श्री.राजू शेट्टी यांची या आंदोलनाबाबत वेगवेगळी चूल न मांडता, शेतकऱ्यांना हक्क मिळवून देण्याच्या भूमिकेतून आम्ही त्यांच्या बरोबर असतो. शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत एकमुखी बोलले गेले पाहिजे हा त्यामागील उद्देश होता. माननीय श्री.राजू शेट्टी यांनी बोलावे आणि त्यांच्यासोबत आम्ही असावे ही आमची भूमिका आहे. यामध्ये पाठिंब्याचा विषय नाही. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठीच आम्ही आंदोलनात होतो.

महोदय, गेल्या वर्षी साखरेला 3200-3300 रुपये भाव होता. शासनाने गेल्या वर्षी एफआरपी भावामध्ये वाढ केली. तद्नंतर माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी मध्यस्थी करुन या प्रश्नात लक्ष घातले. ऊस दरवाढीबाबत जो पायी मोर्चा निघाला होता त्या मध्ये मी सहभागी होतो. शिवाय शेतकरी संघटनेच्या नेत्यांबरोबर उपोषणाला सुध्दा बसलो होतो. बारामतीच्या रणभूमीवर कशा प्रकारे दंगल घडली हे आपणा सर्वांना माहीत आहे. माननीय श्री.राजू शेट्टी आणि श्री.खोत यांची बारामतीमध्ये विक्रमी सभा झाली. त्या नंतर सरकारने खऱ्या अर्थाने मध्यस्थी केली आणि सरकारकडून आंदोलनाला विरोध करण्याची कृती झाली नाही. त्या आंदोलनाच्या वेळी कोल्हापूर, सांगली, सातारा या भागातील शेतकरी रस्त्यावर उतरले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्यावेळी शेतकऱ्यांवर लाठीमार करण्यात आला, त्यांच्यावर गोळीबार सुध्दा करण्यात आला. मी देखील त्या वेळी उपस्थित होतो. त्या वेळी कधी नव्हे तो शेतकऱ्यांनी झाडे तोडून रस्ता बंद केला. त्या आंदोलनाची कोंडी सर्वप्रथम माननीय केंद्रीय राज्यमंत्री श्री.प्रतीक पाटील यांनी फोडली. त्यांच्या साखर कारखान्याने ऊसाला प्रती क्विंटल 2500 रुपये भाव दिला. त्यानंतर तो दर 2250 ठरविण्यात आला. पहिली उचल किती दिली किंवा नंतरची उचल दिली की नाही, हा वादाचा विषय आहे. परंतु हा दर जाहीर केल्यानंतर आंदोलन थांबले.

महोदय, या विधेयकाला या सर्व कारणांमुळेच फार महत्त्व आहे. साखरेच्या भावावर शेतकऱ्याच्या ऊसाला भाव देण्यात येणार आहे. या विषयी ज्यावेळी माननीय पंतप्रधानांकडे आपण भेटीसाठी गेलो त्यावेळी मी सर्वात शेवटी बोललो. मी त्यांना सांगितले की, ऊस उत्पादक आणि साखरेच्या दराचा संबंध काय आहे ? मी त्यांना सांगितले की, साखरेचा भाव सरकारच्या धोरणावरुन ठरतो. हा भाव साखरेच्या आयात-निर्यातीच्या संकल्पनेवरुन ठरतो. कच्ची साखर आयात झाल्यानंतर ती दोन वर्षे राहते आणि ती अतिरक्त झाल्यानंतर भाव ठरविला जातो. माननीय पंतप्रधानांनी जे सांगितले त्यामुळे या विधेयकाचे महत्त्व मला जास्त वाटते. त्यावेळी आपण सांगितले की, केंद्राने साखरेच्या आयातीवर थोडा कर वाढवावा. असे केल्यास बाहेरुन कमी साखर येईल. त्यावेळी माननीय पंतप्रधानांनी सांगितले की, "It is not possible. We are bound by international agreement." म्हणजेच आम्ही ते बंद करु शकत नाही. आपण सहा महिने साखरेची आयात थांबविण्याचे ठरविले. परंतु माननीय पंतप्रधानांनी सांगितले की, आंतरराष्ट्रीय करारानुसार आम्ही तसे करु शकत नाही.

नंतर श्री.कांबळे....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

इम्पोर्ट ड्यूटीच्या संदर्भातील विषय नंतर समितीपुढे सोपवितो, असे त्यांनी सांगितले होते. गेल्या वेळी 2650 रूपये भाव झाल्यामुळे कोणत्याही कारखान्याला 1650, 1700, 1800 च्या वर भाव देता येत नाही. साखरेच्या भावामुळे ऊस उत्पादकांनी का सोसायचे ? ऊस उत्पादक शेतकऱ्यांना निर्मितीचा भाव 2200, 2400 रूपये पडत असेल आणि त्याला 200-400 रूपये त्यावर मिळणार नसतील तर बँकेचे कर्ज, त्यावरील व्याज, मिळणारे वर्षाचे उत्पन्न याचे काय होणार ? आपणही कारखानदार आहात. सर्वच कारखानदार त्यावेळी होते. मला याची कल्पना आहे. मनातून पटत नाही पण साखरेवर अवलंबून असलेला भाव देणे या सापळ्यात अडकलेले हे सर्व गणित होते. या सर्व प्रकरणाचा हिशेब करून महिनाभर आंदोलन चालले. आंदोलन दुर्दैवाने 3 नेत्यांमध्ये झाले, राजू शेट्टी, खोत व रघुनाथ दादा. जोशी साहेबांचा आणखी एक गट होता. ते परवा आले होते. 3 शेतकरी आणि एकच शेतकरी संघटना, त्या शेतकऱ्यांकरिता लढत होते. शेतकऱ्यांची कोणाच्या बरोबरीने लढत आहोत, हे समजण्यापेक्षा माझ्या ऊसाकरिता लढत आहोत, ही भूमिका होती. थोडासा संयम पाळण्याचा प्रयत्न केला असता तर बरे झाले असते. परंतु, या सर्व गोष्टींमध्ये दुर्दैवाने तसे झाले नाही. साखर कारखान्यांच्या भावाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी सह्याद्रीवर बैठक घेतली, त्या बैठकीला आम्ही सर्वजण होतो. साखरेच्या भावावर ऊसाला भाव देणे, हे बंधन असेल तर सरकार कोणत्या हिशेबाने हे करीत आहे. पुन्हा त्यामध्ये कारखानदारांचा व उत्पादकांचा प्रश्न होता.

महोदय, त्या कारखान्यात सरकारचे भागभांडवल असल्यामुळे सरकारचा हस्तक्षेप असणे, ही आमची आग्रहाची भूमिका होती. सर्व कारखान्यांची परिस्थिती अशी आहे की, प्रत्येक कारखान्यांचा एक दर असू शकत नाही. को-जनरेशनचा प्रकल्प आहे. अनेक प्रकल्प आहेत, त्याच्या अंतर्गतही अनेक प्रकल्प आहेत. हे सर्व इथेनॉल काढत आहेत. प्रत्येक कारखान्याचे वेगवेगळे दर असा सर्व गोंधळ असल्यामुळे पंतप्रधान महोदयांच्या समवेत बैठक घेऊन केंद्र शासनापर्यंत हा प्रश्न नेऊ या. हा प्रश्न त्यांनी तेथे नेण्याचा प्रयत्न केला. आपल्याकडे साखरेच्या उत्पादनाच्या संदर्भात रोष होता. मागे उत्तर प्रदेशामध्ये स्वत:हून सरकारी धोरण जाहीर केले

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

होते. साखरेच्या भावाचा प्रश्न आल्यानंतर पुन्हा सरकारने 2500 रूपये दर जाहीर केला आणि नंतर तो कमी केल्यामुळे तिकडचे शेतकरी संतापले. तेथे सहकार क्षेत्र कमी आहे. कमी म्हणजे नाममात्र आहे. मी त्या संदर्भातील अनेक प्रश्न सह्याद्रीवर देखील मांडले होते. सदर बैठकीत माननीय मंत्री देखील होते. काही कारखाने को-जनरेशन करतात. मंत्रिमंडळाने को-जनरेशनच्या संदर्भात धोरण ठरविले. सुरूवातीला साखर कारखान्यांना हे धोरण होते, पण आता त्यात खाजगी कारखाने देखील घेतले आहेत. ते कारखाने इतक्या हुशारीने घेतले आहेत की, सरकारने को-जनरेशनला सबसिडी देण्याचे ठरले. सबसिडी मिळत आहे, पण ती फक्त सहकारी कारखान्यांना होती. प्रत्येक कारखान्याला 1 मे.वॅ.करिता 5 कोटी रूपये आणि 2 मे.वॅ.ला 10 कोटी रूपये सबसिडी आहे. आमचे दादा मोठ्या प्रमाणात खाजगी कारखान्यांचे नेतृत्व करतात. त्यामुळे त्यांनी सांगितले आणि मंत्रिमंडळाने निर्णय घेऊन खाजगी कारखाने देखील त्यामध्ये टाकले. अर्थात हा वीज निर्मितीचा प्रश्न आहे. सबसिडी त्यांना मिळण्यास हरकत नाही. साताऱ्याला तुमचे पंखे लागले आहेत. शासनाने बजाज कंपनीला 700 कोटी रूपयांची सबसिडी दिली. पंखे फिरत आहेत त्याचे विजेचे बिल त्याला मिळत आहे, उत्पन्न मिळत आहे, एन्रॉलमेंटसाठी अधिक सबसिडी 700 कोटी रूपये दिली. मी त्याचा हिशेब मांडला तेव्हा असे समजले की, 70 कारखान्यांनी 15 मे.वॅ. वीज निर्माण केली तर 1050 कोटी रूपयांची सबसिडी देणार असू तर एकूण 5250 कोटी रूपये सबसिडी होते. 70 कारखाने आहेत. आपल्या ऊस उत्पादकांना आता अडचणी आहेत. मला याच सभागृहात उभे राहून माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले होते की, कापूस, सोयाबीन याकरिता म्हणत असाल तर मी असे सांगतो की, साखर उद्योगाकडून सरकारला 4 हजार कोटी रूपये वर्षाला उत्पन्न मिळते. तो उद्योग आम्हाला पैसे मिळवून देतो. सोयाबीन, कापूस उत्पादकांकडून तिजोरीत पैसे येत नाहीत. आम्ही त्यावेळी साखर कारखान्यांच्या संदर्भात शंख करीत होतो. मी त्यांना या संदर्भात आठवण करून दिली की, माननीय मुख्यमंत्री महोदय, आपण काही दिवसांपूर्वी असे सांगितले होते की, त्यावेळी साखर उद्योगाकडून 4 हजार कोटी रूपये येत होते, आता 6 हजार कोटी रूपये येत आहेत. सरकारला एवढे उत्पन्न मिळत असेल तर ऊस उत्पादक शेतकरी

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

अडचणीत असताना, साखरेचे भाव कोसळत असताना आपण त्यांच्या संदर्भात 400-500 कोटी रूपयांचे पॅकेज जाहीर करावे. 500 कौटी रूपयांतील काही रक्कम प्रत्येक शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा करावी, जेणेकरून हा तिढा सुटून जाईल.

(नंतर श्री. खंदारे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आंदोलन भडकलेले होते. पोलिसांनी त्यावेळी दाखल केलेले गुन्हे दुर्दैवी आहेत. या आरोपींबरोबर श्री.सदाभाऊ खोत, श्री.राजू शेट्टी, श्री.शंकर शिंदे हे तिन्ही नेते त्या आंदोलनात होते. शेतकरी ऊसाच्या भावासाठी लढत होता. परंतु त्यावेळी पोलिसांनी शेतकऱ्यांना निर्घृणपणे मारले होते, त्याचे फोटी मी आपल्याला दाखवितो. ते लांबून कोणालाही दिसतील. मागील वेळी जो गोळीबार झाला होता, त्यावेळी एक शेतकरी 23 वर्षाचा विवाहित मुलगा मरण पावला होता. त्याच्या अंत्ययात्रेला मी स्वत: उपस्थित होतो. त्या शेतकऱ्याला एक मूल आहे. त्यावेळी मी स्मशानभूमीत गेलो होतो. हा राजकीय प्रश्न नव्हता तर जाणिवांचा प्रश्न होता. शेतकऱ्यांचे हे दुसरे आंदोलन होते. त्यावेळी पोलिसांनी शेतकऱ्यांना अमानुषपणे बदडून काढले होते. आंदोलनाच्या वेळी शेतकरी मोर्चा काढतात, लाठीचार्ज होतो, त्यावेळी शासन मार्ग काढू शकत नाही.

सभापती महोदय, माननीय पंतप्रधानांनी आदरणीय श्री.शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली एक समिती गठित केलेली आहे. श्री.शरद पवार साहेब त्या दिवशी मेघालयात गेल्यामुळे ते बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत. त्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिनिर्वाण दिनाच्या दिवशी म्हणजे दि.6 डिसेंबर रोजी बैठक झाली आहे. त्यांनी जे काही निर्णय घेतले आहेत त्याचे राज्याला लाभ व्हावयाचे आहेत. त्या निर्णयांची माहिती आम्हाला जाणून घ्यावयाची आहे. महाराष्ट्रातून जे शिष्टमंडळ गेले होते त्यामध्ये माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे होते. त्यांनी केलेल्या सूचनांचा तेथे आदर करण्यात आला. मी त्यावेळी आदरणीय पंतप्रधानांना विनंती केली होती की, केंद्र सरकारने शेतकऱ्यांना सबसिडी द्यावी. त्यांनी "It is not possible." असे सरळ उत्तर दिले. आपण तेथे वादविवाद करण्यासाठी गेलो नव्हतो. आपण आपली कैफियत मांडली होती, त्यांनी ती ऐकली होती. उत्तर प्रदेशातील निवडणुका तोंडावर आहेत. त्यासाठी तो महत्वाचा टप्पा आहे. तेथील शेतकऱ्यांना दुखवून चालणार नाही त्यामुळे सबसिडी निश्चित दिली जाईल याची मला खात्री होती. म्हणून मी सबसिडीचा हट्ट धरला होता. आपल्यापेक्षा उत्तर प्रदेशमधील कोंडी मोठी होती. माननीय श्री.शरद पवार यांच्या समितीने 7200 कोटी रुपये देशातील साखर कारखान्यांना बिनव्याजी देण्याचे ठरविले. या निधीसाठी 12 टक्के व्याज आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

त्यापैकी अखिल भारतीय साखर संघाने 7 टक्के व्याज व केंद्र सरकारने 5 टक्के व्याज अंगावर घ्यावयाचे होते. 5 वर्षामध्ये 7200 कोटी रुपये बिनव्याजी वापरुन फेडावयाचे आहेत. त्याचा हिशोब केला तर राज्यामध्ये 5 वर्षामध्ये 7200 कोटी रुपयांपैकी 2500 कोटी रुपये नक्की येणार आहेत. कारण सर्वात जास्त उद्योग आपल्याकडे आहेत. या 2500 कोटी रुपयांचा 5 टक्केचा बोजा घेतला तर 500 ते 700 कोटी रुपये होतात. जेवढी जर सबसिडी दिली असती तर हा बोजा कारखान्यांवर आला नसता. आता हे व्याज सरकारला हळूहळू भरावे लागणार आहे. या उद्योगाकडून सरकारला वर्षाला 5 हजार, 6 हजार कोटी रुपये मिळतात. ज्यावेळी आम्ही विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी लढत होतो त्यावेळी ही सुपातील माणसे आमच्याकडे आनंदाने हसत होती. ते कुत्सिततेने हसत होते असे मी म्हणणार नाही. पण ते सर्व ऊस उत्पादक शेतकरी होते. त्यांच्या तुलनेने धनाढ्य होते. त्यांच्या ऊस उत्पादनामुळे धनाढ्य नव्हते. पण सुपातले ज्यावेळी जात्यात आले, ते मी अनुभवले, मी त्यांच्या सोबतही जात्यात भरडण्यासाठी उभा राहिलो. तेथील शेतीची अर्थव्यवस्था मी पाहत होतो.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

दुर्दैव असे असते की, शेतकरी कोणताही असू दे, आपापल्या उत्पादनाशी प्रामाणिक राहून, माझ्या श्रमाला पैसे मिळाले पाहिजे असे जेव्हा तो सांगतो त्यावेळी तो रस्त्यावर येऊन गोळी खायला देखील तयार असतो. मग तो पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी असो, विदर्भातील शेतकरी असो किंवा मराठवाड्यातील शेतकरी असो. शेतकरी हा त्याच्या उत्पादनाप्रमाणे सन्मानीत झाला पाहिजे असे शेतीचे धोरण स्वीकारले तर भविष्यामध्ये असे घडणार नाही. मला अत्यंत दु:ख होते की या महाराष्ट्रामध्ये कापसाची खरेदी व्हावी यासाठी कापूस पणन महामंडळ स्थापन केले होते. हे पणन महामंडळ आपण मोडीत काढले ? ऊस उत्पादक रस्त्यावर आल्यानंतर तुमच्या भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला. पश्चिम महाराष्ट्रामध्ये यापुढे काँग्रेस आणि राष्ट्रवादी साफ होईल. तुम्ही औषधाला देखील उरणार नाही अशी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर ऊस उत्पादकांचे भाव ठरविण्याकरिता हे विधेयक आणलेले आहे. मी या विधेयकाचे स्वागत करतो.

मराठवाडा आणि विदर्भातील वंचित शेतक-याकरिता स्थापन केलेले कापूस पणन महामंडळ तुम्ही मोडित काढले. या ठिकाणी पश्चिम महाराष्ट्राचे सरकार असते. सगळी भिस्त पश्चिम महाराष्ट्राच्या शेतक-यावर असल्यामुळे आपले या राज्यामध्ये काय होणार अशी भीती वाटल्यानंतर स्वामीनाथन समितीच्या शिफारशी अमलात आणायला लागलात. परंतु या शिफारशी अमलात आणण्यासाठी शेतकरी संघटना गेली 5 वर्षे ओरडत आहे. कालच्या आंदोलनातील भयानकता तुम्हाला दिसल्यामुळे तुम्ही हे बिल आणत आहात. हे बील स्वागतार्ह आहे. माकडीणीच्या जेव्हा नाका-तोंडाजवळ पाणी येते त्यावेळी स्वत:चा जीव वाचविण्यासाठी डोक्यावर घेतलेल्या पिलाला आपल्या पायाखाली घेते. तशा प्रकारे वेळ आल्यानंतर स्वत:ला वाचविण्यासाठी विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतक-याला तुम्ही पायाखाली घालता, कारण तिकडचे लोक तुम्हाला निवडून देतात. काही झाले तरी विदर्भ आणि मराठवाडयामध्ये आम्ही निवडून येऊ, विदर्भ हा काँग्रेसचा आहे असे गृहीत धरुन चालता. पश्चिम महाराष्ट्रामध्ये अशी परिस्थिती झाली तर काय करायचे या भीतीतून आपण हे विधेयक आणलेले आहे. स्वामीनाथन समितीच्या शिफारशी अमलात आणण्यासाठी शेतकरी संघटना गेल्या पाच वर्षापासून मागणी करीत आहे. पण त्याकडे तुम्ही ढुंकून देखील पाहिले नाही. आज तुम्ही त्यांच्याकडे पहात आहात. आमच्या शेतक-यांनी काठया खाल्ल्या,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

लाठया खाल्ल्या. आम्ही त्यांच्या बरोबर होतो. माझ्याकडे कारखान्याच्या खरेदी-विक्रीची माहिती आहे. परंतु तो विषय सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील मांडणार असल्यामुळे मी त्यावर बोलणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील हे सरकारच्या भ्रष्टाचाराविरुध्द प्रथमच बोलायला उभे राहाणार असल्यामुळे ते आदरणीय झालेले आहेत. मी या ठिकाणी भ्रष्टाचार मांडून काय निर्माण करणार आहे ? हा भ्रष्टाचार सर्वांना माहीत आहे. यामुळे शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळणार आहे काय ? मी माननीय मुख्यमंत्री महोदयांचे आणि माननीय सहकार मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांचे जाहीर अभिनंदन करतो. साखर कारखान्यांच्या खरेदी-विक्रीमध्ये या महाराष्ट्रामध्ये उत्पात मांडला होता. कोणत्याही कारखान्यामध्ये बेशिस्त निर्माण करायची, कारखाना मोडीत येईल अशी परिस्थिती जाणीवपूर्वक निर्माण करायची आणि पडेल त्या किमतीला कारखाना खरेदी करायचा, 100 कोटी रुपयाचा कारखाना 25 कोटी रुपयामध्ये खरेदी करुन मोकळे व्हायचे असे प्रकार राज्यात सुरु झाले. हा कारखाना यांच्या हातामध्ये आला की मग तो चांगला चालायला लागतो. सहकारी संस्थेकडे असताना तो चालत नाही. पण त्याची खरेदी झाली की तो लगेच चालायला लागतो.

सभापती महोदय, नर्मदा सरोवराच्या लढवय्या मेधाताई पाटकर यांनी खूप अभ्यास करुन हा विषय लोकांसमोर मांडला. पण त्या विषयी कोणी बोलत नाही. सभागृहाच्या पटलावर तो विषय कोणी आणायचा ? मी त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला पण मला प्रतिसाद मिळाला नाही.

..नंतर श्री. खंदारे...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री.दिवाकर रावते...

तुम्हाला प्रतिसाद मिळाला याचा मला आनंद झाला. तुम्ही त्यांचा अभ्यास जनतेसमोर मांडा.

सभापती महोदय, आम्हाला वेदना होतात की, आमचा कापूस उत्पादक शेतकरी आज हमी भावासाठी तडफडतो आहे. तुम्ही शेतकऱ्याना काही अनुदान देता काय, कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या कापसाला 3 हजार रुपये भाव देता काय, सोयाबीन पिकास हजार,दीड हजार रुपये भाव वाढवून देता काय, या शेतकऱ्यांना जास्त पैसे मिळावेत यासाठी शासन म्हणून आपण काही प्रयत्न करता काय, या गोष्टींचा लाभ मिळावा म्हणून आम्ही शासनाकडे गयावया करीत आहोत. कापूस उत्पादकांचा रट्टा पाठीत बसणार आहे असे बघितल्यानंतर थांब बाबा, आम्हाला मारु नको, तुम्हाला आम्ही सांभाळतो. अशा प्रकारचे विधेयक आणले आहे. यापुढे राज्यात एकाही सहकारी साखर कारखान्याची विक्री होणार नाही असे माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केल्यामुळे मी त्यांचे अभिनंदन केले. मस्तवालपणा कसा येतो याचे मी उदाहरण या ठिकाणी देणार आहे.

सरकारने या बाबतीत धोरण जाहीर केले. धोरण जाहीर करताना सहकार मंत्री उपस्थित होते. परंतु एमएससी बँकेने शासनाचे यासंबंधीचे आदेश धुडकावून लावून दोन सहकारी कारखाने लिलावात काढले. तुमच्या सरकारला आम्ही जुमानत नाही. सहकारी बँका बुडत असताना सरकारच्या तिजोरीतून पैसे दिले जातात. नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेस शासनाने वाचविले, या सहकारी बँकेला लायसन्स कोठून मिळाले ? रिझर्व्ह बँकेने मान्यता न दिलेली ही बँक असून ती अनेक वर्षापासून चालविली जात आहे. ज्यावेळी या बँकेचा एनपीए खाली आला. त्यावेळी सरकारने आपल्या तिजोरीतून 50 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला. त्यानंतर त्या बँकेस लायसन्स मिळाले. ती बँक आमच्या सरकारकडे गुरकावून बघते, मस्तीत सांगते की, आम्ही साखर कारखान्यांचे लिलाव करणार आहोत. सरकारला कोण विचारते आहे. तुमची काय परिस्थिती आहे. या सगळया वेदना देणाऱ्या गोष्टी आहेत. प्रशासकीय यंत्रणा एकमेकांना आव्हान देते. या बँकेवर आता संचालक मंडळ नाही, त्या सहकारी बँकेवर प्रशासक नेमले आहेत. ते प्रशासक जेव्हा बदलतील आणि मंत्रालयात येतील त्यावेळी ते या ठिकाणी 'येस सर' बोलण्यास सुरुवात करतील. मुख्यमंत्री महोदय म्हणत आहेत की, यापुढे एकही सहकारी साखर कारखाना विकू दिला जाणार नाही. आम्हाला सांगणारे तुम्ही कोण आहात ? ते प्रशासक मंत्रालयात आल्यानंतर 'येस सर' म्हणतील. प्रशासकीय अधिकारी हे आयएएस असतात.या गोष्टी पाहिल्यानंतर आणि ऐकल्यानंतर

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

डोके भणभणते. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये उद्विग्न झालेले मंत्री अधिकारी आपली कामे ऐकत नाहीत असे सांगतात. या मंत्रालयाचे नाव बदलवावे आणि सचिवालय असे नाव देण्यात यावे. त्याचे कारण मंत्र्यांची कामे सचिव ऐकत नाही. मंत्री अशा प्रकारची वक्तव्ये करतात. गेल्या महिन्यातील ही गोष्ट आहे. माननीय मुख्यमंत्री हे मन शांत ठेवून आपले काम करीत असतात. त्यांना जे आव्हान दिले, त्यास त्यांनी उत्तर दिले. याच्यापुढे कोणत्याही सहकारी साखर कारखान्यांची विक्री होणार नाही असे बोलल्यानंतर बँकेचे पैसे बुडीत होऊ नये म्हणून बँकेच्या संचालक मंडळाने एक नवीन फॉर्म्युला निर्माण केला. इंदिरा महिला सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षा श्रीमती विजयामाला देसाई होत्या. मी सहकार मंत्री असताना सदर सहकारी साखर कारखान्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या दिल्या होत्या. महाराष्ट्रामध्ये संपूर्ण महिलांचा एकमेव सहकारी साखर कारखाना होता. महिलांचा हा कारखाना होता. तो सहकारी साखर कारखाना बुडावयास आला. रयत सहकारी साखर कारखाना, सातारा हा आमच्या श्री.विलासकाका उंडाळकर यांचा आहे. इंदिरा महिला सहकारी साखर कारखाना आणि रयत सहकारी साखर कारखाना यांच्याकडे संचित कर्ज, शासकीय भाग भांडवल, शासनाचे थकीत कर्जावरील शुल्क, इतर देणी प्रत्येकी 90 कोटी रुपये एवढी आहे. राज्य शासनाने हे दोन कारखाने 18 वर्षे लीजवर चालविण्यास दिले. तुम्ही 18 वर्ष कारखाना चालवावयाचा आणि कर्ज फेडावयाचे आणि 19 व्या वर्षी शेतकऱ्यांचा कारखाना पुन्हा शेतकऱ्यांना परत द्यावयाचा असा नवीन फॉर्म्युला तयार केला. विक्री नाही, पण कारखाना चालेल. शेतकऱ्यांचा कारखाना शेतकऱ्यांकडे राहील आणि कारखान्यावरील कर्जही फिटेल. जे सहकारी साखर कारखाने विकले गेले आहेत, बँकाची देणी 125 कोटी, कारखान्यांची विक्री करुन मिळालेले पैसे बँकेकडे गेले. शेतकऱ्यांच्या शेअरची रक्कम कोठे आहे, माहिती नाही. कामगारांचे पगाराचे पैसे कोठे आहेत ते माहिती नाही. साखर कारखान्यातील कर्मचाऱ्यांना पगार दिला जाईल, कारखान्यांवरील कर्ज फिटले जाईल, 18 वर्षानंतर शेतकऱ्यांचा कारखाना त्यांना परत मिळेल. सरकारने अशा प्रकारचे पहिले पाऊल टाकले ही अतिशय अभिनंदनीय बाब आहे. भविष्यात कोणताही सहकारी साखर कारखाना विकला जाणार नाही अशा प्रकारचे धोरण आणल्यानंतर का रे म्हणणाऱ्या अधिकाऱ्यांना जबाब देऊन टाकला. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी लक्षात ठेवावे की, सरकार हे सरकार असते, तुम्ही चार दिवसाचे अधिकारी का रे म्हणणारे असता.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

हा जबाब दिला त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. हे दोन कारखाने सुरु राहतील. आज मी शासनाला सांगतो. तुम्ही भावबंध राखता. आदरणीय प्रतीक पाटील यांनी पहिली कोंडी फोडली. कोल्हापूरचे खासदार मंडलिक यांनी नंतर कोंडी फोडली. 2650 रुपये भाव जाहीर केल्यामुळे सगळ्यांना यावर्षी 2500 रुपये भाव द्यायला तयार झाले. आंदोलन केल्यानंतर ही परिस्थिती निर्माण होते हे होऊ नये यासाठी सह्याद्री अतिथीगृहावर झालेल्या बैठकीत स्वामीनाथन समितीच्या अहवालाप्रमाणे शेतकऱ्यांना भाव देण्यासाठी समिती निश्चित करायची ठरले.

सभापती महोदय, हे विधेयक या ठिकाणी आले आहे. या विधेयकाचे मी स्वागत करतो. शेतकऱ्यांना न्याय देणारे हे विधेयक आहे. न्याय देऊ शकेल की नाही यावर ही चर्चा आहे. या विधेयकात पृष्ठ क्रमांक 2 वर एक अत्यंत सुंदर अशी तरतूद केलेली आहे. "राज्य शासनाच्या मर्जीस अधीन राहून, अशासकीय सदस्य, त्याच्या नामनिर्देशनाच्या दिनांकापासून तीन वर्षाच्या कालावधीसाठी पद धारण करील." वर म्हटले आहे की, "राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे राज्यातील कारखान्यांचे पाच प्रतिनिधी, यापैकी तीन प्रतिनिधी हे सहकारी साखर कारखान्यांचे असतील आणि दोन प्रतिनिधी हे राज्यातील इतर कारखान्यांचे असतील." म्हणजे खाजगी कारखान्यांचे असतील. पाच प्रतिनिधी आपलेच कोणते तरी बगलबच्चे असतात. ते कार्यकर्त्यांसाठी करावे लागते. त्याबद्दल माझी तक्रार नाही. या ठिकाणी मर्यादा घातली आहे त्याबद्दल मी तुमचे स्वागत करतो. पुढे असे म्हटले आहे की, "मंडळावर एकदा नामनिर्देशित झालेला सदस्य हा दुसऱ्यांदा पुनर्नामनिर्देशन केले जाण्यासाठी पात्र असणार नाही." म्हणजे त्याला पुन्हा या समितीवर येता येणार नाही. वर्षानुवर्षे आपल्या मर्जीतले बसवायचे. तेच चालवितात. मग आपण सांगू त्या बोलक्या बाहुल्या बसवायच्या. ते तुम्ही बंद केले त्याबद्दल तुमचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 3 वर असे म्हटले आहे की, "अशासकीय सदस्यास कोणत्याही वेळी, शासनाला उद्देशून, आपल्या स्वाक्षरीनिशी लिहिलेल्या अर्जाद्वारे आपल्या पदाचा राजीनामा देता येईल." आपल्या पदाचा राजीनामा देता येईल. परंतु त्याची सही त्यावर असली पाहिजे. मी राजीनामा पाठविला तरी सभापती तो स्वीकारणार नाहीत. कारण त्यांच्यासमोर उभे राहून मी स्वाक्षरीसह राजीनामा दिला पाहिजे अशी ही तरतूद आहे. पुढे स्वल्पविराम टाकून म्हटले

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आहे की, "परंतु, त्याचा राजीनामा स्वीकारला जाईपर्यंत तो आपल्या पदावर राहील." म्हणजे नवीन सदस्य नियुक्त करायला सरकार मोकळे आहे. मग ही पळवाट कशासाठी? मला मंडळावर रहायचे नाही त्यामुळे माझा राजीनामा स्वीकारा. चार लोकांनी राजीनामा दिला की त्या जागा तशाच मोकळ्या ठेवायच्या. कशासाठी हे केले? मला वेळेवर उपसूचना मांडता आली नाही. तुमचे सगळे धावपळीत असते. आम्ही वेठबिगार आहोत. तुमचे काम उरकायचे आहे. आम्ही उरकून घेतो. एका शब्दामध्ये "होय"चे बहुमत, "नाही"चे बहुमत सांगण्यात येते. या ठिकाणी कायदा येतो त्याची चिकित्सा होण्यासाठी हे विधिमंडळ आहे.

नंतर 6इ.1....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

दुर्दैवाने चिकित्सा व्हावी अशी सरकारची कधीच इच्छा नसते. आम्ही करतो म्हणून त्याचा रोष असतो. शेवटी आम्हाला आमचे कर्तव्य केले पाहिजे. यात असेही नमूद करण्यात आले आहे की, त्याचा राजीनामा स्वीकारला जाईपर्यंत तो आपल्या पदावर राहील. हे सर्व आक्षेपार्ह आहे. तेव्हा ही जी तरतूद आहे ती अयोग्य आहे.

यानंतरचा 7 हा सर्वात महत्त्वाचा आहे. तो पात्रते संबंधातील आहे. यात नमूद करण्यात आले आहे की, नामनिर्देशित केलेल्या अशासकीय सदस्य, खाली विनिर्दिष्ट केलेल्या अनर्हतांपैकी कोणतीही अनर्हता असल्यास शासनास त्याला त्याच्या पदावरून काढून टाकता येईल. यासंबंधी माझे म्हणणे असे आहे की, आपण नेमतानाच काळजी घेतली पाहिजे. आपण काढण्याची कसली व्यवस्था करीत आहात. पुढे असे म्हटले आहे की, असा सदस्य अमुक्त नादार असेल. आम्ही जेव्हा निवडणुकीचा अर्ज भरतो तेव्हा सर्व जाहीर करतो. तशी तरतूद आपण यात करावी. आपणला जर अर्ज स्वीकारायचा नसेल तर तो स्वीकारू नये. त्याला नेमल्यानंतर तो नादार आहे म्हणून काढून टाकण्यात येणार आहे. तो नादार आहे हे कधी कळणार आहे. यासाठी मी कोणता शब्द वापरू पुढचे तर आणखी भयानक आहे. त्यात उल्लेख आहे की, शासनाच्या मते... याचा काय अर्थ आहे. संभाजी नगर उच्च न्यायालयाच्या मते प्राप्त झालेल्या पुराव्या नुसार आमच्या मंत्रिमंडळातील एका मंत्र्यांने 3 कोटीचा भ्रष्टाचार केल्याचा पुरावा आहे. त्यांनी शासनाला आदेश दिले की, त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा व पुढची कार्यवाही करावी. शासनाच्या मते मंत्रिमंडळाने निर्णय घेतला की, आम्हाला कारवाई करावयाची नाही. तो दोषी असला तरी, लुटारू असला तरी.... सॉरी मला माफ करावे. खालच्या सभागृहात कोणाला तरी लुटारू म्हटल्यामुळे राग आला. मंत्रिमंडळाला हा अधिकार आहे की नाही हे मला माहीत नाही. कोणी तरी त्याला चॅलेंज केल्याशिवाय राहणार नाही.

माजी मुख्यमंत्री आदरणीय श्री.अशोक चव्हाण हे दोषी आहेत असे सीबीआयला वाटते. सीबीआय ही चौकशी यंत्रणा आहे. त्यामुळे ती यंत्रणा त्यांच्यावर आरोपपत्र ठेवील. न्यायालयामध्ये खटला चालेल. त्यात ते आपली बाजू मांडतील.. त्यात ते निर्दोष सुटतीलही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

पण यात आपला काय संबंध आहे ? श्री.अशोक चव्हाण यांनी सांगितले की, मी मुख्यमंत्री असताना पाप केले आहे. तेव्हा मला ते सर्व नियम लावण्यात यावे. आता ते सामान्य आमदार आहेत. त्यांनी सांगितले की, हे जे काय घडले आहे त्याला सीबीआय गुन्हा म्हणत आहे. ते मी मुख्यमंत्री असताना केले आहे. तेव्हा मुख्यमंत्र्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करायला सरकारची मान्यता लागते. गुन्हा नोंदविण्यासाठी सीबीआयने सरकारकडे परवानगी मागितली. सरकार दीड वर्ष गप्प बसले. शेवटी सीबीआय राज्यपालांकडे गेली. राज्यपालांनी सांगितले की, ते गुन्हेगार आहेत की नाही हे माहीत नसल्यामुळे आम्ही गुन्हा नोंदवायला परवानगी देत नाही. हे सुमोटो कोर्ट झाले. हे सर्व मी का सांगितले तर येथे 'शासनाच्या मते' असा उल्लेख असल्यामुळे. 'ज्यात नैतिक अध:पतन असेल' असे देखील नमूद केले आहे. यात नैतिक अध:पतनाची व्याख्या आपण दिलेली नाही. कायद्यामध्ये ही व्याख्या आम्ही कुठे शोधायची ? त्या संबंधातील माहिती सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब सांगतील. यात पुढे असेही नमूद केले आहे की, "अशा कोणत्याही अपराधाबद्दल त्याला सिद्धपराधी ठरविले असेल व कारावासाची शिक्षा दिली असेल."

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सुप्रीम कोर्टाने निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींबद्दल मत दिलेले आहे. माझे म्हणणे असे आहे की, ज्याच्यावर गुन्हा दाखल झाला असेल, तो दोषी आहे की, नाही ते न्यायालय ठरवील. जो दोषी आहे त्याची तुम्ही नेमणूकच करु नका. आपल्याकडे चांगली मंडळी भरपूर आहेत. ज्याच्यावर गुन्हा दाखल झाला असेल त्याला नेमायचेच कशाला ? तुम्हाला जर अशी व्यक्ती पाहिजे असेल व कोर्टातून तो निष्पाप ठरला असेल तर तुम्हाला 3 वर्षानंतर त्या व्यक्तीची नेमणूक करता येते. नैतिक पतन कसे ठरवायचे ? विधेयकाच्या (ग) मध्ये असे म्हटले आहे की, "तो विकल मनाचा असेल आणि सक्षम न्यायालयाने त्याला तसे घोषित केले असेल." अशी व्यक्ती असेल तर त्या व्यक्तीला नेमताच कशाला ? (घ) मध्ये असे म्हटले आहे की, "सदस्य म्हणून कार्य करण्यास नकार दिला असेल किंवा तो कार्य करण्यास असमर्थ झाला असेल." नकार देणाऱ्या व्यक्तीला घेताच कशाला ? कोणाला नेमायचे याचा अधिकार सरकारला आहे. या ठिकाणी "असमर्थ" असा शब्द वापरला आहे. त्यामुळे असमर्थ या शब्दाचा अर्थ काय ? या विधेयकामध्ये तुम्ही कोणाला असमर्थ समजणार आहत ? ज्यावेळेस एखाद्या व्यक्तीबद्दल हा व्यक्ती असा असेल तर त्याची व्याख्या देण्याची आवश्यकता आहे. असमर्थ असेल तर त्याचा तुम्ही राजीनामा घेणार आहात काय ? नियुक्तीच्या संदर्भात विद्रूप पध्दतीने नमूद केलेले आहे त्यामुळे हे विधेयक मागे घेतले पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, विधेयकाच्या पृष्ठ क्रमांक 3 मधील 9 मध्ये असे म्हटले आहे की, "गाळप हंगामास सुरुवात होण्यापूर्वी, गाळप हंगाम संपल्यानंतर आणि ऊस हंगामाच्या शेवटी अशा कमीतकमी तीन वेळा बैठकी होईल." ही समिती ऊस उत्पादकाला काय भाव द्यावयाचा ते ठरविणार आहे. त्या क्षेत्रात ऊस किती आहे, कारखान्याची गाळप क्षमता किती आहे,तयारी काय केलेली आहे, साधारणत: गाळप किती होईल, मागच्या 10 वर्षाचा उतारा बघून मागचे रेकॉर्ड बघून या वर्षी किती गाळप होईल याचा अंदाज काढून सर्वसाधारण भाव ठरवतील. कायमचा भाव लगेच ठरवणार नाही. ऊतारा किती आला, साखर किती आली,उत्पादन किती झाले हे पाहून त्या प्रमाणे भाव कमी किंवा जास्त केले जातात. परंतु या विषयावर सन्माननीय सदस्य श्री. विजय सावंत जास्त बोलू शकतील. कोठे को जनरेशन आहे, इथेनॉल आहे,आणखीन काय चालते हे सर्व त्यामध्ये आहे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रमेश शेंडगे)

श्री.दिवाकर रावते....

मळी कितीला विकली हे सर्व दिलेले आहे त्यामुळे मी त्यावर बोलत नाही.

सभापती महोदय, आपण बैठकीच्या संदर्भातील विषय तपासून घ्यावा मला त्याबद्दल काही बोलायचे नाही.

सभापती महोदय, खंड 4 मध्ये नमूद केलेले आहे की, "ऊस (नियंत्रण) आदेश, 1966 च्या तरतुदीन्वये, उत्पन्न विभागणीच्या आधारे, केंद्र सरकारने ठरविलेल्या रास्त व किफायतशीर दराव्यतिरिक्त (यात पुढे ज्याचा निर्देश, "रास्त व किफायतशीर दर (एआरपी)" असा करण्यात आला आहे) असेल असा शेतकऱ्यांना द्यावयाचा ऊसाचा दर ठरविणे.

परंतु, ऊसाचा दर निश्चित करताना, भुसा (बॅगस) मळी (मोलैसिस) व प्रेसमड या सारख्या उप उत्पादनांच्या मूल्यांसह साखरेच्या मूल्याच्या आधारे ऊसाचा दर निश्चित करण्याचे ठरविण्यात आले असेल तर ऊसाचा दर हा, अशा उप उत्पादनांसह, साखरेच्या, कारखाना मूल्याच्या (एक्स-मिल व्हॅल्यूच्या) सत्तर टक्के इतका असेल." 70:30 हा स्वामीनाथन समितीचा फॉर्म्युला आहे.

सभापती महादेय, या ठिकाणी वीज उत्पादनाचा विषय घेतलेला नाही. आपण एक मेगावॅट वीज उत्पादन करणाऱ्यांना पाच कोटी रुपयांची सबसिडी देणार आहोत. हा कारखान्याचा फायदा आपण यामध्ये धरला नाही. जी 30 टक्के रक्कम आहे त्यामध्ये कारखान्याचा खर्च आहे. हा नफ्या तोट्याचा विषय नाही. एकूण 70 कारखाने आहेत त्या कारखान्यांची यादी यामध्ये असली पाहिजे. अन्यथा समिती असे सांगेल की, कारखान्यांची यादी कायद्यामध्ये नाही त्यामुळे आम्ही त्याची मोजदाद करणार नाही. एक मेगावॅट वीज निर्मितीसाठी पाच कोटी रुपये, जर तीन मेगावॅट वीज निर्मिती केली तर पंधरा कोटी रुपये मिळणार आहेत. तेव्हा आपण याचा विचार करावा.

या तरतुदीमध्ये पुढे काय म्हटलेले आहे ते मी वाचून दाखवितो.

"परंतु आणखी असे की, उपरोक्त तीन उप उत्पादनांचे मूल्य लक्षात न घेता केवळ साखरेच्या मूल्याच्या आधारे ऊसाचा दर निश्चित करण्याचे ठरविण्यात आले असेल तर, ऊसाचा दर हा, साखरेच्या कारखाना मूल्याच्या (एक्स-मिल व्हॅल्यूच्या) पंच्चाहत्तर टक्के इतका असेल,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, खंड 5 मध्ये असे नमूद केलेले आहे की, कारखान्याच्या भोगवटादाराला ऊसाचा पुरवठा केल्यानंतर लगेच तो मिळाल्यापासून चौदा दिवसांच्या आत, रास्त व किफायतशीर दर (एआरपी) प्रमाणे, किमान दर देण्यास कारखाना जबाबदार असेल, आपण चांगल्या प्रकारची तरतूद केलेली असल्यामुळे मी या तरतुदीचे स्वागत करतो. आपण पहिली उचल चौदा दिवसात देण्याची हमी दिलेली आहे.

सभापती महोदय, खंड 6 हा अपराध आणि शास्तीसंबंधी आहे. त्यावर मी जास्त बोलत नाही . आपण येथे दंडाची रक्कम 25 हजार रुपये ठेवलेली आहे.

सभापती महोदय, या विधेयकाचे मी स्वागत करतो. परंतु मला ज्या तरतुदी अयोग्य वाटल्या त्या मी येथे मांडल्या आहेत. आपण त्यामध्ये बदल करावा अशी मी आपणास विनंती करतो. शेतकऱ्यांच्या इतक्या वर्षाच्या मागणीनंतर व श्री.राजू शेट्टी व श्री. खोत यांनी आजपर्यंत जो काही संघर्ष केला त्या संघर्षाचे हे फलित आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सुरुवातीला मी त्यांचे अभिनंदन केले. सरकारने हे विधेयक आणण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतली. सरकारने कोणाला श्रेय जाते याचा विचार केला नाही. उशिरा का होईना डॉ.रंगराजन समितीच्या शिफारशीनुसार हे विधेयक आणल्याबद्दल सर्व शेतकऱ्यांच्या, आंदोलकांच्या वतीने मी सरकारचे अभिनंदन करतो. तसेच या आंदोलनात ज्या आंदोलकांनी सर्वकाही सोसले आहे त्यांच्या प्रती मी सर्वांच्या वतीने सहानुभूती व्यक्त करतो. या निमित्ताने एवढीच विनंती करतो की, या आंदोलनामध्ये ज्या आंदोलकांवर गुन्हे दाखल झालेले आहेत ते त्वरित मागे घ्यावेत. ऊस आंदोलनातील नेते माननीय श्री.राजू शेट्टी व श्री.खोत यांना तडीपार करण्याबाबत राष्ट्रवादी युवक काँग्रेसने जी मागणी केली आहे तिचा मी निषेध करतो. राज्यामध्ये मोठे आंदोलन उभे करणाऱ्या नेत्यांना तडीपार करण्याची मागणी आमच्याकडे गृह खाते आहे, आमच्याकडे सत्ता आहे म्हणून कोणी करीत असेल तर ती अत्यंत निषेधार्ह बाब आहे. हे विधेयक आणून ऊस आंदोलन करणाऱ्या नेत्यांच्या मागणीचा सन्मान केला असेल तर ज्या शेतकऱ्यांवर या आंदोलनामुळे गुन्हे दाखल झाले आहेत ते ताबडतोब मागे घ्यावेत, अशी पुनश्च विनंती करतो.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले मनापासून आभार मानतो व येथेच थांबतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते ज्येष्ठ असून, त्यांनी या विधेयकावर अतिशय तळमळीने आणि पोटतिडकीने विचार मांडले आहेत. मी त्यांना विनंती करु इच्छितो की, त्यांनी माननीय राज्यपालांबाबत 'हे सगळं समजून चालते' अशा प्रकारचा जो आक्षेप घेतला आहे तो मागे घ्यावा व तो भाग सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावा.

श्री.दिवाकर रावते : ठीक आहे. 'हे सर्व समजून चालते' अशा प्रकारचा मी जो उल्लेख केलेला आहे तो काढून टाकण्यास माझी हरकत नाही.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या भाषणात उपरोक्त शब्दांचा उल्लेख झाला असेल तर तो कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्री.शरद रणपिसे : तसेच दुसरी बाब अशी की, कोणत्याही सन्माननीय सदस्यांवर वैयक्तिक आरोप करावयाचा झाल्यास नियमानुसार नोटीस द्यावी लागते अशी आपली प्रथा वा परंपरा आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी कोणतीही नोटीस न देता तत्कालीन मुख्यमंत्री व विद्यमान सन्माननीय सदस्य श्री.अशोक चव्हाण यांच्या बाबत वक्तव्य केलेले आहे. ज्यावेळी हा विषय येईल त्यावेळी आपण या विषयी बोलावे, असे मला वाटते.

श्री.दिवाकर रावते : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, एखाद्यावर आरोप करावयाचे झाल्यास नियमानुसार नोटीस द्यावी लागते. परंतु मी आरोप केलेले नाहीत.

श्री.शरद रणपिसे : महोदय, सन्माननीय सदस्य सुस्वभावी असून ते प्रत्येक विषय गंभीरतेने मांडतात. माझी विनंती आहे की, त्यांनी माननीय श्री.अशोक चव्हाण यांच्या बाबतीत जो उल्लेख केलेला आहे तो कामकाजातून काढून टाकावा. आपण माझी विनंती ऐकाल असे वाटते. शेवटी या बाबत तुम्हीच ठरवायचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2013 चे वि.स.वि. क्रमांक 42, महाराष्ट्र (कारखान्यांना पुरविण्यात आलेल्या) ऊस दराचे विनियमन विधेयक, या विधेयकाचे स्वागत करुन, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, मी या विधेयकावर बोलण्यासाठी जेव्हा हात वर केला तेव्हा माननीय सहकार मंत्री म्हणाले की, तुमचा आणि या विधेयकाचा काय संबंध आहे ? मी त्यांना सांगू इच्छितो की, माझे वडील हे ऊस उत्पादक शेतकरी नसले तरी ते जिराईत शेतकरी आहेत. आज वयाच्या 78 व्या वर्षी ते शेतात राबतात आणि मी त्या शेतकऱ्याचा मुलगा आहे. मी स्वत: नांगर चालविला नसला तरी मला शेतीची नक्की माहिती आहे.

महोदय, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी हे विधेयक आणले आहे. ज्यांनी या विधेयकावरील चर्चेला सुरुवात केली ते आदरणीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यानी आयोजित केलेल्या दिंडीत मी स्वत: त्यांना भेटायला गेलो होतो व त्या दिंडीत दिवसभर पायी चाललो होतो. शिवसेना पक्षाबरोबर माझे मतभेद आहेत. परंतु शेतकऱ्यांच्या प्रश्नांविषयी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी प्रामाणिकतेने आणि तळमळीने लढा दिलेला आहे.

महोदय, माननीय श्री.राजू शेट्टी आणि श्री.सदाभाऊ खोत यांच्या आंदोलनाने या सरकारला हे विधेयक आणण्यास भाग पाडले. माननीय श्री.राजू शेट्टी आणि त्यांचे जे आंदोलक होते त्यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या, त्यांच्यावर लाठ्या चालविण्यात आल्या, त्यांना नागवले गेले. हे सरकार आपल्या मस्तीमध्ये तथाकथित कारखाना चालविण्याची हिंमत दाखवित बसले. परंतु शेवटी त्या मंडळीपुढे सरकारला नमावे लागले. मी तर म्हणेन की, हे विधेयक म्हणजे त्या शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा विजय आहे. या विधेयकाचे स्वागत करीत असताना मी त्या आंदोलनाला सलाम करतो.

नंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

या विधेयकात अनेक चांगल्या बाबी आहेत. एफआरपी, रास्त आणि किफायतशीर दर देण्याच्या संदर्भात शरद जोशींच्या आंदोलनापासून सुरूवात झाली. महाराष्ट्रात सातत्याने अनेक वर्षे शरद जोशींनी आंदोलन सुरू केले. आता त्यालाही जवळपास 30 वर्षे होत आहेत. पिकाच्या भावाच्या संदर्भात केलेल्या मागणीप्रमाणे भावाच्या जवळ जाण्याचा प्रयत्न पहिल्यांदाच सरकारी विधेयकाच्या निमित्ताने होत आहे. शेतकऱ्याला शेतमालाचा भाव उत्पादन खर्चावर आधारित मिळाला पाहिजे ही मागणी आतापर्यंत आपण ठोकरत आलो. शेतकऱ्यांच्या नावाने राज्य करणारे राज्यकर्ते ती मागणी सतत ठोकरत होते. आता ती कोंडी पहिल्यांदा फुटत आहे. त्यामुळे विधेयकाचे स्वागत केले पाहिजे. या विधेयकात आणखी ज्या अतिशय महत्त्वाच्या तरतुदी आहेत, त्यामध्ये शेतकऱ्याला बँकेमार्फत कर्ज देणे आणि सदस्य नेमणे या तरतुदी आहेत. नेमण्यात येणारे सदस्य पुन्हा नामनिर्देश केले जाण्यासाठी पात्र असणार नाहीत, ही त्यातील अतिशय महत्वाची तरतूद आहे. मक्तेदारी होण्याची शक्यता तुम्ही टाळली आहे, त्याचेही मी स्वागत करतो. दोषींना 25 हजार रूपये इतक्या किरकोळ रकमेचा दंड सुचविला आहे. ही तरतूद विधेयकच्या हेतूला साजेशी आहे, असे मला वाटत नाही. त्यामध्ये दुरूस्ती झाली पाहिजे. ठीक आहे. ही सुरूवात आहे, म्हणून मी त्याचे स्वागत करतो. डॉ. रंगराजन समितीच्या शिफारशींचा स्वीकार हेही सर्वात महत्त्वाचे पाऊल या निमित्ताने सरकारने टाकले आहे. त्यामुळे यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांचे सुध्दा अभिनंदन केले पाहिजे.

सभापती महोदय, राज्यात सहकाराच्या माध्यमातून ऊस कारखानदारी फुलविली. ऊस कारखानदारी ज्यासाठी फुलविली, त्या हेतूला मात्र गेल्या काही वर्षांत काळिमा फासण्यात आला. सरकारकडून त्याचे उत्तर अजूनही मिळालेले नाही, हे मला खेदपूर्वक नमूद करावयाचे आहे. राज्यातील 40 कारखाने उभे करण्यासाठी शेतकऱ्यांनी काडी-काडी जमा केली होती, पोटाला चिमटा काढला होता, माळरानावर जेथे गवत उगवत नव्हते, तेथे वैभव फुलविले होते, सोने पिकविले होते. शेतकऱ्यांचे कारखाने जाणीवपूर्वक मोडीत काढायचे, बुडवायचे, असा प्रकार सुरू होता. स्वार्थी संचालकांनी घातलेल्या गोंधळामध्ये, घोटाळ्यामध्ये ते कारखाने लिलावात काढण्याची

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

पाळी आणली. ज्यांनी कारखाने बुडविले त्यांनीच ते कारखाने विकत घ्यायचे, असा प्रकार गेल्या काही दिवसांत सुरू झाला आहे. एका कारखान्याबाबत नाही तर 40 कारखान्यांबाबत असे झाले आहेत. 40 कारखाने लिलावात विकण्यासाठी मॅनेज केले. लिलावही खोट्या पध्दतीने तयार करायचा असा प्रकार सुरू झाला. ठरवून कोणाला तरी आणायचे, जास्त रकमेच्या बोलीला बाहेर काढायचे आणि 10 टक्क्यांपेक्षा कमी किंमतीमध्ये ते कारखाने विकत घ्यायचे, असे कारस्थान दोन्ही बाजूच्या संगनमताने झाले आहे, ही सर्वात वाईट बाब आहे. मी परवा या विषयावर चर्चा मागितली होती. मेधाताई, अण्णा हजारे यांनी आंदोलन सुरू केले आणि त्याची यादी प्रसिध्द केली. मी यादी पुन्हा वाचण्याची गरज नाही. कारण मी व्यक्तिगत नोटीस दिलेली नाही. 40 जणांना प्रत्येकाला नोटीस देणे शक्य नाही. ते सभासदही उपस्थित नाहीत, त्यामुळे त्यांच्याबद्दल बोलणे चुकीचे ठरेल. 40 जणांनी घेतलेल्या कारखान्यांची सरकार चौकशी करणार की नाही ? आम्ही यापुढे काही करू देणार नाही, असे आता आपण सांगत आहात, पण ते पुरेसे ठरणार नाही. ज्यांनी लिलावामध्ये मातीमोल, कवडीमोल भावाने कारखाने विकत घेतले, त्या घोटाळ्याचे काय ?

(नंतर श्री. खंदारे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

सभापती महोदय, हा घोटाळा 10 हजार कोटी रुपयांचा आहे. एकेक कारखाना 250 ते 300 कोटी रुपयांचा आहे. पण हे कारखाने 20 कोटी रुपयात, 25 कोटी रुपयात, 27 कोटी रुपयात विकत घेतले आहेत. म्हणजे 10 टक्क्यापेक्षा कमी रकमेमध्ये हे कारखाने विकत घेतलेले आहेत. या साखर कारखान्यांची जमीन 250-300 कोटी रुपयांची आहे तर काहींची 500-700 कोटी रुपयांची आहे. त्यापैकी 25 टक्के जमीन विकली असती तरी त्या कारखान्यांचे पुनर्वसन झाले असते, कर्ज फिटले असते. कारखाने कसे दिवाळखोरीत निघाले याची स्वतंत्रपणे चर्चा करता येईल. कारखाने दरवर्षी मोडीत काढावयाचे आणि सरकारकडून पैसे घ्यावयाचे असा उद्योग कायम सुरु आहे. ज्या शेतकऱ्यांच्या जीवावर कारखाने उभे केले त्यांच्या हातामध्ये ते कारखाने राहिले पाहिजे. याबाबत सरकार काय करणार आहे ? लिलावाच्या या कारस्थानात सत्ताधारी व विरोधी पक्षाचे दिग्गज नेते सामील आहेत. परवा मी हा प्रश्न उपस्थित केला होता त्यावेळी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी याला काही अपवाद करा असे मला सांगितले आहे. कारखाने मोडीत काढणाऱ्यांच्या यादीत त्यांची नावे नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. ठीक आहे, पण मोडीत काढणाऱ्यांशी संगनमत करुन ते कारखाने विकत घेतलेले आहेत. विकत घेत असताना सर्व नियमांचे पालन केले आहे हे सर्व मान्य करु. पण ते कारखाने कवडीमोल भावात घेतले आहेत, त्याची तेवढी किंमत आहे का ? त्या अपराधाचा काही तरी हिस्सा तुम्ही घेणार की नाही ? एक कारखान्याचे प्रकरण काढले की त्याला दुसरा कारखाना देऊन टाकायचा. तू बालाघाट कारखाना घेऊ नको, तुला मुक्ताई कारखाना देतो असे सांगावयाचे. हा काय प्रकार आहे ? या राज्यातील नदी खोऱ्यातील साखर कारखाने स्वार्थी संचालकांनी पैसे काढून बुडविले. आता ते कारखाने कवडीमोल भावाने मघाशी सांगितल्या प्रमाणे या लोकांनी घेतले आहेत. ज्यांचे सर्व राजकारण या कारखानदारीच्या लुटमारीतून उभे राहिलेले आहे. 40 कारखाने ज्यांनी लिलावातून घेतले आहेत त्यांची नावे प्रसिध्द केली पाहिजेत. हे लिलाव रद्द करुन हे कारखाने पुन्हा शेतकऱ्यांच्या ताब्यात द्यावेत. त्यांची थोडीशी जमीन विकली व इतर अन्य गोष्टीतून पैसा उभा केला तर शेतकरी पुन्हा कारखाना चालवू शकतील. शासन हे करणार आहे की नाही ते सांगावे. विकत घेणाऱ्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

कंपन्यांची नावे काय आहेत, संचालकांची नावे काय आहेत, संचालकांचे नातेवाईक कोण आहेत, त्यांनी इतक्या कमी पैशात कसे घेतले, कारखान्यांची इतर मालमत्ता आहे त्याचे काय, त्यांनी शाळा, महाविद्यालये सुरु केली आहेत त्याचे काय ही सर्व मालमत्ता कारखाने विकत घेणाऱ्यांनी हडप करुन टाकली आहे. शेतकऱ्यांची व त्यांच्या भागभांडवलाची वासलात लावली आहे. जो कामगार तेथे काम करीत होता त्यालाही देशोधडीला लावले आहे. त्या कामगारांना कामावर घेतले जात नाही. माझा त्या लिलावाला व खाजगीकरणाला विरोध आहे. ज्या शेतकऱ्यांना देशोधडीला लावले आहे, त्यांची होत असलेली लूटमार, ज्यांनी हे सहकाराचे रोपटे लावले त्यांना पहावले गेले नसेल. ज्या यशवंतराव चव्हाण, विखे-पाटील, भाऊसाहेब थोरात, वसंतदादा पाटील यांनी हे सहकाराचे रोपटे लावले ते रोपटे यांनी नुसते खाऊन टाकले नाही तर खाजगी माध्यमातून ते लोक कायमचे बडे भांडवलदार झालेले आहेत. भांडवलदारांना शिव्या घालणे सोपे आहे. 20-25 कोटी रुपयांमध्ये कारखाना घ्यावयाचा व त्यावर 100 कोटी रुपयांचे कर्ज काढावयाचे असा धंदा सुरु आहे. राष्ट्रीयकृत बँका या कारखान्यांना 100 कोटी रुपयांचे कर्ज देऊ शकत होत्या. तेवढी किंमत शासनाने वसूल का केली नाही ? प्रत्यक्षात किंमत जास्त आहे. जेवढी किंमत आहे तेवढे कर्ज बॅक देत नाही, एकतृतीयांश कर्ज देते. किंमत जास्त आहे ती वसूल केली जाणार की नाही ते सांगावे.

या सरकारला रास्त भाव देण्याची जी भूमिका घ्यावी लागली आहे ती सरकारने स्वत:हून घेतलेली नाही. शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे शेतकऱ्यांनी मिळवली आहे, शासनाकडून खेचून घेतली आहे. पण तुम्ही खरोखर प्रामाणिक असाल, शेतकऱ्यांची मुले असाल, तर मग शेतकऱ्यांनी उभे केलेले कारखाने परत शेतकऱ्यांच्या ताब्यात देणार की नाही ? ज्यांनी या खरेदीत घोटाळा केलेला आहे त्यांची नावे सभागृहात सांगणार की नाही ते सांगावे. ज्या माननीय मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांचे कारखाने वाचविण्यासाठी पावले उचलली आहेत त्याचे आम्ही स्वागत करतो. त्याच माननीय मुख्यमंत्र्यांना आवाहन आहे की, त्यांनी आणखी दोन पावले पुढे जावे. या राज्यातील शेतकरी तुम्हाला उचलून धरील. या राज्यातील सर्व सामान्यांचा कायद्यावर विश्वास आहे. ज्याचा भ्रष्टाचाराला विरोध आहे, तो तुम्हाला उचलून धरील. त्यामुळे शासनाने कारखान्यांची यादी

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

जाहीर करावी. त्यामध्ये किती रकमेचा घोटाळा झाला आहे, ते सांगावे. नियमांचे पालन करुन कारखाने विकत घेतले आहेत असे सांगणे सोपे आहे. या राज्यातील जनतेने कोणाकडे पहावयाचे ? माननीय मुख्यमंत्री चांगले आहेत, परंतु त्यांच्या भोवतालचे सर्व सहकारी या व्यवहारात गुंतले असतील तर त्याचे काय, माननीय विरोधी पक्ष नेते म्हणतात की, याला काही अपवाद आहेत, हे मला मान्य आहे. परंतु विरोधी पक्षातील नेते संगनमत करुन मी बालाघाट कारखाना घेतो, तू मुक्ताई कारखाना घे असे जर होत असेल तर या राज्याचे दिवाळे निघण्यासाठी वेळ लागणार नाही.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

2014च्या निवडणुका लांब नाहीत. काही महिन्यात तुम्हाला घरी जावे लागेल....(अडथळा) यामध्ये शिवसेनेचा संबंध नाही. म्हणून मी माननीय मुख्यमंत्री आणि माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे अभिनंदन केले. माझे आणि शिवसेनेचे सेक्युलारिझमच्या बाबतीत मतभेत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या विधवांना न्याय मिळावा म्हणून शेतकऱ्यांची दिंडी काढून उन्हातान्हात चालत होते त्यावेळी मी देखील त्यांच्या बरोबर चालत होतो...(अडथळा)...

सभापती महोदय, कारखान्यांच्या खरेदी-विक्रीच्या संगनमतामध्ये विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षाचे नेते सामील असतील तर जनतेने कोणाकडे न्याय मागायचा ? कारखाने कसे बुडाले याची चर्चा करण्याची गरज नाही. कारण मग सगळयांचीच लक्तरे निघतील. म्हणून त्याची चर्चा मी येथे करीत नाही. ज्या पध्दतीने हा लिलाव झालेला आहे तो लिलाव कारखान्याचा नसून महाराष्ट्राच्या इभ्रतीचा लिलाव झालेला आहे. महाराष्ट्राने सहकारातून फुलविलेल्या समाजवादाचा लिलाव झालेला आहे. यशवंतराव चव्हाणांपासून वसंतदादा पाटील यांनी जी मेहनत घेतली, विखे-पाटलांपासून खेडयापाड्यातील कार्यकर्त्यांनी सहकारी कारखाने उभे राहाण्यामध्ये जी मेहनत घेतली त्या मेहनतीचा हा लिलाव आहे. ज्या शेतक-यांचे कष्ट, त्यांची कमाई, कारखान्याच्या मातीमध्ये आणि कारखान्याच्या ऊसामध्ये लागली होती त्याचा हा लिलाव आहे. तुम्हाला शेतकऱ्यांचा लिलाव करण्याचा अधिकार नाही. आज लिलाव ठोकल्यानंतर भाव द्यायला येत आहात. हे खाजगीकरणाचे वारे रोखले नाही तर आम्ही समाजवादाचा पाळणा हलवला असे म्हणून यशवंतरावजी चव्हाणांच्या समाधीवर फुले वाहायला जाण्याचा अधिकार तुम्हाला राहाणार नाही. एका बाजूला तुम्ही यशवंतरावजी चव्हाणांच्या समाधीवर फुले वाहायला जाता आणि दुसऱ्या बाजूला सरसकट कारखाने लिलावात काढून खाजगीकरण करायला मागत असाल तर तुम्ही समाजवाद गाडायला मागत आहात, हे तुम्ही लक्षात घेतले पाहिजे. म्हणून माझी मागणी आहे की याची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे म्हणजे झाली पाहिजे. त्याआधी तुम्ही उद्याच्या उद्या सर्व कारखान्यांची यादी जाहीर करा. माननीय राज्यमंत्र्यांना ते शक्य होत नसेल तर माननीय सहकार मंत्र्यांनी या ठिकाणी यावे किंवा माननीय मुख्य मंत्र्यांनी उद्या येथे येऊन अशा प्रकारची यादी आहे, इतक्या लोकांनी कारखाने विकत घेतलेले आहेत, कंपन्यांच्या डायरेक्टरांची आणि त्यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

गुंतलेल्या राजकारण्यांची नावे अशी अशी असून या सगळयांची चौकशी आम्ही करु असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले पाहिजे. त्यानी सांगितले होते की सहकार खात्या मार्फत याची चौकशी केली जाईल. सहकार खात्या मार्फत होणाऱ्या चौकशीवर आम्ही कसा विश्वास ठेवणार ? येथे सीबीआयवर विश्वास ठेवता येत नाही. सीबीआय परवानगी मागायला जाते, त्यांना परवानगी नाकारली जाते. कायद्याने सर्व काही असेल. पण कायद्याने चौकशी का नाकारली त्याची कारणे जनतेपुढे आली पाहिजेत. मला कुणावर आरोप करायचा नाही किंवा सर्वोच्च संस्थेबद्दल मला एक अक्षरही बोलायचे नाही. परंतु या देशातील कोणतेही संविधानिक पद जनतेपेक्षा मोठे नाही. जनता सार्वभौम आहे. त्या पदावरील कोणत्याही व्यक्तीने कोणताही निर्णय घेतला असला तरी त्याची कारणे स्पष्ट केली पाहिजेत. कोणाला सोडायचे आणि कोणाला सोडायचे नाही, कोण अपराधी आणि कोण अपराधी नाही याचा निर्णय न्यायालयात होईल. आपली न्यायसंस्था अजूनही चांगली आहे. न्यासंस्थेत गडबडी असतीलही. सगळीकडे गडबडी आहेत. पण न्यायसंस्थेने केलेल्या कायद्यावर आपण विश्वास ठेवला पाहिजे. पण न्यायालयाच्या आधीच आपण निर्णय घेणार असू तर ते चालणार नाही. तुम्ही जनतेची किती काळ फसवणूक करणार आहात ? तुम्ही जनतेची फसवणूक केली तर जनता तुम्हाला धडा शिकवील आणि घरी पाठवील. याबाबतीत दूध का दूध, पानी का पानी झाले पाहिजे. आपण हे करणार नसाल तर तुमचे हात एकमेकात मिसळलेले आहेत असे लोक समजतील आणि म्हणतील की कशाला आमची फसवणूक करता, कशाला आम्हाला सांगता ? तुम्ही दोघेही मग घरी जा. मला वाटते तो धडा या निमित्ताने तुम्ही घेतला आणि खरे बोलण्याचे धारिष्ट दाखविले तर लोक तुम्हाला खांद्यावर घेतील अन्यथा येत्या निवडणुकीत ते आपटतील एवढेच सांगतो आणि मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

..नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकावर बोलताना या विधेयकामागील पार्श्वभूमी किंवा हे विधेयक कोणामुळे आले यावर बोलण्याऐवजी या विधेयकाचा परिणाम काय होणार आहे या बाबत थोडासा विचार केला तर, या विधेयकाच्या शीर्षकामध्येच एक गोष्ट स्पष्ट होते की, ".....to regulate the price of Sugarcane supplied to sugar factories in the State of Maharashtra." म्हणजेच ऊसाला जो दर द्यावयाचा आहे त्यावर एकप्रकारचे नियमन असावयास पाहिजे. 'विनियमन' आणि 'नियमन' यातील फरक हा समजून घेतला पाहिजे. या अनुषंगाने कायद्याद्वारे एक क्वॉसी ज्युडीशियल ऑथॉरिटी प्रस्थापित करण्याचा प्रयत्न किंवा उद्देश या विधेयकात अंतर्भूत आहे. निश्चितपणे अशा प्रकारची यंत्रणा राज्यात असावी, ही बाब अतिशय स्वागतार्ह आहे. मला वाटते की, शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी आवश्यक असलेली एक बाब या विधेयकाच्या निमित्ताने पुढे येत आहे, म्हणूनच या विधेयकाला समर्थन देण्याची आवश्यकता आहे.

महोदय, प्रश्न असा आहे की, राज्य शासन कायद्याने अनेक मंडळे तयार करते. तशाच प्रकारचे एक मंडळ या विधेयकाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. नवीन मंडळाची रचना कशी असेल या बाबतचा उल्लेख या विधेयकात करण्यात आलेला आहे. मंडळाची एकूण सदस्य संख्या 15 आहे. मुख्य सचिवांपासून साखर आयुक्त जे त्या मंडळाचे पदसिध्द सदस्य सचिव आहेत. या मंडळामध्ये मुख्य सचिव, सचिव (वित्त), सचिव (सहकार), सचिव (कृषी) हे चार सचिव आणि साखर आयुक्त असे एकूण पाच शासनाचे प्रतिनिधी आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब म्हणतात त्यानुसार आय.एस.एस. सेवेतील पाच अधिकारी या समितीमध्ये आहेत. त्यांची या समितीमध्ये आवश्यकता आहे हे मला मान्य आहे. तसेच शासनाने नामनिर्देशित करावयाचे असे राज्यातील कारखान्यांचे पाच प्रतिनिधी आहेत. त्यापैकी तीन सहकारी साखर कारखान्यांतील असतील. यामध्ये विभागीय प्रतिनिधित्वाचा विचार केला की नाही ? नसल्यास, तो विचार करावा, अशी या निमित्ताने विनंती करतो. कारण राज्यात साखर कारखानदारी ज्या प्रमाणात आहे त्या प्रमाणात ते प्रतिनिधी या समितीवर कसे येतील हे आपण बघितले पाहिजे. या समितीमध्ये उर्वरित दोन प्रतिनिधी हे राज्यातील इतर साखर कारखान्यांचे असतील. मुळात हे प्रतिनिधी निवडण्याची डिस्क्रीशनरी पॉवर्स शासनाकडे आहे. हे दोन प्रतिनिधी निवडताना खाजगी साखर कारखानदारी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

करणाऱ्यांची एकत्रित संघटना आहे काय, ती संघटना इतर संघटनांशी संलग्न आहे काय, त्या संघटनेमार्फत जी नावे सुचविली जाणार आहात ती आपण स्वीकारणार आहात काय, या बाबतचा खुलासा केला पाहिजे.

तसेच तिसरी गोष्ट सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यानी निदर्शनास आणून दिली आहे. आपल्याकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आहे. त्यावर सदस्यांची नियुक्ती करताना, त्या बद्दलचे डिफायनिंग क्लॉज त्या कायद्यात घातले आहेत. ते मंडळ एकूण किती सदस्यांचे असेल, याचा त्या क्लॉजमध्ये उल्लेख आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामध्ये आरोग्य विभागाचे सचिव, इतर विभागांचे सचिव, महापालिका क्षेत्राचा प्रतिनिधी म्हणून एक नॉमिनी, नगरपालिका क्षेत्राचा प्रतिनिधी म्हणून एक नॉमिनी, कारखानदारी क्षेत्रातील एक नॉमिनी, अशा प्रकारे त्यांचे मंडळ तयार होते. या पात्रतेच्या ज्या स्टेजेस आहेत त्याची पात्रता ठरवायची आहे. असो.

महोदय, पृष्ठ क्र-3 वरील 7 मध्ये अशासकीय सदस्यांच्या बाबतीत नमूद केलेले आहे.

नंतर श्री.भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

त्यांची नियुक्ती करण्यापूर्वी करता येण्यासारख्या या गोष्टी आहेत. त्याचाही आपल्याला विचार करावा लागेल. यानंतर सगळ्यात महत्वाचे म्हणजे ज्यांना तुम्ही क्वॉसी ज्युडिशियल म्हणून कोड ऑफ सिव्हिल प्रोसीजर, 1908 चे सर्व अधिकार दिलेले आहेत, जेव्हा न्यायालयीन प्रक्रियेचे अधिकार एखाद्या मंडळाला देतो आणि स्वायत्तता स्वरुपात त्यांनी काम करावे अशी अपेक्षा असते अशा वेळेला त्यांनी दिलेल्या निर्णयावर दाद मागायला कुठे जातील? एकदा क्वॉसी ज्युडिशियल म्हटल्यानंतर ज्यांना तुमच्या नियामक मंडळाने निर्णय दिला तो त्यांना मान्य नसेल तर त्याबद्दल अपिलाची तरतूद या यंत्रणेमध्ये असावी किंवा नसावी, त्याची गरज आहे किंवा नाही हाही मुद्दा महत्वाचा आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, त्यांना सिव्हिल कोर्टाचे अधिकार दिलेले असतात. त्याचे अपिलेट कोर्ट म्हणजे हायकोर्ट असते. हायकोर्टात दाद मागण्यासाठी जावे लागेल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आपल्याकडे ठरलेले आहे की, दरवेळी दिवाळी आली की सफाई कामगारांचा संप होणार, उन्हाळ्याची सुट्टी लागली व लग्नसराई आली की एस.टी.कामगारांचा संप होणार. यामुळे आपण या ठिकाणी नमूद केलेल्या किमान 3 बैठका व्हाव्यातच, परंतु त्याच्या बरोबरीने आणखी काही या विषयावर सातत्य टिकवायचे असेल तर या बैठकांची संख्या मॅण्डेटरी म्हणून अधिक करता येईल का, अशा प्रकारची तरतूद करण्याबाबत विचार करावा.

सभापती महोदय, एका बोर्डावर अशासकीय सदस्य म्हणून काम केलेले असल्यामुळे अनुभवातून सांगू इच्छितो. या ठिकाणी म्हटले आहे की, मुख्य सचिव आणि वित्त खात्याचा सचिव दर्जाचा अधिकारी सदस्य असेल. आज प्रत्येक खात्यामध्ये प्रधान सचिव आणि सचिव नेमलेले असतात. माझ्या अशासकीय सदस्य पदाच्या काळात असे आढळून आले की, एका खात्याच्या सचिवाची त्या बोर्डावर सदस्य म्हणून नियुक्त झालेली असताना तो सचिव बैठकीला न येता कोणाला तरी नॉमिनेट करतो आणि त्याच्या वतीने तो नियामक मंडळावर काम करतो. ही तरतूद या विधेयकामध्ये नसावी. वित्त सचिव म्हणजे सचिव दर्जाचा माणूस त्या बैठकीला हजर असला पाहिजे. यामध्ये पारदर्शकता टिकवायची असेल आणि ऊस उत्पादकाला योग्य भाव देण्यासाठी जी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

यंत्रणा आहे त्याबाबत आपला उद्देश जर सकारात्मक असेल तर ही यंत्रणा उभी करताना जी काळजी घेणे आवश्यक आहे त्या संदर्भात तरतूद करता येईल का याचा विचार करावा.

सभापती महोदय, यामधून निश्चितपणे ऊस उत्पादकांना दिलासा मिळेल. कमिटमेंट स्वरुपात त्यांच्या पुढे हे जाईल अशा पध्दतीच्या या व्यवहाराचे नियंत्रण करता येईल असे मला वाटते. ज्या काही सूचना आपल्या विचारार्थ मांडल्या आहेत त्याचा विचार करावा. हे विधेयक अतिशय महत्वाचे आहे. त्यामुळे मी त्याला समर्थन देऊन माझे भाषण संपवितो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, प्रामुख्याने शेतकऱ्यांच्या हितासाठी हे विधेयक मांडले असले तरी माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी ज्याचा उल्लेख केला त्या शेतक-यांचे केवळ पाच प्रतिनिधी त्यामध्ये असतील. ती संख्या वाढविली पाहिजे त्याशिवाय शेतक-यांना न्याय मिळणार नाही.

नंतर 6 एन.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील...

कारखान्यातील मजूर त्याची बाजू मांडायला जाऊ शकत नाही. त्याची संघटना प्रश्नांचा खूप अभ्यास करीत असते. तेव्हा कुठली शेतकरी संघटना अधिकृत आहे हे शासनाने ठरविले पाहिजे. शेतकरी आपली बाजू मांडू शकत नाही. त्याप्रमाणे कारखान्यातील मजूर आपली बाजू मांडत नाही. त्याची संघटना बाजू मांडते. तेव्हा शेतकरी संघटनेचे प्रतिनिधी देखील यात असणे आवश्यक आहे असे मला वाटते.

पान क्र.3 वर खंड 4 मध्ये, "परंतु, ऊसाचा दर निश्चित करताना भुसा (बॅगस), मळी (मोलैसिस) असा उल्लेख केला आहे. मोठे उत्पन्न हे डिस्टीलरीमधून व को-जनरेशन मधून येते. त्याचा देखील यात विचार केला पाहिजे असे मला वाटते.

पान क्र.4 वर कारखान्यात ऊसाच्या वजनाच्या केलेल्या नोंदीच्या आधारे रक्कम प्रदान करण्यात येईल असे नमूद केले आहे. कारखान्यामध्ये हाच मोठा चिंतेचा विषय आहे. शेतकऱ्याचा ऊस जातो तो काट्यामध्ये मारला जातो. याचाही उल्लेख आपण केला पाहिजे. हा देखील विचारात घेण्यासारखा विषय आहे. अशा प्रत्येक व्यक्तीस दोषसिद्धीनंतर पंचवीस हजार रूपये दंडाची रक्कम आकारण्यात येईल अशा प्रकारची देखील तरतूद आहे. ही दंडाची रक्कम आहे काय ? सकाळी डायरेक्टर कारखान्यात चहा प्यायला बसले की, तेवढी रक्कम खर्ची पडते. तेव्हा ही रक्कम जास्त असली पाहिजे असे मला वाटते. माझ्या या 2-3 सूचनांचा आपण विचार करावा अशी माझी विनंती आहे.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, बिलावर कितीही वेळ बोलता येते याची मला कल्पना असली तरी देखील मी माझे थोडक्यात विचार मांडणार आहे.

सभापती महोदय, हे बिल अतिशय सुंदर आहे. शेतकऱ्यांच्या फायद्याचे आहे. त्यामुळे मी या बिलाचा सन्मान करतो. अशा प्रकारचे बिल येणे फार आवश्यक होते. कारण शेतकऱ्यांची लुबाडणूक होत होती. त्यातून त्यांना वाचविण्याकरिता हे बिल आणलेले आहे. सहकारी साखर कारखाने हे कमी भावात विकले जातात. जो माणूस कारखाना घेतो तो 100 ते 150 कोटी रूपयांचे कर्ज घेऊन कारखाना विकत घेतो. कुठलीही वित्तीय संस्था 50 ते 60 टक्यांपेक्षा जास्त प्रमाणात कर्ज देत नाही. हे सर्व संगनमताने केले होते. ते माननीय मुख्यमंत्र्यांनी बंद केले म्हणून मी त्यांचा प्रथमत: आभारी आहे. यात आपण चांगल्या अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. मी माझ्या कारखान्यासंबंधी बोलत नाही. माझा कारखाना हा प्रायव्हेट लिमिटेड नसून, पब्लिक लिमिटेड आहे. त्यात हजार सदस्य आहेत. हा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पहिला साखर कारखाना आहे. अधिकारी आपल्या पदाचा गैरवापर कसा करतात हे मी आपल्याला सांगणार आहे. यात को-जनरेशन व डिस्टीलरीचा उल्लेख करण्यात आलेला नाही. कारण ती इंडस्ट्री वेगळी झ ालेली आहे. कारण को-जनरेशनचा, डिस्टीलरीचा आणि शुगरचा आय.एम.वेगळा असतो. प्रत्येक इंडस्ट्री ही वेगळी ट्रीट केली जाते. यातून जे रॉ मटेरियल निघेल ते धरण्यात आलेले आहे. उदा.बॅगस, मोलैसिस हे धरलेले आहे. ही इंडस्ट्री वेगळी आहे व त्याची आयडेंटीटी वेगळी आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत ...

सभापती महोदय, विधिमंडळात कायदे तयार केले जातात. कायदा तयार झाल्यानंतर तो सर्वांना सारखा पाहिजे. कायदा गरिबाला आणि श्रीमंतालाही सारखाच असला पाहिजे. परंतु कायदे तयार झाल्यानंतर त्या कायद्यांचा उपयोग अधिकारी कसे करतात त्याचे एक उदाहरण मी आपल्याला सांगू इच्छितो. साखर आयुक्त घरगडया सारखा वागतो. मला याचा प्रॅक्टीकल अनुभव आलेला आहे. "घरगडी" हा शब्द मी जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून वापरत आहे. मी माझा साखर कारखाना प्रायव्हेट लिमिटेड करणार होतो परंतु 1000 सदस्य झाल्यामुळे तो आपोआप पब्लीक लिमिटेड झाला आहे. आता तो कारखाना माझा राहिलेला नाही. कोऑपरेटीव्ह सारखाच तो झालेला आहे. मी माझ्याकरिता नाही तर सिंधुदुर्ग जिल्हयातील जनतेसाठी मी बोलतो आहे. कारखान्यासाठी परवानगी घेण्यासाठी गेल्यानंतर एरिअल डिस्टन्स सर्टिफिकेट लागते त्यासाठी मी अर्ज केला. शुगर कंट्रोल ॲक्टमध्ये जी प्रोव्हीजन आहे ती मी पूर्ण फॉलो केली होती. पण शुगर कमिशनरला ते कळते किंवा कळू नये किंवा कोणाच्या तरी दबावाखाली जाणीव पूर्वक कसा त्रास द्यावयाचा याचे चालते बोलते उदाहरण मी आपल्या समोर ठेवतो.

साखर कारखान्यासाठी अर्ज केल्यानंतर मी 17/31 गट नंबर दिला होता. 17/31 आणि 17/88 हे दोन्ही माझे गट नंबर होते. रेव्हेन्यू अधिकाऱ्याने 17/88 च्या ठिकाणी 17/31 लिहिले ही माझी चूक नाही. मला सर्व्हे ऑफ इंडियाचे सर्टीफिकेट मिळाले. पिलर तोच आहे. सहकार आयुक्तांवर कोणी तरी दबाव आणला. कारखाना गेला तरी मला काही वाटणार नाही. कारखाना गेला तर जनतेचे नुकसान होणार आहे. न्याय मिळावा यासाठी मी हे सांगत आहे. सर्टीफिकेट व्हेरिफाय करावे लागते. त्यानंतर ऑब्जेक्शन घेण्यात आले. काही तरी कारण सांगून शुगर कमिशनर केसच बंद करण्यास तयार नव्हता. दोन्ही पार्टी केस चालवायची नाही असे सांगत असतांनाही सहकार आयुक्त केस बंद करण्यास तयार नव्हता. नंतर त्याने केस संपवली परंतु त्यामध्ये त्याने पुन्हा तपासणी करण्याची अट घातली. मला सर्टीफिकेट मिळाल्यानंतर सहकार आयुक्ताने एका राजकीय पुढाऱ्याला सांगितले की, यांना प्रमाणपत्र मिळाले आहे. त्यानंतर एसडीओने ते प्रमाणपत्र लगेच कॅन्सल केले. पुन्हा मी सर्व पेपर तयार केले तरी सुध्दा तो प्रमाणपत्र देण्यास तयार नव्हता. शेवटी मला कोर्टात जावे लागले. शेवटी कोर्टातून मला प्रमाणपत्र आणावे लागले. अधिकारी कायद्याचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत ...

दुरुपयोग कसे करतात हेच मी येथे सांगत आहे. त्यामुळे सहकार आयुक्तांना जे अधिकार आहेत ते सचिवांना द्यावेत एवढेच माझे म्हणणे आहे. तो शुगर कमिशनर लायकीचा नसल्यामुळे त्याला ते अधिकार देऊ नका हे मी येथे जबाबदारीने सांगत आहे. अधिकाऱ्यांनी कोणाच्याही राजकीय दबावाखाली जाता कामा नये. खरे म्हणजे सहकार आयुक्तांनी कायद्या प्रमाणे काम करावयास पाहिजे होते. कमिशनर आणि कलेक्टरांकडे प्रमाणपत्र मागितले असता आम्हाला असे प्रमाणपत्र देता येत नाही असे त्यांनी सांगितले. खरे म्हणजे त्यांच्यावर दबाव असल्यामुळे त्यांनी प्रमाणपत्र दिले नाही. शेवटी मला कोर्टाकडून प्रमाणपत्र मिळाले. एका जजने ती ऑर्डर पास केली. माझा गट नंबर चुकला होता तर त्यांनी मला कळवावयास पाहिजे होते.

शुगर कंट्रोल ॲक्ट 1966 च्या सेक्शन सहा मधील तरतूदीनुसार प्रमाणपत्र घ्यावयाचे असेल, पिलर असेल तर काही प्रश्न येत नाही. प्रमाणपत्रासाठी तुमच्याकडे संमती पत्र लागते. माझ्याकडे एमईओ होता. सहकार आयुक्तांना सर्व माहिती कळवली होती. परंतु कोणाला तरी फेवर करण्यासाठी व मला त्रास देण्यासाठी सहकार आयुक्तांनी दिल्लीला कळवले की, यांचे सर्टीफिकेट कॅन्सल करा. याच सहकार आयुक्तांनी सोलापूरमधील एका इंडस्ट्रीजची तीन वेळा चिमणी बदलली आहे. नोटीफिकेशन काढतात. माझा पिलर मी बदलला नव्हता. पिलर बदलला असता तर ती माझी चूक झाली असती. हा शुगर कमिशनर एकाला फेवर करतो व दुसऱ्याला त्रास देतो हे बरोबर नाही. मंत्र्यांच्या कामासाठी हा सहकार आयुक्त दिल्लीमध्ये फेऱ्या मारीत होता. जर सहकार आयुक्त नोकर म्हणून काम करीत असेल तर अशा सहकार आयुक्तांना कायद्याने पॉवर देणे म्हणजे जनतेला फसविण्यासारखे आहे. त्यामुळे सहकार आयुक्तांना जे अधिकार दिलेले आहेत ते सचिवांना द्यावेत. सचिवांना असे अधिकार दिले तर सचिव असे काम करणार नाही असे मला वाटते. मी केसच्या संदर्भात कोर्टात गेल्यानंतर मला तेथील चार-पाच वकीलांनी सांगितले की, हा सहकार आयुक्त ठराविक लोकांनाच मदत करीत असतो.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत....

तो असा असा माणूस आहे असे त्यांनी मला सांगितले. अशा साखर आयुक्तांना बसविल्यास तो मनमानी पध्दतीने कारभार करील. आपण साखर आयुक्तांना असे अधिकार दिले तर त्याचा गैरवापर होण्याची शक्यता आहे. तेव्हा साखर आयुक्तांना दिलेले अधिकार काढून घ्यावेत अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे. आपण हे अधिकार कोणत्याही सचिवांना द्यावेत. आपण साखर आयुक्तांना दंड करण्याचे अधिकार दिले तर ते कोणालाही दंड करतील. विजय सावंत यांनी ऐकले नाही म्हणून त्यांना दंड करा. उद्या दुसऱ्या कोणी व्यक्तीने ऐकले नाही तर दंड करा. एखाद्या नेत्याच्या अंडरप्रेशरखाली हे करायचे, साखर आयुक्तांनी कोणाचीही बाजू न घेता काम केले पाहिजे. त्यांनी मला पत्र पाठवावयास पाहिजे होते. परंतु त्यांनी तसे कोणतही पत्र मला पाठविलेले नाही. मग मी चीफ शुगर डायरेक्टर यांच्याकडे गेलो. माझ्या नकळत त्यांना कळविण्यात आले. मी त्याबाबत ऑब्जेक्शन घेतले. चीफ शुगर डायरेक्टरकडे माझी हिअरींग झाली. शुगर कमिशनरने ताबडतोब समोरच्या पार्टीला सांगितले त्यांचा वकील तेथे हजर झाला. मी तर असे सांगू शकत नाही. मग असे सांगणार कोण तर शुगर कमिशनर. मी त्यांच्या कार्यालयात चौकशी केली असता मला सांगण्यात आले की, आमच्या साहेबांनी सांगितले. किती चमचेगिरी करायची किती हाजीहाजी करायची. जिल्हयात कारखाना होऊ द्यायचा नाही असा त्यांचा प्रयत्न होता.

सभापती महोदय, मी एका कारखान्याने मेलेल्या माणसाचे बोगस प्रमाणपत्र दिलेले आहे अशी तक्रार केली. त्या संदर्भातील दाखले दिले. पण त्यावर कोणतीही ॲक्शन घेण्यात आलेली नाही. ती कंपनी रजिस्टर्ड नाही तरी देखील त्यांचेवर ॲक्शन घेतलेली नाही. आपण कमिशनरांच्या हातात पॉवर दिली तर त्याचा कितीतरी मिसयुस होणार आहे. 45 पैकी 43 लोक बोगस होते. मी आमदार म्हणून पत्र पाठविले. पण मला एकाही पत्राचे उत्तर मिळालेले नाही. खरे म्हणजे आमदारांच्या पत्राला उत्तर देणे आवश्यक आहे. खरे म्हणजे अशा अधिकाऱ्याला निलंबित केले पहिजे. तो दुसऱ्यांच्या कारखान्यांसाठी दिल्लीला चकरा मारतो. अशा कमिशनरांना पाठीशी घालत असाल, त्यांना अधिकार देणार असाल तर या विधेयकाला काही अर्थ राहणार नाही. सर्वसामान्य माणसाला न्याय मिळणार नाही. ज्याचा राजकीय दबाव आहे त्यांची कामे होतील. सर्वसामान्य लोकांची कामे होणार नाहीत, सर्वसामान्य जनतेला न्याय मिळण्यासाठी आपण विधेयक आणतो. शेतकऱ्यांच्या दृष्टीने हे विधेयक महत्वाचे असल्यामुळे मी या विधेयकाचे स्वागत करतो. परंतु

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत....

यातील अधिकाऱ्यांना माझा विरोध आहे. आपण साखर आयुक्तांकडील अधिकार सचिवांकडे द्यावेत. आपण साखर आयुक्तांना सस्पेंड करणार आहात काय अशी मागणी करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी येथे सत्यकथन केलेले आहे. सन्माननीय सदस्य सभागृहात जे काही सांगतात ते सत्य आहे असे आपण समजतो. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली घटना अतिशय गंभीर आहे. त्यांच्याकडे रेकॉर्ड आहे. आपण विधेयकावर चर्चा करीत असलो तर सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्यास गांभीर्य आहे. ते आमदार असताना त्यांना हा अनुभव आला तर सर्वसामान्य जनतेला काय अनुभव येत असेल, तेव्हा आपण या प्रकरणाची चौकशी करुन त्या साखर आयुक्तांना सस्पेंड केले पाहिजे अशी माझी मागणी आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य येथे जे वक्तव्य करतात ते सर्व सत्य असते असे मानण्याचा आपला प्रघात आहे. ते सत्य बोलत आहेत असे आपण गृहीत धरु. हे प्रकरण गंभीर आहे. आपण विधेयकावर चर्चा करीत आहोत. त्यांनी भाषण करीत असताना सांगितले की, साखर आयुक्तांना अधिकार नसावेत. त्यांना अधिकार का नसावेत याची त्यांनी कारणे सांगितली. आपणास या संदर्भात माननीय सभापतींशी बोलावे लागेल. या प्रकरणाची मुख्य सचिवांमार्फत चौकशी करुन त्याचा अहवाल योग्य त्या कारवाईसहित आपल्यामार्फत येथे आला पाहिजे. तुम्ही आम्ही ठरवणे योग्य होणार नाही. यातून मार्ग काढला पाहिजे.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, मी येथे शपथेवर सांगतो की, मी जे येथे सांगितले ते सर्व सत्य आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हाला ते मान्य आहे. या संदर्भातील सर्व मिनिटस् मुख्य सचिवांकडे पाठवावेत आणि त्यासंदर्भात त्यांनी चौकशी करुन त्याचा अहवाल माननीय सभापतींकडे द्यावा. मुख्य सचिव या बोर्डाचे अध्यक्ष आहेत. हे प्रकरण गंभीर आहे. मुख्य सचिवांनी या प्रकरणाची चौकशी करुन त्या संदर्भातील अहवाल माननीय सभापतींकडे द्यावा आणि त्याप्रमाणे आपण योग्य ते निर्देश द्यावेत असा आपण यातून मार्ग काढू शकतो. या विधेयकाच्या माध्यमातून त्यांना शिक्षा करावी असे सांगता येत नाही. त्यासाठी आपणास लक्षवेधी सूचना उपस्थित करावी लागेल.

-------- यानंतर श्री.बोर्डे..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश धस (सहकार राज्यमंत्री) : महोदय, सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक-42 वर सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, कपिल पाटील, हेमंत टकले, चंद्रकांत पाटील, विजय सावंत यांनी आपले मत व्यक्त केले आहे. या विधेयकावरील चर्चेच्या निमित्ताने त्यांनी अतिशय उपयुक्त सूचना केल्या आहेत. शिवाय या विधेयकातील काही तरतुदींबाबत हरकती घेऊन, काही विधायक सूचना सुध्दा केल्या आहेत.

महोदय, केंद्र सरकारने नेमलेल्या डॉ.सी.रंगराजन समितीने आपल्या अहवालात केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने हे विधेयक या ठिकाणी आले आहे. शेतकऱ्यांना साखर कारखानाच्या उत्पन्नाच्या आधारे पुरवठा केलेल्या ऊसाचा दर देण्यात यावा अशा प्रकारची त्या समितीने शिफारस केली होती. त्या अनुषंगानेच हे विधेयक या ठिकाणी मांडण्यात आलेले आहे.

महोदय, अशा प्रकारचे विधेयक केवळ महाराष्ट्रात संमत होत आहे असे नाही. देशात सर्वात अगोदर हे विधेयक संमत करण्याचा मान आपल्या शेजारील कर्नाटक राज्याने मिळविला आहे. हे विधेयक आणण्यापूर्वी मंत्री महोदयांनी साखर संघाचे अध्यक्ष, साखर उद्योग आणि इतर सर्व संबंधित घटकांशी चर्चा केली होती. त्यानंतर एकूण उत्पन्नाच्या 70 टक्के आणि 75 टक्के असे दोन भाग ठरविण्यात आले. यामध्ये 70 टक्के खर्च पकडत असताना एच अँड टी चा समावेश केला गेला. ऊस दराबाबतचा संघर्ष दरवर्षी निर्माण होतो. यामध्ये प्रभावित होणारा एकच घटक आहे असे नाही. शेतकरी, कारखानदार हे घटक सुध्दा त्यात प्रभावित होतात. ऊस दराबाबत कधी कधी योग्य वेळी आणि कधी कधी अयोग्य वेळी आंदोलने केली जातात.

महोदय, 1 ऑक्टोबर हा हंगामाच्या शुभारंभाचा दिवस दिसत असला तरी, नोव्हेंबर महिन्यात ऊसाला अमुक इतका दर देण्याची मागणी केली जाते. महोदय, मी साखर कारखानदार नाही. परंतु निश्चितपणे ऊसतोड कामगार आहे. यामध्ये सर्वात जास्त हाल ऊसतोड कामगारांचे होतात. आमच्या जिल्ह्यातील ऊसतोड कामगार पाठीवर विंचवाचे बिऱ्हाड घेऊन पश्चिम महाराष्ट्र किंवा कर्नाटक राज्यात ऊसतोड करण्यासाठी जातात. परंतु या ऊसतोड कामगारांचा कधी विचार केला जात नाही. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, या ऊसतोड कामगारांचा कोणी विचार करावा ? या आंदोलनात माणसांचे हाल होतात. मग आमच्या जनावरांचे काय ? या आंदोलनात आमच्या जनावरांना आंदोलकांकडून आऱ्या टोचल्या गेल्या. अशा वेळी आमच्या जनावरांची अवस्था

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश धस....

काय झाली असेल याचा विचार न केलेला बरा. दुष्काळ पडल्यामुळे ऊसतोड कामगार माघारी येऊ शकत नाही. कारण दुष्काळात त्यांची जनावरे जगण्याची शक्यता नसते. त्यामुळे सर्व परिस्थिती सहन करुन लोकांना आहे त्याच ठिकाणी थांबावे लागते. मुक्या जनावरांची अवस्था तर फार वाईट झाली होती. सुरुवातीला साखर कारखानदारांनी ऊसतोड कामगारांना कमी पैसे दिले. ऊसतोड कामगार माघारी फिरुन गावी आला तर त्याला रोजगार नसतो. शिवाय त्याच्या जनावराला चारा आणि पाणी नसते. महोदय, आमच्या भागात 'खिलार' जातीची जनावरे आहेत. ही जनावरे घेऊन मागे कसे यायचे असा प्रश्न त्यांच्यासमोर पडतो.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश धस ....

या आंदोलनामध्ये बैलगाडी चालली. तुम्ही गाडीचे टायर फोडा, गाड्या थांबवा, आमचे त्याबद्दल काही मत नाही. पण आंदोलकांनी आमच्यावर हल्ला केला. ऊसतोड कामगारांनी नेमके त्यांचे काय केले ? त्यांनी आमच्यावर दगड मारायचे. मुक्या जीत्रापाने काय केले, त्याला खिळ्यांनी, आरीने ढोसायचे आणि जखमी करायचे. येथपर्यंतची मानसिकता असेल तर हे आंदोलनकर्ते नेमके कोणते आंदोलन करीत आहेत. तुम्हाला आंदोलन सरकारच्या विरोधात करायचे आहे, मग एसटी फोडा, काय करायचे ते सर्व झालेले आहे. तुम्हाला काय आक्रमकपणा दाखवायचा आहे तो दाखवा. पण जनावरांवरही आक्रमकपणा दाखविला गेला. मुक्या जीत्रापाने नेमके कोणाचे काय केले होते ? येथपर्यंत आंदोलनाची झळ बसली. अनेक दिवस लोकांनी तेथे जाऊन बसायचे, काम नाही म्हणून बसायचे, मुकादमाने खाण्यास पैसे दिले तर खाण्यास मिळायचे. शेजारचे शेतकरी कोणी स्वत:च्या शेतामध्ये काम देत नाहीत म्हणून जेथे आमचे बिऱ्हाड मांडलेले असेल, त्या बिऱ्हाडाच्या जागेवर बसायचे आणि जे काही 5-10 रूपये मिळतील ते घ्यायचे. खरे म्हणजे ते पैसे मिळणार नाहीच. किती लोकांनी फाशी घेतली याचे रेकॉर्ड केले तर समजेल. कारण त्याला कुठेच आधार नाही. कारखाने डायरेक्ट आमच्याशी करार करीत नाहीत. जी कोणती संस्था असेल ती कारखान्याच्या मुकादमाशी करार करते. कारखाना डायरेक्ट ऊसतोड कामगारांशी करार करीत नाही. मुकादमाशी करार केला जातो. ट्रस्टचा आणि त्या ट्रस्टचा बांधील मुकादम यामध्ये करार होतो. कारखान्याचे पैसे बुडाले तर मुकादमाला नोटीस दिली जाते, त्याच्यावर गुन्हा दाखल केला जातो, त्याच्याकडून सक्तीने पैसे वसूल केले जातात. ऊसतोड कामगार हा कामगार म्हणून ट्रीट होत नाही. कारण शासनाच्या निर्णयाप्रमाणे, 100 दिवसांच्या किंवा 160 दिवसांच्यावर कंटिन्यू काम केले तर तो कायमस्वरूपी नोकरदार होतो. आमचे लोक 180 दिवस, 200 दिवसही काम करतात. पण ते काम रेकॉर्डवर कुठेच नसते. त्यांची परिस्थिती फार भयावह असते. स्वत:चे घरदार, संसार सोडून यायचे, लहान लेकरं सोडून यायची. लेकरेबाळे कुठे आहेत, काय आहेत हे माहीत नसते. घराला आग लागली तर त्या आगीमध्ये 2-4 लेकरे गेली आहेत, अशी कित्येक उदाहरणे झाली आहेत. बड्यांच्या आंदोलनामध्ये छोट्यांचे मरण होते. या आंदोलनामुळे लोक येथे ऊस

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश धस ....

तोडायला नको म्हणतात आणि बाहेरच्या राज्यात जातात, इतकी वाईट परिस्थिती आंदोलनामुळे निर्माण झाली आहे. आंदोलन करण्याचा अधिकार सर्वांना आहे हे मला मान्य आहे. परंतु, साखरेचा दर 2600 रूपये आणि ऊसाला 3300 रूपयांचा भाव द्या असे म्हणणेही काही वेळा थोडेसे गैर होते, याचा सुध्दा आपण विचार केला पाहिजे. गळीत हंगाम सुरू होण्याच्यापूर्वी 1-2 महिना अगोदर मागणी केली पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री. हेमंत टकले व दिवाकर रावते म्हणाले की, आपण 3 बैठकांच्या संदर्भात सांगितले आहे. मी सांगू इच्छितो की, तसे नाही. 1/3 सदस्यांनी केव्हाही मागणी केली तरी सुध्दा अतिरिक्त बैठका घेण्याच्या संदर्भात त्यामध्ये निर्णय घेतलेला आहे. 3 बैठका यास्तव ठेवाव्यात की, पहिले पेमेंट हे अंतिम पेमेंट नाही. पहिल्यांदा पेमेंट दिले जाते, दुसऱ्यांदा दुसरा आणि तिसऱ्यांदा तिसरा हप्ता दिला जातो. सन्माननीय सदस्यांनी काही जणांची नावे घेतली. मी सांगू इच्छितो की, सभागृहात जे सन्माननीय सदस्य आहेत, त्यातील काही सन्माननीय सदस्यांचे कारखाने पहिल्या क्रमांकाचे दर देतात. मागील वर्षी माननीय मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांच्या साखर कारखान्याने 2800 रूपयांचा दर दिला आहे.

(नंतर श्री. खंदारे ....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.सुरेश धस....

बारामती साखर कारखान्याचा दर 2751 होता, सोमेश्वर व माळेगाव कारखान्याचाही दर जास्त होता. छत्रपती साखर कारखान्याचाही दर जास्त होता. मागील वर्षी 2800 रुपये दर दिला होता म्हणून या वर्षी 3300 रुपये दराची मागणी करणे उचित नाही. ही अवस्था केवळ साखर कारखानदारीमध्ये आहे असे नाही, सर्वच व्यवस्थेत आहे. दुधाच्या धंद्यातही तशीच परिस्थिती आहे. मी महानंद डेअरीचा चेअरमन होतो. त्या ठिकाणी या सदनाचे माजी सदस्य मधुकरराव सरपोतदार यांनी स्थापन केलेली कामगार संघटना आहे. त्यांच्या कार्यकर्त्यांबरोबर काम करण्याची मला संधी मिळाली होती. आता पुंडलिकराव सावंत हे काम पाहत आहेत. त्या डेअरीत आमचे दूध घ्या असे सांगून मोठ्या प्रमाणावर लोंढे येतात. आमचे दूध घेतले पाहिजे असा आग्रह करतात. दूध ठेवण्यासाठी दुसरी जागा नाही म्हणून महानंद डेअरीत टँकर्स आणले जातात. त्यामुळे दुधाचा दर 25 रुपयापर्यंत गेला आहे. कालच शासनाने दोन रुपयांनी दूधाचे दर वाढविले आहेत. याचे कारण असे की, मागील वर्षी राज्यात दुष्काळ पडल्यामुळे जनावरांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले. सातत्याने ऊसाची कुटी चाऱ्यामध्ये दिल्यामुळे जनावरांचे हेमोग्लोबीन कमी झाले. तसेच जनावरांची लागवड वेळेवर न झाल्याचा परिणाम पुढे आला. यापूर्वी जगामध्ये दूधाच्या पावडरचे दर 125 रुपये होते ते 250-300 रुपयांपर्यंत गेले. निर्यातही मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. जगात दूधाच्या पावडरची मागणी वाढलेली आहे. त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या या व्यवसायावर होत आहे. म्हणून साखरेचे दर आहेत ते अगोदरच निश्चित व्हावेत, गळीत हंगाम सुरु होण्यापूर्वी बैठक घेऊन साधारणपणे दर काय राहणार आहे यासाठी मध्ये व शेवटी बैठक घेतली जाते. पहिला दर काय होता, मध्ये काय दर होता व शेवटी दर काय ठेवावयाचा त्याबाबत निर्णय होऊ शकतो. म्हणून या विधेयकात अशा प्रकारची तरतूद केलेली आहे. ही तरतूद सर्व घटकांच्या दृष्टीने, शेतकरी व कारखानदारांच्या दृष्टीने, ऊसतोड कामगारांच्या दृष्टीने, जो घटक मोजला जात नाही त्यांच्यासाठी या तरतुदी केलेल्या आहेत.

को-जनरेशनबाबत मागण्या केल्या आहेत. परंतु त्यासाठी समिती अस्तित्वात आहे. त्यामध्ये तीनच बाबींचा समावेश केलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगेन की, भविष्यामध्ये त्यांच्या सूचनेचा विचार करता येईल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.सुरेश धस....

सभापती महोदय, कलम 156 (3) चा येथे उल्लेख करण्यात आला आहे. याबाबत मी अधिक बोलणार नाही. परंतु या कलमाचा बऱ्याच ठिकाणी गैरवापर होत आहे, मग तो राजकीय दृष्ट्या होत असेल, अन्य कारणांमुळे होत असेल. कोण कोणावरही चिखलफेक करीत आहेत. मनरेगा सारख्या योजनेसाठीही या कलमाचा गैरवापर होत असल्याचे दिसून येत आहे. या कलमाबाबत राज्य सरकारला शिफारस करण्याच्या पलीकडे काही अधिकार नाहीत. एफआयआर व इन्क्वायर अशी यात तरतूद आहे. इन्क्वायर ॲण्ड एफआयआर अशी यामध्ये तरतूद नाही. परंतु या कलमाबाबत सर्व राजकीय पक्षांनी विचार करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी साखर कारखान्यांच्या विक्रीसंबंधीचा मुद्दा मांडलेला आहे. या राज्यातील एकूण 36 सहकारी तत्वावरील साखर कारखाने विकले गेले आहेत.

नंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सुरेश धस...

या 36 कारखान्यांपैकी 25 कारखाने हे एमएससी बँकेने विकलेले आहेत. बाकीचे 7 कारखाने राज्य सरकार आणि लिक्विडेटर यांनी विकलेले आहेत. 3 कारखाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकानी विकलेले आहेत आणि डीआरटी कोर्टाने 1 कारखाना विकलेला आहे. हा निर्णय तत्कालीन सरकारने घेतला. हा निर्णय घेण्याचे कारण असे आहे की, 2002मध्ये सेक्युरीटायझेन ॲक्ट केन्द्र सरकारने पास केला. त्या कायद्याच्या अंतर्गत ज्या बँकेने या साखर कारखान्यांना कर्ज पुरवठा केला होता त्या साखर कारखान्यांना दिलेल्या कर्जाच्या वसुलीचा अधिकार प्राप्त झाला. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्या प्रमाणे राज्य सहकारी बँकेने सर्वच वेळी शासनाचे ऐकलेले नाही. काही बाबी आता पुढे येत आहेत. जेव्हा कारखान्यांची विक्री होत होती त्यावेळी राज्य सरकारने दिलेल्या भागभांडवलाचा विचार केला होता का, कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीचा, त्यांच्या पगाराचा विचार केला होता का, अशा प्रकारच्या बाबी पुढे येत आहेत. चांगल्या कारखान्याची विक्री झालेली नाही. ज्या लोकांनी सहकाराच्या नावाखाली स्वत: विश्वस्त म्हणून काम करण्याऐवजी मालक म्हणून काम केले, चुकीचे काम केले वाडवडिलांनी,पूर्वजांनी जी मालमत्ता उभी केली त्या मालमत्तेचे मालक झालो आहोत, हम करे सो कायदा अशा वृत्तीने काम केले, शेतकऱ्यांना आणि कामगारांना देशोधडीला लावले, बँकांची घेतलेली कर्जे परत केली नाहीत आणि कारखान्याचे दिवाळे काढले अशा कारखान्यावर कारवाई झाली आणि सेक्युरिटायझेशन ॲक्ट अंतर्गत बँकांनी कारखाने ताब्यात घेतले आणि रीतसर टेंडर काढून लिलाव केला. पश्चिम महाराष्ट्रातील कारखान्याची विक्री होत असताना त्याचे मूळ मूल्य किती असावे, विदर्भातील कारखाना विकताना त्याचे मूळ मूल्य किती असावे, मराठवाड्यातील कारखाना विकताना त्याचे मूळ मूल्य किती असावे आणि उत्तर महाराष्ट्रातील कारखाना विकताना त्याचे मूळ मूल्य किती असावे अशा प्रकारचा निर्णय त्यावेळच्या मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वाखालील कमिटीने घेतला आणि रीतसर टेंडर काढले गेले.

सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी एका शिष्टमंडळा समवेत माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. त्यावेळी त्या शिष्टमंडळाबरोबर मी देखील होतो. शिष्टमंडळाला दिलेल्या आश्वासनानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँक कायद्याच्या कलम 83 खाली चौकशी लावलेली आहे. चौकशीचा अंतिम रिपोर्ट ऑक्टोबर 2013 पर्यंत अपेक्षित केला होता. परंतु वेगवेगळया

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश धस...

जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्याकडे दिल्यामुळे त्यांनी मुदतवाढ मागितल्यामुळे चौकशीचा अंतिम अहवाल 31 डिसेंबर पर्यंत येईल. याबाबतीत मला वाद निर्माण करावयाचा नाही. परंतु कोणताही घोटाळा झाला तर त्याचा आकडा मात्र कमी येत नाही. 10 हजार कोटी रुपयाचा आकडा सांगितलेला आहे. चौकशी नंतर निश्चित आकडा पुढे येईल. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी चांगली सूचना केली. जे 3 सहकारी साखर कारखाने समोर येतील, 2 खाजगी साखर कारखाने समोर येतील ते विभागवार असावे. त्याचा समावेश नियमातच करुया.

...नंतर श्री गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश धस....

या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी खाजगी साखर कारखान्यांचाही उल्लेख केलेला आहे. आता आपल्याकडे खाजगी साखर कारखान्यांची संख्या कमी राहिलेली नाही. ज्यावेळेस ऊसाचे जास्त गाळप होते त्यावेळेस सबसिडीच्या बाबतीतील निर्णय शासनाने घेतलेले आहेत. परंतु या निर्णयामुळे नेमका शेतकरीच अडचणीत सापडला गेला. यामध्ये फक्त सहकारी साखर कारखान्यांनाच फक्त ऊस गाळपाची सबसिडी मिळेल व खाजगी साखर कारखान्यांना ती मिळणार नाही यासंदर्भात एकदा निर्णय घेतला गेला होता. या निर्णयामुळे बऱ्याचशा तगडया साखर कारखान्यांनी 200-200 कि.मी. अंतरावरुन ऊस उचलून आपल्या स्वतःच्या कारखान्यात गाळप केला. आम्ही अतिरिक्त ऊसाचे गाळप करतो म्हणून सरकारकडून अतिरिक्त सबसिडी पदरात पाडून घेतली. यामध्ये खाजगी साखर कारखान्यांना सबसिडी मिळाली नसल्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांना ऊसाचे व्यवस्थित दर दिले नाहीत. यामध्ये कारखान्याचे अतिरिक्त ट्रान्सपोर्ट वाढल्यामुळेही नुकसान झाले. यामध्ये आपल्या राज्याचे जे काही नुकसान व्हावयाचे होते ते झाले. परंतु लांब अंतरावरुन ऊस आणून त्याचे स्वतःच्या कारखान्यात गाळप करुन आम्ही अतिरिक्त ऊसाचे गाळप केले म्हणून त्याची अतिरिक्त सबसिडी राज्य सरकारकडून मिळवली. शेतकरी कोणत्या साखर कारखान्याला ऊस देतो हा मुद्दा महत्वाचा नाही तर शेतकऱ्याला किमान एफआरपी दर तरी मिळाले पाहिजेत. काही कारखाने फायद्यात असताना आम्हाला तोटा झाला आहे असे सांगत असतात. ऊसाचे जादा गाळप झालेले असताना अनेक कारखान्यांनी आमचा कारखाना तोटयात आहे असे सांगितलेले आहे. यामध्ये एकालाच नाव ठेवण्यात अर्थ नाही.

शेतकऱ्याला लुटण्यासाठी पक्षाची आवश्यकता लागत नसते. मराठवाडयातील काही साखर कारखान्यांनी ऊसाला 300 रुपये टन दर दिलेला आहे. शेतकऱ्याला कमी दर द्यावयाचा व जास्त फायदा आपल्या पदरात पाडून घ्यावयाचा असे काही साखर कारखान्यांनी केलेले आहे. त्यामुळे अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी हे विधेयक या ठिकाणी आणण्यात आलेले आहे. केंद्र सरकारने ऊसाच्या संदर्भात जे एफआरपी दर निश्चित केलेले आहेत ते किमान दर शेतकऱ्याला दिले गेले पाहिजेत. जे कारखाने चांगल्या स्थितीत आहेत त्यांनी एफआरपीपेक्षा अधिक दर दिलेले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश धस....

साखर कारखान्यांमध्ये स्पर्धा असलीच पाहिजे. आमच्या भागातील साखर कारखान्यांनी एकत्र येऊन आपण सर्वांनी ऊसाला सारखाच दर देऊ असा निर्णय घेतला होता. ऊसाचे सारखे दर देण्यामध्ये वेगवेगळया पक्षाच्या नेत्यांमध्ये एकमत होत असते. एफआरपीमुळे अधिकचे दर शेतकऱ्यांना मिळाले तर ते शेतकऱ्यांसाठी फायद्याचेच होईल. ज्या साखर कारखान्यांकडे को-जनरेशन, डिस्टीलरीज आहेत असे कारखाने शेतकऱ्यांना जास्तीचे दर निश्चितच देतील. परंतु अप्रगत भागातील साखर कारखान्यांनी एफआरपी पेक्षा कमी दर शेतकऱ्यांना देऊ नये अशा प्रकारची तरतूद या विधेयकामध्ये करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, ऊसाचे वजन करतांना साखर कारखाने काटा मारत असतात असा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी केलेला आहे. सगळेच साखर कारखाने ऊसाचे काटे मारतात असे नाही. सगळयाच क्षेत्रामध्ये काही वाईट लोक असतातच त्यामुळे सहकारामध्येही आणि खाजगी व्यवसायामध्येही काही वाईट लोक असतात. बरेचसे कारखाने काटा मारुन आमची रिकव्हरी जास्तीची आहे अशा बढाया मारत असतात. त्यामुळे अशा प्रकारच्या तक्रारी आल्या तर वेट अँड मेजरमेंट विभागाच्या अधिकाऱ्यांना पाठवून या प्रकाराला निश्चितपणे आळा घालता येईल.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश धस.....

साखर आयुक्तांबद्दल या ठिकाणी उल्लेख करण्यात आला. तसे पाहिले तर या समितीमध्ये साखर आयुक्तांना फारसे अधिकार नाहीत. सदस्य सचिव म्हणून बैठक आयोजित करणे, झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त घेणे आणि पुढील प्रकरण राबविणे एवढेच काम त्यांना करता येते. या ठिकाणी अधिक काही भाष्य न करता एवढेच सांगू इच्छितो की, माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केल्या आहेत, शेतकऱ्यांच्या ऊसाच्या दरासंबंधी अत्यंत चांगले विधेयक या ठिकाणी आणले आहे ते सभागृहाने संमत करावे अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 12 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.सुरेश धस : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि. क्रमांक 42 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : सन 2013 चे वि.स.वि. क्रमांक 42 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. शुक्रवार, दिनांक 20 डिसेंबर, 2013 रोजी सकाळी 10.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक होईल. या विशेष बैठकीमध्ये सकाळी 10.00 ते 11.45 या वेळेत म.वि.प.नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 10 वाजून 48 मिनिटांनी शुक्रवार, दिनांक 20 डिसेंबर, 2013 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही